23-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SGJ/ AKN/ KTG/ 10:00

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

**पृ.शी.** :***राज्यात विशेषत: विदर्भात बियाणांचा मोठ्या प्रमाणात होत असलेला काळाबाजार***

**मु.शी.** :***राज्यात विशेषत: विदर्भात बियाणांचा मोठ्या प्रमाणात होत असलेला काळाबाजार*** यासंबंधी सर्वश्री ***श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री जयवंतराव जाधव, अनिल भोसले, दीपकराव साळुंखे,*** वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या.) : अध्यक्ष महाराज, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"***राज्यात विशेषत: विदर्भात बियाणांचा मोठ्या प्रमाणात होत असलेला काळाबाजार, त्यातच रासायनिक खताचाही अपूरा पूरवठा, नागपूर विभागातील चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांत धान, सोयाबीन या पिकांची तर वर्धा, नागपूर जिल्ह्यात सोयाबीन व कपासी या पिकांची मोठ्या प्रमाणात होणारी लागवण, विदर्भात मोठ्या प्रमाणात कृषी केंद्रात बोगस, निकृष्ट व नामांकीत नसलेल्या बियाणांची विक्री होत असल्याचे प्रकार, तसेच नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यामध्ये डाऊ कंपनी व एम.जी. १००० नागपूर या कंपनीचे बियाणे बोगस निघणे, यात सोयाबीन बिज उत्पादन कंपन्या असून त्यात महाबिज, खाजगी कंपन्या, अंकूर, ईगल, कृषीधन, ओसवाल सिड्स यासारख्या कंपन्या कार्यरत असून सदर कंपन्याच्या किंमतीत (MRP) तफावत आढळून येणे, त्यामुळे शेतकऱ्यांकडून अवाजवी भाव घेण्याचे प्रकार उघडकीस येणे, शेतकऱ्यांना पक्के बिल न देणे, कृषी केंद्रात उपलब्ध खतांची साठवणूक करुन जास्त भावात विक्री करणे, बोगस खताचा साठा अकोला, जि.मुर्तीजापूर येथे सापडूनही कृषी केंद्र चालक व विक्रेत्यांवर कोणतीही कठोर कारवाई न होणे, त्यामुळे विदर्भातील कृषी अधिकारी यांचे खते व बियाणे विक्रेत्यांशी असलेले लागेबांधे, कृषी अधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांनी याबाबत तक्रारी करुनही कारवाई न होणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने बियाणांचा काळाबाजार रोखून शेतकऱ्यांना न्याय देवून त्यांचे नुकसान टाळण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर त्वरीत करावयाची कारवाई व उपाययोजना.***"

श्री.राम शिंदे (कृषी राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.दीपकराव साळुंखे ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, महाबीजच्या बियाण्यांवर शेतकऱ्यांचा फार विश्वास आहे. परंतु महाबीजकडे बियाणे अपुरे असल्यामुळे शेतकऱ्यांना खाजगी बीज कंपन्यांकडे वळावे लागते. प्रत्यक्षात महाबीजचे 30 किलोचे बियाणे 1875/- रुपयांना मिळते तर अंकुरचे बियाणे 2430/- रुपये, ईगलचे 2310 रुपये, कृषीधनचे 2340/- रुपये आणि ओसवालचे बियाणे 2100/- रुपये या दराने विकले जाते. बियाण्यांच्या संदर्भात वेगवेगळे व वाढीव दराने शेतकऱ्यांना बी-बियाणे विकत घ्यावे लागत असल्यामुळे शेतकऱ्यांची खाजगी कंपनीच्या बियाण्यांमुळे फसवणूक होत असते. त्यामुळे मी शासनाला विनंती करते की, या सगळया बियाण्यांचे रेट महाबीजच्या बियाण्यांच्या रेट प्रमाणे केले जाणार आहे काय, किंवा भविष्यात केले जातील काय ?

सभापती महोदय, शेतकऱ्यांची खाजगी बी-बियाण्यांकडून प्रचंड लूट होत असते. महाराष्ट्रामध्ये एकंदर 3074 गुणवत्ता निरीक्षक आहेत. परंतु गडचिरोली जिल्हयातील देसाईगंज येथील श्रीमती मोनिका वाघमारे यांच्या परवाना प्राप्त पारस कृषी केंद्रातून श्री. कमलाकर राऊत यांनी 125 दिवसात निघणारे उन्हाळी धानाचे बियाणे खरेदी केले होते. परंतु हंगाम संपत आल्यानंतर देखील बियाण्याला अंकुर सुध्दा फुटले नसल्यामुळे या शेतकऱ्याची घोर फसवणूक झालेली आहे. बियाणे न उगवल्यामुळे सदर शेतकऱ्याने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार केली. या शेतकऱ्याच्या शेतीचा पंचनामा देखील केला गेला. परंतु अद्याप पर्यंत संबंधित कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही, शेतकऱ्याला कोणत्याही प्रकारचा न्याय मिळालेला नसल्यामुळे संबंधित शेतकऱ्याला शासन तातडीने न्याय मिळवून देणार आहे काय व सर्व बी-बियाणे एका छत्राखाली आणून एकाच दराने वितरीत केले जाणार आहे काय ?

श्री. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. महाबीज बियाणे उत्पादक कंपनी ही शासनाच्या आधिपत्याखाली येत असून पुरवठा, वितरण व विक्री व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन, अधिनियम 2009 च्या अंतर्गत फक्त कापसाच्या बियाण्याचाच आपण रेट ठरवित असतो व इतर कोणत्याही बियाण्यांचा रेट आपण ठरवित नाही. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, खाजगी कंपन्या बियाणे विकत असतात व त्या कपंन्याचे दर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राम शिंदे.......

खाली वर होत असतात. यामध्ये एकत्रितरीत्या सर्वाचे रेट नियंत्रण शासनाने या कायद्याच्या अंतर्गत आणून निश्चित स्वरुपात अतिशय सकारात्मक विचार करुन यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असाही प्रश्न विचारला होता की, कमलाकर राऊत या शेतकऱ्याने खाजगी कंपनीकडून बियाणे विकत घेतले होते व त्यामध्ये त्या शेतकऱ्याची जी फसवणूक झाली, जे बियाणे उगवलेच नाही आणि त्याची आशा कालखंडात फसवणूक झाली. पर्टीक्यूलर या केसेसच्या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मार्फत, यामध्ये पंचनामा काय झाला, कोणत्या कंपनीचे बियाणे खरेदी केले होते, ते बियाणे का उगवले नाही, बियाणे नेमके डुप्लीकेट होते की, काय होते, त्याच्यामागे काय हेतू होता या सर्व गोष्टीचा तपशीलवार आणि बाबवार त्याची संपूर्णतः डिटेल चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल आणि त्यासंदर्भामध्ये तात्काळ दखल घेण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने बियाणे व खते बांधावर देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आताचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे आणि आम्ही खते आणि बियाणे शेतकऱ्यांच्या बांधावर दिली जावित अशी मागणी केली होती. आमच्याभागात आम्ही हा कार्यक्रम राबविलेला आहे. त्यामुळे 75 टक्के बियाणे आणि खते पेरणी पूर्वी, पाऊस होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या दारात जाईल अशी हमी राज्य शासनाने घेतली होती त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली, किती सोसायटयांनी, किती बँकानी तातडीने कर्ज दिले आणि कर्ज न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी खते किंवा बियाणे घेतले नाही अशी आकडेवारी राज्य शासनाकडे आज उपलब्ध आहे काय ? सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब ही गंभीर बाब आहे. खाजगी बियाणे उत्पादक डूप्लीकेट बियाणे विकतात व डुप्लीकेट बियाण्यांमुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते. मंत्री महोदय आपण सुध्दा शेतकरी आहात. एका शेताला कीड लागली तर त्या शेताच्या जवळच्या शेतातही कीड लागत असते. त्यामुळे किमान या तीन महिन्यात आपल्या खात्याचे अधिकारी गावपातळीपासून ते तालुका पातळीपर्यंत आहेत. ते प्रभावीपणे पेरणी होण्यापूर्वी कामे करतील अशी अपेक्षा आम्ही करावी काय ?

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्यासंदर्भात शासनाने बांधावर खते देण्याच्या संदर्भात धोरण घेतलेले आहे. त्यानुसार यावेळेस खरीप हंगामाकरिता राज्य शासनाने 16.64 लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सूचना केल्या होत्या. त्याच्या अगेन्स्ट 17.10 लाख क्विंटल एवढे जास्तीचे बियाणे या खरीप हंगामात उपलब्ध करुन दिले होते. त्याच बरोबर 41.75 लाख मेट्रीक टन खरीप हंगामात उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आराखडयामध्ये जे काही ठरले होते त्या प्रमाणे खते सुध्दा उपलब्ध करुन दिले आहे. खते आणि बियाणे उपलब्ध झाली नाही अशी राज्यामध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. दुर्दैवाने पाऊस सुध्दा कमी झाल्यामुळे ती अडचण भासली नाही. मुर्तीजापूर येथे खताच्या संदर्भात जे प्रकरण घडले त्यासंदर्भात आपण पोलीस केसेस दाखल केलेल्या आहेत. बनावट खत तयार करण्याच्या संदर्भात ॲग्रो इनपूट्स या फर्मच्या नावाने एक व्यक्ती घरीच मिठाला केमिकल चोळून डूप्लीकेट खत बनवित होता त्यासंदर्भात दखल घेऊन पोलीस केस दाखल केली असून त्या ठिकाणचा मुद्देमाल व साठा जप्त करुन त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, काही शेतकऱ्यांनी बीटी बियाण्यांचे भाव कमी होण्याच्या अगोदर बीटी बियाणे खरेदी केले होते. त्यामुळे त्यांना 100 रुपये फरकाची रक्कम शासनाने कंपनीला देण्याबाबत सांगितले होते परंतु हायकोर्टात ही केस असल्यामुळे त्या कंपनीचे अपील फेटाळले व शासनाचा निर्णय कायम केला. त्यामुळे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, शेतकऱ्यांना कंपनीकडून बीटी बियाण्यांच्या संदर्भातील फरकाची रक्कम शासन मिळवून देणार काय व ही रक्कम किती दिवसात मिळवून दिली जाणार आहे ?

श्री. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जानकर साहेबांनी बीटी कॉटनच्या संदर्भात जो प्रश्न विचारला, आणि महाराष्ट्र कापूस बी-बियाणे अधिनियम 2009 च्या अंतर्गत राज्य शासनाने विनियमन जे राज्य सरकारच्या अधिपत्याखाली आहे त्याच्यामध्ये 100 रुपयांने त्या बियाण्याची किंमत 8 जून, 2015 रोजी आपण केलेली आहे. कमी केलेल्या दरानुसारच हे बियाणे तेवढयाच किंमतीने विकले गेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, बियाण्याची किंमत वाढवावी, कमी करावी असा कुठलाही प्रश्न उपस्थित झालेला नाही. ज्या किंमतीने बियाणे विकावयाचे होते त्याच किंमतीने बियाणे विकण्यात आले आहे.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवी : सभापती महोदय, मी थोडी दुरुस्ती करु इच्छिते. शासनाने बीटी बियाण्यांचे भाव 100 रुपये कमी करण्याच्या अगोदर काही शेतकऱ्यांनी कंपनीकडून बियाणे खरेदी केले होते. बियाण्यांचा स्टॉक तोच होता. त्यामुळे बियाण्याच्या फरकाची रक्कम शेतकऱ्यांनी कपंन्याकडे मागितली. कंपनीने हायकोर्टात केस आहे असे सांगितले. परंतु हायकोर्टात कंपनीचे अपील फेटाळले व फरकाची रक्कम देण्यासंदर्भात आदेश दिले. त्यामुळे फरकाचे पैसे शासन शेतकऱ्यांना देणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, शेतकऱ्याची फसवणूक झाल्यानंतर आपण कंपन्यांवर कारवाई करीत असतो. शेतकऱ्याचे सोयाबीनच्या पिकामध्ये नुकसान झाले तर शेतकरी पुन्हा सोयाबीन पेरु शकत नाही. खरे म्हणजे त्या शेतकऱ्याचे वर्षभराचे आणि आयुष्यभराचे नुकसान होत असते. आपल्या राज्यात 374 गुणवत्ता निरीक्षक आहेत. अशा वेळी खाजगी बीज कंपन्या असो किंवा महाबीज असो. महाबीज कंपनी आपली कंपनी असल्यामुळे या कंपनीवर आपला आणि शेतकऱ्यांचाही विश्वास आहे. खाजगी कंपनीच्या बियाण्यांच्या बाबतीत नेहमी नेहमी तक्रारी येत असतात. त्यामुळे शासन खाजगी कंपन्या कडून त्यांच्या बियाण्यांच्या बाबतीत चांगली लागण आहे, उत्तम प्रतीचे बियाणे आहे अशा पध्दतीचे प्रमाणपत्र घेतल्यानंतरच बियाणे विकण्याची परवानगी देणार आहे काय, आणि शेतकऱ्यांची फसवणूक टाळणार आहे काय ?

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस...

शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यानंतर कंपन्यावर कारवाई करतो. पण त्या कारवाईचा कंपन्यांवर काही परिणाम होताना दिसत नाही. त्यामुळे खाजगी कंपन्या, बोगस कंपन्या शेतकऱ्यांची फसवणूक करीतच असतात. तेव्हा शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्याविरुध्द कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने कायद्यात कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन कोणतीही कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करण्यास धजावणार नाही. शेतकऱ्याची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांना जास्तीत जास्त शिक्षा देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने दिनांक 8 जून, 2015 बी.टी.कॉटन बियाण्यांची 100 रुपये कमी किमतीने विक्री करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या संदर्भातील केस माननीय उच्च न्यायलयात प्रलंबित आहे. दिनांक 8 जून, 2015 नंतर कोणत्याही बियाणे विक्रेत्याने असा प्रकार केला याची माहिती त्यांनी दिली तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. 8 जून नंतर शेतकऱ्यांना मूळ किमतीपेक्षा 100 रूपये जास्त लावून विक्री केली असेल तर त्याला त्या संदर्भात सूचना देण्यात येतील आणि त्यांना पैसे परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्याच बरोबर शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होऊ नये या दृष्टीकोनातून कॉटन बियाणां व्यतिरिक्त इतर बियाणे एकत्रितरित्या एका नियंत्रणाखाली विनियम 2009 च्या कायद्या अंतर्गत आणण्याच्या संदर्भात शासन सकारात्मक दृष्टीकोनातून तपासून योग्य ती कार्यवाही करील.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : यवतमाळ जिल्ह्यतील यावली येथे दारुबंदीसाठी आग्रह धरणारे पोलीस पाटील श्री.राठोड यांची करण्यात आलेली निर्घृण हत्या

**मु. शी.** : यवतमाळ जिल्ह्यतील यावली येथे दारुबंदीसाठी आग्रह धरणारे पोलीस पाटील श्री.राठोड यांची करण्यात आलेली निर्घृण हत्या यासंबंधी सर्वश्री संदीप बाजोरिया, संजय दत्त, शरद रणपिसे, भाई जगताप,प्रकाश गजभिये, हेमंत टकले, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संदीप बाजोरिया ( यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यवतमाळ जिल्ह्यातील यावली येथे दारुबंदीसाठी आग्रह धरणाऱ्या पोलीस पाटील श्री. राठोड यांची दिनांक 3 जुलै, 2015 रोजी दगडाने डोके ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना घडणे, राठोड यांचा गावातील अवैध धंद्यांना कायम विरोध असणे, यवतमाळ जिल्ह्यात दारुबंदीची चळवळ जोर धरत असतानाच राठोड याची झालेली हत्या ही दुर्देवी असून या घटनेतील आरोपींना लवकरात लवकर पकडून त्यांना कठोर शिक्षा करण्यात यावी अशी ग्रामस्थांची मागणी असणे, राज्यशासनाने सदरील घटनेची दखल घेऊन श्री.राठोड यांच्या मारेकऱ्यांना अटक करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.राम शिंदे ( गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे ):** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. माननीय गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यांनी त्या ठिकाणी दौरा देखील केला होता. यवतमाळ जिल्ह्यामध्ये दारूबंदीचे मोठे आंदोलन छेडलेले आहे आणि त्या पार्श्वभूमीवर ही घटना घडलेली आहे. पोलीस पाटलाची हत्या होण्यापूर्वी चार दिवस अगोदर पोलीस पाटीलांनी एक दारूची गाडी पडकली होती. ती गाडी पोलीस स्टेशनमध्ये जमा केलेली आहे. श्री.विलास पवार हा गावठी दारूची विक्री करणारा मुख्य एजंट आहे. दारूची गाडी पकडल्यामुळे पोलीस पाटलाच्या हत्येचा कट रचण्यात आला. हे पोलीस पाटील अतिशय सद्‌गृहस्थ असून ते संपन्न घरातील आहेत. त्यांची 70 एकर ओलिताची शेती आहे. ते उच्च शिक्षित आहेत. त्यांची दोन्ही मुले चांगल्या कंपनीमध्ये नोकरीस आहेत. पोलीस पाटील दारूबंदीचे प्रखर पुरस्कर्ते होते. त्यांनी मागील चार-पाच वर्षापासून दारूबंदीचे चांगले काम केलेले आहेत. अशा व्यक्तीचा कट करुन त्यांची दिनांक 3 जुलै, 2015 रोजी हत्या करण्यात आली. ज्यादिवशी त्यांची हत्या झाली त्यादिवशी ते रात्री कोलाम पोड येथे गेले होते. तेथून दोन कि.मी. अंतरावर पोलीस चौकी आहे. त्यांनी कोलाम पोड वरुन फोन केला त्याची नोंद आहे. तरी देखील पोलीस तीन तासात तेथे पोहोचले नाहीत. यातील मुख्य आरोपीला आठ दिवस पकडण्यात आले नाही. सुरूवातीला सहाजणांना अटक करण्यात आली. माननीय राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील यवतमाळ येथे आले होते, त्यावेळी आम्ही त्यांच्याकडे निवेदन दिले. त्यांनी आमची मागणी मान्य केली. त्यानंतर तीन दिवसांनी मुख्य आरोपीला पकडण्यात आले. माझे प्रश्न आहेत की, पकडण्यात आलेली दारूची गाडी कोणाची आहे ? मला गाडीमालकाचे नाव माहीत आहे. पण पोलीस विभागाने त्याबाबत चौकशी केली काय ? दारूचा अवैध व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीची ती गाडी होती. त्या गाडीचा मालक या हत्याकांडामध्ये सहभागी आहे काय, त्यासंबंधी आपल्याकडे काही माहिती आहे का, आपण त्याच्यावर कारवाई करणार आहात काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी यवतमाळ जिल्ह्यातील यावली येथे पोलीस पाटीलाची करण्यात आलेली हत्या यासंबंधी लक्षवेधी सूचना विचारली आहे. दिनांक 2 जुलै रोजी कोलाम पोड वस्तीवर एका दारु विक्रेत्याच्या संदर्भात भांडण सुरु होते. त्या संदर्भात पोलीस पाटल श्री .विरेंद्र रामराव राठोड यांना तेथे बोलाविण्यात आले. त्यांनी ते भांडण मिटविले. भांडणे मिटवून परत जात असताना रस्त्यामध्ये रात्री ही घटना घडली. दिनांक 3 रोजी सकाळी 6.00 वाजता त्याच्या पुतण्याने गुन्ह्याची नोंद केली. या प्रकरणामध्ये एकूण 11 आरोपी होते, त्यापैकी सहा आरोपींना त्याच दिवशी तत्काळ अटक करण्यात आली. मुख्य आरोपीसह बाकीच्या चार जणांना दिनांक 6 रोजी अटक करण्यात आली. या गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली. हा गुन्हा डिटेक्शन झाला. माननीय गृह राज्यमंत्री डॉ.रणजित पाटील हे त्या दिवशी दौऱ्यावर होते. आपण त्यांना निवेदन दिले असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी देखील अमरावतीच्या दौऱ्यावर होतो. मी सुद्धा त्या घटनेतील बाब तपासून पाहिली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पोलीस स्टेशनमध्ये फोन करुन सुद्धा पोलिसांनी काही रिस्पॉन्स दिला नाही. त्या संदर्भात सीडीआर प्राप्त करुन चौकशी करण्यात येईल. एखाद्या घटनेची बाब निदर्शनास आणून देखील सुद्धा त्याचा कॉग्नीजन्स घेतला नसेल तर त्या संदर्भात निश्चितपणे तपास करुन कडक स्वरुपाची कारवाई करण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली या तीन जिल्ह्यांमध्ये दारुबंदी झालेली आहे. एप्रिल महिन्यापासून चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दारुबंदी झालेली आहे. दुर्दैवाने यवतमाळ जिल्हा चंद्रपूर जिल्ह्याला लागून आहे. ज्यावेळी दारुबंदी होणार असे कळले त्याचवेळी यवतमाळ जिल्ह्यामध्ये अवैध दारु विक्रीची मोठी टीम तयार झाली. त्यांना मोटारसायकल देण्यात आल्या. कोणी मेल्यानंतर चौकशी करण्यापेक्षा किंवा अवैध दारु पकडल्यानंतर गुन्हा दाखल करण्यापेक्षा त्या अगोदर कारवाई झाली पाहिजे. वणीच्या बॉर्डरवर दारु विक्रेते कॅम्प करुन आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील दारु मोठ्या प्रमाणात चंद्रपूर जिल्ह्यात येत आहे. तेव्हा या संदर्भात एक मोहीम राबवून शासन अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर ताबडतोब कारवाई करणार काय ? चंद्रपूर जिल्ह्यामध्ये खऱ्या अर्थाने दारुबंदी यशस्वी होण्याच्या सरकार दृष्टीने पाऊल उचलणार काय ?

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा या तीन जिल्ह्यांमध्ये राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. सरकार निश्चितपणे सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये गेल्या वर्षी जून 2014 पर्यंत 1160 गुन्हे घडले होते. या वर्षी 1454 गुन्हे घडले आहेत आणि हे सर्व गुन्हे डिटेक्शन झालेले आहेत. आपण दारूबंदीचे धोरण अवलंबित असताना बॉर्डरचे काही जिल्हे, बॉर्डरचे स्टेट येथून दारूची अवैधरित्या वाहतूक होते. ही वाहतूक रात्रीच्यावेळी होते. मी नागपूर, गडचिरोली आणि अमरावती विभागाची मिटींग घेतली होती त्या मिटींगमध्ये माझ्याशी निदर्शनास ही बाब आली. मी त्यावेळी सर्व एस.पी.ना सूचना दिल्या की, शासनाने दारूबंदीचे धोरण स्वीकारले असेल तर दारूबंदी झाली पाहिजे. दारूबंदी झाल्यानंतर अवैधरित्या दारु विक्री सुरु राहणे, ही काही चांगली गोष्ट नाही. दारूबंदीच्या संदर्भात अनेक महिला पुढे येत आहेत. आम्ही आय.जी.ना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. महिलांच्या सहभागाने ग्रामसभेमध्ये दारूबंदीचा ठराव आला तर या गावातील दारु विक्री बंद केली जाते. दारूबंदीच्या संदर्भात जनतेमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात अव्हेरनेस येण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे....

म्हणून जनतेनेच हे शास्त्र स्वीकारले तर निश्चितपणे या अनुषंगाने बंदी आणली जाईल. पोलीस या कामी सातत्याने सहकार्य करीत आहेत आणि प्रयत्न सुध्दा करीत आहेत. यापुढे सुध्दा ते सहकार्य करीत राहतील. स्थानिक गुन्हे शाखा किंवा विशेष पथक नेमण्याच्या बाबतीत प्रयत्न केले जात आहेत. परंतु एकदा विशेष ड्राईव्ह घेऊन या तीन जिल्ह्यांच्या बाबतीत कायमस्वरुपी आणि प्रभावीपणे दारुबंदी करण्याच्या बाबतीत सरकार विशेष प्रयत्न करेल, एवढेच या निमित्ताने सांगतो.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, शासनाने जिल्ह्याजिल्ह्यांत दारुबंदी करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे, याबद्दल मी सरकारचे आभार मानतो. परंतु अशा प्रकारचे प्रयत्न करुनही त्यातून फारसे काही साध्य होत नाही. चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी करण्यात आली आहे. परंतु त्या भागातील दारु विक्रेते दारु विकण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या करीत आहेत. पूर्वी बाहेरच्या जिल्ह्यातील दारु चंद्रपूरमध्ये येत होती. परंतु आज चंद्रपूरमध्ये दारु पोहचविण्याची अभिनव योजना सुरु झाली आहे. फोन केल्यानंतर घरपोच दारु मिळते. मी माननीय राज्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, हा सरकारचा अभिनव उपक्रम आहे काय ? ज्यांना सरकारकडून दारु पाहिजे त्यांनी फोन केल्यानंतर त्यांना दारु मिळते. सन्माननीय सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. सभापती महोदय, या अतिसंवेदनशील सरकारच्या काळात एका पोलीस पाटलाची हत्या झाली आहे. मी विचारु इच्छितो की, राज्यात किती पोलीस पाटील आहेत आणि सरकार त्यांना पोलीस संरक्षण देणार आहे की नाही ? आज राज्यामध्ये आमदारांवर हल्ले होतात. आता पोलीस पाटलावर हल्ला करुन, त्यांचा खून करण्यात आला आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, गावागावांमध्ये जे पोलीस पाटील पोलिसांची जबाबदारी सांभाळतात त्यांना संरक्षण देण्यात येईल काय, तसेच यवतमाळ जिल्ह्यामध्ये दारुबंदी केव्हा करणार आहात ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, शासन सर्व पोलीस पाटलांची काळजी घेत आहे. जो प्रकार घडलेला आहे त्या बाबतीत मी सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर दिलेले आहे. हा गुन्हा डिटेक्ट होऊन आरोपींना पोलीस



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे....

कस्टडी झाली आणि आता ते न्यायालयीन कोठडीत आहे. आजपावेतो या घटनेतील आरोपी अटक आहेत. सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, चंद्रपूर जिल्ह्यात फोन केल्यानंतर दारु मिळते. या बाबतीत त्यांचा काय अनुभव आहे हे माहीत नाही. कोणी फोन केला आणि कोणाला दारु पोहचविली हे माहीत नाही.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदय, हा प्रश्न गंभीर आहे.

प्रा.राम शिंदे : होय. हा प्रश्न गंभीर असून, मी तो गांभीर्याने घेतला आहे. दारुबंदी झालेल्या जिल्ह्यात फोन केल्यानंतर दारु मिळते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. असे होत असेल तर यासाठी दोन व्यक्तींमध्ये इंटरॲक्शन होते. त्यानंतर त्या ठिकाणी दारु पोहचविली जाते. ज्याला दारु पोहोच झाली आहे त्याने या बाबत तक्रार करुन ही गोष्ट निदर्शनास आणून दिली पाहिजे. जो दारु पोहोच करतो तो ही बाब निदर्शनास आणून देण्याची शक्यता नाही. परंतु सन्माननीय सदस्यांचा काही अनुभव असेल किंवा त्यांची पर्टीक्युलर काही केस असेल तर त्यांनी सांगावे. सन्माननीय सदस्यांचा या मागील हेतू अतिशय चांगला आहे....(अडथळा) सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांच्या मनात काहीही प्रश्न राहणार नाहीत याची मी सर्व काळजी घेईन. माझ्या उत्तराने सन्माननीय सदस्यांचे पूर्ण समाधान होईल. त्यामुळे....

**तालिका सभापती** (श्री.दीपकराव साळुंखे) : आज लेकमान्य टिळकांची जयंती असल्यामुळे त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यासाठी जावयाचे आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना ऑनलेग ठेवून, मी सभागृहाची बैठक सकाळी 10.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.25 ते 10.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

**पृ.शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील यावली येथे दारूबंदीसाठी आग्रह धरणारे पोलीस पाटील श्री. राठोड यांची करण्यात आलेली निर्घृण हत्या

**मु.शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील यावली येथे दारूबंदीसाठी आग्रह धरणारे पोलीस पाटील श्री. राठोड यांची करण्यात आलेली निर्घृण हत्या यासंबंधी ***सर्वश्री संदिप बाजोरिया, संजय दत्त, शरद रणपिसे, भाई जगताप, प्रकाश गजभिये, हेमंत टकले, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना***

( चर्चा पुढे सुरू....

श्री. संदीप बाजोरिया : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 3 सुरू आहे. माझ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर माननीय गृहमंत्र्यांनी दिले नव्हते. मी त्या संदर्भात पुन्हा विनंती करतो. हत्याकांडाच्या 2 दिवसांपूर्वी दारूची गाडी पकडली होती, त्या गाडीमालकाचा हत्याकांडाशी काही संबंध आहे का याची चौकशी करणार का, आपल्याकडे या संदर्भातील काही माहिती आहे का, माहिती असेल तर आपण सांगणार का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. पोलीस पाटलांचा मर्डर झाला, त्यामध्ये दारू विक्रेत्याची गाडी वापरात आली, पोलीस स्टेशनमध्ये ती जप्त आहे. सदर बाबतीत सखोल चौकशी करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यानी विषय उपस्थित केला. सभापती महोदय, त्या संदर्भातील सर्व शक्यता पडताळून पाहून योग्य ती चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. अनिल सोले : सभापती महोदय, दारूबंदीच्या संदर्भात चंद्रपूरमध्ये चांगला निकाल येत आहे, यामुळे या क्षेत्रात महिलांमध्ये फार चांगले वातावरण निर्माण झाले आहे. परंतु त्यानंतर यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दारू बंदी बाबतीतील आंदोलने सुरू झाली आहेत. यवतमाळ जिल्ह्यात ही एक घटना घडली, ज्या घटनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. संदीप बाजोरिया यांनी लक्षवेधी सूचना आणली आहे. परंतु अनेक ठिकाणी जे दारूबंदीकरिताचे काम करीत आहेत त्यांना प्रेशराईज करण्यात येत आहे. दारूबंदीच्या संदर्भात 7-8 हजार लोकांचे मोर्चे निघत आहेत. शासनाने आंदोलनातील महिला-पुरूषांना संरक्षण देण्याचा विचार करून शासनाने त्या दृष्टीने काही उपाययोजना केल्या आहेत का, चंद्रपूरमध्ये ज्याप्रमाणे दारूबंदी केली त्याप्रमाणे यवतमाळ जिलह्यामध्ये सुध्दा दारूबंदी करण्याचा शासनाचा मानस आहे का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. अनिल सोले साहेबांनी प्रश्न विचारला. मोर्चे, आंदोलने निघतात, त्यांना पोलिसांचे संरक्षण दिले जाते. परंतु पर्टिक्युलर केसमध्ये पोलीस पाटलांचा मर्डर झाला. दारू विक्रेत्यांच्या विरोधात, ॲक्टिव्हिटी केल्यानंतर काय कार्यवाही केली जाते .... निश्चित स्वरूपामध्ये त्यांचे संरक्षण करण्याच्या संदर्भात शासन प्रयत्नशील राहील. शासनाकडे यवतमाळच्या दारूबंदीचा कोणत्याही स्वरूपाचा प्रस्ताव अजून प्राप्त झालेला नाही. आता सध्या तरी गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा जिल्ह्यात दारूबंदी सुरु आहे. निश्चित स्वरूपामध्ये या संदर्भात जर काही निवेदन प्राप्त झाले किंवा प्रस्ताव प्राप्त झाला तर त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, चंद्रपूरमध्ये दारूबंदीचा निर्णय होण्यासाठी तेथे प्रचंड जनआंदोलने झाली. 800 गावात दारूबंदीची अंमलबजावणी झाल्यानंतर जिल्ह्यामध्ये दारूबंदीची मागणी झाली. महाराष्ट्रात अनेक गावांत महिलांनी दारूबंदीचे ठराव केले आहेत. माननीय गृह राज्यमंत्र्यांना, माननीय मुख्यमंत्र्यांना, माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांना याची कल्पना आहे. मी या संदर्भात मार्चच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात, डिसेंबरच्या हिवाळी अधिवेशनात प्रश्न विचारले होते. गावागावंचे दारूबंदीचे ठराव घेऊन मतदान घेतले गेले पाहिजे. परंतु प्रत्यक्षात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) D.3

MSK/ KTG/ AKN/ पूर्वी श्री. बोर्डे 10:45

डॉ. नीलम गोऱ्हे ....

मतदान न घेता 2, 3, 4 वर्षे हे ठराव प्रलंबित आहेत. उत्पादन शुल्क विभागाचा या बाबीशी संबंध आहे, गृह विभागाचा संबंध आहे. माझा प्रश्न असा आहे की, दारूबंदीच्या प्रलंबित ठरावांबाबत योग्य ती पावले उचलून पुढील महिनाभराच्या काळात येथे मतदान घेऊन, उभी बाटलीची आडवी बाटली करण्याच्या संदर्भात महिलांच्या पाठीमागे शासन उभे राहील का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न मांडला. दारूबंदीच्या संदर्भात ग्रामसभेत ठराव आल्यानंतर निश्चित स्वरूपात कार्यवाही करणे अपेक्षित आहे. गेल्याही वेळी या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देताना सांगतले होते की, सर्वांना परत एकदा रिमाईंड सूचना देण्यात येतील आणि महाराष्ट्र शासनाच्या ज्या काही स्टँडर्ड गाईडलाईन्स आहेत, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सूचित करण्यात येईल. एखाद्या पटिक्यूलर केसमध्ये जर ठराव होऊनही त्यावर कार्यवाही होत नसेल तर त्या प्रलंबित केसमध्ये विशेष लक्ष देऊन कार्यवाही करण्याच्या संदर्भातही सूचना देण्यात येतील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, यवतमाळ तालुका, जिल्हा येथील यावली गावातील पोलीस पाटील विरेंद्र शामराव राठोड यांनी त्यांच्या गावात दारूबंदीची मोहिम सुरूकेल्यामुळे सुपारी देऊन त्यांचा दारूबंदीला विरोध करणाऱ्या लोकांकडून खून करण्यात आला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मालाड-मालवणी येथे विषारी दारु प्यायल्यामुळे 100 ते 125 लोकांचा मृत्यू झाला आहे. सद्य:स्थितीत राज्यात चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा या जिल्ह्यात दारुबंदी करण्यात आली आहे. तथापि, या जिल्ह्यांमध्ये अवैध मार्गाने अन्य जिल्ह्यातून दारु आणली जाते, त्यावर प्रतिबंध होत नाही. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात दारुबंदी करण्यासंबंधी शासन विचार करणार आहे का ?

सभापती महोदय, दारु अन्नधान्य, औषधे, खाद्यपदार्थ या सारख्या अन्य बाबींमध्ये भेसळ करणाऱ्यांना कॅपिटल पनिशमेंटची तरतूद अन्य राष्ट्रांनी केलेली आहे. अशाच प्रकारे आपले शासन लोकांच्या आयुष्याशी खेळ करणाऱ्या लोकांसाठी फाशीच्या शिक्षेची तरतूद करणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, राज्य शासनाने नुकतीच चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी केली आहे. त्यापूर्वी वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात दारुबंदी करण्यात आलेली आहे. या दारुबंदीचा परिणाम काय आहे, या बाबतचा सविस्तर अभ्यास शासनाला करावा लागेल.

सभापती महोदय, मुळात दारुविषयी राज्य शासनाचे धोरण हे प्रोहिबिशनचेच असल्याने ते रेग्युलेट व्हावे, यासाठी आपण लायसन्स देत असतो. आंध्र प्रदेश सरकारने संपूर्ण राज्यात दारुबंदी केल्यानंतर बाजुबाजूच्या राज्यातून मोठ्या प्रमाणात दारु स्मगल होऊ लागली. त्यामुळे एखादा निर्णय घेत असताना तो इफेक्टिव्हली राबविता आला पाहिजे.

सभापती महोदय, आज पोलीस विभागावर कामाचा खूप ताण आहे. संपूर्ण पोलीस दल आपण दारुबंदी धोरणाच्या अंमलबजावणीसाठी लावू शकू का, हा देखील प्रश्न आहे. त्यामुळे दारुबंदी हे तत्व आपल्याला तत्वत: बरोबर वाटत असले तरी वस्तुस्थिती वेगळी आहे. कारण, अनेक आव्हाने पोलीस विभागासमोर आहेत. अशा प्रकारचा निर्णय घेत असताना इम्प्लिकेशनचा विचार केला पाहिजे. या सर्व परिस्थितीत राज्य सरकार याबाबत तातडीने, आज काही निर्णय घोषित करण्याच्या परिस्थितीत नाही. आपण या संदर्भातील आढावा घेऊ आणि त्या आधारावर निर्णय होऊ शकेल.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी कॅपिटल पनिशमेंटबाबतचाही मुद्दा मांडला आहे. राज्य सरकार त्यांच्याशी सहमत आहे. भेसळ करणाऱ्यांना अतिशय कडक शिक्षा झाली पाहिजे. म्हणूनच आपण मालाड-मालवणी या घटनेतील गुन्हेगारांवर कलम 302 अन्वये गुन्हा दाखल केला आहे, ज्याअन्वये आपल्याला फाशीच्या शिक्षेची मागणी करता येते. त्यामुळे या संदर्भात राज्य सरकार गंभीर आहे. हे केंद्रीय कायदे आहेत. म्हणून भविष्यात कायद्यात काही बदल करावे लागले तरी केंद्र सरकारशी चर्चा करुन राज्य सरकार सकारात्मक विचार करील.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, नगरपालिका किंवा महानगरपालिका क्षेत्रामध्ये दारुबंदीसाठी वॉर्डनिहाय मतदान घेतले जाते. ग्राम पंचायत स्तरावर संपूर्ण ग्राम पंचायत क्षेत्रासाठी मतदान घेतले जाते. तथापि, हे मतदान कशा प्रकारे घ्यावे, याबाबत वाद निर्माण होतो. मतदानासाठी एकूण लोकसंख्येपैकी 50 टक्के महिला उपस्थित असल्या पाहिजेत आणि त्यांनी बहुमताने ठरावाच्या बाजूने मतदान केले तर ठराव मंजूर झाला, असे समजले जाते. मध्यंतरी असेही ठरविण्यात आले की, एकूण उपस्थित महिलांपैकी 50 टक्के महिलांनी ठरावाच्या बाजूने मतदान केल्यास ठराव मंजूर झाला, असे समजले जाईल. याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे, याचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दारुबंदीसाठी मतदानाव्दारे प्रक्रिया राबवावी किंवा कसे, याबाबत मतभिन्नता होती आणि वेगवेगळ्या प्रकारे मागण्याही करण्यात आल्या होत्या. यापूर्वी ग्राम पंचायतीच्या सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केला तर बंदीबाबतचा विचार आपण करीत होतो. नंतरच्या कालावधीत या संदर्भात उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या दाव्यामध्ये न्यायालयाचे निदेश प्राप्त झाले आणि शासनाने नवीन धोरण स्विकारले. महिलांनी मतदानाव्दारे बहुमताने मागणी केली तर दारु विक्रीचे लायसन्स रद्द करण्यासंबंधी सरकार विचार करील. संबंधित वॉर्डमधील किंवा प्रभागामधील मतदार यादीत समाविष्ट असलेल्या एकूण महिलांपैकी 50 टक्के महिलांनी मतदान केले पाहिजे, अशा प्रकारचा निर्णय झाला होता. आता

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे......

उपस्थित असलेल्या परंतु त्या प्रभागात रहात असलेल्या म्हणजेच मतदार यादीतील 50 टक्के महिला उपस्थित रहाव्यात, असे आहे. कारण, महिला गोळा करण्यासाठी वेळ लागत नाही. निश्चित धोरण हेच ठरले आहे की, मतदार यादीतील 50 टक्के महिला उपस्थित असल्या पाहिजेत आणि त्यापैकी 50 टक्के महिलांनी दारूबंदीची मागणी केल्यास त्याचा विचार करता येईल.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, सभागृहात मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. यवतमाळ जिल्ह्यात पोलीस पाटलाची निघृण हत्या झाल्यामुळे हा प्रश्न उपस्थित झाला. ही घटना घडल्यानंतर जिल्हाधिकारी किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी घटनास्थळाला भेट दिली नसल्याने लोकांमध्ये नाराजीची भावना होती. म्हणून तेथील लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर कँडल मार्च काढला. या सर्व लोकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. हे गुन्हे शासन परत घेण्याची शिफारस करणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, शासनाने एक नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्या अंतर्गत कोणत्या केसेस परत घ्याव्यात व कोणत्या घेऊ नयेत, हे स्पेसिफाय केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या घटनेतील गुन्हे या शासन निर्णयात बसत असतील तर ते निश्चितपणे परत घेण्यात येतील.

-------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : बारवी धरणाची उंची वाढवून उपलब्ध जादा पाणी साठा कल्याण-डोंबिवली महापालिकेला देणे
**मु.शी.** : बारवी धरणाची उंची वाढवून उपलब्ध जादा पाणी साठा कल्याण-डोंबिवली महापालिकेला देणे यासंबंधी श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झालेल्या कल्याण, मोहने, टिटवाळा व डोंबिवली या भागातील पाण्याची वाढती गरज भागविण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून बारवी धरणाला दरवाजे न लावता धरणाची आरसीसीची उंची वाढविल्यास 2 टीएमसी पाणीसाठा वाढू शकतो व याबाबत त्वरीत निर्णय घेतल्यास जून - 2015 च्या महिन्यात हे काम पूर्ण होईल अशी सूचना लोकप्रतिनिधींनी केली होती, मा.जलसंपदा मंत्री यांनी देखील यास सहमती दर्शवून याप्रमाणे कार्यवाही केल्यावर अनेक भागाचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल तसेच 30 जूनपर्यंत बारवी धरणाची उंची वाढवून त्यातून उपलब्ध असलेला जादा पाण्याचा साठा कल्याण-डोंबिवली महापालिकेला देण्याचे आश्वासन मा.मंत्री महोदयांनी दिले असताना सुध्दा अद्याप या संबंधी कोणतीही कार्यवाही न झाल्याने पाणी समस्या चिघळलेली असणे, या भागातील रहिवाशांच्या पाण्याच्या प्रश्नाने गंभीर व उग्र रुप धारण केले असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता, याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, अनेक वर्षांपासून कल्याण-डोंबिवलीकरांना पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न भेडसावित आहे. वेळोवळी मी या सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला आहे. सर्वप्रथम दिनांक 17 एप्रिल, 2013 रोजी मी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सभापतीस्थानी असलेल्या उप सभापती महोदयांनी लक्षवेधीच्या उत्तरातून समाधान न झाल्यामुळे बैठक आयोजित करण्याचा निदेश दिला होता व त्याप्रमाणे या संदर्भात दोन बैठकाही झाल्या. त्यानंतर दिनांक 1-8-2013 रोजी मी पुन्हा लक्षवेधी सूचना उपस्थित केली.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्या माध्यमातून त्यांचे लक्ष याकडे वेधू इच्छितो की, तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आणि तत्कालीन उप मुख्यमंत्री महोदयांचा सहभाग असलेली उच्चाधिकार समितीची एक बैठक या संदर्भात झाली होती. त्या बैठकीमध्ये असा निर्णय झाला की, "नवी मुंबईला बारवी धरणातील पाण्याची सध्या आवश्यकता आहे. परंतु, मोरबा धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर बारवी धरणातील पाण्याची त्यांना आवश्यकता राहणार नाही. त्यावेळी नवी मुंबई महापालिका जे पाणी बारवी धरणातून उचलत आहे, ते पाणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात येईल."

सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मी मागील आठवड्यात दिली होती. सुरुवातीला ती मुख्यमंत्री महोदयांच्या विभागाकडे दाखविण्यात आली आणि त्यानंतर मग ती उद्योग मंत्री महोदयांच्या विभागाकडे वर्ग करण्यात आली. उद्योग मंत्री महोदय एक ज्येष्ठ नेते आहेत आणि त्यांच्या विषयी मला आदर आहे. परंतु, हा महत्वाचा विषय शासनाच्या दोन विभागांमध्ये रेंगाळतो आहे.

सभापती महोदय, आता मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी दिनांक 1-8-2013 रोजी ही लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली होती. तत्कालीन जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी या लक्षवेधी सूचनेतील चर्चेत दिलेले उत्तर मी आपल्याला वाचून दाखवितो. जेणेकरुन ही परिस्थिती अधिक स्पष्ट होईल. त्यांनी असे उत्तर दिले होते की, " ही वस्तुस्थिती आहे की, कल्याण-डोंबिवली महापालिकेला बारवी धरणातून प्रतीदिन 140 दशलक्ष लीटर पाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उपलब्ध करुन देण्याचा निर्णय त्यावेळी झालेला होता. दिनांक 16.11.2005 रोजी झालेल्या

...6....



श्री.संजय दत्त........

बैठकीमध्ये नवी मुंबईकरिता मोरबे धरणातून आवश्यकतेप्रमाणे पाणीपुरवठा झाला तर त्यांच्यासाठी उपलब्ध असलेले पाणी कल्याण-डोंबिवली महापालिकेला देण्याचा निर्णय झाला. उच्चाधिकार समितीची दिनांक 13.8.2009 रोजी बैठक झाली.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त........

उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये सुद्धा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला आज एमआयडीसी मार्फत पाणी उपलब्ध करुन दिले जाते त्याऐवजी थेटपणे पाणी उचलण्यास मान्यता देण्यात आली. परंतु, या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे." मंत्री महोदयांनी त्यावेळी हे मान्य केले होते आणि पुढे ते असे म्हणतात की, "त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे एमआयडीसी बरोबर जो करारनामा झाला होता तो रद्द करुन जलसंपदा विभागाकडून उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला थेटपणे पाणी देण्याचा निर्णय येत्या महिन्याभरात कार्यान्वित केला जाईल." सदरचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिनांक 01.08.2013 रोजी दिले होते. हा प्रश्न गंभीर आहे. सभागृहात याबाबत चर्चा होते. आपण पूर्वी विरोधी पक्षात असताना अनेक सार्वजनिक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आपण आज मुख्यमंत्री आहात. शेवटी, जनतेचा सभागृहावर विश्वास आहे. सभागृहात शासनाच्या वतीने मंत्री ज्यावेळी आश्वासन देतात त्यावर जनता विश्वास ठेवते. मी सांगू इच्छितो की, या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. मी दिनांक 27.03.2015 रोजी पुन्हा हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय जलसंपदा मंत्री श्री.गिरीष महाजन आणि माननीय जलसंपदा राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे साहेबांनी उत्तर दिले होते आणि त्यांनी पुन्हा हमी दिली की, तुम्ही हा प्रश्न उच्चाधिकार समितीकडे नेऊ नका. बारवी धरणाची उंची वाढविल्यानंतर जे 2 टीएमसी पाणी उपलब्ध होईल ते पाणी आम्ही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला वर्ग करु आणि तुमची समस्या सोडवू. माझी मुख्यमंत्री महोदयांना एवढीच कळकळीची विनंती आहे की, आपण कल्याण-डोंबिवलीकरांचा हा प्रश्न कायम स्वरुपी सोडवावा. आपण हा प्रश्न उच्चाधिकार समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करुन सोडविता किंवा कसे, हा तुमचा अधिकार आहे. आपण हा प्रश्न बारवी धरणाची उंची वाढवून सोडविता किंवा कसे, हा तुमचा अधिकार आहे. शेवटी, जनतेने काय करावयाचे ? रोज मोर्चे निघतात, आमच्या भगिनींना त्रास होतो. म्हणून शासनाने यावर काही तरी उपाययोजना केली पाहिजे.

सभापती महोदय, माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. उच्चाधिकार समितीने जो निर्णय घेतला होता त्या निर्णयाची अंमलबजावणी करुन शासन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला पाणी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त........

वर्ग करेल, का बारवी धरणाची उंची वाढवून 2 टीएमसी पाणी उपलब्ध होईल त्याचे वर्गीकरण करणार आहे आणि यासाठी विशिष्ट कालमर्यादा असावी. कारण, मंत्री महोदयांनी 30 जून रोजी आश्वासन दिले होते. ते रेकॉर्डवर आहे. परंतु 30 जून नंतर आता पर्यंत काहीच झालेले नाही. त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, 80 टक्के काम झोले आहे आणि आजही तीच परिस्थिती आहे, असे सांगण्यात येते. त्यामुळे माझी आपल्यामार्फत मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, कल्याण-डोंबिवलीकरानां विशिष्ट कालमर्यादा ठरवून पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सध्या कल्याण-डोंबिवलीकरांची 310 एमएलडी पाण्याची मागणी आहे आणि शासनाने फक्त 234 एमएलडीचा करार केलेला आहे. तो वाढवून 310 एमएलडीचा करण्यात येईल काय ? मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, अशी माझी विनंती आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्ता यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबद्दल मी प्रथम खुलासा करु इच्छितो की, शासनाच्या सर्व खात्यांमध्ये चांगला समन्वय आहे. आमच्यामध्ये कोणताही गैरसमज नाही. बारवी धरण एमआयडीसी मार्फत बांधण्यात येत आहे, याची आपणा सर्वांना माहिती आहे. यामध्ये सर्व गुंतवणूक, कामाची पूर्तता, पुनर्वसन ही संपूर्ण जबाबदारी एमआयडीसीची म्हणजे उद्योग विभागाची आहे. त्यामुळे उद्योग मंत्र्यांनी उत्तर देणे अपेक्षित असले पाहिजे.

सभापती महोदय, सन 2008 पासून या धरणाची उंची वाढविण्याचे काम बंद होते. त्यानंतर यासाठी प्रयत्न करण्यात आले. सन 2012 मध्ये या प्रयत्नांना थोडेसे यश आले आणि 31.69 कोटी रुपयांचे पुनर्वसनाचे उत्कृष्ट पॅकेज देण्यात आले. आपल्याकडे पुनर्वसनाच्या बाबतीत निलवंडे पॅटर्न प्रसिद्ध आहे, त्याचा अवलंब करण्यात आला आणि दरवाजे बसविणे वगैरे काम सुरु झाले. आता 2 महिन्यांचे काम शिल्लक असताना 6 गावे आणि 5 पाड्यांपैकी 5 गावांनी आणि 4 पाड्यांनी सहकार्य दिले. त्यांचे पुनर्वसन झाले आणि होत आहे. पुढील 3 महिन्यात ती सर्व कामे होतील.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई......

परंतु, तोंडली गाव आणि मानवली क्र.2 पाडा यांचा तीव्र विरोध आहे. ते तेथून हटायला तयार नाहीत. त्यांच्या बरोबर अनेक बैठका घेऊन त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, ते तेथून हटत नाहीत आणि अशा परिस्थितीत धरणाचे काम पूर्ण केले तर ती गावे पाण्यामध्ये बुडू शकतात. एवढे तर शासनाला कठोर होता येत नाही. त्यामुळे त्यांची समजूत काढून त्यांना दुसरीकडे हलविणे आवश्यक आहे. जे पुनर्वसनाचे पॅकेज आहे ते सर्वांनी मान्य केलेले आहे आणि ते याही गावांनी मान्य करावे, असा प्रयत्न आहे. ही गावे बुडित होऊ नयेत म्हणून काम रखडले आहे. सन्माननीय सदस्यांनी मान्य केलेले आहे की, 80 टक्के काम पूर्ण झाले आहे. मग उर्वरित 20 टक्के काम पूर्ण करण्यास काय हरकत आहे. यासाठी कोणतीही अडचण नाही, पैशांची अडचण नाही, इंजिनिअरिंगची देखील कोणती अडचण नाही. फक्त त्यांना नीट समजावून सांगून तेथून हटविणे गरजेचे आहे. काही वेळा हिंसक वळण लागते. पोलिसांना हस्तक्षेप करावा लागतो, असे वाईट दृश्य तेथे असू नये, अशी आमची इच्छा आहे. या संदर्भात मी देखील बैठक घेतली होती. लोकप्रतिनिधींनी देखील सहकार्य दिलेले आहे. हे सहकार्य अधिक दिले आणि एका गावाचा प्रश्न असल्यामुळे त्यामध्ये काही अडचण येऊ नये आणि आपण पुढील दोन-तीन महिन्यात हे काम पूर्ण करू मध्यंतरीच्या काळात या गावातील लोक न्यायालयात देखील गेले. परंतु, चर्चेतून प्रश्न सुटला तर सर्वच काम सुरळीत होऊ शकेल. नवी मुंबईला सध्या 65 एमएलडी पाणी दिले जाते. पूर्वी 120 एमएलडी पाणी दिले जात होते. परंतु, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने स्वत:ची पाणी पुरवठा योजना केलेली असल्यामुळे सध्या एमआयडीसीकडून केवळ 5 एमएलडी पाणी कल्याण-डोंबिवली शहराला पुरविले जाते. त्यामुळे उच्चाधिकार समितीच्या एका निर्णयाची अंमलबजावणी झालेलीच आहे. आता यातून मार्ग हाच आहे की, या धरणाची उंची आणि दरवाज्याचे काम पूर्ण झाले तर हा प्रश्न मिळू शकेल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. मी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, जे मंजूर पाणी आहे ते फक्त 234 एमएलडी आहे आणि सध्याची मागणी 310 एमएलडी आहे. त्यामुळे असे म्हणणे बरोबर नाही. मी सुरुवातीलाच माननीय उद्योग मंत्र्यांविषयी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त........

आदर व्यक्त करताना सांगितले होते की, मुख्यमंत्री महोदय उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष आहेत. मी ज्यावेळी या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती त्यावेळी जलसंपदा मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, बारवी धरणाची उंची वाढविल्यामुळे हा प्रश्न सुटेल. त्यावेळी मी भूमिका घेतली की, उच्चाधिकार समितीमध्ये हा निर्णय झाला की, बारवी धरणाची उंची वाढविण्याबाबतचा विचार करता येईल. आज कल्याण-डोंबिवलीकरांना पाणी पाहिजे आहे. त्यावेळी जी परिस्थिती होती, ती मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. तीच परिस्थिती आजही आहे. धरणाचे 80 टक्के काम पूर्ण झालेले आहे. माननीय उद्योग मंत्र्यांनी ज्या अडचणी सांगितल्या त्याची मला कल्पना आहे. ज्यावेळी मी या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती त्यावेळी देखील माननीय जलसंपदा मंत्र्यांनी हे सांगितले होते. त्याचे रेकॉर्ड मी आपल्याला देऊ शकतो. त्यामुळे चित्र बदलेले नाही आणि दोन-तीन महिन्यात काम होईल, असे गोलगोल उत्तर देऊन हा प्रश्न सुटणार नाही. हा प्रश्न गंभीर आहे. आपण या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घ्यावे. मी या संदर्भात तीन वर्षात तीन लक्षवेधी सूचना उपस्थित केलेल्या आहेत. माननीय उप सभापतींनी या संदर्भात तीन वेळा बैठक बोलाविली होती. कोणालाही दुखविण्याचा प्रश्न नाही. प्रश्न असा आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी हस्तक्षेप केला तर हा प्रश्न सुटू शकतो. म्हणून मी त्यांना विनंती केली होती. मी पुन्हा विनंती करतो की, उच्चाधिकार समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी किंवा बारवी धरणाच्या कामाबाबत मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय उद्योग मंत्र्यांनी अतिशय सुस्पष्ट उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरामध्ये कोणतीही ॲम्बिग्विटी नाही. परंतु, सन्माननीय सदस्यांचा असा आग्रह आहे की, उच्चाधिकार समिती मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असल्यामुळे त्यांच्या मार्फत आश्वासन असावे. मी अतिशय स्पष्टपणे सांगतो की, माननीय उद्योग मंत्र्यांनी जे सांगितले त्याचे तंतोतंत पालन केले जाईल. आता पावसाळा सुरु झालेला आहे. आपल्याला पावसाळ्यात काम करता येणार नाही. आता काम पूर्ण झालेले आहे, केवळ गेट्स बसवायचे आहेत आणि गेट्स लावण्याकरिता एकूण जी 6 गावे आहेत त्यापैकी 2 गावांचा प्रश्न आहे आणि त्यातही गेट्समुळे 25 घरे

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

पाण्याखाली जाणार आहेत. त्या 25 घरांचा मेजर प्रश्न आहे. या संदर्भात माननीय उद्योग मंत्री आणि मी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि त्यांना सांगितले की, जे काही पॅकेज द्यायचे असेल ते देऊन 25 घरांचा प्रश्न संपवा आणि हे काम पूर्ण करावे. त्यामुळे पावसाळा संपल्याबरोबर आम्ही या कामाची सुरुवात करु साधारणपणे या कामासाठी 2 महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तेवढ्या कालावधीमध्ये हे काम पूर्ण केले जाईल. स्वत: उद्योग मंत्री आणि मी या कामावर पूर्ण देखरेख ठेऊ आणि कल्याण-डोंबिवलीला पाणी मिळाले पाहिजे, याबद्दल दुसरी कोणती भावना असण्याचे कारणच नाही. किंबहुना तेथील महापौर, पदाधिकारी सातत्याने आम्हाला या संदर्भात भेटत असतात आणि आम्ही त्यांना देखील असे आश्वासित केलेले आहे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

त्यामुळे मी निश्चितपणे आपणाला आश्वस्त करतो की, पावसाळा संपल्यावर हे काम त्वरित सुरु केले जाईल. दोन महिन्याच्या कालावधीत हे काम पूर्ण करण्यात येईल. दुसरा मुद्दा असा मांडण्यात आला होता की, 234 एमएलडी ऐवजी 310 एमएलडी पाणी दिले पाहिजेत, यासंदर्भातील माहिती आज माझ्याकडे नाही, ही बाब तपासून घेण्यात येईल जे पाणी उपलब्ध असेल त्यापैकी जास्तीत जास्त पाणी कल्याण-डोंबिवली शहराला देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त साहेबांचा मी आभारी आहे, अनेक वेळा हा विषय सभागृहात उपस्थित करुन तो त्यांनी जीवंत ठेवला आहे. कल्याण-डोंबिवली शहरातीत पिण्याच्या पाण्याची अतिशय वाईट परिस्थिती आहे, या महानगरपालिकेची देखील अत्यंत वाईट परिस्थिती आहे, पिण्याचे पाण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे, 330 एमएलडी पाण्याची गरज आहे म्हणून या शहरांना 330 एमएलडी पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे, यासाठी जी उपाययोजना करण्यात येणार आहे, ती विहित कालावधीत करण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्री महोदय सभागृहात देतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यासंदर्भात मी आताच आश्वासन दिले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी तीन वेळा ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. त्याचप्रमाणे नवी मुंबईत नव्याने होणारे विमानतळ आणि नयना टर्मिनल यासाठी शासनाने पाण्याचे नियोजन केले नाही. कोंडाणे, बाळगंगा आणि शाई ही नियोजित धरणे करण्यात येणार आहेत, मुख्यमंत्री महोदयांचे मी लक्षवेधू इच्छितो की, बाळगंगा धरणाचे काम 90 टक्के पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणच्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत उद्योगमंत्री महोदयांनी सांगितले आहे, या भागातील सर्व आमदार एकत्र बसले तर चर्चा करुन येथील पुनर्वसनाचा प्रश्न सुटू शकतो, त्या धरणाची चौकशी आम्ही करण्यास सांगितली होती, ती चौकशी चालू राहील ही बाब आपण देखील सभागृहात मांडली होती. तीन धरणांचे मुद्दे वेगवेगळे आहेत, बाळगंगा धरणाचे पाणी तातडीने अडविता येऊ शकते. नवी मुंबईत होणारे विमानतळ आणि जेएनपीटीचे चौथे टर्मिनल नयना होणार आहे, त्याअनुषंगाने तेथे होणारे नागरीकरण यासाठी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. कोंडाणे धरणासाठी सर्व मंजुऱ्या मिळाल्या आहेत,

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील...

टेंडरमध्ये काही घोटाळा झालेला आहे, त्यामुळे त्या धरणाचे काम थांबले आहे, शाई धरणाचा वेगळा प्रश्न आहे, या धरणासाठी वन विभागाची परवानगी मिळालेली आहे, त्यासाठी 250 किंवा 350 कोटी दिले आहेत, नक्की आकडा किती आहे याची मला माहिती नाही, ती रक्कम वन विभागाकडे देण्यात आली आहे. या परवानगीची मुदत संपत आहे. आमच्या जिल्ह्यातील हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे, मी थोडक्यात प्रश्न विचारतो जास्त पार्श्वभूमी सांगत नाही. शाई धरणाच्या परवानगीसाठी वन विभागाकडे आवश्यक निधी भरण्यात आला आहे. ही कामे वेळेत झाली नाहीत तर ती परवानगी लॅप्स होईल, त्यामुळे पुन्हा वन विभागाकडून परवानगी घ्यावी लागेल. त्यामुळे शाई धरणाचे काम तातडीने सुरु झाले पाहिजे. पुन्हा वन विभागाची परवानगी घेण्याची गरज लागून नये. हायपॉवर समितीचे अध्यक्ष म्हणून मी मुख्यमंत्री महोदयांना नम्रपणे सांगतो की, या तिन्ही धरणांकडे लक्ष देऊन ही कामे तातडीने सुरु करण्याबाबत कार्यवाही करावी. नाही तर कल्याण-डोंबिवली शहरापेक्षा कठीण परिस्थिती आमच्या जिल्ह्याची होईल, त्यामुळे याबाबत राज्य शासन योग्य ती दक्षता घेईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हळूहळू सर्व विषय हायपॉवर कमिटीकडे येत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अत्यंत महत्वाचा आहे, बाळगंगा, कोंडाणे किंवा शाई धरण ही तिन्ही प्रकल्प अत्यंत महत्वाचे आहेत, ही गोष्ट खरी आहे की, त्यासंदर्भात बरेच वाद तयार झाले होते, कोर्टात काही केसेस आहेत, या धरणासाठी योग्य प्रकारे परवानगी घेतली किंवा नाही, अशा अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, या अडचणींचा विचार केला तरी यातील काही प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहेत, सन्माननीय सदस्यांनी बाळगंगा व शाई धरणाच्या संदर्भात जे सांगितले त्याबाबत संबंधितांना तातडीने सूचना देण्यात येतील. मी माननीय जलसंपदा मंत्री यांना यासंदर्भात उच्चस्तरिय बैठक घेण्याच्या सूचना देतो. ज्या अडचणी असतील त्या कायद्यात बसवून योग्य प्रकारे हे प्रकल्प कसे पूर्ण करता येतील, यासंदर्भात राज्य सरकार निश्चितपणे नियोजन करणार आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री व माननीय उद्योग मंत्री यांनी हा प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त...

फक्त एक प्रश्नरुपी शंका मी उपस्थित करतो, पूर्वीचे अनुभव पाहता आता मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, दोन महिन्यात ही कार्यवाही करण्यात येईल. हा प्रश्न सप्टेंबर अखेरपर्यंत मिटेल अशी आशा मी व्यक्त करतो. मी एक बाब मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, पूर्वी अशी आश्वासने दिल्यानंतर त्याबाबत मी सतत पाठपुरावा करीत होता. याबाबत आढावा बैठक घेण्यात यावी, आश्वासन दिल्याप्रमाणे काम होते किंवा नाही हे पहावे, माझ्या महितीप्रमाणे आश्वासन दिल्याप्रमाणे कामे होत नाहीत, मागच्या लक्षवेधीच्या वेळी आश्वासन दिले होते व आजपर्यंत काहीही काम झाले नाही, मुख्यमंत्री महोदयांना मी नम्रपणे विनंती करतो की, जनता आपल्यावर विश्वास ठेवते, दोन महिन्यांचे टार्गेट समोर ठेऊन या कामाची किती प्रगती होते यासाठी माननीय मुख्यमंत्री व उद्योगमंत्री महोदयांनी यासंदर्भात बैठक घेऊन त्या कामाचे मॉनिटरिंग करावे, जनेकरुन वस्तुस्थिती सप्टेंबर अखेरपर्यंत साकार होईल व पुन्हा नागपूर येथील अधिवेशनात मला या विषयाची लक्षवेधी सूचना उपस्थित करण्याचा प्रसंग येणार नाही, यासाठी मुख्यमंत्री महोदय मॉनिटरिंग बैठक घेतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, उद्योगमंत्री महोदय याबाबत पूर्ण मॉनिटरिंग करतील आणि ऑगस्टच्या शेवटी याबाबत वस्तुस्थिती काय आहे याचा आढावा ते स्वतः घेतील.

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, मुख्यमंत्री व उद्योग मंत्री महोदयांना मी असा प्रश्न विचारतो की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये आता 27 गावांचा समावेश करण्यात आला आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली या परिसरात लोकसंख्येचे प्रमाण 38 टक्याने वाढत आहे, पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे, गेल्या तीन अधिवेशनात मी याबाबत विषय उपस्थित करीत आहे, पाणी, आरोग्य, रस्ते व इतर नागरी सुविधांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने विशेष पॅकेजची मागणी केली आहे, त्यामुळे मुख्यमंत्री महोदय विशेष पॅकेज देतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हा विषय लक्षवेधी सूचनेच्या स्कोपच्या बाहेर आहे. सन्माननीय सदस्यांनी स्कोपमध्ये प्रश्न विचारला तर स्कोपमध्ये पॅकेजचा विचार करता येईल. मी सन्माननीय सदस्यांना विनम्रपणे विनंती करतो की, आता या प्रश्नांचे उत्तर देणे शक्य नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G-4

VVK/ AKN/ ST/ प्रथम श्री.बोरले... 11:10

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त दोन तीन अधिवेशनामध्ये हा प्रश्न पोडतिडीकीने विचारीत आहेत, हे मी पाहत आहे, माझी त्यांना विनंती आहे की, कल्याण-डोंबिवली परिसरातील लोकप्रतिनिधी सक्षम आहेत, यामध्ये माननीय उप सभापती आहेत, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे, सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे व स्वतः आपण आहात. तेथील एका गावातील व एका पाड्यावरील लोक पुनर्वसनासाठी तयार होत नाहीत ही शासनाची अडचण आहे, याबाबत आपण प्रयत्न केले तर हा प्रश्न लवकर मिटेल व पुन्हा डिसेंबरच्या अधिवेशनात आपणाला प्रश्न विचारावा लागणार नाही. या लोकांना पुनर्वसनाचे चांगले पॅकेज देण्यात आले आहेत, ते त्यांनी मान्य करावे यासाठी आपण प्रयत्न करावेत. हा प्रश्न आपण सामोपचाराने मिटविला तर तो लवकर सुटेल.

--------------

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने समांतर जलवाहिनीच्या कामात केलेली अनियमितता***

**मु.शी.** : ***औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने समांतर जलवाहिनीच्या कामात केलेली अनियमितता***
यासंबंधी ***श्री.सुभाष झांबड,वि.प.स.य***ांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुभाष झांबड (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"औरंगाबाद येथे समांतर जलवाहिनीचे काम पाहणाऱ्या कंपनीला १५३ कोटींचा घसघशीत फायदा करुन देण्याचा खळबळजनक प्रकार माहे जून, २०१५ दरम्यान उघडकीस आलेला असणे, कंपनीला जास्तीत जास्त फायदा कसा होईल यादृष्टीने मनपातील काही अधिकारी व कर्मचारी दिवसरात्र काम करीत असणे, औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने संपूर्ण शहरात "डीआय" पाईप वापरावेत अशी अट करार पत्रकात नमूद असणे, परंतू कंपनीला डीआयऐवजी स्वस्त दरातील निकृष्ट दर्जाची एचडीपीई पाईप वापरण्याची मुभा देण्याचा ठराव अत्यंत छुप्या पध्दतीने घेतलेला असणे, परिणामी येथील जनमानसांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने यासंदर्भात सखोल चौकशी करुन दोषींवर फौजदारी गुन्हा नोंद करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."***

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G-4

VVK/ AKN/ ST/ प्रथम श्री.बोरले... 11:10

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, औरंगाबाद येथील समांतर जलवाहिनीचा विषय अतिशय गंभीर आहे. मुख्यमंत्री महोदयांना मी विनंती करतो की, या प्रकरणाची उच्चस्तरिय सखोल चौकशी करण्यात यावी असा माझा पहिला प्रश्न आहे. दिनांक 2 मार्च 2015 रोजी 153 कोटी रूपययांचा फायदा समांतर जलवाहिनीच्या कत्रांटदारास व्हावा असा ठराव आयत्यावेळी घुसविण्यात आला आहे असे निदर्शनास आले आहे. त्यानंतर 20 जून 2015 रोजी या ठरावाची माहिती सभागृहासमोर आली तेव्हा महानगरपालिकेच्या सभागृहातील नगरसेवकांना या प्रस्तावाला विरोध केला व दिनांक 2 मार्च रोजी असा ठराव झालेला नाही. त्यामुळे हा ठराव आता कन्फर्म करण्यासासाठी कसा काय आला यासाठी त्यांनी विरोध केला होता. हा विरोध डावलून तो ठराव कन्फर्म करण्यात आला आहे. 153 कोटी रूपयांचा फायदा कंत्राटदारास होईल असा प्रयत्न औरंगाबाद महानगरपालिकेने केलेला आहे. माझा विषय 153 कोटी रूपयांचा नसून समांतर जलवाहिनीचा आहे.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड.....

समांतर जलवाहिनीचे एस्टीमेट 365 कोटी रुपये होते, त्याला 2009 मध्ये टेंडर पध्दतीने मान्यता दिली गेली, ती कॉस्ट 792.20 कोटी रुपये झाली. पूर्वीपासून या योजनेमध्ये काळेबेरे झाल्याचे समोर येत आहे. कंपनीचे टेंडर पास करताना वेगवेगळया ती नावाच्या कंपन्यांचे टेंडर पास केले होते. पुढे 2011 मध्ये या तीन कंपन्यांनी मिळून एक नवीन कंपनी स्थापन केली. त्या कंपनीच्या माध्यमातून करार करण्यात आला. करारामध्ये डीआय पाईप पुरविण्याची अट असताना त्यामध्ये आयत्यावेळी मार्चमध्ये एचडीपीई व डीआय पाईप मिक्स करुन वापरावेत असा प्रयोग करण्यात आला आणि कॉन्ट्रॅक्टरचा फायदा करुन देण्याचा प्रयत्न झाला. 792 कोटी रुपयांची योजना आज 1018 कोटी रुपयांवर गेली आहे. काम पूर्ण होईपर्यंत या योजनेची किंमत 1500 कोटी रुपयांवर जाईल. या योजनेचे एस्टीमेट सतत वाढत आहे. हा वित्तीय भार जनतेला सहन करावा लागणार आहे की राज्य शासन महापालिकेला मदत करणार आहे, तसे नसेल तर महापालिका स्वतः हा भार सहन करणार आहे काय? कॉन्ट्रॅक्टरने कोणतीही योजना सुरु न करता पाईपलाईन आणि पाणी पुरवठा योजना त्याच्या ताब्यात दिली आहे. त्या माध्यमातून कॉन्ट्रॅक्टरने जल मीटर सक्तीने बसविण्याचे काम सुरु केले आहे. मीटरची किंमत बाजारात 800 रुपये असताना नागरिकांकडून 3500 रुपये सक्तीने वसूल करुन मीटर बसविण्याचे काम सुरु आहे. हे मीटर हलक्या दर्जाचे असून एका पुढाऱ्याच्या मुलाबरोबर भागीदारीने कारखाना उभा करण्यात आला आणि 800 रुपये किंमतीऐवजी 3500 रुपये एवढा आर्थिक भार जनतेवर टाकण्याचे काम सुरु आहे. असे अनेक घोटाळे या टेंडरमध्ये झालेले आहेत. या योजनेला 'अलिबाबा आणि चाळीस चोर' असेच नाव दिले तर ते चुकीचे ठरणार नाही. या प्रकरणाची शासनाने उच्चस्तरीय चौकशी करावी.

सभापती महोदय, नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर जिल्हयाचे पालकमंत्री श्री.रामदास कदम यांनी प्रेस कॉन्फरन्सद्वारे हा पहिला विषय घेऊन ताशेरे ओढले. या कामाच्या संदर्भात भाष्य केले. कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून चुकीचे काम केले जात आहे, हलक्या दर्जाचे पाईप वापरले जात आहेत, या योजनेमध्ये फार मोठा घोटाळा झाला आहे असे त्यांनी प्रेससमोर सांगितले. या योजनेच्या कॉन्ट्रॅक्टरच्या माध्यमातून जो पाणी पुरवठा सुरु आहे, तो त्वरित बंद करुन महापालिकेने स्वतः पाणी पुरवठा करावा असेही सांगितले. एका महिन्यानंतर काय झाले माहीत नाही. एका

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष झांबड.....

महिन्यानंतर बाजू बदलली आणि ताबडतोब कॉन्ट्रॅक्टरला काम करण्यास परवानगी दिली आणि लवकर काम पूर्ण करावे असे सांगितले. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 365 कोटी रुपयांची योजना 792 कोटी रुपयांवर गेली. आज या योजनेची किंमत 1062 कोटी रुपये असून भविष्यकाळात 1500 कोटी रुपयांवर जाणार आहे. औरंगाबाद शहराच्या नागरिकांच्या दृष्टीने पाणी पुरवठा हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. ही योजना महापालिकेच्या माध्यमातून पीपीपी मॉडेलवर करण्याचे काम सुरु आहे. उच्चस्तरीय समिती स्थापन करुन या कामाची चौकशी करण्यात यावी. यामध्ये ज्यांचे हात बरबटले आहेत त्यांना शिक्षा देण्यात यावी, त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा आणि ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात येऊन औरंगाबाद शहरातील नागरिकांचा जिव्हाळयाचा प्रश्न सोडविण्याचे काम करावे.

सभापती महोदय, आज औरंगाबाद शहरामध्ये 5 दिवसानंतर पाणी पुरविले जाते. औरंगाबाद हे ऐतिहासिक शहर आहे, औद्योगिकदृष्टया पुढारलेले शहर आहे. या योजनेमध्ये घोटाळा झालेला असून काळ्या यादीतील कॉन्ट्रॅक्टरच्या तीन कंपन्यांचा गट असताना कोणतीही चौकशी न करता करार करुन त्या आधारे काम देण्यात आले आहे. 365 कोटी रुपयांची योजना 1062 कोटी रुपयांवर गेली असून 153 कोटी रुपयांचा फायदा करुन देणारा ठराव आयत्यावेळी मंजूर करण्यात आला याची उच्चस्तरीय पातळीवरुन चौकशी करण्यात येईल काय? 800 रुपये किंमतीला मीटर बाजारात उपलब्ध असताना नागरिकांकडून 3500 रुपये सक्तीने वसूल केले जात आहेत ती वसुली थांबविण्यात येऊन औरंगाबाद शहरातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सोडवून दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अतिशय विस्तृत आणि स्वयंस्पष्ट निवेदन करण्यात आलेले आहे. माननीय सदस्य श्री.सुभाष झांबड यांनी मांडलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे संक्षिप्तपणे निवेदनात दिलेली आहेत. या प्रकल्पाला युआयडीएसएसएमटी अंतर्गत शासनाने 2009 मध्ये मान्यता दिली. त्यावेळी प्रकल्पाची किंमत 359.67 कोटी रुपये एवढी होती. तीन वर्षानंतर त्याची कॉस्ट वाढली. 2009 मध्ये योजनेच्या रिव्हाईज डीपीआरच्या अनुषंगाने महापालिका स्तरावर

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील...

पीपीपी मॉडेलवर प्रकल्प करण्याचा 18.8.2009 रोजी निर्णय घेतला. त्यामध्ये काही अधिक गोष्टी अंतर्भूत करण्यात आल्या. ग्राहक मीटर बसविणे, वितरणाची लांबी 810 कि.मी.ने वाढविणे, नवीन जलकुंभ बांधणे इत्यादी अतिरिक्त कामांचा अंतर्भाव करण्यात आला. 2011 मध्ये निविदेस मान्यता देताना सभेने काही अटी व शर्ती घातल्या. त्या अटी व शर्तीनुसार राज्य शासन व केंद्र शासनाच्या मान्यतेच्या आधीन राहून वितरण व्यवस्थेमध्ये डीआय ऐवजी कॉम्बिनेशन ऑफ डीआय प्लस एचडीपीई पाईप वापरण्यास परवानगी देण्यात आली. खरे पाहिले तर हे कॉन्स्टिट्यूशनल आहे की नाही याची माहिती घ्यावी लागेल. निवेदनात सर्व माहिती दिलेली आहे. माननीय सदस्यांनी निवेदनातील शेवटच्या तीन ओळी वाचून घ्याव्यात. माझ्या दालनात या विषयाबाबत मी 8 तारखेला बैठक घेतली होती याची माननीय सदस्यांना माहिती आहे.

सभापती महोदय, हे जे झाले ते प्री-बिडमध्ये ठरले. तो कॉन्स्टिट्यूशनल आहे की नाही हे तपासून पाहण्यात येईल. डीपीआरमधील ब्रीच ऑफ कण्डिशनबाबत अजूनही शासनाकडे कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. जानेवारी महिन्यात जी सभा झाली, त्यामध्ये स्पष्ट निर्णय घेण्यात आला होता की, फक्त डीआय पाईप वापरुन योजना कार्यान्वित होईल. 15 मार्च रोजी प्रशासनाने पुन्हा सभा बोलावली. त्यामध्ये निर्णय घेतला की, जे पहिले प्री बिड कंपनीबरोबर झाले त्यातील अटी व शर्तीचा भंग होईल म्हणून पूर्वीप्रमाणे काम करावे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जसे निवेदनात म्हटले आहे त्यानुसार या सगळया प्रकरणाबाबत तक्रारी प्राप्त होत्या, म्हणून मी माझ्या स्तरावर माझ्या दालनात बैठक घेतली. सचिव स्तरावर सुध्दा बैठक झाली. स्पष्ट निर्देश देण्यात आले होते की, डीआय शिवाय कोणतेही समांतर पाईप वापरले जाणार नाहीत. त्याशिवाय योजनेचे काम होणार नाही. तसे पाहिले तर हे ट्रान्झिशनल फेजमध्ये आलेली आहे, त्याचा सुध्दा विचार करावा लागेल. माननीय सदस्य श्री.सुभाष झांबड यांचे निवेदनावरुन समाधान झाले नसेल तर सचिव स्तरावर म्हणण्यापेक्षा माझ्या स्तरावर 15 दिवसाच्या आत याबद्दल आपण निर्णय व त्याबाबतची बैठक माझे दालनात 15 दिवसात घेण्यात येईल.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, 800 रुपये किंमतीला जे मीटर बाजारात उपलब्ध आहेत त्याबद्दल 3500 रुपये आकारले जात आहेत. ही बाब टेंडरमध्ये अंतर्भूत नाही. ही बाब आजच रद्द करण्याचा निर्णय घ्यावा. या बाबीशी टेंडरचा काही संबंध नाही. महापालिकेने सक्ती

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतीश चव्हाण....

केली आहे. 800 रुपयांना बाजारात मीटर उपलब्ध आहे. 2500 रुपये प्रती मीटर कंपनीला फायदा होणार आहे. 1 लाख कनेक्शन्स आहेत. जे आरोप केले, ज्यांचे नाव घेतले त्याबाबत आजच्या आज चौकशी सुरु करावी.

नंतर आय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे) :** सभागृहाची वेळ 20 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आधीच सांगितले आहे की, यात ठराव झालेले आहेत. सदर ठराव हे कॉन्स्टीटयुशनल होते काय याबद्दल साशंकता आहे. त्यामुळे फक्त एका मीटर संबंधी नाही तर सगळ्या गोष्टींचीच चौकशी करण्यात येईल आणि या चौकशीत जे काही निष्पन्न होईल त्यासंबंधी निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या नवीन निर्णयाप्रमाणे 50 टक्के निधी राज्य सरकारला द्यावा लागणार आहे. ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. केंद्र सरकारच्या नवीन निर्णयामुळे राज्य सकरारला 50 टक्के हिस्सा भरावा लागणार आहे काय, असल्यास, ही योजना कशा प्रकारे पुढे कार्यान्वित होईल ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, नीती आयोगाने अद्यापि असा कुठलाही निर्णय घेतलेला नाही. नीती आयोगाच्या बैठकीमध्ये मी स्वत: उपस्थित होतो. नीती आयोगाने ज्या योजना 80:20च्या होत्या त्या 50:50 च्या केल्या आहेत. यासंबंधी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री.शिवराज चौहान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती बनविण्यात आली आहे. या समितीमध्ये 6-7 राज्यांचे मुख्यमंत्री आहेत. या समितीमध्ये श्री.अखिलेश यादव यांच्यासह वेगवेगळ्या पक्षाचे मुख्यमंत्री आहेत. प्रत्येक योजना कॉन्स्टीटयुशनल कशी असली पाहिजे 80:20, 50:50 असली पाहिजे या संदर्भातील अहवाल त्यांनी तयार केलेला आहे. तो अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर होऊन मंजूर होणार आहे. ज्या जुन्या योजना आहेत त्यांचे आज जे शेअरींग पॅटर्न आहे ते सध्या तरी बदलल्याचे अधिकृतपणे कळविण्यात आलेले नाही. मात्र, अशा प्रकारच्या ज्या योजना आहेत त्यासंबंधी मागच्या सरकारने अशी भूमिका घेतली होती की, कॉस्ट एस्कलेशन झाले तर ते केंद्र सरकार देणार नाही. हा निर्णय केंद्रातील मागच्याच सरकारने घेतला होता. त्यामुळे याचे काय करायचे हा मुद्दा पुढे येणारच आहे. डीआय पाईप बदलून दुसऱ्या पाईपला परवानगी दिली काय, त्यामुळे कन्सेशनरला फायदा होतो आहे काय, या पुरताच ही लक्षवेधी सूचना तूर्तास मर्यादित

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

आहे. श्री.बापू घडामोडे या नगरसेवकांनी ठराव झालेलाच नाही अशी तक्रार केलेली आहे. तो इन्सर्ट करण्यात आलेला आहे. त्यामुळे यात खूप अडचणी दिसत आहेत. आता आपण सर्वजण मीटर संबंधी निर्णय घ्यावा असे म्हणत आहात. माझे म्हणणे आहे की, यात ॲडहॉक निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. येथे जेवढे मुद्दे मांडलेले आहेत त्या सर्व मुद्यांवर निश्चित कालावधीमध्ये सचिव दर्जाच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून त्याचा अहवाल मागविण्यात येईल आणि एकत्रितपणे त्यावर निर्णय करण्यात येईल.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, जवळपास पाच दिवसांच्या आड पाणी पुरवठा होत आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. सहा राज्यांनी ज्या कंपनीला काळ्या यादीत टाकले आहे अशा कंपनीला आपण कंत्राट दिलेले आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी 15 दिवसात याची चौकशी करण्यात येईल असे सांगितले आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे त्यांना देखील चर्चेसाठी बोलवावे आणि लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी आमची विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, समांतर जलवाहिनी औरंगाबादला अत्यंत आवश्यक आहे. गेल्या अनेक वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. हिंदीत एक म्हण आहे. 'गले की हड्डी न उगलती बने न निकलती बने' म्हणजे घशात हाड अडकले की, ते पोटातही टाकता येत नाही आणि बाहेरही टाकता येत नाही. तशी अवस्था आज या योजनेची खऱ्या अर्थाने झालेली आहे. यात वेगवेगळे लिटीगेशनचे मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात वस्तुनिष्ठ असा निर्णय घ्यावा लागेल. ज्या ज्या सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडावयाचे आहे ते त्यांनी लेखी स्वरूपात समितीकडे द्यावे. त्यावर समिती विचार करेल.

...........

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ***मौजे कवठेएकंद (ता.तासगांव, जि.सांगली) येथील दुर्गम फायर वर्क्स या कारखान्यात दिनांक ५ मे २०१५ रोजी झालेला स्फोट***

**मु.शी.** :***मौजे कवठेएकंद (ता.तासगांव, जि.सांगली) येथील दुर्गम फायर वर्क्स या कारखान्यात दिनांक ५ मे २०१५ रोजी झालेला स्फोट***
यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले,किरण पावसकर,नरेंद्र पाटील,संदीप बाजोरिया,दीपकराव साळुंखे,प्रकाश बिनसाळे,श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मौजे कवठेएकंद (ता.तासगांव, जि.सांगली) येथील दुर्गम फायर वर्क्स या शोभेच्या दारु कारखान्यात दिनांक ५ मे २०१५ रोजी प्रचंड स्फोट होवून या दुर्दैवी घटनेत ९ जणांचा जागीच होरपळून झालेला मृत्यु, उपचारादरम्यान एकाचा तर बेपत्ता झालेल्या बालकांचा मृतदेह उसाच्या फडात सापडणे, अशा आणखी दोघांचा झालेला मृत्यु, त्यामुळे या घटनेतील मृतांचा आकडा अकरावर पोहचणे, या घटनेत दोन इमारती, मौल्यवान साहित्य, वाहने अक्षरक्ष: बेचिराख झाली असून लाखो रुपयांचे झालेले आर्थिक नुकसान, त्यामुळे जनतेत पसरलेले कमालीचे भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."***

श्री.विजय देशमुख (कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील कवठेएकंद या गावात ही घटना घडली आहे. ईगल फायर वर्क्स या फटाके बनविणाऱ्या कारखान्यामध्ये दिनांक 4 मे 2015 रोजी स्फोट होऊन 11 जणांचा मृत्यू होऊन 3 जण जखमी झाले आहेत. उत्तरामध्ये आपण स्फोट होण्याचे कारण नमूद केलेले आहे. जेथे दारू काम करण्यात येत होते त्या शेडस् देखील उद्ध्वस्त झालेल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर असलेला कच्चा माल हा ज्वालाग्रही होता. त्याचा देखील स्फोट झालेला आहे. त्यामुळे सर्व उत्पादने नष्ट झालेली आहेत. शेडमध्ये काम करीत असणाऱ्या सात कामगारांचा व एका ग्राहकाचा जागीच मृत्यू झाला हे आपण लेखी उत्तरात नमूद केले आहे. कारखाने अधिनियम, स्फोटके अधिनियम, स्फोटक पदार्थ अधिनियम या अनुसार भोगवटादाराविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे असे आपण नमूद केले आहे. ग्रामीण भागामध्ये अशा स्वरूपाची कारखानदारी उभी राहते त्यावेळी त्यावर कोणाचेही नियंत्रण रहात नाही. त्यामुळे तेथे सुरक्षिततेच्या दृष्टीने ज्या काही उपाययोजना करावयास पाहिजे त्या होताना दिसत नाही. उदा.कच्च्या मालाचा साठा संरक्षित करून तो यामध्ये येणार नाही अशा प्रकारची व्यवस्था केलेली नसते. येथे कामाला येणारी मुले ही बहुधा लहान असतात. यातील धक्कादायक घटना म्हणजे एक मृतदेह नंतर आढळून आलेला आहे. तामिळनाडूमध्ये मोठया प्रमाणावर फटाक्यांचे कारखाने असल्यामुळे तेथे स्फोटाचे प्रकार पूर्वी मोठ्या प्रमाणावर घडत होते व त्यात मृत्युचे प्रमाण देखील जास्त असायचे. आपल्या येथे काही वर्षापूर्वी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यामध्ये अशी घटना घडली होती. दोन तीन प्रकारचे कारखाने असतात. शोभेची दारू बनविणारे व विहिरी खोदण्यासाठी लागणारे स्फोटके बनविणारे कारखाने असतात. अशा कारखान्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कामगार विभागांतर्गत उप आयुक्त पद निर्माण करता येईल काय, या कारखान्यांमध्ये जे कामगार घेतले जातात त्यांची मान्यता घेण्याची प्रोसिजर आपल्या खात्या मार्फत सुरू करण्यात येईल काय, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या पोषाख वगैरे बाबींची अंमलबजावणी करण्यासाठी अशा कारखान्यांची वारंवार तपासणी करून या कारखान्यांतून स्फोटाद्वारे उद्भवणाऱ्या मृत्युचा प्रकार कमी करण्यासाठी गांभीर्याने उपाययोजना कराव्या लागतील. दुर्दैवाने आता पर्यंत तसे होताना दिसत नाही. कृपया कामगार मंत्री याकडे लक्ष देऊन सर्व सुधारणा आपल्या खात्या मार्फत करतील काय ?

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, ईगल फायर वर्क्स हा कारखाना मौजे कवठेएकंद, ता.तासगाव, जि.सांगली येथे होता. या कारखान्याला जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी होती. पण हा कारखाना सहसंचालक, औद्योगिक सुरक्षितता व आरोग्य, कोल्हापूर यांची मंजुरी न घेता बेकायदेशीररितीने सुरू होता. अशा कारखान्यांबाबत सुरक्षिततेसंबंधी नियमावली आहे. त्याप्रमाणे या कारखान्याने सुरक्षिततेचे नियम पाळले नव्हते. इमारतीमध्ये किती अंतर असावयास पाहिजे, साफसफाई कशी असावयास पाहिजे, विद्युत सामुग्री कशी असावयास पाहिजे यासह स्त्रिया व मुलांना कामावर लावण्याबाबतचे नियम आहेत. तसेच कोणत्याही स्त्री व तरूण इसमास रसायनाचे मिश्रण करण्याच्या व ते वितळविण्याच्या व कापण्याच्या कामास लावण्यात येऊ नये अशा प्रकारचे स्पष्ट नियम आहेत. या कारखान्याच्या स्फोटात जे मृत्युमुखी पडले आहेत त्यात कोणताही लहान मुलगा आढळून आलेला नाही. तसेच या कारखान्यात कोणताही लहान मुलगा कामाला होता असे आढळून आलेले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय देशमुख .....

तसेच विना परवाना सुरु असलेल्या कारख्यान्यांचे सर्वेक्षण 2012 मध्ये करण्यात आले होते व त्यामध्ये 49 कारखाने विना परवाना सुरु असल्याचे आढळून आले होते. या कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. अशा कारखान्यांवर एकंदरित 37 खटले दाखल करण्यात आले आहेत. कारखान्यांना वारंवार भेटी देऊन त्यांना सुरक्षिततेच्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. ज्या कारखान्यांनी सुरक्षा उपाययोजना केल्या नाहीत अशा कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. सुरक्षेसंदर्भात तसेच औद्योगिक सुरक्षा कायद्या प्रमाणे अशा कारखान्यांवर वारंवार खटले भरण्यात येतात तसेच अशा कारखान्यांची वारंवार तपासणी होत असते. सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांनी दुघटना होऊ नये यासाठी कामगार उप आयुक्ताचे पद निर्माण करावे व जे कारखाने नियम पाळणार नाहीत अशा कारखान्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी सूचना केलेली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कारखान्यांची यापुढे वारंवार तपासणी करुन नियम न पाळणाऱ्या कारखान्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, मौजे कवठेएकंद येथील इगल फायर वर्क्स कारखान्याची शासनाने सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेतली होती काय ? इगल फायर वर्क्स कारखान्यात स्फोट झाल्यामुळे यामध्ये ज्या कामगारांचा मृत्यू झालेला आहे त्यांचा विमा उतरवण्यात आला होता काय,विमा उतरवला असल्यास तो किती वर्षाचा होता ?

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, या कारखान्याने विमा उतरवलेला नव्हता. कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार मृत्यू पावलेल्या कामगारांच्या नुकसानीबाबत फॉर्म डी ची नोटीस पाठवलेली आहे. या घटनेमध्ये ज्या ज्या कामगारांचा मृत्यू झालेला आहे त्यांच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई मिळावी यासाठी न्यायालयात प्रकरण सुरु आहे. कामगार कायद्यानुसार कामगारांना त्यांच्या वयाप्रमाणे नुकसानभरपाई मिळणार असून झुबेदा नवाफ यांना 5,42,240 रुपये, रामराजेंद्र गिरी यांना 6.39 लाख रुपये,सुनंदा रामगिरी यांना 7.2 लाख रुपये, तानाजी शिरसोड यांना 7.36 लाख रुपये व राजेंद्र गिरी 8.79 लाख रुपये व अजित तोडकर यांना 8 लाख 15 हजार 400 रुपये नुकसान भरपाई मिळावी यासाठी कोर्टात दावा दाखल करण्यात आलेला आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील कवठेएकंद या गावामध्ये इगल फायर वर्क्स शोभेच्या दारु कारखान्यात दि.4 मे, 2015 रोजी स्फोट झाला त्यामध्ये 11 कामगारांचा मृत्यू व 3 कामगार जखमी झाले होते. यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, इगल फायर वर्क्स या कारखान्याने परवानगी न घेता कारखाना सुरु केला होता अशी माहिती माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी दिलेली आहे. इगल फायर वर्क्सच्या मालकाने परवानगी न घेता सदर कारखाना सुरु केल्यामुळे आमच्या 11 कामगारांना जीव गमवावा लागला. त्यामुळे सदर कारखाना मालकाविरुध्द शासनाने कठोर कारवाई केली आहे काय ? इंडस्ट्रीअल सेफ्टी व एक्सप्लोजिव्ह डिपार्टमेंटची परवानगी इगल फायर वर्क्स या कारखान्याच्या मालकाने घेतलेली नसताना हा कारखाना सुरु झालाच कसा याची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, सदर कारखाना मालकाविरुध्द फौजदारी केस दाखल झाली असून सदर कारखान्याचा मालक अटकेत आहे. सदर कारखानदाराने परवागनी घेतली होती,रिन्यूव्हेशनसाठी फॉर्म भरला होता. परंतु कारखाना औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांच्याकडून परवाना न घेता कारखाना सुरु होता. संबंधित विभागाची परवानगी न घेतल्यामुळे कारखाना गुन्हे 84 अनुसार खटले दाखल करण्यात आले आहेत.

---

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लक्षवेधी सूचना क्रमांक 6 बाबत**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. सुभाष देसाई : मिहान सेझ प्रकल्प सामान्य प्रशासन विभागाकडे असल्यामुळे हा प्रश्न आमच्याकडे चुकून दाखवला गेला आहे. हा उद्योग विभागाचा प्रश्न नाही. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेचे उत्तर देण्यासंदर्भात मुदतवाढीची आम्ही विनंती केलेली असून या लक्षवेधी सूचनेचे उत्तर सामान्य प्रशासन विभागाकडून घेण्यात यावे ही विनंती.

**तालिका सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.45 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

## प्रश्नोत्तराच्या तासासंबंधी

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय,अधिवेशनाचा हा दुसरा आठवडा असून उद्या आठवड्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतर फक्त एक आठवडा शिल्लक राहतो. आम्ही ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो त्या भागातील प्रश्न आम्ही येथे मांडतो. मला एवढेच सांगावयाचे आहे की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये फक्त चार-पाच प्रश्नांवर चर्चा होते. त्यापुढे ही संख्या जात नाही. आम्ही तीन तीन महिने अगोदर प्रश्न देतो आणि ते प्रश्न चर्चेला येणार नसतील तर आम्ही येथे कशाला बसायचे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी काल सभागृहात उपस्थित होत्या किंवा कसे हे मला माहीत नाही. पण मी कालच या संदर्भात निदेश दिलेले आहेत. मी आपल्या मताशी पूर्णपणे सहमत आहे. मी येथून कितीही स्ट्रीक्ट राहण्याचा प्रयत्न केला तरी सर्वच सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी हात वर करतात. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण सर्वांनी मला सहकार्य करावे. मी काल निदेश देताना सांगितले होते की, आपण सकाळच्या विशेष सत्रात पाच-सहा लक्षवेधी सूचनांवर चर्चा करतो आणि प्रश्नोत्तराच्या तासामध्ये देखील पाच प्रश्नांवर चर्चा करतो. पाच प्रश्न म्हणजे is equivalent to लक्षवेधी असा त्याचा अर्थ होतो. प्रश्नोत्तराचा तास आणि लक्षेवधी सूचना यामध्ये फरक करणे आवश्यक आहे. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला कसे येतील याबाबत सर्वांनी मला सहकार्य करावे.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील सर्व जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजातील**
**मुलींसाठी वसतिगृह बांधण्याबाबत**

**(1) * 7888 श्री.ख्वाजा बेग, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात सर्व जिल्ह्यात अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतिगृह बांधण्याचा शासन निर्णय क्र.अ.वि.वि.2009/प्र.क्र.15/का 8, दिनांक 2 मार्च 2015 नुसार निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आतापर्यंत किती जिल्ह्यामध्ये वसतिगृहे पूर्ण करण्यात आली आहेत,

(3) तसेच किती वसतिगृहाची कामे अपूर्ण आहेत व ती पूर्ण करण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(4) याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (1) नाही.

अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह बांधण्यास दि.2.3.2010 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांचा जागेवर अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतिगृह सुरु करणेसंदर्भात शासन निर्णय दि. 20.12.2011 रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(2) व (3) दिनांक 2 मार्च, 2010 व दिनांक 20 डिसेंबर, 2011 रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन आतापर्यंत एकूण 20 जिल्ह्यात वसतिगृह बांधण्याकरिता निधी व मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी 4 वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित वसतिगृहांचे बांधकाम सुरु आहेत. त्याकरिता संबंधित वसतिगृहास आवश्यक तो निधी टप्प्याटप्प्याने देण्यात आला आहे. तसेच कामे पुर्ण होण्याकरिता जस जशी कामे पुर्ण होतील तस तसा निधी देण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7888....

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, राज्यतील सर्व जिल्ह्यात अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतिगृह बांधण्यात येईल काय असा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. शासन निर्णय दिनांक 2 मार्च, 2015 ला अनुलक्षून मी तो प्रश्न विचारलेला होता. शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेण्यासंबंधीची जी कार्यवाही आहे त्यामध्ये मुलींसाठी वसतिगृह हा महत्वाचा विषय आहे. मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे आणि विशेषतः मुस्लिम मुलींच्या शिक्षणासाठी वसतिगृहाची आवश्यकता आहे. लेखी उत्तरामध्ये आतापर्यंत 20 जिल्ह्यात वसतिगृहाचें बांधकाम करण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये वसतिगृह बांधण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे ? या वर्षी वसतिगृहाच्या बांधकामासाठी शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे ? मागील वर्षी यवतमाळ जिल्हयात दिनांक 30.6.2014 च्या पत्रानुसार जागेच्या उपलब्धेसंबंधी मागणी करण्यात आली होती. त्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती मिळाली काय, नसेल तर त्याची काय कारणे आहेत, शासन हा विषय गंभीरतेने घेणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अल्पसंख्याक मुला-मुलींसाठी वसतिगृह बांधण्याचा विषय सरकारने अतिशय गंभीरतेने घेतलेला आहे. राज्यातील प्रत्येक गावात, तालुक्यात आणि जिल्ह्यात 25 टक्केच्यावर अल्पसंख्यांकाची संख्या असेल त्या ठिकाणी वसतिगृह बांधण्याचा प्रयत्न करतो. या माध्यमातून 20 जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध झालेली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध नसल्यामुळे त्या ठिकाणी जागा उपलब्ध होते काय याचा तपास सुरु आहे. मुलींचे वसतिगृह असल्यामुळे ती जागा शहरात असावी, शहरालगत असली पाहिजे. आपणास शहराच्या बाहेर वसतिगृह बांधात येणार नाही. शहरात जागा मिळण्यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत. यवतमाळ जिल्ह्यामध्ये अलीकडे जागा उपलब्ध झालेली आहे. त्या ठिकाणी शासकीय पॉलिटेक्नीक मायनॉरीटी उघडले जाईल, त्या ठिकाणी मुलींचे वसतिगृह उघडण्याचा सरकारचा विचार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.ख्याजा बेग यांनी दिनांक 2 मार्च 2015 नुसार निर्णय घेण्यात आला काय, असा प्रश्न विचारला होता. त्याचे लेखी उत्तर "नाही" असे देण्यात आलेले आहे. माझा प्रश्न आहे की, ज्या 9 वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण झालेले



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7888....

डॉ.नीलम गोऱ्हे...

आहेत त्या जिल्हयांची नावे सांगण्यात येतील काय ? काही तालुक्यांमध्ये वसतिगृहांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी वसतिगृह बांधण्यात येतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रायगड, कोल्हापूर, जालना येथे वसतिगृहे सुरु झाली आहेत. रायगड जिल्ह्यात अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे सुरु आहे. (अडथळा) अल्पसंख्याक समाजाच्या मुलींसाठी महाविद्यालय आहे. नसेल तर माहिती घेऊन सांगतो. माझ्याकडे जी माहिती आहे ती मी सांगत आहे. जर अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्या अधिकाऱ्यांवर आताच कारवाई करण्यात येईल. पनवेल येथे बी.एड.महाविद्यालयात वसतिगृह सुरु करण्यात आले आहे. मी यादी वाचून दाखविते त्यानंतर आपण प्रश्न विचारावेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांनीसाठी वसतिगृह असा हा विषय आहे. बी.एड.मध्ये वसतिगृह असेल तर बी.एड.मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिंनीसाठी ते असू शकेल. माझा प्रश्न आहे की, केवळ अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी हे वसतिगृह आहे काय ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रायगड जिल्हयात अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे ते सुरु आहे. कोल्हापूर जिल्ह्यात राजाराम महाविद्यालय येथे वसतिगृह सुरु आहे. जालनामध्ये धनसावंगी येथे शासकीय तंत्रनिकेतन येथे प्रस्तावित आहे. अमरावती येथे यावर्षी बांधकाम पूर्ण झाले, या वर्षी प्रवेश प्रक्रियेला मान्यता दिलेली आहे. जळगाव जिल्ह्यातील बांधकाम पूर्णत्वास आलेले आहे. या वर्षी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या दोन्ही ठिकाणी प्रवेश प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे. औरंगाबाद-संभाजीनगरला बांधकाम पूर्ण झाले असून प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात बसमत आणि हिंगोली येथील बांधकाम पूर्ण झालेले आहे, प्रवेश सुरु आहे. कळमनुरी येथे बांधकाम सुरु आहे. परभणी जिल्ह्याती पूर्णा येथील बांधकाम पूर्ण झाले असून प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. परभणी,

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7888....

श्री.एकनाथराव खडसे......

गंगाखेड, शेलू, पाथरी आणि जिंतूर या ठिकाणी बांधकाम सुरु आहे. नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात बांधकाम पूर्णत्वास आले असून प्रवेश अपेक्षित आहे. लातूरला शासकीय तंत्रनिकेतनमध्ये बांधकाम सुरु आहे. सोलापूरला शासकीय तंत्रनिकेतनमध्ये बांधकाम सुरु आहे. वाशिमला बांधकाम पूर्ण झाले असून प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये मंगळूरला बांधकाम पूर्ण असून यावर्षी प्रवेश प्रक्रिया सुरु केली आहे. मानोरा आणि मालेगाव येथ बाराव्या पंचवार्षिक योजनेंतर्गत बांधकामास सुरुवात करीत आहोत. मुंबईत अंधेरी येथे महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत बांधण्यात येणारे सावली वसतिगृहाचे बांधकाम सुरु आहे. भंडारा येथे गांधी विद्यालयात बांधकाम सुरु आहे. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठामध्ये बांधकाम सुरु करण्यासाठी निधी दिलेला आहे. त्या ठिकाणी निविदा मागविण्यात आल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7888....

श्री.एकनाथराव खडसे....

ठाण्यात मुंब्रा येथे जागा उपलब्ध झालेली आहे. ती जागा नुकतीच महसूल विभागाकडून हस्तांतरित करण्यात आली आहे. रत्नागिरी येथे जागा उपलब्ध असून, त्या ठिकाणी आता बांधकाम करण्यास परवानगी द्यावयाची आहे. सांगली येथील वसतिगृहाला आता प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्या ठिकाणी निधी उपलब्ध करुन दिला आहे. यवतमाळ येथे जागा उपलब्ध झाली आहे. बुलढाणा येथे सुध्दा जागा उपलब्ध आहे. मध्यंतरी नागपूरच्या आजूबाजूला जागा मिळाली नाही. त्यामुळे शासनाने नागपूर महापालिकेला कळविल्यानंतर त्यांनी जागा उपलब्ध करुन देण्याचे कळविले आहे. त्या ठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठामध्ये अशा प्रकारचे बांधकाम करावे असा प्रस्ताव विचाराधीन आहे. पुणे येथे शासकीय तंत्रनिकेतन येथे 200 विद्यार्थी क्षमता असलेले वसतिगृह प्रस्तावित करण्यात आले असून, त्या ठिकाणी आणखी 200 मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी मॉडर्न कॉलेजला जागा उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांनी सांगितल्यामुळे या संदर्भात शासनाचा निर्णय अजून व्हावयाचा आहे. सभापती महोदय, चालू शैक्षणिक वर्षात 15 वसतिगृहांमध्ये 1210 विद्यार्थीनींना प्रवेश दिला जाणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, त्या ठिकाणी बी.एड.च्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल. परंतु असे नाही. वसतिगृह सुरु करण्यासाठी अगोदर सरकारी जागा उपलब्ध झाली पाहिजे. सरकारच्या महाविद्यालय, विद्यापीठ, पॉलीटेक्नीक कॉलेज किंवा इंजिनियरींग कॉलेजची जागा उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी प्राधान्याने बांधकाम केले जाते. खाजगी संस्थांची वसतिगृहांसाठी जागा देण्याची तयारी असेल तर सरकार त्या ठिकाणी वसतिगृह बांधून देईल. वसतिगृहाच्या बांधकामासंदर्भात शासनाचे नियम ठरलेले आहेत. अशा वसतिगृहामध्ये 70 टक्के अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. 70 टक्के अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर उर्वरित जागांवर बिगर अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. अल्पसंख्याक समाजाच्या 70 टक्के मुली उपलब्ध झाल्या नाही तर, जेवढ्या मुली उपलब्ध होतील त्यांना प्रवेश दिल्यानंतर रिक्त असलेल्या जागांवर बिगर अल्पसंख्याक समाजाच्या मुलींना प्रवेश देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7888....

अॅड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, मागील तीन वर्षांपासून रत्नागिरी जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या मुलींच्या वसतिगृहाचे काम प्रलंबित आहे. जिल्हा प्रशासनाने या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळेच ते प्रलंबित राहिले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, या वसतिगृहाची इतर सर्व कामे पूर्ण करून ते वसतिगृह 2015 या वर्षापासून सुरु करण्यात येईल काय ? तसेच अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांच्या विकास योजना, वसतिगृहे, शिष्यवृत्ती, ग्रामपंचायत अनुदान इत्यादी संदर्भातील सर्व कामे विविध विभागांकडून करण्यात येतात. त्यामुळे विभागा-विभागांमध्ये समन्वय साधण्यात विलंब होतो. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारु इच्छिते की, सर्व विभागांचे एकत्रिकरण करण्यासाठी शिक्षण संचालनालय आणि समाजकल्याण संचालनालयाप्रमाणेच अल्पसंख्याक संचालनालय स्थापन करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना योग्य आहे. त्यामुळे सजेशन फॉर अॅक्शन. तसेच दुसरी बाब अशी की, रत्नागिरी येथील वसतिगृह 2015 मध्ये बांधून त्या ठिकाणी प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याचा कार्यक्रम राज्य सरकारने तयार केला आहे. त्यामुळे सदरहू वसतिगृह याच वर्षी पूर्ण करण्याचा सरकारचा विचार आहे.

श्री.मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, राज्यात कोणत्या ठिकाणी वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध झाल्या आणि कोणत्या ठिकाणी कामे सुरु आहेत. बऱ्याच ठिकाणी जागा उपलब्ध होणार असून, त्या ठिकाणी कामाला सुरुवात होणार आहे. ज्या ठिकाणी वसतिगृहांच्या बांधकामाची कामे हाती घेतली आहेत ती कामे कधीपर्यंत पूर्ण होतील आणि त्या वसतिगृहांमध्ये प्रवेश प्रक्रिया केव्हापासून सुरु होईल ? तसेच ज्या ठिकाणी जागा उपलब्ध झालेली आहे त्या ठिकाणी वसतिगृहाच्या बांधकामाची सुरुवात कधी होईल ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विभागाच्या ताब्यात आलेल्या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून पुढील योग्य ती कार्यवाही करुन बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येईल. राज्यातील अल्पसंख्याक मुला-मुलींच्या वसतिगृहाचे काम पूर्ण करण्याचा इष्टांक 2019 पर्यंत दिला असून, त्या दृष्टीने हा इष्टांक पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7888....

श्री.अब्दुल्ला खान दुर्राणी : सभापती महोदय, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यात अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतु अजूनपर्यंत त्या ठिकाणी कोणत्याही सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या नसल्यामुळे त्या ठिकाणी मुलींना प्रवेश देता आला नाही. ती कामे करण्यासाठी निधीची कमतरता आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, त्या ठिकाणी लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन देऊन, अपूर्ण असलेली कामे कधीपर्यंत पूर्ण करण्यात येतील ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, त्या ठिकाणी निधीची कमतरता नाही. त्या ठिकाणी निधी पूर्णपणे उपलब्ध करुन दिला आहे. सदरहू बांधकाम पूर्ण करण्यास दोन वर्षांची मुदत दिलेली आहे. त्यामुळे दोन वर्षात सदरहू बांधकाम पूर्ण करावे असे अपेक्षित आहे. त्यामुळे सदरहू बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या बाबतीत सूचना देण्यात येतील.

---------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.वाडा (जि.पालघर) येथील शेततळयाच्या कामात लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(२) * ६८०५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनील तटकरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.वाडा (जि.पालघर) येथे शेततळे खोदण्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची धक्कादायक बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यानच्या पहिल्याच आठवडयात उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४)
प्रश्न उद्भवत नाही.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, हा प्रश्न वाडा तालुक्यातील गालतरे गावाचा आहे. त्या गावात 17 शेत तळे यंत्राच्या माध्यमातून खोदण्यात आले. त्यामुळे तेथील ग्रामसभेने ठराव केला की, या कामाच्या बाबतीत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी. त्यांनी तशा प्रकारचे पत्र उप विभागीय कृषी अधिकारी, वाडा यांना दिनांक 3 मार्च, 2015 रोजी दिले. परंतु या प्रश्नाच्या लेखी उत्तरावरुन काहीच ध्वनित होत नाही. महोदय, या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या कामाच्या संदर्भात प्रशासनाकडे मार्च-एप्रिल महिन्यामध्ये तक्रार आली होती हे खरे आहे काय, त्या तक्रारीनुसार या प्रकरणी चौकशी करण्यात आली होती काय आणि चौकशीत काय निष्पन्न झाले ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, दिनांक 2 मार्च, 2015 रोजी सदरहू गावी ग्रामसभा घेण्यात आली होती. परंतु त्या ग्रामसभेत असा कोणताही ठराव झालेला नाही. परंतु त्या ठिकाणी स्थानिक आरटीआय ॲक्टीव्हीस्टच्या माध्यमातून एस.डी.ओ.(कृषी) यांच्याकडे या कामाच्या बाबतीत

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6805...

प्रा.राम शिंदे....

तक्रार प्राप्त झाली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे. त्यामध्ये 17 शेतकऱ्यांना कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत लाभ दिला होता. प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार, शेतकरी, साक्षीदार आणि ग्रामस्थ यांचे समाधान करण्यात आलेले आहे. या कामांमध्ये कोणताही गैरप्रकार घडलेला नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना वाडा तालुक्यातील शेत तळ्यांच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, वाडा तालुक्यात किती शेत तळे खोदण्यासाठी राज्य सरकारने मान्यता दिली, कोणत्या योजनेंतर्गत ही कामे करण्यात आली आणि या शेत तळ्यांची नेमकी स्थिती काय आहे ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, हा प्रश्न गालतरे गावाच्या संदर्भातील आहे.....

**सभापती** : माननीय राज्यमंत्री, आपल्याकडे आता ही माहिती नसेल तर आपण माहिती घेऊन ती पटलावर ठेवावी.

प्रा.राम शिंदे : महोदय, गालतरे गावात 17 शेत तळे खोदण्यात आले. 17 शेत तळ्यांवर 17 लाख 77 हजार रुपये खर्च करण्यात आले. महोदय, वाडा तालुक्यात कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत किती शेत तळे मंजूर झाले आणि किती शेतकऱ्यांना लाभ दिला, या संदर्भातील तपशीलवार माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हाच माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी कोण्या विवक्षित गावातील शेत तळ्याचा प्रश्न विचारलेला नाही. त्यांनी संपूर्ण वाडा तालुक्यात खोदण्यात आलेल्या शेत तळ्यांचा प्रश्न विचारला होता. त्यामुळे माननीय राज्यमंत्र्यांकडे वाडा तालुक्यात किती शेत तळे खोदण्यात आले, कोणत्या योजने अंतर्गत खोदण्यात आले, त्यावर किती खर्च झाला इत्यादी संदर्भातील माहिती असणे आवश्यक आहे. सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांना या बाबतची माहिती पटलावर ठेवावयाची असेल तर आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**सभापती** : आपल्याकडे या बाबतची माहिती आहे काय ? ठीक आहे. हा प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6805...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हा प्रश्न संपूर्ण वाडा तालुक्याशी संबंधित नसून एका विशिष्ट गावाशी संबंधित असा हा प्रश्न आहे.

**सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगतो की, आपण हा प्रश्न वाचावा. हा प्रश्न एका गावापुरता नव्हे तर संपूर्ण वाडा तालुक्याशी संबंधित आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, तालुक्यात शेत तळे खोदण्यात लाखो रूपयांचा गैरव्यवहार झाल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय, असा लेखी प्रश्न विचारण्यात आला होता. त्याला शासनाने "हे खरे नाही." असे लेखी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे तालुक्याचा प्रश्न नाही. तसेच या कामात भ्रष्टाचार झाला आहे हे खरे आहे काय, या प्रश्नाला 'नाही' असे लेखी उत्तर दिलेले आहे. पाच वर्षात किंवा 100 वर्षात किती शेत तळे झाले हा प्रश्न नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी यावर पूरक प्रश्न विचारला आहे. मी माननीय राज्यमंत्र्यांना सुचविले होते की, आपल्याकडे सध्या स्पेसिफिक माहिती नसेल तर आपण ती पटलावर ठेवावी.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या संदर्भातील अधिकची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. त्यामुळे प्रश्न राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

**सभापती** : आपण या संदर्भातील माहिती उद्यापर्यंत सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6805....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझी हरकत आहे. सभागृहाचे माननीय नेते ज्या पध्दतीने बोलत आहेत ते चुकीचे आहे. हा प्रश्न वाडा तालुक्यातील शेततळ्यांच्या संदर्भात विचारण्यात आला आहे, एखाद्या गावाच्या संदर्भात विचारण्यात आलेला नाही. (अडथळा) सर्व गोष्टींच्या बाबतीत भ्रष्टाचार असू शकतो. प्रश्नामध्ये वाडा तालुका असा उल्लेख आहे, गावाचा उल्लेख नाही. आपल्याला प्रश्न वाचता येतो तसा आम्हालाही प्रश्न समजतो. फक्त आपल्यालाच समजते असे समजण्याचा काही भाग नाही. प्रश्न वाडा तालुक्याच्या संदर्भात विचारला आहे आणि त्याला अनुषंगून मी एवढेच विचारले आहे की, वाडा तालुक्यात कोणत्या कार्यक्रमांतर्गत किती शेततळी बांधण्यास परवानगी दिली, त्यावर नेमका किती खर्च झाला आणि त्याची स्थिती काय आहे, असे विचारण्यामध्ये गैर काय आहे ? हा सरळ प्रश्न आहे. हा काही उप प्रश्न नाही. प्रश्नाच्या अंतर्गत अभिप्रेत असणारा प्रश्न आहे.

**सभापती** : ठीक आहे. मला वाटते की, हा प्रश्न राखून ठेवून आपण पुढे जाऊ या. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी सांगितले ते सर्वांनी लक्षात घ्यावे. आता 20 मिनिटांत फक्त दोन प्रश्न झाले आहेत.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मौजे चिमणा बागापूर (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) येथील ८० वर्षीय शेतकऱ्यांने वीज चोरीच्या खोट्या आरोपामुळे आत्महत्या केल्याबाबत**

**(3) * ६६७६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वीज चोरीच्या खोटया आरोपामुळे मौजे चिमणा बागापूर, ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ येथील अमरजाज मनिहार या ८० वर्षीय शेतकऱ्यांने आत्महत्या केल्याची घटना दिनांक ०४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर शेतकऱ्याने बंद रोहित्र सुरु करण्यासाठी केलेल्या प्रयत्नातून महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना दोषी ठरवून दंड ठोठावण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, दंड ठोठावल्यामुळे त्याचा बदला म्हणून सदर मयत शेतकऱ्याविरूध्द महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी वीज चोरीचा खोटा आरोप केला व त्यामुळेच सदर शेतकऱ्याने आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(5) असल्यास, चौकशीनुसार शेतकऱ्याच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याबद्दल महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(2) हे अंशत: खरे आहे. श्री.ए.एस. मनिहार यांनी दाखल केलेल्या नुकसान भरपाई प्रकरणी ग्राहक निवारण मंच (Complaint No.188/2014) यांनी विज वितरण कंपनीला नादुरुस्त रोहित्र उशीरा बदलल्यामुळे रु. २०००/- नुकसान भरपाई म्हणून सदर ग्राहकांच्या येणाऱ्या बिलात समायोजित करण्याचे आदेश दिले.
(3) हे खरे नाही.
(4) होय.
(5) सदर प्रकरणांमध्ये उपकार्यकारी अभियंता, बाभुळगाव उपविभाग तसेच सहायक अभियंता बाभुळगाव शहर वितरण केंद्र यांना वीज बिलाचे चुकीचे निर्धारण केल्यामुळे निलंबित करण्यात आले. तसेच सदर प्रकरणी महावितरणाच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात दिरंगाई करणाऱ्या तत्कालीन अधिक्षक अभियंता यांच्यावर सुध्दा निलंबनासारखी कठोर कारवाई करण्यात आली असून पुढील चौकशी करण्यात येत आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, पहिला प्रश्न असा विचारण्यात आला आहे की, वीज चोरीच्या खोट्या आरोपामुळे मौजे चिमना बागापूर, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ येथील अमरजाज मनिहार या 80 वर्षीय शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना दिनांक 04 मे, 2015 रोजी झाली आहे का ? त्याला "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. दुसऱ्या प्रश्नाला "हे अंशत: खरे आहे" असे सांगितले आहे. मनिहार यांनी दाखल केलेल्या नुकसानभरपाई प्रकरणी ग्राहक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6676....

श्री. सुनील तटकरे ....

निवारण मंच यांनी वीज वितरण कंपनीला नादुरूस्त रोहित्र उशीरा बदलल्यामुळे रू2000/- नुकसानभरपाई म्हणून सदर ग्राहकाच्या येणाऱ्या बिलात समायोजित करण्याचे आदेश दिले. पहिला प्रश्न आत्महत्येच्या कारणाबाबत विचारला आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर वाचल्यानंतर लक्षात येईल की, त्याच्यावर वीज चोरीचा आरोप केल्याचे स्पष्ट होत आहे. या संदर्भात माननीय मंत्र्यांना नेमके काय सांगायचे आहे किंवा नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे कळणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, 2 हजार रूपये दंड झाला होता. रोहित्र दिनांक 13.10.2014 ला नादुरूस्त झाले होते. संबंधितांनी तत्काळ रोहित्र दुरूस्त केले नाही म्हणून ग्राहक निवारण मंचात केस केली आणि त्या केसनुसार त्यांना 2 हजार रूपये दंडाचा आदेश झाला. सदर व्यक्तीचा मृत्यू दिनांक 04.05.2015 ला झाला आहे. ही 6 महिन्यांपूर्वीची घटना आहे. दिनांक 14.11.2014 ला रोहित्र बदलण्यात आले. त्यामुळे दंडाचा आणि त्या घटनेचा कोणताही सबंध येत नाही. मी अंशतः खरे यासाठी म्हटले आहे. दुसरा प्रश्न विचारला होता की, बंद रोहित्र सुरू करण्यासाठी दोषी ठरवून दंड ठोठावण्यात आला होता का ? त्यासाठी दंड आकारण्यात आला. कारण ते रोहित्र बंद होते. रोहित्र एक महिना बंद होते म्हणून संबंधिताना दंड झाला होता. त्यामुळे दुसऱ्या प्रश्नासाठी "अंशतः खरे आहे" असे म्हटले आहे. आत्महत्या त्या कारणाने झाली का या प्रश्नाला "नाही" असे म्हटले आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, उत्तरातून लक्षात येते की, त्यांच्यावर अशा पध्दतीने चुकीच्या पध्दतीने दंड आकारणी झाल्यामुळे आत्महत्या केली. तुम्ही आत्महत्येसाठी कोणतेही दुसरे कारण सांगितलेले नाही. हे स्पष्ट झाले आहे. स्पष्टपणे कबूल केले आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "अंशतः खरे आहे" म्हटले आहे. अंशतः खरे आहे असे म्हणण्याची गरज नव्हती. स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या कारणाने आत्महत्या केली नसेल तर दुसरे कारण काय नमूद करण्यात आले, या संदर्भात संबंधित विभागाने चौकशी करून माहिती घेतली आहे का, माहिती घेताना घरच्या इतर साक्षीदारांनी यामध्ये काय जबाब दिला ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6676....

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, दुसरा प्रश्न सरळ आहे. पहिला प्रश्न असा होता की, आत्महत्या केली का ? हे खरे नाही. आत्महत्या त्यामुळे केलेली नाही. अधिकाऱ्याला दंड झाला, तो 11 महिन्यासाठी दंड झाला. दंड होणे आणि आत्महत्या होणे यामध्ये 5-6 महिन्यांचा फरक आहे. माझ्याकडे रिपोर्ट आलेला आहे. मृत्यू प्रमाणपत्रानुसार दिनांक 04.05.2015 ला मृत्यू झाला आहे. रोहित्र बंद होते तो ग्राहक मंचात गेला, त्यामुळे त्या संदर्भात दंड झाला. आत्महत्या किंवा हत्या या संदर्भात त्याचे काही कारण आहे, त्याचा पोस्टमार्टेम रिपोर्ट झाला नाही. कारण मृत्यू घरी झाला असे दिसत आहे. दिनांक 04.05.2015 ला मृत्यू झाला आहे. दोन्ही घटनांचा संबंध जोडता येत नाही. रोहित्र बसविण्यास उशीर झाल्याने दंड झाला हे सांगितले आहे ते खरे आहे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यात गत हंगामातील कापूस व धान पिकांच्या नुकसानीची
शेतकऱ्यांना मदत मिळणेबाबत**

**(4) * ७८५९ श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात गत हंगामात कापूस व धान पिकाचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यानुसार मदत देणेबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप कांबळे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) व (२) नाही.
तथापि राज्यात खरीप हंगाम २०१४ मधील ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासन पत्र दिनांक ५.१.२०१५ अन्वये केंद्र शासनाकडे रुपये ६०१३.२८ कोटी इतक्या रकमेचे मदतीचे ज्ञापन पाठविण्यात आले होते.
खरीप हंगात २०१४ मधील ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत वाटपासाठी शासन निर्णय दिनांक ७.१.२०१५ अन्वये रुपये २००० कोटी, शासन निर्णय २.२.२०१५ अन्वये रुपये २००० कोटी व दिनांक ८.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये ४०२.७३ कोटी असे एकूण रुपये ४४०२.७३ कोटींचे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
तसेच राज्यात रब्बी हंगाम सन २०१४-१५ मधील ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत वाटपासाठी शासन निर्णय दिनांक २१.५.२०१५ अन्वये रुपये ३६४.२७ कोटी इतक्या निधी( Input Subsidy) उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
यामध्ये कापूस, धान व विविध पिकांचा समावेश असून मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, शेतकऱ्यांना कर्जमाफीही दिलेली नाही. गत हंगामातील कापूस व धान पिकांच्या नुकसानीची शेतकऱ्यांना मदत मिळणार होती, ती सुध्दा संपूर्णपणे वितरित केलेली नाही. प्रश्न कमांक 1 व 2 ला "नाही" असे सांगितले आहे. 50 पेक्षा कमी आणेवारीमध्ये आलेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी दिनांक 05.01.2015 च्या पत्रान्वये मदत घोषित केली आहे. माझा प्रश्न असा आहे की, यवतमाळ जिल्ह्याला किती मदत दिली आणि दिलेल्या मदतीतून किती पैसे परत आले ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859....

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन 2014 मध्ये राज्यात काही वेळा अवकाळी पाऊस पडला. सुरुवातीला 2 हजार कोटी रुपयांची मदत शासनाने जाहीर केली आहे. सन्माननीय सदस्यांनी यवतमाळच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. आवश्यक निधी 295.29 कोटी रुपये एवढा होता, त्यामध्ये तातडीची गरज म्हणून 122.80 कोटी रुपये वितरित केले आहेत आणि उर्वरित निधी तातडीने देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. संदिप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री सांगत आहेत की, जेवढी मागणी झाली त्यामध्ये 122 कोटी रुपयेच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आजपर्यंत जेवढी मागणी झाली तेवढी संपूर्ण वितरित का करण्यात आली नाही, आपण ती केव्हा वितरित करणार आहात ? शासन यावर्षी कर्जमाफी देणार नाही. फेरपेरणीची वेळ आली आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर सन 2017 मध्ये मदत देणार आहात का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मागील कालखंडात 122 कोटी रुपये वितरित करण्यात आले होते. यवतमाळ जिल्ह्यातून 254 कोटी रुपयांची मागणी होती आणि 254 कोटी रुपयेच वितरित करण्यात आले आहेत. वितरित करण्याची कार्यवही सुरु आहे. कोणत्याही प्रकारचा निधी सरकारकडे परत आलला नाही. तो बँकामध्ये आहे. खाते क्रमांक मिळाले नाहीत किंवा वारसाच्या काही तक्रारी आहेत अशा ठिकाणचा निधी प्रलंबित आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, प्रश्नाचा रोख कापूस व धान उत्पादक शेतकरी आणि त्या शेतकऱ्यांचे या हंगामात झालेले नुकसान याकडे आहे. राज्यातील वेळोवेळी आलेला अवकाळी पाऊस, गारपीट यासंबंधीचा प्रश्न नाही. उत्पादन झाले नाही, नुकसान झाले या संदर्भातील प्रश्न आहे. हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. आम्ही नेहमीच याकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. सरसकट राज्यामध्ये् दुष्काळी भागाकरिता साडे चार हजार रुपये हेक्टरी देत आहोत असे सांगितले आणि त्यातील 254 कोटी रुपयांच्या वाटा यवतमाळ जिल्ह्याला आहे या संदर्भात सागितले. कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सोयाबीन,



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859....

श्री. माणिकराव ठाकरे ....

धान या पिकांइतके नुकसान सरसकट कोणत्याही पिकांचे झालेले नाही. परिणाम दिसून आले आहेत. भंडारा, गोंदियाच्या निवडणुकीचे परिणाम आले आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना 1 हजार रूपयांपेक्षा कमी भाव मिळत आहे. भविष्यात दोन्ही पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्याच्या दृष्टीने शासन एकाधिकार योजनेप्रमाणे खरेदीची नवीन काही व्यवस्था करणार आहे का ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859........

चांगल्या धानाचा दर 1 हजार रुपयांनी कमी आहे. कापसाची खरेदी सुध्दा बंद झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सरकारचे पूर्वीपासूनचे धोरण असे होते की, राज्य सरकारने हमी भावामध्ये खरेदी केली पाहिजे. गेली अनेक वर्षे स्व.यशवंतराव मोहिते-पाटील यांनी सुरु केलेल्या कापूस एकाधिकार खरेदी योजनेची अंमलबजावणी चांगल्या पध्दतीने सुरु होती. परंतु, मागील काळात ती योजना बंद केल्यामुळे आता कापूस एकाधिकार योजना नव्याने सुरु करायची का, याचा सरकारला विचार करावा लागेल. ही योजना कोणत्या कारणासाठी बंद करण्यात आली, का बंद करण्यात आली, याचा विचार करुन नव्याने ही योजना सुरु करावी किंवा कसे, याबाबत सरकार निश्चितपणे विचार करील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन 2014 मध्ये 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आलेल्या शेतकऱ्यांची संख्या किती आहे, त्या शेतकऱ्यांनी विमा उतरविलेला आहे का ? ज्या शेतकऱ्यांना विम्याचे आणि शासनाच्या मदतीचे पैसे मिळाले पाहिजे, अशा किती शेतकऱ्यांनी विमा उतरविला होता आणि त्यामधील किती शेतकऱ्यांना विम्याचे आणि शासनाच्या मदतीचे पैसे मिळालेले आहेत ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ज्या ठिकाणी गारपीट, वादळ.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी गारपीट किंवा वादळाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांबद्दलचा प्रश्न विचारलेला नाही. महसूल मंत्री महोदय हुशार आहेत. त्यांनी विधिमंडळात 30 वर्षे घालविली आहेत. ते विषयाला बगल देत आहेत. मघाशीही सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या प्रश्नाला त्यांनी बगल दिलेली आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनीच लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "खरीप हंगाम, 2014 मधील 50 पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी ज्ञापन पाठविण्यात आले आहे." याचा गारपिटीशी काहीही संबंध नाही.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859........

श्री.जयंत प्र.पाटील.......

सभापती महोदय, मी पुन्हा एकदा प्रश्न विचारतो. 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी आलेल्या शेतकऱ्यांची संख्या किती आहे, त्या शेतकऱ्यांनी विमा उतरविलेला आहे का ? या शेतकऱ्यांना विम्याचे आणि शासनाच्या मदतीचे पैसे मिहाले पाहिजे, अशा किती शेतकऱ्यांनी विमा उतरविला होता आणि त्यामधील किती शेतकऱ्यांना विम्याचे आणि शासनाच्या मदतीचे पैसे मिळालेले आहेत ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, प्रश्न राखून ठेवायचा असेल तर राखून ठेवावा. मंत्री महोदयांचा अभ्यास थोडा कमी पडतो आहे, असे समोरच्यांना वाटत आहे.

**सभापती :** प्रश्न राखून ठेवण्याचा अधिकार माझा आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, तो आपलाच अधिकार आहे. परंतु, काही सन्माननीय सदस्य तशी विनंती करीत आहेत म्हणून मी म्हणालो.

सभापती महोदय, किती शेतकऱ्यांनी विमा उतरविला आहे, याबाबतची आकडेवारी आता माझ्याकडे उपलब्ध नाही. तथापि, एकूण 53 लाख, 46 हजार, 890 हेक्टर जमीन सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे, अवर्षणामुळे बाधित झाली होती व त्यांना संपूर्ण मदत देण्यात आली आहे. तसेच, या राज्यात पहिल्यांदाच सर्व ठिकाणी विमा कंपनीचा लाभ देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. राज्य शासनाचे अंशदान, शेतकऱ्यांचा हिस्सा आणि केंद्र शासनाची मदत मोठ्या प्रमाणावर देण्यात आली आहे.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, माझा मंत्री महोदयांना विवक्षित प्रश्न असा आहे की, "4402 कोटी रुपयांचे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे," असे लेखी उत्तर देण्यात आले आहे. ते चुकीचे आहे. प्रत्क्षात 31/5/2015 अखेर पूर्वी दिलेल्या 4000 कोटी शेतकऱ्यांपैकी शेतकऱ्यांची बँकेत खाती नसणे, वारस नोंदी नसणे, इत्यादी कारणांमुळे 460 कोटी रुपये राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पुन्हा समर्पित केले आहेत, हे खरे आहे काय ?

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859........

श्री.अनिल तटकरे........

सभापती महोदय, सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली एकत्रित मागणी 4802 कोटी रुपयांची असताना या मागणीच्या तुलनेत 3942 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. एकूण मागणीच्या तुलनेमध्ये दुसरा खरीप हंगाम वाया गेला तरी शासनाने 858 कोटी रुपये नुकसान भरपाईची रक्कम राज्यातील शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. ती केव्हा उपलब्ध करुन देणार आहात ?

सभापती महोदय, मघाशी राखून ठेवलेल्या प्रश्नाबाबत माझा उप प्रश्न आहे. मघाशी राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले. जलशिवार योजनेअंतर्गत आणि शेततळी योजनेअंतर्गत जी कामे मंजूर केली जातात त्यांना ग्रामसभेची मान्यता आवश्यक आहे किंवा नाही ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, जलयुक्त शिवार योजनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा. तो या तारांकित प्रश्नाशी संबंधित नाही.

सभापती महोदय, पैसे परत येण्यासंबंधी मी मघाशीच सांगितले आहे की, काही ठिकाणी 7/12 उताऱ्यावरील वारसांमधील वाद, बँक अकाऊंट उपलब्ध न होणे, यामुळे रक्कम वितरित करता आलेली नाही. आता आपण थेट लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये रक्कम जमा करीत असतो. आता या क्षणाला ज्या ज्या शेतकऱ्यांचे बँक अकाऊंट उपलब्ध झाले आहे आणि ज्यांनी वारसाहक्क वाद मिटविला आहे, त्या सर्वांना पैसे दिलेले आहेत. उर्वरित रक्कम राज्य सरकारकडे परत आलेली नाही. ती जिल्हाधिकाऱ्यांकडे म्हणजेच संबंधित ट्रेझरीकडे जमा आहे, ही वस्तुस्थिती आहे.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, कोकणात मागील ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तथापि, त्या भागातील आणेवारी 50 पैशांपेक्षा जास्त आहे, असे सांगण्यात आले व त्यांना नुकसान भरपाई देऊ केलेली नाही. आणेवारीची पध्दत ब्रिटिशकालीन असून कोकणासाठी ती मारक ठरत आहे. त्यामुळे ही पध्दत शासन बदलणार आहे का ?

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859........

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आणेवारीची पध्दत ब्रिटिशकालीन असूने ती जुनी झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. या पध्दतीमध्ये बदल करावा, अशा प्रकारची मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. यासाठी कृषी आयुक्त श्री.विकास देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने गेल्या सहा महिन्यांमध्ये मागील आणेवारी, आताची आणेवारी, पीक पध्दती, गेल्या 50 वर्षात आलेल्या नैसर्गिक आपत्ती, त्यांचे प्रकार, झालेले नुकसान, नुकसानीची कारणे, भौगोलिक विस्तार, भौगोलिक क्षेत्र याबाबतचा अभ्यास करुन एक अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. आणेवारीच्या पध्दतीमध्ये बदल करण्याविषयीच्या या अहवालाचा सकारात्मक विचार करण्याचा राज्य सरकारचा मनोदय आहे. यासाठी आणखी 4-6 महिन्यांचा कालावधी लागू शकतो. या अहवालातील शिफारशी मंत्रिमंडळासमोर ठेऊन आणेवारीच्या पध्दतीमध्ये बदल करण्याबाबत शासन येत्या सहा महिन्यात सकारात्मक विचार करील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदय खूप अनुभवी आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी धान खरेदीच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. पण मंत्री महोदयांनी स्व्.यशवंतराव मोहिते-पाटील यांनी सुरु केलेल्या कापूस एकाधिकारी खरेदी योजना कोणाच्या कालावधीमध्ये सुरु झाली, कोणाच्या कालावधीमध्ये बंद झाली, वगैरे बाबत उत्तर दिले.

सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षांपासून आपण किमान आधारभूत किमतीवर भात खरेदी करीत आलो आहोत. मुख्यमंत्री महोदयांनी किंवा कदाचित मंत्रिमंडळाने 200 रूपये बोनस देण्याची घोषणाही एप्रिल महिन्यामध्ये केली होती.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचा असा प्रश्न होता आणि आमचाही असा प्रश्न आहे की, खरीप हंगाम संपल्यानंतर नियमितपणे भात खरेदी करण्यात येणार आहे का ? नियमितपणे भात खरेदी करण्याचा आणि कापूस एकाधिकार खरेदी योजनेचा दुरान्वयानेदेखील काही संबंध नाही. केंद्र सरकार आधारभूत किमतीच्या आधारे धान खरेदी करीत

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7859........

श्री.सुनील तटकरे.......

असते. केंद्र सरकारच्या योजनेप्रमाणे या वर्षी देखील खरीप हंगाम संपल्यानंतर, ज्या प्रमाणे गेल्या 10-15 वर्षे नियमितपणे खरेदी करण्यात येत होती, त्याप्रमाणे खरेदी करण्यासंबंधी सरकार पावले उचलणार आहे का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मागील 8-10 वर्षात ज्या धर्तीवर खरेदी सुरु होती त्या धर्तीवर धान खरेदी करण्याचा सरकार नक्की निर्णय घेईल.

------------

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील वीज निर्मितीकरीता कोळसा खाणी महाराष्ट्रात राहण्याबाबत**

**(5) *७९६३ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, अॅड. हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यामध्ये कोळशाच्या तुटवडयामुळे वीज निर्मिती करण्यामध्ये अडचणी येत असून महानिर्मितीने कोराडी, भुसावळ, चंद्रपूर व परळी येथील चार संच बंद करण्यासाठी वीज नियामक आयोगाकडे परवानगी मागितली असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) ऑनलाईन खाण वाटपात महाजनकोने सहभाग न नोंदविल्यामुळे चंद्रपुर जिल्ह्यातील बराज येथील खाण महाजनको ऐवजी कर्नाटकच्या के.पी.सी.एल.ला वितरीत करण्यात आल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून राज्यातील महानिर्मितीच्या वीज केंद्रांमधील कोळासा टंचाई दुर करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) असल्यास, महाराष्ट्र राज्यात वीज निर्मितीकरीता कोळसा खाणी महाराष्ट्रात रहाव्यात यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) असल्यास, राज्यातून येणारा कोळसा वीज निर्मितीकरिता अपुरा पडत असल्याने बाहेरच्या देशातून कोळसा मागविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(6) असल्यास, सन २०१३-२०१४-२०१५ ह्या वर्षात किती बाहेरील कोळसा मागविण्यात आला आहे,
(7) असल्यास, देशातील व देशाबाहेरील कोळशांच्या किंमतीत फरक किती आहे,
(8) सन २०१५ मध्ये किती बाहेरील कोळसा मागविण्यात आला व येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.
कोळशाच्या तुटवड्यामुळे महानिर्मिती कंपनीने जानेवारी, २०१५ मध्ये सदर संच तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्यासाठी, राज्य वीज नियामक आयोगाकडे परवानगी मागितली होती.
(2) नाही.
(3) भारत सरकारच्या कोळसा मंत्रालयाने सुरू केलेल्या कोळसा खाण पुर्नआवंटन प्रक्रियेनुसार, महानिर्मिती कंपनीने मे.एम.एस.टी.सी. (भारत सरकारचा उपक्रम) च्या पोर्टलवर खालीलप्रमाणे कोळसा खाणी मिळणेबाबत अर्ज केला होता.

१. बरांज-I, II,III,IV, मनोरा दीप व किलोनी कोल ब्लॉक (महाराष्ट्र)
२. गारे पाल्मा-सेक्टर-१ (छत्तीसगड)
३. गारे पाल्मा-सेक्टर-२ (छत्तीसगड)
४. गारे पाल्मा-सेक्टर-३ (छत्तीसगड)
५. चेंदीपाडा व चेंदीपाडा-२ (ओडीसा)

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963........

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.......

केंद्रीय कोळसा मंत्रालयाकडून महानिर्मिती कंपनीला वरील खाणीपैकी गारे पाल्मा सेक्टर-२ ही कोळसा खाण आवंटीत करण्यात आली.
(4) मा.मुख्यमंत्री व मा.उर्जामंत्री यांच्या स्तरावरुन मा.केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली यांना महाराष्ट्रातील बरांज- I, II, III, IV, मनोरा दीप व किलोनी या कोळसा खाणी आवंटीत करण्याबाबत विनंती करण्यात आली होती.
(5) होय,
(6) बाहेरील देशातून सन २०१३-२०१४ मध्ये २९,९२,००० मे.टन व सन २०१४-२०१५ मध्ये १९,३३,८०० मे.टन कोळसा खरेदी करण्यात आला.
(7) सन २०१३-२०१४ मध्ये आयात कोळशाचा सरासरी प्रति मे.टन दर रुपये ५१८९.९९ व देशी कोळशाचा सरासरी प्रति मे.टन दर रुपये २६०७.९८ असा आहे. तसेच सन २०१४-२०१५ मध्ये आयात कोळशाचा सरासरी प्रति मे.टन दर रुपये ६२२१.५३ व देशी कोळशाचा सरासरी प्रति मे.टन दर रुपये २७२३.१७ इतका आहे.
(8) सन २०१५-२०१६ साठी २.७ दशलक्ष मे.टन कोळशासाठी निविदा काढण्यात आली असून याची निविदा प्रक्रिया चालू आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, राज्यातील वीज निर्मितीकरिता महाराष्ट्रातील कोळसा खाणी महाराष्ट्रालाच मिळण्याबाबतचा हा प्रश्न आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बराज येथील 20 किलोमिटरवर असलेली खाण महाजनको ऐवजी कर्नाटकच्या के.पी.सी.एल.ला वितरित करण्यात आली आहे. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे ?

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963........

ॲड.जयदेव गायकवाड........

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नियोजनाच्या अभावामुळे राज्यात भारनियमन होत आहे, हे खरे आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, राज्यात किती किती वीज उपलब्ध आहे, किती विजेची आवश्कता आहे आणि कमी पडणारी वीज उपलब्ध करण्याबाबत काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही गोष्ट खरी आहे की, बरांज 1, 2, 3, 4, मनोरा दीप व किलोनी कोल ब्लॉक हा चंद्रपूर येथून 20 किलो मीटर अंतरावर आहे. हा कोल ब्लॉक पहिल्या पासूनच कर्नाटक राज्याकडे आहे. त्यानंतर जे ई-ऑक्शन झाले त्यामध्ये महाजनकोने बरांज, गारे पाल्मा सेक्टर-1, गारे पाल्मा सेक्टर-2, गारे पाल्मा सेक्टर-3 आणि चेंदीपाडा व चेंदीपाडा-2 अशा कोल ब्लॉकच्या ई-ऑक्शनमध्ये भाग घेतला जातो. परंतु, तेथे कर्नाटकची प्रोसिडिंग आपल्याला माहीत असल्यामुळे व ती माईन्स त्यांच्याकडेच असल्यामुळे 180 दशलक्षचा बरांज आपल्याला मिळाला नाही. परंतु, केंद्र शासनाने आपल्याला यावर्षी गारे पाल्मा सेक्टर-2 हा अत्यंत महत्वाचा कोल ब्लॉक दिलेला आहे. यापूर्वी मच्छाकाटा महागूत कंपनीबरोबर 60:40 मध्ये होता. तो रद्द झालेला आहे. माननीय श्री.सुनील तटकरे साहेब ऊर्जा मंत्री असताना त्यांनी यासाठी बरेच प्रयत्न केले होते. त्यांनी कच्छाकाटा लिंकेज करण्याकरिता, राज्याला कोळसा मिळावा यासाठी बरेच प्रयत्न केले होते. परंतु, त्या कोल ब्लॉकचे आवंटन रद्द झाल्यामुळे आपल्याला गारे पाल्मा सेक्टर-2 हा मोठा कोल ब्लॉक मिळालेला आहे. राज्यात महाजनवाडी येथे कोल ब्लॉक आहे, त्यासाठीही परवानगी मिळाली आहे. आता त्याचे लिंकेजचे आवंटन लेटर यायचे आहे. परंतु, अलॉटमेंट झालेले आहे. महाजनवाडी येथे आपल्याला 340 एमएमटी कोळशाचा दुसरा कोल ब्लॉक मिळालेला आहे. आपल्या राज्याला अत्यंत चांगले कोल ब्लॉक मिळाले आहेत आणि यातून वीज निर्मितीसाठी चांगला सपोर्ट होणार आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963........

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी लोडशेडिंग संदर्भात दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मागील शासनाने ए, बी, सी, डी ग्रुपमध्ये लॉसेसच्या आधारावर लोडशेडिंग करण्याबाबत धोरण ठरविले होते. लॉसेसच्या आधारावर लोडशेडिंग असल्यामुळे आणि फिडर सेपरेशन नसल्यामुळे काही गावे अंधारात आहेत. अजूनही काही गावे शेतीच्या फिडरवर आहेत. त्यामुळे आपण ती गावे जोपर्यंत फिडर सेपरेशन करुन वेगळी करीत नाही तोपर्यंत आपल्याला त्या गावांमधील लोडशेडिंग बंद करता येत नाही. आता केंद्र शासनाची नवीन योजना येत आहे त्या योजनेतून आपण त्या गावांचे फिडर सेपरेशन करणार आहोत. त्यामुळे ती गावे लोडशेडिंगच्या बाहेर निघतील आणि बाकीचे लोडशेडिंग मात्र जुन्याच धोरणाप्रमाणे म्हणजे लॉसेस आणि रिकव्हरीच्या आधारावर राहणार आहे. त्यामुळे लॉसेस आणि रिकव्हरी हे दोन विषय सोडले तर लोडशेडिंग नाही. सध्या 13 ते 14 हजार मेगावॅट लोड आहे आणि राज्यात पुरेशी वीज असल्यामुळे आज तशी लोडशेडिंग करण्याची गरज नाही. केवळ लॉसेस आणि रिकव्हरी हे दोन विषय सोडले तर लोडशेडिंग नाही.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, केंद्रीय कोळसा वाटप समितीने असे सूचविले होते की, राज्यातील कोळसा खाणींमधील कोळसा त्याच राज्यातील वीज निर्मितीसाठी वापरला तर उत्पादन खर्च कमी येतो. माझा प्रश्न असा आहे की, अशी शिफारस असताना सुद्धा केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी महाराष्ट्राला त्या खाणी दिल्या नाहीत. त्यांनी त्यांच्या अखत्यारित त्या खाणी कर्नाटक सरकारला दिलेल्या आहेत, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, महाराष्ट्रातील चंद्रपूर जवळची जी कोळसा खाण आहे ती कर्नाटक राज्याला मिळालेली आहे आणि ती ऑलरेडी कर्नाटक राज्याकडेच होती. आपल्या राज्याला ज्या कोळसा खाणी मिळालेल्या आहेत त्या अत्यंत मोठ्या आहेत. माननीय श्री.अजित पवार साहेब आणि माननीय श्री.सुनील तटकरे साहेब ऊर्जामंत्री असताना परिस्थिती इतकी वाईट होती की, मच्छाकाटा कोल ब्लॉक मिळविण्यासाठी आपल्याला

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963........

श्री.चंद्रशेखर बावनकुळे........

नाकीनऊ आले होते. कारण, त्यावेळी संपूर्ण देशात परिस्थितीच तशी होती. कर्नाटक राज्याला जी बरांज दिलेली आहे ती पूर्वी पासूनच त्यांच्याकडे असल्यामुळे दिलेली आहे. आपण त्यासाठी अर्ज केला होता. परंतु, आपला अर्ज नाकारण्यात आला. आपल्या राज्याला गारे पाल्मा सेक्टर-2 हा कोल ब्लॉक मिळाला आहे आणि त्यातून राज्याला पुरेसा कोळसा मिळेल.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. राज्यातील कोळसा खाण मिळाली तर उत्पादन खर्च कमी येतो आणि मंत्री महोदय सांगतात की, ती नाकारण्यात आलेली आहे. माननीय केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी आपल्याला त्या खाणीतून कोळसा उचलण्यास परवानगी दिली नाही. त्यामुळे उत्पादन खर्च वाढलेला आहे, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, बरांज कोल ब्लॉक कर्नाटक राज्याकडे होता. ती माईन्स सुरु होती. मग ती माईन्स ऑक्शनमध्ये दुसऱ्या राज्याला कशी काय देणार ? ती माईन्स जवळ असल्यामुळे राज्य शासनाने अर्ज केला होता. परंतु, ती माईन्स कर्नाटक सरकारकडे असल्यामुळे ती आपल्याला मिळाली नाही.

**सभापती** : मंत्री महोदय, आपल्याला जवळच्या खाणी मिळाल्या तर उत्पादन खर्च कमी होईल, हे तत्व आहे. आपण त्या पद्धतीने प्रयत्न करावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मागील 5 वर्षापूर्वी आपण भद्रावती बरांजच्या खाणी मागितल्या होत्या. परंतु, त्या खाणी लिलावामध्ये आपल्या राज्याला मिळाल्या नव्हत्या, ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळी त्या खाणी कर्नाटक राज्याला देण्यात आल्या होत्या. त्यावेळी आम्हीच प्रश्न उपस्थित केला होता की, बरांजच्या खाणी जवळ असताना त्या आपल्या राज्याला न देता कर्नाटक राज्याला देऊन आपल्याला मच्छाकाटा येथील खाणीतील कोळसा देण्यात आला. त्यामुळे आपला उत्पादन खर्च वाढतो, हे खरे आहे काय ? आम्ही त्यावेळी असा प्रश्न विचारला होता आणि आजही विचारत आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण पूर्वी कोळसा खरेदी करीत होतो

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963........

श्रीमती शोभा फडणवीस.........

आणि त्यानंतर पैसे देत होतो. परंतु, आता अगोदर पैसे द्यावेत आणि त्यानंतर कोळसा मिळेल, असा डब्ल्यूसीएलने करार केलेला आहे. आज अशी परिस्थिती आहे की, आम्ही पाहिजे तेवढे पैसे भरतो. परंतु, आपल्याला तेवढा कोळसा मिळत नाही. त्यामुळे विजेची तूट निर्माण होते, ही गोष्ट खरी आहे काय आणि डब्ल्यूसीएलकडून आपल्याला अजून किती पैसे येणे बाकी आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, मागील शासनाच्या काळात आपण तो कोल ब्लॉक मागितला होता. परंतु, तो कर्नाटक राज्याला देण्यात आला होता. मी या संदर्भात जास्त उल्लेख करीत नाही. कारण, ते राजकीय भांडण होईल. मागील शासनाने बरांज कोल ब्लॉक मिळावा, अशी मागणी केली होती. परंतु, ती मागणी नाकारण्यात आली होती. तो कोल ब्लॉक कर्नाटक राज्याला मिळाला होता. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, प्रथम पैसे भरा आणि त्यानंतर कोळसा मिळेल, अशी डब्ल्यूसीएलने कोणतीही अट घातलेली नाही. त्यांनी ती अट आता रद्द केलेली आहे. आता उधारीवर देखील कोळसा मिळत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, डब्ल्यूसीएलकडून किती पैसे येणे बाकी आहेत ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, डब्ल्यूसीएलकडून नियमित कोळसा मिळत आहे. आपण ज्याप्रमाणे मागणी करतो त्याप्रमाणे त्यांच्याकडून कोळसा मिळतो. काही वेळा कोळशाचे पर्सेंटेज कमी मिळते. म्हणून आपण इम्पोर्टेड कोळसा घेतो. कोराडी येथे 39 टक्के कोळसा येतो. माझ्याकडे संपूर्ण आकडेवारी आहे. आपल्याला आज डब्ल्यूसीएल सपोर्ट करीत आहे. आपण पैसे भरलेले नसताना देखील त्यांनी आपल्याला जवळपास 400 ते 450 कोटी रुपये किंमतीचा कोळसा उधारीवर दिलेला आहे. डब्ल्यूसीएल आपल्याला सपोर्ट करीत आहे. अगोदर पैसे भरा आणि त्यानंतर कोळसा मिळेल, असे धोरण आता डब्ल्यूसीएलने घेतलेले नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा थोडा तांत्रिक प्रश्न आहे. ज्या कोल माईन्स आपल्याला नाकारण्यात आल्या त्याचा उल्लेख या तारांकित प्रश्नात आलेला आहे. त्या कोल

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963........

श्री.प्रकाश बिनसाळे.......

माईन्समधील कोलची थर्मल व्हॅल्यू काय होती ? त्यानंतर आपल्याला ज्या कोल माईन्स दिल्या त्या कोलची थर्मल व्हॅल्यू काय आहे, त्यामध्ये कोळशाचा किती साठा आहे आणि आपण इम्पोर्टेड कोल जवळपास दुप्पट किंमतीने घेतो त्याची थर्मल व्हॅल्यू काय आहे आणि त्याची तुलना केली असता कोणता कोळसा वापरला तर विजनिर्मितीचा खर्च कमी येतो ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, आपल्याला गारे पाल्मा सेक्टर-2 ही कोल माईन्स मिळणार आहे. त्यातून 653.470 मेट्रीक टन म्हणजे प्रत्येक वर्षी 23.6 मेट्रीक टन कोळसा मिळणार आहे.

**सभापती** : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी थर्मल व्हॅल्यू संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपण त्याबाबत स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, आता गारे पाल्मा सेक्टर-2 प्रोसिडिंग माईन्स सुरु व्हायची आहे, माईन्सच्या प्रोसिडिंगसाठी 2 वर्षे लागतील. महाजनवाडी येथेही प्रोसिडिंग सुरु करायचे आहे. प्रोसिडिंग झाल्यानंतर थर्मल व्हॅल्यू मोजता येते. गारे पाल्मा सेक्टर-2 चे सर्व्हेक्षण सुरु झाले आहे. गारे पाल्मा सेक्टर-2 आणि महाजनवाडी कोल ब्लॉकची जीसीबी व्हॅल्यू बाबतची संपूर्ण माहिती पाहिजे असेल तर मी ती सभागृहाच्या पटलावर ठेवतो. इम्पोर्टेड कोलची माहिती माझ्याकडे आहे. आपल्याकडे इन्पोर्टेड कोळसा येतो.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963...

श्री.चंद्रशेखर बावनकुळे....

सभापती महोदय, याबाबत लेखी उत्तराच्या क्रमांक सात मध्ये इसीपीचे दर नमूद करण्यात आले आहे, महाजनवाडी व गलेफार्माची माहिती मी पटलावर ठेवतो.

**सभापती** : मंत्री महोदय, आता आपणाकडे माहिती नसेल तरी ते काही चुकीचे होत नाही आपण शांतपणे विचार करा व नंतर माहिती पटलावर ठेवावी.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, इसीपीच्या दराबाबत संपूर्ण माहिती पटलावर ठेवतो.

श्री.संदिप बाजोरिया : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, राज्यात कोठेही भारनियमन नाही, मंत्री महोदयांना उत्तरात दुरूस्ती करावयाची आहे काय ? सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगतो की, यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण भागात 9 तास विजेचे भारनियमन चालू आहे, मंत्री महोदय अत्यंत दिशाभूल करणारी व असत्य माहिती सभागृहाला देत आहेत, विजेच्या भारनियमनाबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, ऊर्जा विभागाच्या धोरणाची माहिती सन्माननीय सदस्यांना आहे, मी आधीच सांगितले आहे की, फिडरची एबीसीडी अशी वर्गवारी करण्यात आली आहे. या फिडरवर विजेचे भारनियमन करण्यात येत नाही, विजेचे भारनियमन दोन प्रकारे करण्यात येते. जे फिडर लॉसेस व रिकव्हरीमध्ये कमी आहेत, त्या भागात भारनियमन करण्यात येत आहे, शासनाच्या धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांकडे शासनाच्या धोरणाची प्रत आहे, परंतु ते राजकीय प्रश्न विचारीत आहेत. ज्या गावातील फिडर स्वतंत्र करण्यात आले नाहीत, त्या गावात अजूनही विजेचे भारनियमन चालू आहे. केंद्र सरकारच्या नवीन योजनेअंतर्गत संपूर्ण गावांसाठी स्वतंत्र फिडर करण्यात येत आहेत त्यानंतर त्या गावातील भारनियम रद्द होणार आहे. इम्पोर्टेड कोलची इसीपी व्हॅल्यू 5500 आणि डोमॅस्टिक कोलची इसीपी व्हॅल्यू 3500 आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी जो प्रश्न विचारला तो अत्यंत महत्वाचा आहे, इम्पोर्टेड कोलची व्हॅल्यू 70 टक्के जास्त आहे, इम्पोर्टेड कोलसाठी टेंडर काढले जाते, त्यात काही अटी घातल्या जातात. काल एका प्रश्नाच्या वेळी

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7963...

श्री.जयंत प्र.पाटील...

सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले होते की, दुसऱ्या कोणालाही टेंडर भरता येत नाही. हे सरकार पारदर्शक टेंडर पध्दतीचा अवलंब करीत आहे, इम्पोर्टेड कोलच्या बाबतीत तशा पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे काय ? इम्पोर्टेड कोलची क्षमता इंडियन कोल पेक्षा जास्त आहे. त्यामुळे कोल खरेदीचे धोरण राज्य शासन बदलणार आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महादेय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला आहे, आतापर्यंत या राज्यात जी पध्दत नव्हती ती या सरकारने सुरु केली आहे. रिव्हस बिडींग पध्दतीने कोळसा घेण्याची पध्दत सुरु केली आहे. याबाबत काल निविदा उघडण्यात आल्या आहेत, मागील सरकारच्या काळात सन 2013-2014 मध्ये प्रति मे.टन कोळशाचा दर 5189 होता. सन 2014-15 मध्ये प्रति.मे.टन कोळशाचा दर 6221 होता. आता काल टेंडर ओपन करण्यात आले त्यावेळी कोळशाच्या प्रति मे.टन दराचा ॲव्हरेज 4500 आला आहे. जवळपास 1500 रुपयांनी हा दर कमी आलेला आहे. त्यामुळे पारदर्शक पध्दतीने कारभार चालू आहे. रिव्हस बिडींग पध्दतीनुसार पारदर्शक पध्दतीने टेंडर काढण्यात आले आहे.

-----------

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत**

(6) * **७२४९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण: तारांकित प्रश्न क्रमांक २६६८ ला दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत ॲड. जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन आरक्षण देण्यात येईल, अशी घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी ॲड जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(3) तसेच, या समाजास जाणीवपूर्वक डावलण्याचा प्रकार केल्याने राज्यभरातील मुस्लिम समाजात निर्माण झालेली असंतोषाची भावना दूर करण्यासाठी शासन स्तरावरून कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, मुस्लिमांना आरक्षण देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय
(2) सामान्य प्रशासन विभाग, दि. ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी दिलेल्या ५% आरक्षणाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यत कायदयात रुपांतर न झाल्याने, उपरोक्त अध्यादेश व्यपगतत झाला, तरीही ॲड जनरल यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे उक्त कालावधीतील शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे.
(3) व (४) बाबत नमूद करण्यात येते की, या प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यावर तो विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सभापती महोदय, अनेक समित्यांचे अहवाल देशात व राज्यात आले आहेत, त्यामध्ये रहेमान समिती व सच्चर समित्यांनी मुस्लिम लोकांची शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती फार मागासलेली आहे. लोकशाही आघाडी शासनाने मुस्लिम समाजाला पाच टक्के आरक्षण दिले होते, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, ही बाब न्यायप्रविष्ट आहे, मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत आपले सरकार किती गंभीर आहे, आंध्रप्रदेश, कर्नाटक व तामिळनाडू आणि इतर राज्यात मुस्लिमांना आरक्षण देण्यात आले आहे. या राज्याच्या धर्तीवर आपल्या राज्यातील मुस्लिमांना आरक्षण देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7249...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मुस्लिमांना आरक्षण देण्याबाबत राज्य सरकार गंभीर आहे, मागील 50-60 वर्षात जो निर्णय आपल्या सरकारने घेतला नाही तो आमच्या सरकारने घेतला आहे. या विषयाबाबत उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले आहे. या आरक्षणाला न्यायालयाने मान्यता द्यावी. याबाबत राज्य शासनाकडून प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी राज्य शासनाने कोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्या प्रतिज्ञापत्रात राज्य मागासवर्ग आयोगाचे अभिप्राय नमूद करण्यात आले आहेत, त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मुस्लिम समाज मागास आहे, प्रतिज्ञापत्रातील बाबी मी सांगत आहे त्यामुळे हे किती गंभीर आहे ते आपणाला कळेल. सरकारी नोकरीमध्ये मुस्लिमांचे प्रमाण अत्यल्प आहे, सच्चर व रहेमान समितीचा सांख्यिकी डाटा विचारात घेऊन आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्नाटक राज्यात चार टक्के व आंध्रप्रदेशात पाच टक्के मुस्लिमांना स्वतंत्रपणे आरक्षण देण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टात अशी बाजू मांडण्यात आली आहे की, या राज्यांनी आरक्षण दिले तर महाराष्ट्र राज्यात आरक्षण देण्यास आपण आम्हाला का परवानगी देत नाहीत. उन्नत व प्रगत गटात म्हणजे क्रिमिलेअर मध्ये न मोडणाऱ्या मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य अल्पसंख्यांक आयोगाने अभिप्राय दिले आहेत. मागास प्रवर्ग निश्चित करण्याचे मापदंड लावताना इतर समाजातील सर्व घटकांना समन्यायी तत्व लावले जाते ते अल्पसंख्यांक समाजाला लावले पाहिजे, त्यामध्ये भेदभाव केला जाऊ नये, तसेच अल्पसंख्याक समाजापैकी विशेषतः मुस्लिम समाजाचे शासकीय सेवांमधील प्रतिनिधित्व अल्प असल्याने या समाजाला घटनेतील कलम 16 (4) अन्वये मागास घटक म्हणून समजण्यात यावे, अशी शिफारस केंद्र शासनाने गठीत केलेल्या रंगनाथ मिश्रा समितीने केलेली आहे. सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे, त्यामध्ये काही कारणे नमूद करण्यात आली आहेत, या कारणांच्या अनुषंगाने मुस्लिम समाज मागासलेला आहे, अविकसित आहे, अशिक्षित आहे, सुशिक्षितांचे प्रमाण कमी आहे. शासकीय कार्यालय किंवा अन्य ठिकाणी मुस्लिम समाजाचे प्रमाण अत्यंत कमी असल्यामुळे त्यांना आरक्षण दिले पाहिजे, अशा प्रकारची राज्य शासनाची भूमिका सुप्रीम कोर्टात अभियोक्त्याच्या सल्ल्याने प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्यात आली आहे. ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे सरकारचा असा प्रयत्न आहे की, न्यायालय सरकारच्या बाजूने निर्णय देईल. न्यायालय जो निर्णय देईल त्याचा आदर आणि सन्मान सरकार करेल.

...5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7249...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगितले आहे. परंतु माननीय हायकोर्टाने शैक्षणिक आरक्षण अबाधित ठेवले आहे. माननीय हायकोर्टाच्या निर्णयाचा मान राखून ते आरक्षण शासनाने कायम का ठेवले नाही. सरकार गंभीर असते तर शैक्षणिक आरक्षण संपविले नसते.शैक्षणिक आरक्षणाची एक टक्का जागा देखील मुस्लिमांसाठी ठेवण्यात आली नाही हे खरे आहे काय, याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ? हे करीत नसताना आपण सुप्रीम कोर्टाची सबब सांगत आहात, त्यामुळे आपण माननीय हायकोर्टाचा अवमान करीत आहात. हायकोर्टाने शैक्षणिक आरक्षण कायम ठेवले होते. याबाबत सरकारचे काय मत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मुस्लिम आरक्षणाचा शासनाने निर्णय घेतला व तसा अध्यादेश काढण्यात आला होता. त्या कालखंडापासून शैक्षणिक आरक्षणानुसार ज्यांना ज्यांना प्रवेश देण्यात आले आहेत (..... गोंधळ.....)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देतात)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कोर्टाने ज्यावेळी मुस्लिम व मराठा समाजाचे आरक्षण व्यपगत केले. त्यानंतर या संदर्भात सरकारने जो अध्यादेश काढला त्यात मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याचा अध्यादेश काढण्यात आला नाही. मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत आज मंत्री महोदय जे सांगत आहेत ते पूर्णपणे दिशाभूल करणारे आहे.

या नंतर श्री.भोगले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q.1

SGB/ ST/ KTG/ AKN/ AKN/ 13:00

ता.प्र.क्र.7249.........

श्री.सुनील तटकरे......

हे सरकार मुस्लीम समाजाला आरक्षण देणार आहे काय? मुस्लीम समाजाला आरक्षण न देणाऱ्या सरकारचा धिक्कार असो.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अध्यादेश काढण्यात आला होता, परंतु अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर होऊ शकले नाही. 65 वर्षे यांनी मुस्लीम समाजाला आरक्षण दिले नाही. आता मुस्लीमांसाठी राजकारण करीत आहेत. यांना काय अधिकार आहे?

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.31 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर आर.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेबाबत**

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगू इच्छितो की, आपणाकडून आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या दोन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी कोणती सूचना पहिली घ्यायची याबाबत मला अवगत करावे. मला पहिली सूचना सकाळी 9.50 वाजता व दुसरी सूचना सकाळी 9.51 वाजता प्राप्त झालेली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, "राज्य सरकारमधील विविध खात्यांच्या मंत्र्यांकडून नियमबाह्य पद्धतीने होत असलेले काम" या विषयावरील नियम 289 अन्वयेची सूचना आपण प्रथम घ्यावी.

**सभापती :** ठीक आहे. आज दिनांक 23 जुलै 2015 रोजी सकाळी 9.51 वाजता सर्वश्री हेमंत टकले, माणिकराव ठकारे, अमरसिंह पंडित, संजय दत्त, जयंत पाटील, शरद रणपिसे, जयवंतराव जाधव, वि.प.स.यांनी "राज्य सरकारमधील विविध खात्यांच्या मंत्र्यांकडून नियमबाह्य काम करून भ्रष्टाचार करण्यात येत असणे, महाराष्ट्र शासनाने 3 लक्ष रुपयांच्या वरील खरेदी ई-टेंडरींगद्वारे करण्याचा निर्णय दिनांक 18 डिसेंबर 2014 रोजी घेतलेला असणे, महिला व बाल विकास विभागाने 206 कोटी रुपयांची एकाच दिवशी विना निविदा खरेदी केलेली असणे, शालेय शिक्षण विभागाने 191 कोटी रुपयांची अग्निशामक यंत्रे ई-निविदाद्वारे खरेदी न करता दर करारावर निधी उपलब्ध नसताना घेण्याचा प्रयत्न करणे, आदिवासी विभागात देखील अशा पद्धतीने रुपये 19 कोटी व साडेचार कोटी रुपयांची बूट खरेदी दर करारावर खरेदी करण्याचा प्रयत्न होणे, कृषी खात्याच्या सारा यंत्रांच्या खरेदीतही 125 कोटी रुपयांपेक्षाही जास्त रकमेचा गैरव्यवहार आढळून

..2

**मा.सभापती .....**

येणे, राज्यातील शिक्षण मंत्र्यांकडे बोगस पदवी असणे, गृह राज्यमंत्री (शहरे) यांचे एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदार यादीत नाव असणे, तसेच, मंत्र्यांचे खासगी सचिव तसेच स्वीय सहायक यांच्या नेमणुका नियमबाह्य असणे, अनेक मंत्र्यांच्या अशा कारभाराबद्दल जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष" या विषयाच्या बाबतीत महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. महाराष्ट्र विधान परिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे यासंबंधीचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्याची सूचना देण्यात येते. यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाज क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे. माननीय सदस्यांनी राज्यातील विविध विभागांच्या खरेदीस आक्षेप घेतल्याचे सूचनेद्वारे नमूद केले आहे. गंभीर स्वरूपाचे आक्षेप नोंदविले असल्यामुळे या विषयाला सार्वजनिक महत्त्व प्राप्त होते. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये विषय समाविष्ट नसल्याने मी ही सूचना नाकारित आहे. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सदस्यांना बोलण्यासाठी मी दोन मिनिटे वेळ देत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पावसाळी अधिवेशन सुरू होण्याच्या कालावधीत या शासनाबद्दल आणि या शासनात कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या विभागातील मंत्र्यांच्याबद्दल सर्व वृत्त वाहिन्यांमध्ये, सर्व वर्तमानपत्रामध्ये त्यांच्याकडून नियमबाह्य कामे होत असल्याबद्दल, चुकीची माहिती देत असल्याबद्दलच्या अनेक घटना वारंवार उघडकीस येत होत्या. खरे म्हणजे जी आश्वासने देऊन ..... अडथळा....

सभापती महोदय, या शासनाने ई-टेंडरींगचा निर्णय घेतला. तीन लाखाच्या वरील खरेदी ई-टेंडरींगने करायची असे ठरविले. पण अतिशय चतुराईने यातून पळवाटा काढण्यात आल्या. एकट्या महिला व बालकल्याण विभागाने 206 कोटी रूपयांची चिक्की एकाच दिवशी विना निविदेने



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

खरेदी केलेली असणे, या खरेदी केलेल्या चिक्कीचा दर्जा निकृष्ट असल्याने बालकांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम निर्माण होणे, याच विभागातील इतरही वस्तूंचा दर्जा निकृष्ट असणे, यानंतर या विभागाने खरेदी केलेल्या बिस्कीटांमध्ये सुद्धा असाच प्रकार होत असल्याचे अहवाल प्राप्त झालेले आहेत. शालेय शिक्षण विभागाने अग्निशामक यंत्रे ई-टेंडरींगने न घेता दर करारानुसार घेण्याचा निर्णय घेतला. मुख्यंत्र्यांनी, वित्त मंत्र्यांनी त्यावर आक्षेप नोंदविल्यामुळे या ही प्रकारात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होण्याची शक्यता होती ते ही या निमित्ताने उघड झाले आहे. आदिवासी विभागातही अशाच पद्धतीने 19 कोटी रुपयांचा वह्या आणि साडे चार कोटी रुपयांची बूट खरेदी दर करारानुसार करण्याचा प्रयत्न करणे, या सरकारने या सगळ्या गोष्टी सगळे नियम, प्रथा बाजूला सारुन अत्यंत वाईट पद्धतीने सर्व कामांमध्ये भ्रष्टाचाराची मूळे पार खोलवर नेण्याचे काम अतिशय थोड्या वेळात केलेले आहे. हे काम करीत असताना अतिशय चुकीची माहिती देत राहणे, या खरेदीला मुख्यमंत्र्यांना स्थगिती देण्याची वेळ येणे, कृषी खात्यामध्ये सुद्धा सारा यंत्राच्या खरेदीमध्ये 125 कोटी रुपयांपेक्षाही जास्त रकमेचा गैरव्यवहार आढळून येणे. आरोग्य खात्यामध्ये सुद्धा 50 कोटी रुपयांची औषधी मागणी नसताना दर करारावर खरेदी केल्याचे आढळून आलेले आहे. आता ही सगळी प्रकरणे कमी होती की काय म्हणून सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांचे नाव मतदार यादीत दोन-दोन, तीन-तीन ठिकाणी असणे, नाव बदललेले असणे, या सगळ्या गोष्टी सभागृहासमोर आलेल्या आहेत. तसेच आपल्या शिक्षणाची योग्य माहिती न देणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे प्रश्न देखील आहेत. तेव्हा या प्रश्नावर या सभागृहात चर्चा होणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. चर्चेद्वारे जे काही म्हणणे मांडायचे असेल ते शासनाच्यावतीने, सरकारच्यावतीने, मंत्र्यांच्यावतीने जरुर मांडावे. परंतु, हा विषय महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या मनामध्ये एक प्रश्नचिन्ह म्हणून उभा राहिलेला आहे. याची उत्तरे मिळालीच पाहिजेत. ही उत्तरे मिळण्यासाठी आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर सभागृहात तातडीने चर्चा घेण्यात यावी म्हणून हा स्थगन प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो स्थगन प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी आणि त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. संपूर्ण महाराष्ट्र या गोष्टीकडे पाहात आहे. ज्या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी चिक्की पाठविली जाते त्या चिक्कीमध्ये रेती सापडली आहे, लोखंडांचे कण सापडले आहेत. यासंबंधी एफडीआयने कोर्टामध्ये रिपोर्ट दाखल केला आहे. यामध्ये सरकारकडून असंवेदनशीलता दाखविण्यात आली आहे. त्यामुळे सरकारकडून पत्रकार परिषद घेऊन सांगण्यात आले की, आम्ही काही केलेले नाही, पहिल्याप्रमाणे केलेले आहे. हे जे काही मांडले गेलेले आहे त्याची दखल हायकोर्टाने घेतली आणि सरकारला नोटीसेस बजावल्या आहेत. त्यांनी यासंबंधात सरकारचे उत्तर मागविलेले आहे. हे 206 कोटी रूपये कोणाच्या मालकीचे नाहीत. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या चिक्कीमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे. त्याची कोर्टाने देखील दखल घेतली आहे. आपणाला चिक्की मिळाली काय ? आपण त्यात सामील आहात काय ? नाही ना. कोर्टाने त्यामध्ये दखल घेतली आहे. त्याबाबतीत या सभागृहामध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. सरकार का पळत आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असलेले बाकीचे मंत्री येथे आहेत. रेती माफियांना पाठीशी घालणारे मंत्री येथे बसलेले आहेत. डिग्रीच्याबाबतीत देखील संभ्रम आहे. ते मंत्री देखील येथे बसलेले आहेत. त्यामुळे या सरकारचे खरे रूप या सात महिन्यांमध्ये महाराष्ट्राच्या जनतेसमोर आलेले आहे. या बाबतीत आम्ही स्वच्छ आहोत, हे सरकार संवेदनशील आहे असे त्यांना वाटत असेल तर यावर चर्चा होणे आवश्यक आहे. या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप .......

त्यांना त्यांची बाजू मांडून मोकळे होऊ द्या. यासंदर्भात आमचे काहीही म्हणणे राहणार नाही. या राज्यातल्या सरकारने स्वतःच्या प्रतिमेच्या बाबतीत आणि स्वतःच्या कर्तृत्वाच्या बाबतीत वारंवार बाजू मांडलेली आहे हे महाराष्ट्राच्या जनतेने आंदोलनाच्या तसेच या सभागृहाच्या माध्यमातून पाहिलेले आहे. त्यामुळे आम्हाला आणि महाराष्ट्रातील जनतेला खरी परिस्थिती काय आहे हे कळण्यासाठी या सभागृहात सरकारने चर्चा करावी असा आमचा आग्रह आहे. सरकारला यासंदर्भात जे काही उत्तर द्यावयाचे आहे ते देऊ द्या. आम्ही सरकारचे उत्तर ऐकण्यास तयार आहे. हे सरकार आम्हाला नेहमी म्हणते की, तुम्ही चर्चेपासून पळता ? आता हे सरकार चर्चेपासून का पळत आहे ? हे आम्हाला सांगा.

**सभापती** : मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सदर सूचना अगोदरच फेटाळली आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे. सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.41 ते 1.56 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : आज दिनांक 23 जुलै, 2015 रोजी सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री किरण पावसकर, आनंद ठाकूर यांनी "ठाणे जिल्ह्यातील भातसा नदी पात्रात दक्ष खानझोडे या मुलाचा आढळलेला मृतदेह, त्याच्या डोक्यावरचे अर्धवट केस काढून त्याला विद्रुप केलेले असणे, चार दिवसापूर्वी हत्या होऊनही हत्या नेमकी कोणत्या कारणाने झाली याचा उलगडा न होणे, दक्षवर त्याच्या सावत्र आई, मावशी यांच्याकडून होत असलेले अत्याचार, त्याच्या वडिलांची संपत्ती मिळविण्यात अडचण ठरत असल्याने त्याचा बळी अथवा नरबळी दिला असल्याची शंका असणे, राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू असतानाही दक्षचा नरबळी जाण्याची गंभीर घटना घडणे, या हत्या, नरबही प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता" या अतिशय गंभीर बाबींवर चर्चा करण्यासाठी आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवण्यात यावा, असे नमूद केले आहे.

नियम 289 अन्वयेची सूचना मी फेटाळत आहे.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 45 मिनिटांकरिता स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.57 ते 2.42 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 289 अन्वये सूचना दिली होती. आता मी सदरहू सूचनेच्या बाबतीत माझा निर्णय देत आहे. उद्या प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या विषयावर म.वि.प.नियम 97 किंवा 260 अन्वये चर्चा घेण्यात येईल. आता पुढील कामकाजास सुरुवात होईल.

-------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.विजयकुमार देशमुख (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-13 या वर्षाचा एकेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

प्रा.अनिल सोले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

सभापती महोदय, शुक्रवार, दिनांक 24 जुलै, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 23 जुलै, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. 1 अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ दर्शविण्यात येणार असून मंगळवार, दिनांक 21 जुलै, 2015 रोजी बॅलटमधील प्राथम्यक्रमानुसार आलेल्या 4 अशासकीय विधेयकांना चर्चेसाठी खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

**<u>पुरस्थापनार्थ</u>**

1 सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक-16 महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा विधेयक, 2015-श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांचे — 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके</u>**

1 सन 2014 चे वि.प.वि.क्र.3-महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, 2014-श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे-चर्चा अपूर्णावस्थेत — 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2 सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 11-मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2014- श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे — 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले....

| | | |
|---|---|---|
| 3 | सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक-2 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2014-श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे | 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| 4 | सन 2014 चे.वि.प.वि.क्रमांक 14-महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, 2014-श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे | 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

**सभापती** : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आह, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माझ्याकडे आज गुरुवार, दिनांक 23 जुलै, 2015 रोजी ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी "राज्य शासनाची मंजुरी असताना चिल्ड्रन होम मधील कर्मचाऱ्यांना वेतन योजना, अरोग्य विमा योजना, रजा रोखीकरण आणि कालबध्द पदोन्नती सारख्या योजनांचा लाभ मिळत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी "सूक्ष्म पोषक आहार (T.H.R.) चे काम संबंधित स्थानिक महिला बचत गटांना द्यावे असे निर्देश देण्यात येऊन यासंबंधी बैठकही घेण्यात आली, परंतु आजपावेतो याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, विजय सावंत, कपिल पाटील, श्रीकांत देशपांडे, दत्तात्रेय सावंत यांनी "उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या दोन्ही विद्यापीठाकरिता सहायक प्राध्यापक या पदावर प्रत्येकी 12 सहायक प्राध्यापकांना रुजू करुन घेण्यात येणे, मंजूर पदांचे आर्थिक दायित्व न स्वीकारल्यामुळे या सहायक प्राध्यापकांना सेवेतून कमी करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "मुंबई मधील मौजे कांजूर (ता.कुर्ला) येथील न.भु.क्र.15 येथे मॅरेथॉन ग्रुप व भांडूप इस्टेट यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्विकास योजनेबाबत बोगस प्रस्ताव मंजुरीसाठी दाखल केल्याचे निदर्शनास येणे

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी "महिला व महाविद्यालयीन विद्यार्थीनींवर होणारे वारंवार हल्ले व विनयभंगाच्या प्रकारात दिवसेंदिवस होणारी वाढ, परिणामी महिलांमध्ये पसरलेले भीतीचे व घबराटीचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील अभियांत्रिकी व विधी विभागात उत्तरपत्रिका शिल्लक असतानाही बाजार भावापेक्षा चौपट किंमतीने उत्तरपत्रिकांची छपाई करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "कल्याण-डोंबिवली, टिटवाळा शहरातील स्वच्छतागृहांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून नव्याने आखण्यात येणाऱ्या योजनेत यासंबंधी कोणती उपाययोजना नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी "राज्यातील खादी व ग्रामोद्योग महामंडळात गुजरात पॅटर्न राबवून राज्यातील ग्रामीण कारागीरांना रोजगाराच्या हमीपासून वंचित ठेवण्याचा सुरु असलेला प्रयत्न " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ग्राऊंड हँडलिंग कंपनी म्हणून विविध आंतरराष्ट्रीय विमानांना सेवा पुरविणाऱ्या कंबाटा एव्हिएशन प्रा.लि.च्या व्यवस्थापनाने कामगारांच्या पतपेढीत कोट्यवधी रुपयांचा केलेला अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "मुंबई येथील अनुदानित, मान्यताप्राप्त काही शाळांच्या बांधकामांना मुंबई उपनगर जिल्हधिकारी आणि मुंबई महानगरपालिकेकडून अनधिकृत ठरविण्यात आले असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रुपनवर यांनी "भटक्या विमुक्त समाजाच्या मुला-मुलींना शिक्षण घेण्यासाठी सुरु केलेल्या इयत्ता 7 वी पर्यंतच्या आश्रमशाळेत पुढे 12 वी पर्यंत शिक्षण सुरु करण्याची मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--------

..8..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : कनिष्ठ महाविद्यालयातील मंजूर झालेल्या 914 पायाभूत पदांना वेतन अनुदान न मिळणे तसेच ऑनलाईन मूल्यांकनात पात्र झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्यात न येणे, याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी मागील अधिवेशनात नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यावरील उत्तर मला काल घरी पोस्टाने आले. उशिरा का होईना शासनाने उत्तर पाठविल्याबद्दल मी शासनाचा आभारी आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील ....

मी दोन प्रश्न विचारले होते. तुकडी शाळांशी निगडीत ज्युनिअर कॉलेजेस आहेत. तेथे छोटे वर्ग असतात. त्यामुळे 60 च्या वर मुले बसू शकत नाहीत. शासनाचाही नियम 60 मुलांचाच आहे. पण महाविद्यालयांच्या तुकड्यांसाठी 120 मुलांची कमाल मर्यादा असल्यामुळे नवीन तयार केलेले सॉफ्टवेअर 60 मुलांची तुकडी स्वीकारत नाही. त्यातून ज्युनिअर कॉलेजेसच्या अनेक तुकड्या रद्द होत आहेत. त्यामुळे शिक्षक सरप्लस होत आहेत आणि विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. शासनाने ते मान्य केले आहे. मात्र सॉफ्टवेअरमध्ये त्याची दुरूस्ती अद्यापही झालेली नाही. दुरूस्ती केल्याशिवाय संच मान्यता होणार नाही. त्यामुळे पुढील प्रश्न निर्माण झाला आहे. आपण तशी दुरूस्ती करणार का ? माननीय मंत्र्यांनी 935 पायाभूत वाढीव पदांना मान्यता दिली, त्यांच्या वेतनाची तरतूद असूनही वेतन सुरू झालेले नाही. दोन्ही गोष्टींबाबत माननीय मंत्री समाधान करतील का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन मुद्दे मांडले, त्यातील एक मुद्दा सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करण्याच्या संदर्भातील आहे. 60 मुलांचा नियम असताना नंतर 80 मुलांपर्यंत मर्यादा वाढविली होती. त्या ठिकाणच्या शाळांवर प्रवेशासाठी येणारा ताण लक्षात घेता शाळा व ज्युनिअर कॉलेजेस यांच्या विनंतीप्रमाणे ती मर्यादा वाढवून दिली होती. सॉफ्टवेअर करताना 120 चा आकडा ठेवला होता. महाविद्यालयांना संलग्न असणाऱ्या अकरावी, बारावी इयत्तेला 120 मुलांची क्षमता आहे. अनेक ज्युनिअर कॉलेजेसनी त्यावेळी 60-60 मुलांच्या 2 तुकड्या दाखवून जास्त शिक्षक नियुक्त केले होते आणि सरकारचा जास्त पगार काढला होता. त्यामुळे ते होऊ नये म्हणून सॉफ्टवेअर काढले होते. माझ्या कामाची पध्दत वेगळी आहे. माझे मत आहे की, जी माहिती आहे ती भरा, माहिती स्वीकारणारे सॉफ्टवेअर दुरूस्त करू पण त्या माहितीत जर काही चुकीचे असेल तर शाळेचे अनुदान तर बंद करू, त्या मुख्याध्यापकांना जेलमध्ये टाकू हे मान्य आहे का हे अगोदर येथे सांगा. शिक्षकांना जेलमध्ये टाकले, गुन्हे दाखल केले म्हणून उद्या पुन्हा मोर्चा काढायचा नाही. माझे म्हणणे आहे की, प्रो-ॲक्टिव्ह ....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी धमकी देऊ नये. (अडथळा)

**सभापती** : आपण खाली बसावे. माननीय मंत्री महोदयांनी, काढायचे नाही अशी अपेक्षा आहे असे म्हणावे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री धमकी देत आहेत.

**सभापती** : धमकी नाही.

(गोंधळ)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी धमकी देऊ नये.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी धमकी देत नाही. आम्ही सभागृहात स्पष्टता विचारायची नाही का ? एक मान्य करून घ्यायचे नंतर मोर्चा आणायचे, एसएमएस करायचे, आत्महत्या करतो म्हणायचे हे ठीक नाही. आम्ही हे का सहन करायचे ? माझे म्हणणे आहे की, मी प्रो-ॲक्टिव्ह पॉझिटिव्ह करण्यास तयार आहे. आज पदरात पाडायचे आणि मग तुम्ही पोलीस का आणता, मुख्याध्यापकांना जेलमध्ये घालता असे म्हणायचे, मग नंतर निदर्शने, विरोध, काळे झेंडे फडकावयाचे हे कशासाठी करता ? आपण एक ठरवू या. आपले सभागृह सहमतीने ठरवित आहे. शिक्षकांची मान्यता होण्यासाठी सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करून त्यानंतर मात्र त्या-त्या महाविद्यालयांतील मुख्याध्यापकांनी, ज्युनिअर कॉलेज इनचार्जने खरी माहिती द्यावी आणि खरी माहिती दिली नाही असे जर तपासात सिध्द झाले तर त्या शाळांचे, ज्युनिअर कॉलेजेसचे अनुदान बंद होईल आणि खोटी माहिती देणाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असा जीआर काढला तर त्याला सर्वांची मान्यता आहे का हे विचारतो ? कनिष्ठ महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या संबंधातील विषय मांडला. सदर विषयांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार, विक्रम काळे या सर्वांची बैठक झाली होती. 935 चा आकडा दिला होता, त्यामध्ये मान्यता असणारे पूर्णवेळ, अर्धवेळ शिक्षक जवळपास 331 होतात, त्यांच्या विषयासंबंधीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे अंतिम छाननी करून पाठविला आहे. ज्युनिअर कॉलेजेसच्या प्राध्यापकांच्या संघटनेबरोबर त्या विषयाबाबत बैठक आहे. त्यामध्ये 331 चा निर्णय होईल. उरलेल्यांच्या बाबतीत संघटित लोक वारंवार म्हणतात की, आम्ही पुरावे देतो, मान्यता मिळवून देतो म्हणून ते थांबले आहे. यामुळे भ्रष्टाचार वाढतो असे माझे प्रामाणिक मत आहे. त्यामुळे आता एक तुकडा पाडला पाहिजे. आता हे कायम, बाकीचे नाहीत असे सांगितले. उद्या पुन्हा शिक्षक आमदारांनी त्यांच्या संपाला पाठिंबा देऊ नका अशी माझी विनंती आहे, ती आपण मान्य करावी.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मला खुलासा करू द्यावा. माननीय मंत्र्यांचे उत्तर पॉझिटिव्ह आणि चांगले आले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. परंतु त्यांनी उत्तर देण्याच्या आधी शब्द वापरले. सभागृहाचा असा समज होईल की, मी आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला आहे की काय. मी तसा निर्णय घेतलेला नाही. (अडथळा) मी लढेन, भांडण करून खेचून आणेन. मी कशाला आत्महत्या करू ? परंतु सत्ताधारी पक्षातील लोक जर उद्वेगाने आत्महत्या करण्याची घोषणा करीत असतील तर त्यांचा राग आमच्यावर का काढत आहेत ? तुम्ही प्रश्न लवकर सोडवावा आणि त्यांना जरा सांभाळून घ्यावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी शिक्षक आमदारांच्या आत्महत्यांचे बोललोच नाही. आम्ही कॉलेजला असल्यापासून त्यांचे असेच झाले आहे की, विषय काय, बोलतात काय असे चालले आहे. मी म्हणालो की, शिक्षक नंतर फ्रस्ट्रेट होतात. मग तो मुख्याध्यापक सापडतो, ज्याला जेलमध्ये टाकण्यात येते, तेवढ्यापुरते मर्यादित आहे.

**सभापती** : आपले म्हणणे समजले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**सभापती** : औचित्याचा मुद्दा व नियम 93 अन्वयेची निवेदने हे दोन्ही कसे होईल ? ठीक आहे. आपण बोलावे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

( चर्चा पुढे सुरू ....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दुष्काळ, अवकाळी पाऊस व गारपीट या कारणांमुळे मरणाच्या दारात उभ्या असलेल्या शेतकऱ्यांना पीककर्ज माफी न देता त्यांना सक्षम करण्यासाठी पीक कर्ज देण्यास भाग पाडले जाईल आणि ज्या बँका कर्ज देणार नाहीत त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली होती. आता माहिती आली आहे की, केंद्र शासनाच्या वित्त विभागाने राज्य शासनाला पत्र पाठवून कोणतयाही बँकेवर फौजदारी गुन्हा दाखल करूनये व यापूर्वी एखादा गुन्हा दाखल झाला असेल तर तो मागे घ्यावा असे खळबळजनक पत्र शासनाला पाठविले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या आदेशांनतर शेतकऱ्यांना कर्ज कसे मिळणार आहे ? माझी आपल्याला विनंती आहे की, हे गंभीर आहे, प्रश्नही गंभीर आहे. आपण नेहमी महत्त्वाच्या विषयाची दखल घेत असता. आपण मेहेरबानी करून शेतकऱ्यांच्या संदर्भात दखल घ्यावी आणि सरकारला या संदर्भात स्टेटमेंट देण्याचे निर्देश द्यावेत.

**सभापती** : निवेदन करावे.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांच्या विनंतीवरुन सूचना क्रमांक 12 पुढे ढकलण्यात आली आहे.

## नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने

( पुढे सुरु....

**पृ.शी./मु.शी.** : सोलापूर येथील शासकीय समाजकल्याण कार्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिष्यवृत्तीमध्ये करोडो रूपयांचा अपहार झाल्याप्रकरणी पुण्याच्या मास्टेक कंपनीमधील 34 जणांविरूद्ध सदर बाजार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात येणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सोलापूर येथील शिक्षण खात्यामध्ये शिष्यवृत्तीचे पैसे तेथील 56 कर्मचाऱ्यांनी लाटले आहेत. परंतु त्यापैकी कमी आरोपींना पकडले आहे. 4 कोटी रूपयांतील 20 लाख रूपये पकडले गेले आहेत. बाकीच्या पैशांचे काय झाले, बाकीच्या आरोपींना केव्हा अटक होणार आहे, ज्या कर्मचाऱ्यांनी पैसे खाल्ले, घोटाळा केला, ते आज सेवेत आहेत का ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न समाजकल्याण विभागांतर्गत ऑनलाईनच्या संदर्भातील घोटाळा या संदर्भात आहे. यंत्रणेतील 56 अधिकाऱ्यांवर गुन्ह्याची नोंद झाली, त्यापैकी 23 जणांना अटक केली, 21 जणांना न्यायालयीन कोठडी मिळाली, 2 जणांना जामीन मिळाला. उर्वरित आरोपींना अटक करण्याच्या संदर्भात कार्यवाही सुरू आहे. परंतु ....

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले आहे.

----

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील शालेय विद्यार्थीनींवर शिक्षकांकडून झालेला अत्याचार याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पानरेरमधील 11 मुलींना शिक्षकांनी मारहाण केली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, असे बोलता येणार नाही. काल तुम्ही आम्ही असे केले असता अडविले होते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना बोलू द्यावे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल आपण आम्हाला अशा प्रकारे प्रश्न विचारण्याची संधी दिली नव्हती. नियम सर्वांना सारखे असले पाहिजेत. त्यामुळे आताही सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना संधी देऊ नये, अशी माझी विनंती आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ही घटना दिनांक 15 जुलै, 2015 रोजी घडलेली आहे. त्यामध्ये आतापर्यंत काय प्रगती झाली आहे ? निवेदनात असे नमूद केले आहे की, पुढील तपास सुरु आहे. अशा प्रकारे व्हेग उत्तर देण्यापेक्षा स्पेसिफिक माहिती, लेटेस्ट अपडेट मंत्री महोदय देतील काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, दिनांक 15 जुलै, 2015 रोजी कडूस येथील पंचशील माध्यमिक विद्यालयात ही घटना घडली असून गुन्हा रजिस्टर क्रमांक 120/15, भारतीय दंड विधान कलम 323 व 324 अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी शिक्षकांना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास सुरु असून चार्जशिट दाखल करणे शिल्लक आहे. लवकरात लवकर चार्जशिट दाखल करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मुली वर्गात हसत होत्या, हा त्या मुलींचा गुन्हा होता. विद्यार्थीनींनी हसणे हा गुन्हा समजून त्यांना शिक्षकांनी शिक्षा दिली आहे आणि पोलिसांनी त्या शिक्षकांविरुध्द अशी कलमे लावली की, ते ताबडतोब जामिनावर सुटले आहेत. त्यामुळे संबंधितांविरुध्द कडक कलमे लावली पाहिजेत. ती लावली जातील का ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, एका शाळेमध्ये घडलेली ही घटना आहे. विद्यार्थीनी बडबड करीत असल्यामुळे शिक्षकांनी त्यांना छडीने मारले, एवढाच हा प्रकार आहे. या घटनेची चर्चा मिडियामध्ये होत असल्यामुळे आणि तेथील परिस्थिती बघून पोलिसांनी शिक्षकांविरुध्द 323 व 324 या सारखी कलमे लावली आहेत. शिक्षकांना जामीन मिळाला असून चार्जशिट दाखल करण्याचे काम शिल्लक आहे. शिक्षकांनी केलेल्या गुन्ह्यापेक्षाही अधिक कडक कलमे त्यांच्याविरुध्द लावण्यात आली आहेत.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** मंत्री महोदयांच्या मी असे निदर्शनास आणू इच्छितो की, पोलिसांनी लावलेली 323 व 324 ही कलमे बॉडीली हर्ट किंवा एंज्युरी बाबतची आहेत. परंतु, त्या मुली असल्यामुळे शिक्षकांविरुध्द कलम 354 किंवा विनयभंगाची कलम लावता येऊ शकतील. आपण याबाबतची चौकशी करावी. सन्माननीय सदस्यांचेही तेच म्हणणे आहे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, असे काही असेल तर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी करु तथापि, प्रथमदर्शनी प्राप्त झालेल्या अहवालानुसार कारवाई केलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या निवेदनात मारहाणीची पध्दत दिलेली आहे. काठीने मारहाण केली असल्याने हा गुन्हा कलम 323 व 324 मध्ये बसत नाही आणि या कलमान्वये गुन्हा दाखल केला असेल तर त्यांच्यावर कारवाई होऊ शकणार नाही. एका खोलीमध्ये बंद करुन मारहाण करण्यात आली आहे. त्यामुळे वेगळी कलमे लावणार का ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, तपासून पाहू.

------------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : राज्यातील पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाध्याय पुस्तिकांचा संच खाजगी प्रकाशक विद्यार्थ्यांना अधिक दराने विकत असून त्यामुळे पालकांची आर्थिक पिळवणूक होत असणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 14 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, खाजगी प्रकाशकांकडून 75 ते 100 या दराने प्राथमिक व माध्यमिक पाठ्यपुस्तके मिळत आहेत व सरकार ती 150 ते 250 या दराने उपलब्ध करुन देत आहे. यामुळे पालकांची आर्थिक पिळवणूक होत असून ती सरकार थांबविणार आहे का ?

सभापती महोदय, महाराष्ट्रात मुद्रण छपाई व्यवसाय क्षेत्रात अगोदरच मंदी आहे. आता सरकारकडून निविदा पध्दतीने हे काम दिले जात असल्यामुळे महाराष्ट्रातील हा व्यवसाय परराज्यातील व्यावसायिकांकडे जात आहे. गुजरातसारखे राज्य तेथील मुद्रक, प्रकाशकांना बळ देत आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील मुद्रक, प्रकाशक व्यावसायिकांना व्यवसाय उपलब्ध करुन देण्यासाठी शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या राज्यातील मुद्रकांना व्यवसाय देण्यास मी देखील सन्माननीय सदस्यांएवढाच उत्सुक आहे. कारण शेवटी 'मेक इन महाराष्ट्र' ही आपली भूमिका आहे.

सभापती महोदय, याबाबतची पार्श्वभूमी अशी आहे की, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक महामंडळाच्या स्थापनेपासून छपाईचे काम नोंदणीकृत पध्दतीने देण्याची पध्दत होती. महाराष्ट्रातील प्रिंटर यासाठी आपली नोंदणी करायचे व त्यांना ते काम मिळायचे. तथापि, या प्रिंटर्सचा पुढे एक गट तयार झाला आणि त्यांनी सन 1996-97 मध्ये 25 टक्के दरवाढ द्यावी, अन्यथा, छपाईचे काम करणार नाही, असा इशारा दिला होता. त्यावेळी सरकारने त्यांच्या मागणीप्रमाणे दरवाढ करुन दिली. त्यानंतर सन 2001 मध्ये पुन्हा 24 टक्के दरवाढीसाठी त्यांनी शासनाला वेठीस धरले व त्यावेळी शासनाने त्यांना दरवाढ दिली. त्यामुळे प्रत्येक वेळी अशा प्रकारे दरवाढ करण्यास ते भाग पाडत होते. त्यांनी पुन्हा सन 2003 मध्ये दरवाढीची मागणी केली. मी यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे सन 1996-97 व सन 2001 मध्ये दरवाढ देण्यात आली होती. त्यामुळे सन 2003 मध्ये ज्यावेळी दरवाढ मागण्यात आली त्यावेळी तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.अमरिश पटेल यांनी मुद्रक सातत्याने दरवाढ मागत असल्यामुळे निविदा काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाविरुध्द मुद्रक न्यायालयात गेले. परंतु, शासनाने खुल्या बाजारातून निविदा

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे......

मागवाव्यात, असा निर्णय दिला. त्यानुसार निविदा काढण्याची पध्दत सुरु झाली आहे. ही पध्दत सुरु झाल्यानंतर असे लक्षात आले की, मुद्रकांना जी दरवाढ दिली होती त्यापेक्षा 30 टक्के कमी दर निविदेमध्ये नमूद करण्यात आले होते.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या शालेय पाठ्यपुस्तकांमधून पालकांची अशा प्रकारे लूट करणे बरोबर आहे का ? मुद्रक आपल्या राज्यातील आहेत, त्यांना जगवायचे आहे, चांगले काम द्यायचे आहे, हे आम्हालाही मान्य आहे. परंतु, काम दिल्यानंतर काय होते, हे आपल्या सर्वांना माहीत आहे.

सभापती महोदय, मुद्रकांकडून वेगवेगळ्या माध्यमातून, वेगवेगळ्या लोकांना भेटून, बातम्या छापून आणून, माझ्यावर आणि या सिस्टिमवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपण त्याला बळी पडणार नाही, ही गोष्ट वेगळी आहे. ते मलाही भेटले आहेत. मी त्याना सांगितले की, आपण ओपन टेंडर काढू, बाहेरच्या मुद्रकांनी जो लोअेस्ट रेट कोट केला असेल त्या दराने राज्यातील मुद्रक काम करण्यास तयार आहेत का ? शेवटी या राज्यातील मुद्रकांना काम मिळाले तर शासनाला त्या माध्यमातून कर मिळणार आहे, येथील लोकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे त्यांना काम देण्यास मी उत्सुक आहे. परंतु, तसा विचार केल्यानंतर जर दर तीन वर्षांनी दरवाढ मागितली जाणार असेल आणि पाठ्यपुस्तकांची छपाई करण्यात येणार नाही, असा इशारा देण्यात येणार असेल तर ते बरोबर नाही. इशारा दिल्यानंतर मंत्री महोदय खाबरतात, शाळा सुरु होणार असल्याने ते दबावाला बळी पडतात. शिक्षक आमदार जागरूक असल्यामुळे ते मंगळवारी आणि शुक्रवारी सभागृहात प्रश्न उपस्थित करतात. त्यामुळे दरवाढ द्या आणि प्रिंटिंग करून घ्या, असा निर्णय मंत्र्यांना घ्यावा लागतो. आपण सर्वजण बालभारतीच्या प्रिंटर्सना ओळखतो. अगोदर ते काय होते आणि ही सर्व कामे मिळाल्यानंतर कुठपर्यंत जाऊन पोहोचले आहेत. माझे असे म्हणणे आहे की, ्त्यांनी शासनाच्या या पैशाचा चांगला विनियोग केला पाहिजे. त्यांना काम देण्यास मी 100 टक्के तयार आहे. हा निर्णय शासन प्रोॲक्टिव्ह होऊन करण्यास तयार आहे. जे त्यांची बाजू मांडत आहेत, त्यांनी त्यांना सांगितले पाहिजे की, आपण जे सन 1996-97 ला केले, सन 2001

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे......

ला केले, त्यानंतर 2003 ला केले आणि त्या उपर 30 टक्के कमी दराच्या निविदा शासनाला मिळाल्या.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले आहे. एवढ्या सविस्तरपणे सांगण्याची आवश्यकता नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी केवळ सन्माननीय सदस्यांसाठी सविस्तर खुलासा करीत नाही. बाहेर सर्व माध्यमातून अर्धवट माहिती देऊन 'मेक इन इंडिया' होणार की नाही, असा प्रश्न विचारला जात असेल तर ते बरोबर नाही. आपल्या माध्यमातून मला ही संधी मिळाली. म्हणून मी त्याचा लाभ घेतला.

------------

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा येथील विद्यार्थ्याचा अंधश्रध्देच्या माध्यमातून बळी देण्याचा उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, याकडे पोलिसांनी केलेले दुर्लक्ष याबाबत श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 25 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...8....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या निवेदनातून आम्हाला जे अभिप्रेत आहे, ते आम्हाला मिळाले आहे. सातवी इयत्तेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्याचे अपहरण होते. आई-वडील संबंधित पोलीस स्टेशनला 12 तारखेला तक्रार करतात, असे आपणच उत्तरामध्ये देत आहात. 336 चा गुन्हा लावला आहे. 14 तारखेला पुन्हा सांगितल्यानंतर 346 व 342 चा गुन्हा लावला जातो. 15 तारखेला विद्यार्थ्याचे प्रेत मिळाल्यानंतर 302 व 334 चा गुन्हा लावला जातो. जर या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन, उद्देश लक्षात घेऊन तिवारींचा मुलगा तिकडून गेल्यानंतर 12 तारखेला आपण प्रश्न गांभीर्याने घेतला असता तर त्याच्या प्रेताचे शवविच्छेदन करावे लागले नसते. परंतु, पोलीस स्टेशनने हा गुन्हा गांभीर्याने घेतलाच नाही. निवेदनात म्हटले आहे की, मांत्रिकाचा प्रश्न येत नाही. आई-वडिलांनी असे सांगितले आहे की, 7 महिन्यांपूर्वी ही महिला मांत्रिक त्यांच्या घरी आली होती. पतीवर संकट कोसळेल, मुलावर संकट कोसळेल, असे तिने सांगितले. 5 लाख रुपये देवीला द्यावे लागतील, असेही सांगितले आणि या सगळ्या घटना सांगितल्यानंतर आपण आपल्या उत्तरात हा अंधश्रध्देचा बळी नाही, असे नमूद करीत आहात.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर.......

सरकारने दिलेल्या उत्तराप्रमाणे हा अंधश्रद्धेचा बळी नाही, असे आपण गृहीत धरू. त्यांनी 12 तारखेला सांगितल्यानंतर आपण त्या पद्धतीने तपास केला असता तर 15 तारखेला त्या मुलाचे प्रेत आपल्या हाती मिळाले नसते. मला असे वाटते की, हा अंधश्रद्धेचा बळी असून आजही पोलीस त्या मागचा जो मूळ उद्देश आहे तो समोर ठेवत नाही. म्हणून आपण या घटनेचा व्यवस्थित तपास करुन याचे मूळ कारण शोधणार आहात काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर साहेबांनी नियम 93 अन्वये जी सूचना दिली ती नालासोपारा येथे एका बालकाचा मृत्यू झाला या संदर्भात आहे. त्यांनीही मान्य केलेले आहे की, तांत्रिक, मांत्रिकवरुन हा मृत्यू झालेला नाही. परंतु, मुलांमधील अंतर्गत भांडणाच्या कारणावरुन हा मृत्यू झालेला आहे. या दोन्ही वेगवेगळ्या घटना आहेत. आई-वडिलांकडे 5 लाख रुपयांची मागणी करणे, हा भाग वेगळा आहे आणि त्या मुलाचा मृत्यू भांडणावरुन झालेला आहे आणि त्या अनुषंगाने केस नोंद केलेली आहे, आरोपींना अटक देखील केलेली आहे. परंतु, त्यामध्ये जर काही त्रुटी राहिली असेल तर पुन्हा एकदा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याला या संदर्भात तपासणी करण्यास सांगण्यात येईल.

---------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.:** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ईबीसीच्या सवलतीसाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांचे प्रतिपूर्तीचे अर्ज सादर करुन न घेणे याबाबत सर्वश्री सतीश चव्हाण, धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात या संदर्भात सूचना दिल्या होत्या. परंतु, तहसीलदार अजूनही प्रमाणपत्र देत नाहीत. निवेदनात असे नमूद केलेले आहे की, विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्याबाबत महसूल अधिकारी टाळाटाळ करीत असल्याबद्दलची कोणतीही तक्रार नाही. परंतु, माझ्याकडे काही तक्रारी आलेल्या आहेत. ज्यावेळी सामान्य शेतकऱ्यांचा मुलगा तहसील कार्यालयात जातो त्यावेळी ते त्याला टोलवून लावतात. आपण जर त्याला प्रमाणपत्र दिले तर आपल्यावर कारवाई होईल की काय, अशी भीती अधिकाऱ्यांना वाटते. तसेच, मागील कित्येक वर्षापासून ईबीसीची सवलत 1 लाख रुपये आहे, ती 5 लक्ष रुपये करावी आणि तहसीलदारांना कडक सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना 1 लाख रुपयापर्यंत फीमध्ये सवलत देण्याचा निर्णय राज्य शासनाने पूर्वी घेतलेला आहे आणि जवळपास मागील 10-12 वर्षापासून ही 1 लाख रुपयांची मर्यादा आहे. 1 लाख रुपयांपेक्षा अधिकचे उत्पन्न असणारेही प्रमाणपत्र मागतात, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे तहसीलदार या चिंतेत असतो की, उत्पन्नाचे स्त्रोत बघून 1 लाख रुपयाच्या आत उत्पन्न देत असताना एक प्रकारे ती तारेवरची कसरतच असते. कारण, अलीकडच्या काळात अनेकांचे उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त झालेले आहे. पहिली गोष्ट म्हणजे तहसीलदारांना उत्पन्नाचे स्त्रोत तपासून तातडीने प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येतील आणि तहसीलदारांनी या संदर्भात टाळाटाळ केली किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे आढळून आल्यास संबंधित तहसीलदारांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, आमच्या वेळी ही उत्पन्नाची मर्यादा 12 हजार रुपये होती. आता ती उत्पन्नाची मर्यादा 1 लाख रुपये आहे. अलीकडच्या काळात अनेकांचे उत्पन्न वाढलेले आहे. म्हणून आपण ही उत्पन्नाची मर्यादा वाढविणार आहात काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकाचे उत्पन्न 1 लाख रुपये असल्यास ईबीसीची सवलत मिळते आणि फी माफीमध्ये आपण त्यांना 50 टक्के सवलत देत असतो. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी ही

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे........

उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येणार आहे काय, अशी मागणी केलेली आहे. यामध्ये 1 लाखाऐवजी 2.5 लाख रुपयापर्यंत उत्पन्न असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना सवलत देण्याचा शासन निर्णय घेत आहे.

श्री.सुनील तटकरे (बसून) : शासनाने आज पहिल्यांदा चांगला निर्णय घेतला आहे.

**सभापती** : मी आपणा सर्वांच्या वतीने मंत्री महोदयांचे अभिनंदन केलेले आहे.

-------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी.:** सन 2014 मधील खरीप हंगामातील विमा संरक्षण मिळालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई जाहीर करुन देखील शासन निर्णयाअभावी लाभ मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागणे याबाबत सर्वश्री जयवंतराव जाधव, दीपकराव साळुंखे, अनिल भोसले, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मला नियम 93 च्या सुचनेचे निवेदन 2 मिनिटांपूर्वीच मिळाले आहे. आपण नियम 93 च्या सुचनेबाबत अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि नियम 93 च्या सुचनेची निवेदने वेळेवर मिळावी, अशी विनंतीही करतो.

सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी साधारणत: 4803 कोटी रुपयांची मागणी राज्य शासनाकडे केली होती. लेखी निवेदनात असे म्हटले आहे की, सन 2014-15 मध्ये 4 हजार कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला. यापैकी, 3433 कोटी इतका निधी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष जमा करण्यात आला. मग असा प्रश्न निर्माण होतो की, जिल्हाधिकाऱ्यांनी 4800 कोटी रुपये मागितले असताना उर्वरित 800 कोटी रुपये आणि हे 400 कोटी रुपये म्हणजे 1200 कोटी रुपये मदत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. मग जिल्हाधिकाऱ्यांनी जे सर्व्हेक्षण केले होते ते चुकीचे होते काय ? कारण, त्या सर्व्हेक्षणानुसार निधी वितरित होऊ शकलेला नाही, मदत वितरित होऊ शकलेली नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, केंद्र शासनाने या संदर्भात निकष बदले आहेत. केंद्र शासनाने अतिशय चांगला निर्णय घेतला. परंतु, निकष बदलल्यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आणि निधीमध्ये मात्र वाढ झाली नाही. याचा शेतकऱ्यांना जो फटका बसलेला आहे त्याबाबत राज्य शासन कोणता निर्णय घेणार आहे ? मी पुन्हा प्रश्न विचारतो की, जी 1200 कोटी रुपयांची तफावत आहे ती आपण कशा प्रकारे दुरुस्त करणार आहात ? आपण आजही असे म्हणतो की, शेतकऱ्यांचे बँकेत खाते उघडण्यात आलेले नाही. मग आपण ग्रामसेवक, स्थानिक पातळीवर काम करणारी शासकीय यंत्रणा, सेवाभावी संस्था यांचा यासाठी वापर करून घेणार आहोत की नाही आणि संख्या वाढल्यामुळे शतकऱ्यांना जो फटका बसलेला आहे याबाबत राज्य शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी जे प्रश्न विचारले ते भिन्न आहेत. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा याच्याशी दुरान्वयाने देखील संबंध नाही. त्यांनी नियम 93 अन्वये सन 2014-15 मधील खरीप हंगामातील विमा संरक्षण मिळालेल्या

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.........

शेतकऱ्यांना नुकसान भरपाई जाहीर करुन देखील शासन निर्णयाअभावी लाभ मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागणे, अशी सूचना दिलेली आहे. त्याचा याच्याशी काय संबंध आहे. आपण विम्याच्या संदर्भात काही माहिती विचारली तर ती मी सांगतो. परंतु, तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, विम्याच्या संदर्भात आपण लेखी निवेदनात संपूर्ण माहिती दिलेली आहे. लेखी निवेदनात असे म्हटले आहे की, राष्ट्रय कृषी विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम 2014 मध्ये एकूण 44.79 लाख शेतकऱ्यांनी रक्कम रु.176.24 कोटी विमा हप्ता भरुन 28.05 लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले होते. त्यापैकी 34.87 लाख शेतकऱ्यांना रक्कम रु.1595.65 कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली असून, राज्य शासनाचा हिस्सा रु.690.74 कोटी इतका होता. राज्य शासनाच्या हिस्स्याची संपूर्ण रक्कम यापूर्वीच भारतीय कृषी विमा कंपनीस कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.एनएआयएस 2015/प्र.क्र.91/11-अे, दिनांक 12 जून, 2015 अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. रु.1595.65 कोटी एकूण रकमेपैकी रु.1355.64 कोटी भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत संबंधित बँकांना वर्ग करण्यात आले आहेत. म्हणजे आपल्याकडून विम्यापोटी 1355 कोटी 64 लाख रुपये रक्कम बँकांकडे देण्यात आलेली आहे आणि उर्वरित रक्कमही जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे. एकूण नुकसान भरपाई रकमेतील केंद्राचा हिस्सा 240 कोटी रुपये प्राप्त होणार असून त्यावर भारतीय कृषी विमा कंपनीकडून कार्यवाही करण्यात येत आहे. आपण विम्याच्या संदर्भात 28 लाख हेक्टर क्षेत्रासाठी पूर्णतः विम्याचे पैसे शासनाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव पाटील : सभापती महोदय, मी जे प्रश्न अगोदर विचारले त्याबाबत मंत्री महोदय जे बोलले ते रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगत आहे, माननीय सभापती यांच्या मार्फत मी मंत्री महोदयांना नियम 93 सूचना सादर केली होती. त्याची प्रत मी माननीय सभापतीमार्फत आपणाकडे देतो. यामध्ये सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये गारपिटीचा विषय देखील समाविष्ट करण्यात आलेला आहे.

**सभापती** : रेकॉर्ड तपासून घेऊन काय कार्यवाही करावयाची आहे ती मी करतो.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रेकॉर्ड तपासण्यापेक्षा ती सूचना आता आपण वाचून घ्यावी, कामकाजपत्रिकेवर जो विषय आहे, ती कामकाजपत्रिका सर्वांना देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने आणखी माहिती देण्यास मी तयार आहे. कामकाजपत्रिकेवर जो विषय आहे तो मी आपल्या लक्षात आणून दिला आहे.

----------

**म.वि.स.नियम 93 अन्वये सूचनांच्या निवेदनाबाबत**

**सभापती** : कामकाजपत्रिकेवरील नियम 93 अन्वये सूचना क्रमांक 9 व 10 च्या संदर्भात दोन्ही मंत्री महोदया सभागृहात उपस्थित राहू शकत नाहीत, त्यामध्ये माननीय महिला व बालविकास राज्य मंत्री व मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांच्या आजीचे निधन झाल्यामुळे त्या परळी येथे गेल्या आहेत. त्याचप्रमाणे रोजगार हमी योजना मंत्री देखील उपस्थित नसल्यामुळे क्रमांक 9 व 10 या सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

---------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी मला परवानगी दिली त्याबाबत मी आपली मनपूर्वक आभारी आहे. 'बहुजन हिताय' या पुस्तकाबाबत गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्रात व अन्यत्र सातत्याने नाराजी आहे. या पुस्तकाचे नाव 'बहुजन हिताय' असले तरी बहुजनांचा बुध्दीभेद करण्याचे विचार या पुस्तकातून मांडण्यात आले आहेत, या पुस्तकात लोकमान्य टीळक, डॉ.राजेंद्र प्रसाद, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री.शरद पवार, भारतीय जनता पक्षाचे नेते कै.गोपीनाथ मुंडे अशा अनेक नेत्यांबाबत आक्षेपार्ह लिखान पुरुषोत्तम खेडेकर यांनी केले आहे. यातील अनेक विषय वाचावयाचे ठरले तर त्या बाबतची बदनामी रेकॉर्डवर येईल. याबाबत मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. महत्वाची बाब म्हणजे 1 जुलै 2015 (अडथळा...) हे मी नवीन पुस्तकाबाबत मांडत आहे, माझा औचित्याचा मुद्दा मांडून पूर्ण होऊ द्यावा. अगोदर माझे ऐकून घ्यावे नंतर आपण बोलावे, माझी आपणाला विनंती आहे, हे पुस्तक वेगळे आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझी हरकत अशी आहे की, सदर प्रकरण हक्कभंग समितीपुढे आहे, हक्कभंग समितीच्या अध्यक्षा सन्माननीय सदस्या आहेत, त्यामुळे त्यांनी हे प्रकरण येथे मांडणे योग्य ठरणार नाही, हेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणली त्याबाबत मी त्यांची आभारी आहे, त्या पुस्तकाचे नाव 'शिवरायांच्या बदनामीची केंद्रे' असे आहे, हे पुस्तक 'बहुजन हिताय' आहे. या वेगळ्या पुस्तकामधून अनेक थोर व्यक्तींची पुन्हा बदनामी करण्यात येत आहे. विशेष हक्क समितीची मी अध्यक्ष झाल्यावर मी नम्रपणे सांगू इच्छिते की, मी पहिल्यांदा सर्व नियम वाचले आहेत, शासनाच्या दोन गोष्टी मला निदर्शनास आणावयाच्या आहेत, न्यायालयाने फेब्रुवारी 2013 मध्ये सहा आठवड्याच्या कालावधीत 'बहुजन हिताय' पुस्तकावर शासनाने बंदी घालावी असे निदेश दिले होते. 'बहुजन हिताय' पुस्तकाच्या लेखकांच्या आशयाबाबत मी बोलत आहे, ते पुस्तक मी आणले आहे. त्यांनी मांडलेले विचार समाजात दुही निर्माण करणारे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे...

आहेत, असे मला म्हणावयाचे आहे. न्यायालयाने फेब्रुवारी 2013 मध्ये सहा आठवड्यात बंदी घालावी (अडथळा..) सभापती महोदय, मी हे पहिल्यांदा पाहत आहे की, आम्हाला कोणताच मुद्दा मांडू दिला जात नाही, हे बरोबर नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे आपण कृपया खाली बसा, आपणाला बोलायचे असेल तर आपण नंतर बोलावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने मला तीन बाबी मांडायच्या आहेत. 1 जुलै 2015 मध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या सहसचिवांनी पत्राद्वारे या पुस्तकाचे लेखक श्री.पुरुषोत्तम खेडेकर व प्रकाशक यांना पान क्रमांक पाच वरील मजकूर वगळण्यास सांगितले आहे. न्यायालयाने सरकारला असे निदेश दिले होते की, या पुस्तकावर सहा आठवड्यात बंदी घालण्याचा निर्णय घ्यावा, परंतु ही कार्यवाही झालेली नाही. एका पुस्तकाचा हक्कभंग वेगळा आहे, दुसऱ्या पुस्तकाबाबत अजून हक्कभंग दाखल झालेला नाही. 'बहुजन हिताय' या पुस्तकावर बंदी घालण्याच्या संदर्भात न्यायालयाने राज्य सरकारला जे निर्देश दिले होते, त्याची कार्यवाही व्हावी याकडे मी औचित्याच्या मुद्दयाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

**सभापती** : शासनाने याबाबत निवेदन करावे.

-------

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक जिल्ह्यातील श्री.बाबुराव पालवे नावाच्या 50 वर्षीय शेतकऱ्याने काल रात्री त्याच्या राहत्या घरी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली आहे. आज सकाळी त्या व्यक्तीचा मृतदेह नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठेवण्यात आला आहे. त्याच्याकडे पैसे नसल्यामुळे बायकोचे मंगळसूत्र गहाण ठेऊन या शेतकऱ्याने खते विकत घेतले होते, तरी देखील पैसे कमी पडत असल्यामुळे आर्थिक विवंचेनेतून शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. आज सकाळपासून शेतकऱ्याच्या गंगामाळवली या गावावरुन तेथील नागरिक व जवळच्या नातेवाईकांनी त्याचा मृतदेह नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आणून ठेवला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये अतिशय चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक येथे झालेल्या घटनेबाबत या औचित्याच्या माध्यमातून सभागृहाचे कामकाज संपण्याच्या आत शासनाने निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

**सभापती** : शासनाने निवेदन करावे.

--------

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी औचित्याच मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विधिमंडळाचा परिसर आपल्या अधिपत्याखाली आहे, या परिसराच्या बंदोबस्तासाठी जी सिक्युरिटी लावण्यात आली आहे ती अत्यंत अपमानास्पद आहे, विधिमंडळात आम्ही येतो त्यावेळी येथील हवालदार व पोलीस तंगड्यावर तंगडी टाकून मोबाईलवर बोलत असतात. जगातील 40 ते 45 पार्लमेंटमध्ये मी गेलो आहे, तेथील सिक्युरिटी व वातावरण पाहिल्यानंतर तेथे आमदारांचे वेगळे स्टेटस वाटते.

सभापती महोदय, मी परवाच्या दिवशी येत असताना मंत्री महोदय गाडी घेऊन येत होते, त्यावेळी कोणताही हवालदार जागेवरुन उठला नाही, कमिशनर यांना निळा दिवा देण्यात आलेला आहे, कमिशनर आल्यावर सर्व हवालदार व पोलीस उठले व त्यांनी सॅल्यूट मारला. या परिसरात आमदारांना नाही तर मंत्री महोदयांना देखील किंमत मिळत नसेल तर अशा प्रकारची सिक्युरिटी आपणाला कशासाठी पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी इतक्या मोठ्या पोलीस बंदोबस्ताची गरज नाही. हे पोलीस ट्रीपला आल्यासारखे येथे येतात, 400 ते 500 लोक असतात, ते लोक सातत्याने किती वेळ उभे राहतील, माणुसकीच्या दृष्टीने हे आपणाला मान्य आहे, त्यांची ड्यूटी 15-15 मिनिटांनी शासनाने लावली पाहिजे. ड्यूटी लावल्यावर त्या काळात कोणालाही मोबाईल घेण्यास परवानगी देऊ नये. ही सिक्युरिटी आपल्या अखत्यारित आहे, याचा आम्हाला अपमान वाटतो. येथे बंदोबस्तासाठी आलेल्या लोकांनी आमदारांना देखील सॅल्यूट केला पाहिजे. हा परिसर आपल्या मालकीचा आहे इतर भाग तर सोडून द्या. या ठिकाणी ज्या पध्दतीने पोलीस बंदोबस्त आहे, त्यामध्ये आमच्यासमोर कोणी पिचकारी मारतो, कोणी काय मजा करतो. आम्हाला या ठिकाणी असे वाटते की, आमदार म्हणून आम्ही विधिमंडळात कायदे पास करतो, मला वाटते विधिमंडळात आल्यानंतर आमदार व मंत्री आपण सर्व सारखे आहोत.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील....

कोणाला शासन म्हणून अधिकार जास्त असतील, परंतु आपल्याकडून आमच्या वेगळया अपेक्षा आहेत. सभापती महोदय, आपण सर्वोच्च स्थानी आहात. मी अनेकदा हा विषय मांडला आहे. विधान भवन इमारतीच्या परिसरात पोलीस बंदोबस्तासाठी असताना पत्ते खेळत असल्याची व्हिडिओ क्लिप मी दाखविली होती. यामध्ये सोमवारपर्यंत बदल झाला पाहिजे. या संदर्भातील नियंत्रण सचिवांनी आणि सर्वांनी घेतले पाहिजे. कोणी कुठेही उभा राहतो. पोलीस आपल्या संरक्षणासाठी आहेत की मजा करण्यासाठी, मोबाईल फोनवर बोलण्यासाठी उभे असतात. यामध्ये आमुलाग्र बदल झाला पाहिजे. अन्यथा मंगळवारी आपल्या दालनामध्ये सर्व गट नेत्यांची बैठक बोलवावी, त्या बैठकीला पोलीस आयुक्तांना देखील बोलवावे. आपण त्या बैठकीमध्ये चर्चा करु. हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे. पोलीस आयुक्तांपेक्षा आमदार मोठे आहेत. अधिकाऱ्यांपेक्षा आम्हाला अधिकार आहे. ही लोकशाही आहे. लोकशाहीमध्ये आम्हाला जनतेने निवडून दिलेले आहे. आमचा सन्मान राखला पाहिजे, आमचा अधिकार आपण आम्हाला मिळवून द्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**सभापती** : मंगळवार, दिनांक 28 जुलै, 2015 रोजी सर्व संबंधितांची माझ्या दालनात बैठक बोलावण्यात येईल.

-------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विशेष उल्लेखाच्या सूचना

**सभापती** : आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील अल्पसंख्याक समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती सुरु करण्यात येते, तसेच सन 2008-2009 ते 2014-2015 या कालावधीत मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत नवीन व नूतनीकरणासाठी राज्यभरातून लाखो अर्ज शिक्षण विभागाने घेतले व त्यातून पात्र विद्यार्थीही निवडण्यात आले, केंद्र शासनाने निधी दिला असून सन 2008-2009 या वर्षी विद्यार्थ्यांना पूर्णपणे लाभ देण्यात येणे, मात्र सन 2008-2009 नंतर मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे उघडकीस येणे, मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्तीपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात यावा, अशी शिफारस या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

**सभापती** : शासनाने कार्यवाही करावी.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल तटकरे (रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

रायगड जिल्हयातील रोहा या तालुक्याच्या मुख्यालयी असलेले 50 खाटांचे उप जिल्हा रुग्णालय हे वैद्यकीय अधिकारी व इतर आवश्यक असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक कर्मचा-यांची अनेक पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी अन्य ठिकाणी जावे लागत असणे, रुग्णालयातील प्रसुती विभाग बंद असल्याने अनेक गरोदर मातांना अन्य खाजगी रुग्णालयात जावे लागत असल्याने त्यांना खर्चाच्या दृष्टीने उपचार घेणे कठीण होणे, तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी विविध रोगावरील औषध गोळयांचा तुटवडा, बंद व नादुरूस्त असलेली यंत्रसामुग्री यामुळे रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या जिल्हा उप रुग्णालयाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

-------

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

देवगड येथील गिर्ये खोलवाडी खारलँड बंधाऱ्याच्या गेट नं.4 चे झडप सहा महिन्यापूर्वीच वाहून गेले असून अद्यापही या बंधाऱ्यावर झडप बसविण्यात आलेले नसणे, त्यामुळे बंधाऱ्याच्या पलीकडील खारे पाणी खोलवाडी येथील शेत जमिनीत घुसल्याने 200 हेक्टर शेतजमीन नापिक झाली असणे, सहा महिन्यापूर्वी उधाणाच्या पाण्यात या बंधाऱ्याची झडप फुटल्यानंतर गिर्ये येथील ग्रामपंचायतीने व ग्रामस्थांनी संबंधित खारलँड बंधाऱ्याच्या कार्यालयाकडे लेखी पत्र देऊन सातत्याने या संदर्भात पाठपुरावा करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी ही झडप बसविण्यासाठी काहीही हालचाल केलेली नसणे, त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांची भात शेती नापिक झाली असणे, यंदाचा पावसाळा सुरु झाल्यापासून काही शेतकऱ्यांनी भात शेतीला सुरुवात केली असणे, मात्र काही शेतकऱ्यांनी बंधाऱ्याचे झडप तुटल्याने संबंधित अधिकारी याबाबत काही तरी कार्यवाही करतील या अपेक्षेने अजूनपर्यंत शेती केलेली नसणे, परंतु भात शेती सुरु केलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात खारे पाणी घुसल्यामुळे त्यांची 80 टक्के शेती वाया गेली असणे, खारलँड बंधारे विभागाने तातडीने हालचाल करुन झडप बसविण्याची बाब मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

-------

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील आर्थिकदृष्टया मागास दुर्बल घटक व सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरिता शासनाने "अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची" सन 1998 साली स्थापना केली. परंतु शासनाने सदर महामंडळासाठी पुरेसा निधी दिला नसल्याने गरजू लोकांच्या कर्ज मागणी अर्जाच्या रक्कमेची पूर्तता करणे महामंडळास अवघड होत असणे, तसेच महामंडळातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरली नसल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असणे, याबाबत समाजाकडून व लोकप्रतिनिधींकडून वारंवार होत असलेल्या तक्रारीबाबत शासनाने चौकशी करुन सदर महामंडळाच्या कार्यालयीन कामकाजात सुसूत्रता आणण्याकरिता 300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शिफारस करीत आहे. 10 वर्षे झाली आहेत, हे एकमेव महामंडळ आहे. बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी कर्ज मिळू शकते. अधिकाऱ्यांची पदे कमी आहेत, त्यामुळे योग्यरित्या काम होत नाही. सभापती महोदय, आपण मंत्री महोदयांना निर्देश द्यावेत.

**सभापती** : शासनाने निवेदन करावे.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने नुकतेच शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण केलेले आहे. राज्यभरात केवळ 50 हजार मुले शाळाबाह्य असल्याचे या सर्वेक्षणात आढळून आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु काही स्वयंसेवी संस्थांनी सुमारे दोन वर्षापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात 64 लाख शाळाबाह्य मुले असल्याचे निष्पन्न झाले होते. यापैकी एका संस्थेच्या विश्वस्त पदी खुद्द विद्यमान शालेय शिक्षणमंत्री श्री.विनोद तावडे हे होते. अशा प्रकारच्या सर्वेक्षणाचे पुढील नियोजनासाठी व निधीची तरतूद करण्यासाठी खूप महत्व असते. 11 कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्र राज्यात केवळ 50 हजार शाळाबाह्य मुले आढळणे हे कोणत्याही तर्काच्या कसोटीवर वास्तव असू शकत नाही. या बाबतीत शालेय शिक्षण विभागाने गांभीर्याने फेरविचार करुन शाळाबाह्य मुलांची नेमकी संख्या जाणून घेण्यासाठी पुन्हा सर्वेक्षण करावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे. शाळाबाह्य मुलांची नेमकी संख्या निश्चित झाल्यानंतर पुढील नियोजन आणि शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाची काय व्यवस्था शासन करणार आहे? 64 लाख मुले असतील आणि शासन केवळ 50 हजाराची सोय करणार असेल तर ते अतिशय दुर्दैवी ठरेल. हा गंभीर प्रश्न आहे. म्हणून फेर सर्वेक्षण होऊन निश्चित आकडेवारी शासनाने जाहीर करावी अशी मी मागणी करतो.

**सभापती** : शासनाने कार्यवाही करावी.

--------

...7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी 105 हुतात्म्यांनी आपल्या जिवाचे बलिदान केल्यामुळे मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आहे. आपल्या मागे आपल्या कुटुंबाचे काय होईल याची पर्वा न करता महाराष्ट्र निर्मितीसाठी त्यावेळी 105 हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. या हुतात्म्यांच्या कुटुंबीयांना आपण आणि आपले सरकार काही देणे लागतो, याचे आपण नेहमी स्मरण ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यास बलिदान दिले म्हणून काही हुतात्म्यांच्या नातेवाईकांना शासनाने सदनिका दिल्या आहेत, हे स्तुत्य आहे. तथापि, उर्वरित हुतात्म्यांच्या नातेवाईकांचा शोध न लागल्यामुळे त्या देण्यात आलेल्या नाहीत. परंतु मुंबईतील श्री.सुधीर रामनाथ अमृते या एका हुतात्म्याच्या मुलाने अशा 12 हुतात्म्यांच्या नातेवाईकांचा शोध लावून दिनांक 21.11.2014 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांकडे त्यांची यादी पाठवून त्यांना सदनिका देण्याची मागणी केली आहे. या संदर्भात सदर नातेवाईकांना काहीही कळविण्यात आलेले नाही. सबब या संदर्भात चौकशी करुन या 12 हुतात्म्यांच्या नातेवाईकांना लवकरात लवकर शासनाने सदनिका मंजूर करावी आणि महाराष्ट्रातील मुलांना संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास कळावा म्हणून इतिहासाच्या क्रमित पुस्तकात एक धडा समाविष्ट करावा अशी या विशेष उल्लेखाद्वारे मी विनंती करीत आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी मंगल कलश आणला, याचा पाया घातलेल्या हुतात्म्यांसाठी राज्य शासनाने कृतज्ञता म्हणून पाऊल उचलावे अशीही मी शासनाला विनंती करते.

---------

नंतर 2ए.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, राज्यात वनविभागांतर्गत वन रक्षक व वनपाल कर्मचारी कार्यरत असणे, सदर वन रक्षक व वनपाल यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा व महसूल कर्मचाऱ्यांपेक्षा वेतनश्रेणी कमी असणे, त्यामुळे वनपाल व वन रक्षक संघटना यांनी शासनाकडे पोलीस व महसूल विभ्ांगात कार्यरत समकक्ष पदांची समान वेतनश्रेणी मिळावी म्हणून सतत मागणी करूनही त्यावर न झालेली कार्यवाही, त्यामुळे वनपाल व वन रक्षक कर्मचाऱ्यांवर होत असलेला अन्याय, शासनाने यावर त्वरित कार्यवाही करण्यासाठी मी हा विशेष उल्लेखद्वारे मुद्दा उपस्थित केला आहे.

.......

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ ( : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, जळगाव महापालिकेच्या दवाखान्यात गेल्या 2 महिन्यांपासून औषधांचा तुटवडा निर्माण होणे, त्यामुळे गोरगरीब रुग्णांना बाहेरुन औषध व इंजेक्शन खरेदी करावी लागणे, त्यामुळे रुग्णांना आर्थिक भूर्दंड सहन करावा लागणे, त्याकरिता सदर महानगरपालिकेच्या दवाखान्यात औषधी साठा उपलबध करुन दण्याची आवश्यकता हा विषय मी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

.........

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी तसेच शालेय शिक्षण विभागाने 31 डिसेंबर 2002 रोजीच्या शासन निर्णयानुसार आणि वेळोवेळी बदललेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या शासन निर्णयानुसार शासनमान्य अनुदानित शाळांमध्ये अनुकंपाधारकांना सेवेत सामावून घेण्याची योजना आहे. सेवेत असताना एखाद्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला व तो निकषात बसत असेल तर त्याच्या कुटुंबातील एका वारसाला त्याच्या पात्रतेनुसार जे काही पद उपलब्ध असेल त्या पदावर सामावून घेतले पाहिजे व त्यांना त्यांचे जीवन जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. अनुकंपातत्त्वावर नोकरी मिळणे म्हणजे राईट टु लिव्ह आहे. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या एका पदावर सामावून घेतले जावे अशी आमची अपेक्षा आहे. शासन निर्णय देखील तसेच आहे. पण दुर्दैवाने अनेक जिल्ह्यांमध्ये अशी अनेक प्रकरणे 4-4, 6-6, 8-8 महिने प्रलंबित आहेत. काही जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकारी मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसांना सेवेत सामावून घेतात. त्यांना मान्यता देतात. पण आमच्या रत्नागिरी, रायगड जिल्ह्यात अनुकंपाधारकांची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. या निमित्ताने माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, तातडीने अनुकंपाधारकांना शासनाच्या सेवेत नियमानुसार सामावून घ्यावे व त्यांना जीवन जगण्याबाबतचा अधिकार प्रदान करण्याबाबत कार्यवाही करावी.

**सभापती :** या प्रकरणी शासनाने कार्यवाही करावी.

........

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यात शासकीय कामकाज, बँक आदी कामासाठी आधार कार्ड गृहीत धरण्यात येत असणे, तथापि, पुणे शहरात अनेक एजन्सीद्वारे आधार कार्ड काढण्यात येणे, आधार कार्ड काढण्याचे काम मोफत असताना पुण्यात आधार कार्ड परवाना असलेल्या कर्वे नगर भागातील आधार कार्ड काढणाऱ्या ऑपरेटरने आधार कार्डासाठी नागरिकांकडून पैसे घेतल्याचे दिनांक 21.7.2015 रोजी उघडकीस येणे, आधार कार्ड मोहीम पारदर्शक असावी व व नागरिकांची आर्थिक लूट होऊ नये म्हणून शासनामार्फत कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

.....

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये 3 ते 5 वर्षात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण वाढल्याचा परिणाम शेती क्षेत्रावर होऊन त्यात घट झाल्याचा अहवाल कृषी खात्याने देणे, सन 2013 मध्ये 1 लाख 15 हजार हेक्टर शेतीक्षेत्र होते ते सन 2015 मध्ये 1 लाख 10 हजार हेक्टरवर आलेले असून 5 हजार हेक्टर शेतीक्षेत्र घटल्याचे स्पष्ट होणे, रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, माणगाव, रोहा हे भात पिकाचे क्षेत्र म्हणून ओळखले जात होते. मात्र आता भाताविक्री केंद्रही बंद झाल्याने व्यावसायिक शेतीवर परिणाम होणे, तसेच, खालापूर, पेण, पनवेल, कर्जत, अलिबाग, रोहा, महाड येथे मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रकल्प उभारण्यात आल्यामुळे शेतीक्षेत्र घटले असणे, रायगड जिल्ह्यातील गेल्या 5 वर्षात 50 हजार हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्राने वापरली गेली असून त्यातील 5 हजार हेक्टर शेतीक्षेत्रही औद्योगिकीकरणासाठी हस्तांतरीत करण्यात येणे, रायगड जिल्ह्यात येणारे दिल्ली-मुंबई कॉरिडोर, पनवेल येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे विविध औद्योगिक क्षेत्रासाठी जवळपास 2 लाख हेक्टर जमीन संपादित केली जाणार असून भविष्यात शेतीक्षेत्र कमी होण्याची भीती निर्माण होणे, सबब, शासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

.......

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, नागपूर जिल्ह्यात जलयुक्त शिवार या योजनेतील कामांमध्ये अनियमितता असणे, कृषी व सिंचन विभागात असमन्वयामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात असणे, तांत्रिक अज्ञानामुळे नाला रूंदीकरण व खोलीकरणाचा पाणी साठविण्यासाठी उपयोग होण्याऐवजी पाणी वाहून जात असणे, परिणामी शेतकऱ्यांच्या सिंचनाची कोणतीही सोय होत नसून कंत्राटदारांचे हित जोपासले जात असल्याचे जनमानसात समज होणे, वास्तविक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता विशिष्ट गावांची निवड करण्याऐवजी सर्वच गावांमध्ये ही योजना राबवायला हवी होती. कृषी विभागाकडे तांत्रिक व्यक्ती नसल्यामुळे या योजनेतील कामांमध्ये तारतम्य नसणे, नाला रूंदीकरण, खोलीकरण व सपाटीकरणात पाणी साचण्याऐवजी वाहून जाणे, त्यामुळे केलेला खर्च व्यर्थ जाणार असल्याने याबाबत त्वरित कार्यवाही होणे आवश्यक आहे म्हणून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

....

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, एका बाजूला सरकार 'प्रत्येक मूल शाळेत जाईल घरी कुणी न राहील' हे शिक्षणाच ब्रीद वाक्य ठरवून शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करत असतानाच, केंद्र सरकारच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत राज्यात सन 2012 मध्ये सुरू करण्यात आलेली 43 मॉडेल स्कूल बंद करणार असल्याचा निर्णय सरकारने घेतल्याचे, मुंबईच्या बालभवन येथे गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या बैठकीत सांगण्यात आले. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील 5 मॉडेल स्कूल मधील 400 विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असताना शासनाने आपल्या या अन्यायकारक निर्णयाचा फेरविचार करावा अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

.....



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सन 2015-16 करिता राज्यातील विजेच्या दराबाबतची वस्तुस्थिती

**मु.शी.:** सन 2015-16 करिता राज्यातील विजेच्या दराबाबतची वस्तुस्थिती संबंधी ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, राज्यातील जनतेमध्ये आणि दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये विजेच्या दरासंबंधी संभ्रम मधल्या काळात निर्माण झाला होता. नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला होता त्यामध्ये वीज दराचा देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या राज्यात 31 ऑक्टोबर 2014 रोजी नवीन शासन आले. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि आमच्या तीन्ही कंपन्यांनी खर्चामध्ये कपात करून वीज नियामक आयोगाकडे एक पिटीशन दाखल केले. मला सांगण्यास आनंद होतो की, राज्यामध्ये विजेचे दर हे कमी झालेले आहेत. सन 2001-2002 राज्याच्या वीज दरामध्ये 4.4 टक्के इतकी वाढ झाली होती. सन 2003-2004 मध्ये 1.50 टक्के इतकी वाढ झाली होती. सन 2006-2007 मध्ये 16.88 टक्के दरवाढ झाली होती. सन 2007-2008 मध्ये 5.7 टक्के दरवाढ झाली होती. 2008-2009 मध्ये 8.76 टक्के दरवाढ झाली होती. सन 2009-2010 मध्ये 4.20 टक्के दरवाढ झाली होती. सन 2010-11 मध्ये 3.03 टक्के दरवाढ झाली होती. सन 2011-2012 मध्ये 11.6 टक्के दरवाढ झाली होती. सन 2012-2013 मध्ये 16.48 टक्के दरवाढ झाली होती. मागच्या वर्षी म्हणजे सन 2014-2015 मध्ये 11.34 टक्के दरवाढ झाली होती. मंत्री परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सहकार्य केल्यामुळे यावेळी सन 2015-16 मध्ये -5.72 टक्क्यांनी विजेचे दर कमी झालेले आहेत. मी माझे थोडक्यात मुद्दे मांडतो. या निवेदनाची कॉपी मी सर्व सन्माननीय सदस्यांना देखील देणार आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** मंत्री महोदय, आपण जे निवेदन करीत आहात ते प्रदीर्घ आहे. सदस्यांना जो मुद्दा पाहिजे होतो तो मुद्दा आपण प्रभावी रीतीने मांडलेला असल्यामुळे सदर निवेदन पटलावर ठेवावे असे मला वाटते.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, फक्त महत्वाचे मुद्दे मांडतो. बीपीएल ग्राहकांची 13 टक्क्याने दरवाढ कमी करण्यात आली आहे. 100 युनीट पर्यंत 10 टक्के दरवाढ कमी करण्यात आली आहे. घरगुती मोठया ग्राहकांची 10 टक्क्याने दरवाढ कमी केली आहे. वाणिज्य वर्गवारीमध्ये 10 टक्के दरवाढ कमी करण्यात आली आहे. सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेचे दर 7 टक्क्याने कमी करण्यात आले आहेत. कोकणामध्ये समुद्र किनारी लोक राहत असतात. कोल्हापूर जिल्हयात छोटे यंत्रमाग आहेत. यंत्रमाग आणि इंडस्ट्रीअल हे दोन भाग वेगळे करावेत अशी मागणी यंत्रमाग धारक गेल्या 10 वर्षापासून करीत होते. छोटया छोटया यंत्रमागांना इंडस्ट्रीज कॅटेगरीजमध्ये टाकण्यात आले होते. यावेळी शासनाने विशेष भूमिका घेऊन यंत्रमागाची वेगळी कॅटेगरीज केली. यंत्रमागाला इंडस्ट्रीजमधून कमी करण्यात आले आहे. यंत्रमागाचा दर 6.15 रुपयावरुन 5.43 कमी केलेला असून 8.75 रुपयावरुन 6.88 रुपये इतका रेट कमी झालेला आहे.

सभापती महोदय, शासकीय शाळा, महाविद्यालय, दवाखाने, सार्वजनिक सेवा यासाठी आपण वेगळी कॅटेगरीज केली आहे. अगोदर ही कॅटेगरीज एक होती. अगोदर शासकीय सेवेला खूप जास्त विजेचे दर लागत होते. जिल्हा परिषदेच्या शाळेला, महाविद्यालयाला तसेच दवाखान्यांना अगोदर खूप वीज बील येत होते. परंतु आता नवीन वेगळी वर्गवारी केल्यामुळे त्यांना अगोदर 6.50 लागत होते परंतु आता त्यांचा रेट 4.54 झालेला आहे. 9.58 वरुन 5.84 पैसे रेट झालेला आहे. 9.72 वरुन 6.50 रेट झाला आहे 10.28 पासून 7.20 एवढा रेट झालेला आहे. साधारणत: 30-35-40 टक्के दरवाढ कमी झालेली आहे.

सार्वजनिक अशासकीय सेवेचे विजेचे रेट सुध्दा कमी झालेले आहेत. 6.50 वरुन 4.92, 9.58 वरुन 7.22, 9.72 वरुन 7.32, 10.28 वरुन 7.68 एवढे रेट कमी झाले आहेत. जवळपास 25-30 टक्क्याने दरवाढ कमी झालेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रशेखर बावनकुळे.......

सभापती महोदय, कोकणामध्ये सेरी कल्चर, ॲक्वा कल्वर, टिस्यू कल्चर, मशरुम उद्योग, पशू पैदास तसेच सर्वात महत्वाची बाब अशी आहे की, आपल्या भागात मच्छीमारांसाठी जे शीत केंद्र आहेत त्यांच्यासाठी आता वेगळी कॅटेगरीज करण्यात आली आहे. शीत केंद्राला इंडस्ट्रीजमधून कमी करुन त्यांच्यासाठी वेगळी कॅटेगरीज केलेली आहे. मच्छीमारांनी शीत केंद्रात मच्छी ठेवली तर त्यांना 7.30 ते 13.49 पर युनीट रेट लागत होता. परंतु आता यासाठी वेगळी कॅटेगरीज केल्यामुळे 3.60 पैसे दर केलेला आहे. शीतगृहाला आता कृषीमध्ये टाकण्यात आले आहे. निवेदनाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना दिलेल्या आहेत. राज्यातील जनतेला नवीन वीज दराची माहिती व्हावी यासाठी मी हे निवेदन केलेले आहे.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यातील साखर उद्योगात आलेली मंदी

**मु.शी.:** राज्यातील साखर उद्योगात आलेली मंदी या विषयवर सर्वश्री जयंत पाटील, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, प्रभाकर घार्गे, हेमंत टकले, प्रकाश गजभिये, जयवंतराव जाधव, दिपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती :**या अल्कालीन चर्चेसंबंधी औपचारीक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.जयंत पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

राज्यातील साखर उद्योगामध्ये प्रचंड प्रमाणात मंदी निर्माण झाल्याने तसेच निर्यात होणाऱ्या साखरेचे दर प्रती क्विंटल रुपये 1 हजार 900 प्रमाणे घसरल्यामुळे साखर कारखाने तोट्यात चालविणे शिवाय साखर कारखान्यांच्या व्यवस्थापनाकडे पर्याय नसणे, राज्यातील साखर-उद्योग तोट्यात जात असल्याची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचा परिणाम होणे, त्यामुळे यापुढे विदर्भ, मराठवाड्या प्रमाणेच पश्चिम महाराष्ट्रात देखील आत्महत्येचे प्रकार घडण्याची शक्यता निर्माण होणे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून साखर कारखान्यांना सी.सी.च्या (कॅश क्रेडीट) रुपाने 10.50 टक्के दराने कर्ज देणे, गाळीप हंगाम संपल्यावर साखर विक्रीतून कारखाने कर्जाची फेड करीत असणे, जागतिक व भारतीय बाजारातच दिवसागणिक साखरेचे दर कमी होणे, जादा साखरेमुळे कारखानदारीचे अर्थकारण आणि व्यापारी वर्ग अडचणीत येणे, उत्पादित होणारी 15 टक्के अतिरिक्त साखर भविष्यात निर्यात होणे गरजेचे असणे, केंद्र शासनाने या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केल्यास राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, गाव पातळीवरील कृषी पत संस्था (विविध कार्यकारी सहकारी संस्था) या आर्थिकदृष्ट्या अडचणीत येणे व पर्यायाने राज्यातील सहकार चळवळीवर त्याचा विपरित परिणाम होणे, शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही."

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील.....

सभापती महोदय, या राज्यामध्ये एकंदर 191 साखर कारखाने असून 126 कारखाने सहकार तत्वारील असून 65 साखर कारखाने खाजगी तत्वावर चालतात. शेतकऱ्यांना देण्यात येणारा ऊसाचा दर व साखरेची विक्री यामध्ये आज व्यस्त प्रमाण निर्माण झाले आहे. या राज्यामध्ये एफआरपी नुसार ऊसाचा दर दिला गेला पाहिजे असे राज्य शासनाने येथे वेळोवेळी सांगितले. ज्या साखर कारखान्याने एफआरपी प्रमाणे दर दिला त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी अनेक वेळा सांगितले आहे की, आम्ही त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करु. ज्यावेळेला एफआरपीचा दर ठरविण्यात आला होता त्यावेळेस साखरेचा दर 2700-2800 रुपये होता व पुढील वर्षी तो दर 3200 रुपये होईल अशी राज्य शासनाची व केंद्र शासनाची अपेक्षा होती. मंत्री महोदय ठामपणे सांगत होते त्यावेळेला साखरेचे दर एवढे कमी झालेले नव्हते. कोल्हापूर जिल्हयामध्ये जवळपास 30 साखर कारखाने आहेत. या 30 साखर कारखान्यांनी ऊसाचा दर ॲव्हरेज 2500 रुपये दिला होता. राधानगरी व करवीर या भागातील साखर कारखान्यांनी 2550 रुपये ऊसाचा दर दिला होता. डिसेंबर व जानेवारी महिन्यात दर वाढतील अशी अपेक्षा होती. आज साखर उद्योग नष्ट होण्याला सुरुवात झालेली आहे. ज्यावेळेला एफआरपी प्रमाणे दर दिला त्यावेळेस साखरेचा दर 32 रुपये होती. काल आम्ही माननीय सभापती महोदयांच्या दालनात बसलो असताना त्या ठिकाणी एक साखर व्यापारी आला असताना त्याला विचारण्यात आले की, "आज साखरेचा दर काय आहे" ? त्यावेळेस साखर व्यापाऱ्याने "आजचा साखरेचा दर 18.50 रुपये आहे" अशी माहिती दिली. साखरेचे प्रमाण आज व्यस्त झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रात 80 टक्के ऊसाचे पेमेंट साखर कारखाने अगोदरच देत असतात. यामध्ये साखर कारखान्यांची मोठी अडचण निर्माण झालेली आहे. आज देशातील 8 ते 9 टक्के शेतकरी साखर उद्योगावर अवलंबून आहे.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

आपल्याकडे जवळपास दहा टक्के जास्त आहे. देशातील एकूण लोकसंख्येच्या 7 ते 8 टक्के कुटुंब या उद्योगावर अवलंबून आहेत. देशातील साखर उद्योगामध्ये जवळपास एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. आज देशाची साखरेची वार्षिक गरज 240 टन आहे आणि या वर्षी साखरेचे उत्पादन 280 टन आहे, हा मोठा फरक नाही. एकूण वार्षिक उत्पन्नाच्या 85 टक्के साखर भारतीय बाजारामध्ये विकता येते, 15 टक्के साखर जादा होते. ही परिस्थिती फार गंभीर नाही. पण आपण त्याचे व्यवस्थित नियोजन केले तर काही अडचण येणार नाही. माननीय मंत्री सांगतील की व्यवसायामध्ये नफा तोटा होत असतो. आम्ही त्यांची वक्तव्ये ऐकलेली आहेत. पण मी याठिकाणी सांगू इच्छितो की, मागील 25-30 वर्षामध्ये असे व्यस्त प्रमाण कधी झाले नव्हते. पूर्वीची आम्हाला काही माहिती नाही, परंतु पहिल्यांदा असे घडले आहे. माननीय मंत्र्यांना याचे चांगले ज्ञान आहे. मागील 15-20 वर्षापासून मी बँकेकडून अनेक सहकारी साखर कारखान्यांना फायनान्स केलेला आहे. मी रोज त्या साखर कारखान्यांची बॅलन्सशीट पाहतो. मी स्वतःचा त्याचा अभ्यास केलेला आहे. आज हे प्रमाण व्यस्त झालेले आहे, ही गंभीर बाब आहे. दोन वर्षामध्ये हे चित्र बदलेल. त्याचे कारण असे की, जागतिक बाजारामध्ये पेट्रोलिअम पदार्थाचे दर खाली आल्यामुळे असे झालेले आहे.

सभापती महोदय, जगामध्ये सर्वात जास्त साखरेचे उत्पादन ब्राझील देशात होते. तो देश इथिनॉलचे उत्पादन करायचा. पण पेट्रोलिअम पदार्थाचे दर खाली आल्यामुळे त्या देशाने साखरेचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली, त्यामुळे आपला एक्स्पोर्ट बंद झालेला आहे. यामध्ये साखर कारखान्यांची काहीही चूक नाही. जागतिक बाजाराच्या परिणामामुळे ते कमी जास्त झाले आहे. या सर्व गोष्टींचा विचार आजच्या चर्चेच्या निमित्ताने व्हावयास पाहिजे. आज साखरेला 1900 रुपये दर आहे. मागील सात-आठ दिवस आपण दोघेजण यावर सातत्याने चर्चा करीत आहोत. या घटनेचे गांभीर्य अन्य कोणाला आलेले दिसत नाही. या राज्याची संपूर्ण अर्थव्यवस्था कोसळून पडणार आहे म्हणून या विषयावर चर्चा करण्याची मी मागणी केली.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

सभापती महोदय, मी या उद्योगाच्या संदर्भात आकडेवारी काढलेली आहे. जवळपास 2 कोटी लोक या उद्योगावर अवलंबून आहेत. त्यामध्ये शेतमजूर, ऊस तोडणी कामगार आणि वाहतूक कामगार यामध्ये समाविष्ट आहेत. ही डायरेक्ट आणि इनडायरेक्ट कामगारांची आकडेवारी आहे. इनडायरेक्ट कामगारांची आकडीवारी जास्त आहे. माझ्याकडे बंदरावर काम करण्यासाठी 200 कामगार आहेत, परंतु इनडायरेक्ट कामगार 2700 आहेत. मग त्यामध्ये ट्रकचालक, क्लिनर, टायरवाले आले, हे सर्व इनडायेक्ट कामगार आहेत. मी सांगितलेली आकडेवारी राज्य शासनाकडून घेतलेली आहे. या ठिकाणी साखर उद्योगाशी संबंधित अनेक सदस्य आहेत त्यांना आपण माहिती विचारु शकता.

सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही. मी प्रमुख मुद्दे मांडणार आहे. या उद्योगामुळे बँका अडचणीत येणार आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी मागील रेकॉर्ड काढून पहावा. बँकेचा चेअरमन म्हणून मी 1995 पासून होत असलेल्या बैठकांना उपस्थित राहत आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी त्यावेळी बैठक बोलाविली होती, त्या बैठकीला मी गेलो होतो. त्यांनी सांगितले की, राज्यातील ज्या चांगला बँका आहेत त्या बँकानी 40 कोटी रुपये कर्जाचे वाटप केले पाहिजे. आम्ही त्याचे प्रोसिडीग्ज केले नाही. आम्ही त्यावेळी चुकलो. आम्ही आता प्रोसिडीग्ज सुरु केले. माननीय सहकार मंत्र्यांनी बोलाविले की, आम्ही लगेच त्याची संगणकावर नोंद घेतो. माननीय सहकार मंत्री आमच्या बँकेत आलेले आहेत. त्यांना माहीत आहे की, आम्ही बँकेचे संगणकीकरण झालेले आहे. आम्ही आता सर्व माहिती रेकॉर्ड करतो. आम्ही त्यावेळी डेटा केला नाही. आम्हाला सांगण्यात आले की, कोकणातील बँका चांगल्या आहेत, मुंबई बँक चांगली आहे. ठाणे बॅक, पुणे बँक, सातारा बँक चांगली आहे त्यामुळे आपल्या बँकेने त्यांना फायनान्स केला पाहिजे असे सांगून आम्हाला ते अनिवार्य केले. आज या बँकाची काय परिस्थिती आहे ? आम्ही कष्ट करुन या बँका उभ्या केल्या. राज्य शासनाने कर्ज देण्यास भाग पाडले त्यामुळे आमची बँक अडचणीत आली आहे. या उद्योगाबरोबर राज्यातील सर्व सहकारी बँका मोडीत निघणार आहेत. दादा, आपण सहकारी चळवळीत काम केलेले आहे. मी दोन्ही दादांना

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

सांगतो की, ही अतिशय गंभीर बाब आहे आणि राज्यातील कोणताही शेतकरी आपणास माफ करणार नाही. कोणी किती पैसे घेतले याची आकडेवारी मंत्री महोदयांकडे आहे. यापूर्वी कोल्हापूरच्या कोणत्याही कारखान्याचे पेमेंट राहत नव्हते. साखर काखाना एकवेळ बँकेचे पैसे थकवतील पण ऊस शेतकऱ्यांचे पैसे थकविल्याचे मी तरी पाहिलेले नाही. कदाचित त्याला एखादा अपवाद असू शकेल. आजरा सारखा साखर कारखाना असला तरी त्या साखर कारखान्यानी त्यांनी शेतकऱ्यांचे पैसे कधी थकविलेले नाही, हे मी पाहिलेले आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर एमएसबी बँकेचा प्रतिनिधी म्हणून काम केलेले आहे म्हणून मला या सर्व गोष्टी माहीत आहेत. तेव्हा आपल्यासमोर जे संकट आले आहे त्यावर आपल्याला पर्याय शोधला पाहिजे.

सभापती महोदय, देशात महाराष्ट्र राज्य आणि उत्तर प्रदेश ही दोन राज्य सर्वात जास्त साखर उत्पादन करतात. त्यानंतर कर्नाटक, गुजरात राज्यांचा नंबर लागतो. पंजाब राज्यात मोठ्या प्रमाणात साखर उत्पादित होत नाही. तेव्हा देशपातळीवर जेवढे गांभीर्य घेतले पाहिजे ते घेतले जात नाही. मी दादांची तळमळ पाहिलेली आहे. ते दोन दिवस माझ्याशी चर्चा करीत आहेत. आपणास या प्रश्नावर उपाय शोधला पाहिजे.

सभापती महोदय, सन 2014-2015 मध्ये हंगाम सुरु झालेला आहे. पण सन 2015-2016 मध्ये कोणत्याही साखर कारखान्याला हंगाम सुरु करण्याची हिम्मत होणार नाही. वारणा साखर कारखाना जागतिक पातळीवर गेला आहे. त्या साखर कारखान्याला कर्जाचे व्याज भरताना नाकीनऊ येत आहे. साखर कारखान्यांनी त्या परिसराचे अर्थकारण बदलून टाकले आहे. वारणा, वाळवा, दूधगंगा या साखर कारखान्यांचे मॅनेजमेंट चांगले आहे. कै.सा.रे.पाटील यांच्या साखर कारखान्याला तुम्ही कर्ज नाकारणार काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

हे लोक चोर होते काय, लुटारु होते काय ? नाही. या लोकांनी या सहकार क्षेत्रात आपले आयुष्य घालविले म्हणून त्या भागातील अर्थकारण बदलले आहे. आमच्यासारखा एखादा खराब असेल आणि त्याने चूक केली म्हणून संपूर्ण चळवळ बदनाम आहे असे म्हणता येणार नाही नाही. या चर्चेच्या माध्यमातून मी कोणावर टीका करणार नाही. परंतु यावर उपाय काय आहे, या बाबतीत आपल्याला चर्चा केली पाहिजे. महोदय, एकमेकांवर आरोप करुन किंवा कोणाची चूक सांगून उपयोग होणार नाही. त्यामुळे जागतिक पातळीवरील बाजारपेठेत याचा मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला असून, त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागत आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी अनेक पर्याय आहेत. आपण म्हणतो की, या संदर्भात मदत करावी. परंतु मला कोणी कितीही मदत केली तरी ती कमी पडणार आहे. महोदय, जर सरकारला मदत द्यावयाची असेल तर ती टनामागे 1 हजार रुपये द्यावी. तरच त्या शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा मेळ बसेल. या संपूर्ण कामांसाठी 25 हजार कोटी रुपये लागतील. मला निश्चित आकडा माहीत नाही. पण या संपूर्ण गोष्टीचा आर्थिक मेळ बसवावयाचा असेल तर 800 ते 1000 कोटी रुपये लागतील आणि टनामागे कमीत कमी 500 ते 600 रुपये द्यावे लागतील. परंतु आज सरकार केवळ 200 रुपये देऊ पाहत आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार या कामी मदत करीत आहे. परंतु सरकारकडून जुने कारखाने आणि नवीन कारखाने अशी कॅटॅगरी केली जात आहे. यातून वाद निर्माण होतील. पण ते वाद चर्चेअंती सुटू शकतात.

सभापती महोदय, 2015-16 या हंगामातील जवळजवळ 100 कारखाने बंद होण्याच्या स्थितीत आहेत. या मागचा कळीचा मुद्दा वेगळा आहे. मी कोणावर टीका करीत नाही. परंतु हा उद्योग भांडवलदारांना ताब्यात घ्यावयाचा आहे. या जगातील बडे भांडवलदार, रिलायन्स सारखे भांडवलदार, यांना जागतिक बाजारपेठेत ई-साखरेच्या माध्यमातून संपूर्ण उद्योग ताब्यात घ्यावयाचा आहे. महोदय, या बाबतीतील पुरावे माझ्याकडे आहेत. जागतिक बाजारपेठेत वेगळा ब्रँड तयार करुन रिलायन्स सारखे मोठे भांडवलदावर सर्व उद्योग ताब्यात घ्यावयास निघाले आहेत. त्यामुळेच त्यांना अस्तित्वात असलेला उद्योग जाणीवपूर्वक अडचणीत आणून व कारखाने बंद पाडून नंतर ते कारखाने स्वतःच विकत घ्यावयाचे आहेत. आज शेतकऱ्यांना 2000-2500 रुपये भाव मिळतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

परंतु नंतर शेतकऱ्यांना हा भाव 1 हजार रुपये देण्यात येणार आहे. यातून खरा शेतकरी नडला जाणार आहे. ज्यांनी साखर उद्योगामध्ये विविध स्तरावर काम केले अशा तज्ज्ञांशी मी दोन महिन्यांपासून चर्चा करीत आहे. याचे मूळ तेथे आहे. म्हणून केंद्र सरकार याला संमती देत नाही. वास्तविक पाहता केंद्र सरकारने मनात आणले तर सर्व काही करु शकते. परंतु हे सरकार केवळ एका उद्योगासाठी संपूर्ण चळवळ किंवा 50-60 वर्षाच्या काळातील मेहनत मातीमोल किंमतीने द्यावयास निघाले आहे. हे मी मुद्दाम रेकॉर्डवर आणत आहे. या बाबतचे परिणाम शासनाला दोन वर्षानंतर कळतील.

महोदय, हा सर्व प्रकार थांबविण्याची ताकद आपल्या राज्यात आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी ज्यावेळी कारखाने उभे केले त्यावेळी शेतकरी 8-9 लाख रुपये उभे करीत होते. त्या कालखंडात 2-3 कोटी रुपयांमध्ये साखर कारखाना उभा केल्याचे आम्ही वाचतो. आम्हाला वास्तव माहीत नाही. परंतु आम्ही या नेत्यांचे चरित्र किंवा त्यांचे अनुभव वाचतो त्यातून हे सर्व कळते. भाऊसाहेब थोरात, तात्यासाहेब कोरे यांनी शेतकऱ्यांच्या घरोघरी जाऊन मोठ्या कष्टाने 10-10 रुपयांच्या माध्यमातून शेअर कॅपिटल जमा केले. गावामध्ये दोन-दोन दिवस वस्ती करुन शेअर कॅपिटलच्या माध्यमातून 7-8 लाख रुपये जमा केले. महोदय, कारखाने कोणाच्या ताब्यात आहेत हे सोडून द्या. कारण तो कारखाना आज एकाच्या ताब्यात असेल परंतु उद्या तो दुसऱ्याच्या ताब्यात असेल. मागच्या काळात ज्या बँका तुमच्या हातात नव्हत्या त्या बँका आता तुमच्या हातात येत आहेत. पूर्वी बीड जिल्हा बँक काँग्रेसच्या ताब्यात होती, ती तुमच्या ताब्यात आली. मुंबई बँक सुध्दा तुमच्या ताब्यात आली. ठाणे बँकेवर एका मताच्या फरकाने तुमची सत्ता आहे. माननीय मंत्री महोदय, पूर्वी ज्या ठिकाणी तुमचा शिरकाव नव्हता त्या ठिकाणी आता तुमचा शिरकाव झाला आहे.

माननीय सहकार मंत्री, आपण 15 वर्षे घरदार सोडून संघाचे प्रचारक म्हणून काम केले. आपण संघ सेवक आहात. आपल्याला या विषयी काम करणे सोपे आहे. आपण मनात आणले तर सर्व काम होऊ शकते. या कामी केंद्र सरकार किती मदत देणार हे मला माहीत नाही. माननीय मंत्री, आपण आपल्या ताकदीवर हे सर्व करु शकतो. कमीत कमी सहकार तत्त्वावरील कारखाने आणि सहकारी बँका कशा टीकतील या दृष्टिकोनातून काम केले पाहिजे. नॅशनलाईज बँकांचे पैसे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

फेडणे वगैरे हा वेगळा भाग आहे. त्यामुळे या दृष्टीने कशा प्रकारे काम करण्यात येणार आहे, याचे उत्तर राज्य सरकारकडून हवे आहे. मला वाटते राज्य सरकार हे काम चांगल्याप्रकारे करु शकते.

सभापती महोदय, मी माननीय सहकार मंत्र्यांबरोबर या विषयावर चर्चा केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, यासाठी आर.बी.आय. ची परवानगी पाहिजे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, 1995, 1996-98 साली या देशात केवळ 4 टक्के व्याज दराने कर्ज देणारी आमची रायगडची एकमेव बँक होती. आमच्या बँकेने यासंदर्भात कार्यक्रम आणि जाहिरात दिली होती. आम्ही त्या कार्यक्रमाला माझे मित्र आणि तत्कालीन उप मुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांना बोलविले होते. त्या कार्यक्रमाला 10-15 हजार शेतकरी जमले आणि त्यात आम्ही 4 टक्के व्याज दराने कर्ज देण्याची घोषणा केली. परंतु नाबार्डच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, तुम्हाला असे करता येणार नाही. मंत्री महोदय, मुळात जे करता येणार नाही तेच आपण करावयाचे असते. सभापती महोदय, हे कायदेमंडळ आहे. आम्ही आयोजित केलेल्या कार्यक्रमाला नाबार्डचे दोन-तीन अधिकारी आले होते त्यांनी अगोदर तत्कालीन उप मुख्यमंत्री असलेल्या गोपीनाथ मुंडे यांना सांगितले की, हे काम चुकीचे होत असल्यामुळे आपण या कार्यक्रमाला जाऊ नका. त्यावर गोपीनाथ मुंडे यांनी सांगितले की, श्री.जयंत पाटील यांनी कार्यक्रम आयोजित केल्यामुळे मी तो रद्द करु शकत नाही. महोदय, नाबार्डच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही या व्याज दराने कर्ज दिल्यास तुमच्यावर कारवाई करु. त्यावर मी त्यांना सांगितले की, शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज दिल्यामुळे माझ्यावर कारवाई केल्यास मला आनंद आहे. मी पुन्हा शेतकऱ्यांसमोर मते मागण्यासाठी जाईल आणि मला खात्री आहे शेतकरीच मलाच पुन्हा या जागी बसवतील. महोदय, नाबार्डला आमच्यावर कारवाई करता आली नाही.

माननीय सहकार मंत्री, आपले नाव ऐतिहासिक सहकार मंत्री म्हणून नोंदले गेले पाहिजे. 2005 मध्ये 4 टक्के व्याज दराने शेतकऱ्यांना जे कर्ज दिले जाते त्याला नाबार्डकडून 'रायगड पॅटर्न' म्हणून संबोधले जाते. आपण शेतकऱ्यांना 4 टक्के व्याज दराने कर्ज दिले, परंतु आज आम्ही शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याज दराने 200 कोटी रुपयांपर्यंत कर्ज देत आहोत. आमच्या

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील....

बँकेने बिगर शेतीचा फायदा शेतीकडे वळविण्याचे काम केले आहे. आम्ही नाबार्डला सांगितले की, या बँकेचे खरे मालक शेतकरी आहेत. सभापती महोदय, आपण सुध्दा एका बँकेचे संचालक आहात. नाबार्डमध्ये आमचा गौरव आहे. महोदय, नाबार्डने माझ्यावर आणि आमच्या बँकेवर 18 भाषेत फिल्म तयार केली आहे. इतर राज्यातील लोक प्रशिक्षणासाठी आमच्याकडे येतात. सातारा आणि रायगड बँकेची कर्ज देण्यात स्पर्धा असते. जे हुशार असतात ते एका-एका गुणासाठी भांडत असतात. तसे या दोन बँकांचे आहे. आज राष्ट्रीय पातळीवर सातारा आणि रायगड या दोन बँकांमध्ये स्पर्धा असल्याची चर्चा आहे. या निमित्ताने मी माननीय सहकार मंत्र्यांना सांगू इच्छितो की, या सर्व कर्जाचे रि-शेड्युलिंग करण्याचा आपण निर्णय घ्यावा.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

सगळ्या कर्जाचे रि-शेड्यूलिंग करण्याचा निर्णय घ्या. किती माफी देणार आहोत ते मला माहीत नाही. रि-शेड्यूलिंग केले नाही तर कोणतीच बँक राहणार नाही, तुमची पण बँक राहणार नाही. रि-शेड्यूलिंग केले नाहीत तर त्याला मुदतीच्या कर्जासाठी शासनाने गॅरेंटी द्यावी. तुम्ही 5 वर्षांनी पुन्हा या, आमचे काही म्हणणे नाही. पण 5 वर्षांनंतर त्याचे कर्ज आपल्याला फेडायचे आहे, तेव्हा बघू. तुम्ही आहात आणि मी देखील आहे. परंतु उद्योग तर राहील आणि तोपर्यंत आर्थिक परिस्थिती सुधारेल, उद्या त्याची बॅलन्सशीट सुधारेल. उद्या 17 रूपयांची साखर 40 रूपये देखील होऊ शकते. आपण या पध्दतीचा निर्णय घ्या. आपण काम करीत आहात. आपण अगदी सज्जन मंत्री आहात. सत्तेवर बसल्यानंतरही अति सज्जन आहात. तुम्ही म्हणणार की, नको, अधिकारी नाही म्हणतात. अधिकारी आपल्याला फिरविण्याचे काम करतात (अडथळा) माननीय मंत्र्यांची जरब आहे. पण कायदा सांगितला की घाबरतात, नको म्हणतात. मी अगोदर विचारले, मात्र ते म्हणतात, नको, रिझर्व्ह बँकेची परवानगी लागेल. रिझर्व्ह बँक म्हणजे काय आहे ? आपण परवानगी द्या. मला आनंद आहे, आम्ही तीच अपेक्षा करीत आहोत. परवानगी दिली नाही तर तुम्ही परिपत्रक काढावे. आज असे झाले आहे. मी ही चर्चा तुम्हाला सांगून का घेण्यास लावली ? कारण परवा आम्हाला नोटीस आली. माझा एमडी येथे आला. तुम्हालाही भेटला. साखर आयुक्तांनी नोटीस दिली की, साखर जप्त करू आणि शेतकऱ्यांना पैसे देऊन टाकू. शेतकऱ्यांबरोबर वाहतुकदारांचे, बँकवाल्यांचे, विजेचे पैसे द्यायचे आहेत, कामगारांचा पगार द्यायचा आहे. सर्व बाबींचा ताळमेळ घालून आपल्याला चालवावे लागेल. साखर आयुक्तांना, एवढे पैसे द्यायचे आहेत, तेवढे पैसे द्यायचे आहेत, असे बोलायला काय आहे ? 5-10 कोटी रूपये ठीक आहेत. परंतु 40 कोटी रूपये देणे, 100 कोटी रूपये देणे याची कुवत वारणाचीही नाही, वाळवाचीही नाही आणि फलटणचीही नाही. आपण माफ करा. कारण मला आपले माहीत नाही. आता ज्या परिस्थितीचे कारखाने आहेत त्यांचीही कुवत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे माझी कळकळीची विनंती आहे. आपण याचे गांभीर्य ओळखलेले नाही. शेतकरी पुढील वर्षी बँगलोर-पुणे रस्ता चालवू देणार नाही, नाशिक-मुंबई रस्ता चालवू देणार नाही, सांगली-नगर रस्ता चालवू देणार नाही. पुढील वर्षी पंढरपूरच्या

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

यात्रेला शेतकऱ्याकडे त्याचे वाहणही नसेल अशी परिस्थिती होईल. आपण त्याचे गांभीर्य घेत नाही. वातावरण असे झाले आहे की, कारखाने खाल्ले. आपण त्या बेल्टमधील आहात. कारखाना कितीही चांगला मोठा असला, 15-20 कोटी रूपयांच्यावर असला तरी त्याला प्रॉफिट होत नाही. कारण त्यातील 5-10 कोटी रूपये पुन्हा नवीन मशीन आणून त्यांचा मेंटेनन्स करण्याला खर्च होत आहेत. नवीन उद्योग आहे. मी 1-2 वर्षांपूर्वी त्यामध्ये पडलो, त्यातील बारकावे पाहिले. मला वाटत होते की, आता आम्हाला शहाणपण सुचले. फेल कशाला गेले. ती वेगळी गोष्ट आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना चांगला अनुभव आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांनी सभागृहातच चॅलेंज घेतले, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर होते. माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांनी सांगितले की, मी कारखाना घेतो, त्यांनी 4 कारखाने घेतले आणि आता 300-500 कोटी रूपयांच्या तोट्यात बसलेले आहे. विदर्भात 2 चांगले कारखाने चालत होते, पहिला सुधाकर नाईकांचा आणि दुसरा सुरेश देशमुख यांचा कारखाना चांगला चालत होता. मी चुकीचे बोलत नाही. बँका वगैरे अडचणीत आल्या. मी माननीय श्री. नितीन गडकरी यांचे अभिनंदन करीन, त्यांनी घेतले. 1 कारखान्यावर 3 कारखाने घेतले. अनेक वेळा आमच्याबरोबर चर्चा केली, मला नेले. आजपण ते म्हणाले की, त्यावर बोलू नका, कोणी ऐकण्यास तयार नाही. आपला उपाय आपणच शोधला पाहिजे, आपला वैद्य आपणच तयार केला पाहिजे. आपण दुसरीकडे जाऊ नका. आपण तांत्रिक परवानगी आणा. आपण दोन्ही सभागृहांच्या सन्माननीय सदस्यांना घेऊन माननीय राष्ट्रपतींकडे, माननीय पंतप्रधानांकडे जावू. लोकशाहीत काहीही होऊ शकते. आपण केले, आपण घेतले. देशातील, राज्यातील महत्त्वाचा उद्योग बंद पडू लागला आहे. पण गांभीर्यच नाही. निर्णय तातडीने घेतला नाही तर योग्य होणार नाही. महिन्याला दर 50 रूपयांनी वाढतो की 100 रूपयांनी वाढतो याचा मी अभ्यास केलेला नाही. पण पोत्यामागे महिन्याला दर वाढत आहे. व्याज वाढत चालले आहे. आणखी आपण त्यामध्ये भर घालत आहोत. एकच निर्णय घ्या. राज्य बँकेने कोणतीही गोष्ट केलेली नाही. अधिकारी चुकीचे रिपोर्टिंग करीत आहेत. शासनाने बँक गॅरेंटी दिली. दोन्ही



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

कडे एकच होते, तो वेगळा मुद्दा आहे. शासन म्हणून तुम्ही आहात. राज्य शासनाने गॅरेंटी दिली. ती गॅरेंटी करण्यास गेल्यानंतर तुम्ही म्हणाला की, आम्ही देत नाही आमच्याकडे पैसे नाहीत. राज्य बँक उच्च न्यायालयात गेली. उच्च न्यायालयात सांगितले. आपल्याला त्यावर चर्चा करण्यास वेळ नाही, त्यामुळे मी आता यामध्ये बोलत आहे. राज्य बँकेला उच्च न्यायालयाने सांगितले की, पहिल्यांदा प्रॉपर्टी लिलावाने विका आणि पैसे घ्या, मागाहून बँक गॅरेंटीचे पैसे आले नाही तर बँक गॅरेंटीचे पैसे राज्य शासनाला मागा. ते रेकॉर्ड आहे आपण फाईल पहावी. राज्य बँकेने काय केले ? आमच्यासारखे लोक तेथे होते. एकतर्फी नाही. राज्य बँकेने लिलव लावले. कोणी किती, कसे घेतले, ॲडस्टिंग केली हे मला माहीत नाही. लिलावामध्ये आम्ही त्यांना लोएस्ट टॅक्स दिले आणि हायपॉवर कमिटीला राज्य शासनाकडे पाठविले की, एवढी कोटेशन आली आणि याला या प्रमाणे कारखाने विकायला मागतो. लोएस्टला मान्यता द्या. त्यामध्ये सर्व अधिकारी हाते. अधिकाऱ्यांची हायपॉवर कमिटी आणि तुम्ही आम्हाला नोटीसा देता. आमची प्रॉपटी जप्त करता. खालचा क्लार्क येऊन आम्हाला नोटीसा काढतो की, तुमचे जप्त करतो, नाव छापतो. आमचा संबंध काय आहे ? आम्ही कधी एक रूपयाही घेतला नाही किंवा कधी गाडीही वापरली नाही ? जप्त करण्याची नोटीस काढणे हे काय चालले आहे ? या चळवळीमध्ये नवीन माणूस कोणी येईल की नाही ? हे थांबले पाहिजे. ज्यांनी कारखाने शासनाकडून घेतले असतील, ज्यांनी गैरव्यवहार केला असेल त्यांची चौकशी करा. आमचा काय प्रश्न आहे ? उद्या कोणी येथे पैसे खाल्ले तर, आम्ही विधानमंडळाच्या वतीने काम करतो, मग आम्ही जबाबदार आहोत का ? संचालक मंडळामध्ये कोणी काम करायचे याचा तरी निर्णय घ्यावा. आज आपल्याला वेळ नाही, पुढील आठवड्यात वेळ मिळाला तर मी त्यावर चर्चा करण्याची परवानगी मागत आहे. आपल्या समवेत सर्वच त्यासाठी जबाबदार राहणार ? कोणी कुठे खाल्ले, काय घेतले याची जबाबदारी नाही का ? आपण त्याचाही धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. अधिकाऱ्याने किती बोलायचे ? त्याला प्रेस नोट देण्याचा अधिकार नाही. प्रेसमध्ये बोलण्याचा अधिकार नाही. तुमची परवानगी पाहिजे. मी आजिबात नोटीसीला उत्तर दिले नाही. कोणालाही भेटायला गेलो नाही. मला काय ? कर नाही त्याला डर कशाला ? माझा प्रश्न नाही. मी कशाला त्यांना भेटायला जाऊ ? माजी मंत्री वगैरे सर्व जातात. मी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

स्वत: जाऊन उच्च न्यायलयात सांगेन. स्वत: सांगेन, वकील करणार नाही. मी असे सांगेन की, हे या पध्दतीचे आहे ते या पध्दतीने झाले पाहिजे. आपण आता साखर उद्योगाकडे वेगळ्या तऱ्हेने पाहिले पाहिजे. पुढील कामे करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या कठोर असा निर्णय घ्यावा लागेल. आपण खाण्यासाठी साखर फक्त 10-15 टक्के वापरतो. मी चुकत असेन तर आकडा मागे घेईन. शीतपेये सगळ्यात जास्त साखर जाते, चॉकलेट, औषधे यामध्ये सुध्दा सर्वात जास्त साखर वापरली जाते. आपल्याकडे याचे पर्याय आहेत. आपल्या या संदर्भात राज्याचे कायदे करू शकतो. आपण 3 जिल्ह्यांत दारूबंदी केली तसा निर्णय घेऊ शकतो. आपण आपल्या राज्यात साखरेचा दर शीतपेयासाठी 50 रूपये ठेवा, खाण्यासाठी 25 रूपये ठेवा. 75 टक्क्यांनी साखर विकली तरी जास्तीत जास्त थम्स-अप, कोकाकोला या शीतपेयांची किंमत 10 पैशांनी वाढेल. फार फरक पडत नही. आपल्याकडे सर्व पर्याय आहेत. मी माझे उदाहरण दिले. प्रत्येक गोष्टीला पर्याय आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, प्रत्येक प्रश्नाला पर्याय असतात, आपण ते काढू शकतो. आज कारखान्यांकडे साखर शिल्लक आहे. ती राज्य शासनाने खरेदी करुन ठेवावी, आमच्याकडून ताब्यात घ्यावी आणि ती विकावी. ज्यांना साखर लागते अशा राज्यातील उद्योगांना 50 रुपये किलो या दराने साखर विकावी, तसे तुम्ही त्यांना सांगावे. किती फरक पडणार आहे ? संपूर्ण देशात सर्वात जास्त मार्केटिंग आपल्या राज्यात आहे, सर्वात जास्त उद्योग आपल्या राज्यात आहेत, साखरेची विक्री सर्वात जास्त आपल्या राज्यात होत असते. किती कारखाने बाहेरुन साखर घेतील ? आपण शेतकऱ्यांचे हित बघणार आहात की, कंपन्यांचे, हा प्रश्न आहे. आपण कंपन्यांचे हित बघणार आहात का ? आपण हा पर्याय राबवू शकणार नाही का ? हा पर्याय राबविणे हे तुमच्या हातत आहे. परंतु, आज तुम्हाला शेतकऱ्यांपेक्षा कंपन्यांचे हित जास्त महत्वाचे वाटत आहे. ते काय बोलतील, असे तुम्हाला वाटत आहे. मी सहकार मंत्री महोदयांना व्यक्तिशः बोलत नाही. मी त्यांना पर्याय सुचवितो आहे. आपण या संदर्भात उद्याच्या उद्या निर्णय घेतला पाहिजे. पाहिजे तर तुम्ही कारखान्यांना अन्य अटी घालाव्यात. आर.बी.आय.ची परवानगी घ्या, राज्य शासनाचे धोरण आहे, त्याप्रमाणे आम्ही रिशेड्युलिंग करण्यास परवानगी देत आहोत, असा निर्णय घ्या. हे कारखाने आज वाचतील. किमान इंजेक्शन देऊन त्यांना जगवा. परंतु, ही खाती एन.पी.अे.मध्ये गेली तर बँकांचेही मरण आहे. म्हणून या प्रश्नाचे गांभीर्य आपण ओळखले पाहिजे. अन्य सन्माननीय सदस्यांना याचे गांभीर्य किती आहे, हे मला माहीत नाही. मी काही या क्षेत्रातील तज्ज्ञ नाही. माझ्याकडे कोणती पदवी नाही. मी प्रॅक्टिकल माणूस आहे. सहकार मंत्री महोदयांच्या पदव्यांबाबत मला माहीत नाही. आपण यावर निश्चितपणे प्रयोग करु शकाल. या प्रकरणात या पध्दतीने निर्णय घेतला गेला तर निश्चितपणे वेगळी चालना मिळेल. पाहिजे तर अन्य उद्योगांना सवलती द्या, टॅक्समध्ये सवलत द्या. आपण कोणताही पर्याय निवडू शकता. केवळ दोन-चार वर्षासाठी आपल्याला हे करावयाचे आहे. सन 2018 मध्ये जागतिक बाजारपेठेत साखरेच्या उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या दोन वर्षात कसे करता येईल, बँकांचे रिशेड्युलिंग कसे करता येईल, त्या दृष्टीकोनातून मी हा पर्याय सूचविला आहे. हे

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

माझे व्यक्तिगत मत आहे. स्वतः सभापती महोदय आणि अन्य साखर चळवळीमध्ये काम करणाऱ्या नेते मंडळींचे काय म्हणणे आहे, हे मला माहीत नाही.

सभापती महोदय, शासनाने साखरेसाठी 50, 100 रुपये, 200 रुपये देऊ नये. आम्हाला पुढील वर्षी व्याज द्यावे. आमच्याकडूनच कमवा आणि आम्हाला द्या. मग हा उद्योग कसा वाढतो, ते बघा. त्यांना पाहिजे तर बाकीच्या अटी घाला. तरच हे होईल. या उद्योगावर अन्य उद्योगही अवलंबून आहेत. अनेक पतपेढ्यांनी वाहतूक यंत्रणांना ॲडव्हान्स पैसे दिलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील पतपेढ्यांनी शेतकऱ्यांनाही ॲडव्हान्स दिलेला आहे. त्यामुळे 50 टक्के पतपेढ्या यामध्ये अडचणीत येणार आहेत. या पतपेढ्यांमध्ये गुंतविलेले पैसे ठेवीदारांचे आहेत. पेण अर्बन सहकारी बँकेचे पैसे आपण 7 वर्षात वसूल करु शकलेलो नाही. पुढे गंभीर परिस्थिती निर्माण होईल आणि व्याज वाढत जाईल. ऑगस्ट महिन्यामध्ये ऊस कामगारांना ऊस तोडण्यासाठी ॲडव्हान्स पैसे द्यावे लागतात, वाहतुकदारांना ॲडव्हान्स पैसे द्यावे लागतात. त्यामुळे या संदर्भातील निर्णय सरकारला येत्या 8 ते 10 दिवसात घ्यावा लागणार आहे.

सभापती महोदय, आजच्या या चर्चेच्या निमित्ताने माझी विनंती आहे की, पुढील आठवड्यामध्ये आपण एक तातडीचे बैठक बोलवावी. सभापती महोदयांनी यापूर्वी एक बैठक आयोजित केली होती. परंतु, माझ्या घरातील एकाचे दु:खद निधन झाल्यामुळे मी त्या बैठकीला उपस्थित राहू शकलो नाही. आपण मला फोनही केला होता की, उपस्थित रहावे. पण मी त्या बैठकीला उपस्थित राहू शकलो नाही. परंतु, आता आपण ही बैठक घ्यावी. मी काही पर्याय सुचविले आहेत. ते राबविण्यासाठी तुम्ही दिल्लीमध्ये वजन वापरले तर निश्चितपणे हे होईल. अन्यथा, नागपूरचे वजन वापरावे. सहकार मंत्री महोदयांबद्दल आम्हाला वेगळा आदर आहे. मी त्यांना या राज्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने, साखर उद्योगातील कामगारांच्या वतीने त्यांना विनंती करीत आहे. तुमचे कोणतेही धोरण चुकलेले नाही. जागतिक पातळीवर आर्थिक अडचण आल्यामुळे उद्योगाची परिस्थिती अशी झालेली आहे. त्यामुळे दुर्दैवाने ऐतिहासिक निर्णय घेण्याची जबाबदारी तुमच्यावर पडलेली आहे, ती तुम्ही पार पाडावी, अशी माझी विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, तिसरा एक पर्याय मी या ठिकाणी देणार आहे. मिळालेल्या उत्पन्नातील 70 टक्के रक्कम शेतकऱ्यांना द्यावी आणि 30 टक्के प्रोसेसिंग वगैरेसाठी कारखान्यांना द्यावी. तरी हे गणित सुटू शकेल. समजा दर 1000 रुपये मिळाला तर त्यामधील 700 रुपये शेतकऱ्यांना आणि 300 रुपये कारखान्यांना द्यावेत. हा उद्योग जगवायचा असेल तर वेगळ्या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील.

सभापती महोदय, माझी चवथी मागणी अशी आहे की, ऊसाला आपण एफआरपी प्रमाणे दर देतो. धान्य, भात, डाळीलाही एफआरपीप्रमाणे दर देतो. त्याप्रमाणे साखरेला सुध्दा एफआरपी द्या. अन्यथा, यामुळे मालामाल कोण होणार आहे ? ही व्यापाऱ्यांची एक मोठी रिंग आहे. ते 2000, 2700 रुपयांना साखर खरेदी करतील आणि गोदामांमध्ये ठेवतील. पुढील वर्षी कारखाने सुरु झाले नाही तर ही साखर ते 5000 रुपयांना विकतील. पुढील वर्षी साखर कारखाने सुरु होणार नाहीत, अशी परिस्थिती आहे. हीच साखर ते 5000 रुपयांना विकतील आणि मोठा मलिदा कमावतील. हा व्यवसाय भांडवलदारांना ताब्यात घ्यायचा आहे. या साखर उद्योगामध्ये सहकार क्षेत्रातील दिग्गजांच्या दोन पिढ्या गेल्या आहेत. विधानसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील साहेबांचे आजोबा या क्षेत्रात होते, त्यांच्या वडिलांनीही हा उद्योग केला आणि आज ते स्वत: देखील या उद्योगात आहेत. माननीय भाऊसाहेब थोरातही या उद्योगात होते. त्यांच्याही दोन पिढ्या यामध्ये होत्या. वारणाच्या दोन पिढ्या, राजाराम बापू पाटील यांच्याही दोन पिढ्या याच उद्योगात होत्या. त्यांनी हा उद्योग सांभाळला. ही एक संस्था आहे, त्यांची मक्तेदारी नाही. आपल्या संस्थेत कोणाला सभासद करुन घ्यायचे, हे संचालक मंडळ ठरवीत असते, संस्थेची जनरल बॉडी ठरवित असते. उद्या रुपी किंवा जनता बँक जयंत पाटलांना सभासद करुन घेणार आहे का, तो त्याचा अधिकार आहे. त्यांच्यामध्ये फुट पडली तर मतदान होणार आहे. कोणाला नवीन सभासद करुन घ्यावये, हे त्या संस्थेची बॉडी ठरवीत असते. अनेक संस्थांमध्ये असे होते की, एखादा वाईट माणूस संस्थेमध्ये येतो आणि संपूर्ण संस्थेची वाट लावून जातो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

23-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF-4

SRR/ AKN/ KTG/ प्रथम श्री.मंगेश...... 16:30

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, हा उद्योग महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. कोणी कितीही टीका केली तरी महाराष्ट्र राज्याचे संपूर्ण अर्थकारण बदलणारा हा उद्योग आहे. राजकारण सुध्दा बदलणारा हा उद्योग आहे. जेव्हा अर्थकारण बदलते, तेव्हा राजकारण येते. अर्थकारण आणि राजकारण ही दोन चाके आहेत.

सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये ही चर्चा मागितली होती. परंतु, वेळ अपुरा आहे. त्यामुळे आपण अल्पकालीन चर्चेला परवानगी दिली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. माझ्या विनंतीला मान देऊन या विषयावर आपण चर्चा मंजूर केली. संसदीय कार्य मंत्र्यांनाही मी धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आज ही चर्चा सभागृहात होत आहे. या चर्चेच्या निमित्ताने आपण काय बोलणार आहात, ही बाजू मांडावी, ती बाजू मांडावी, असे सांगणारे भरपूर फोन मला महाराष्ट्रातून आले. फॅक्सव्दारे कागदपत्रे पाठविली आहेत.

सभापती महोदय, शेवटी मी एवढेच सांगतो की, रिशेड्युलिंग, बंपर स्टॉक आणि त्यांचे पैसे कसे घ्यायचे आहेत, काय करायचे आहे, यावर आपण चर्चा करुन निर्णय घ्यावा.

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.........

मला असे वाटते की, माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेबांनी आजच्या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आणि कामगारांना हायसे वाटेल, समाधान वाटेल असे उत्तर द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शबद संपवितो.

जयहिंद, जय महाराष्ट्र.

--------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. शेती माल प्रक्रिया उद्योगांपैकी साखर कारखानदारी हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे मागील 3-4 पिढ्यांपासून सुरु असलेली सहकारी साखर कारखानदारी आणि शेती मालावर प्रक्रिया करणारे उद्योग आपल्या राज्यात सुरु झाले आणि शेतकऱ्याला समाजात प्रतिष्ठेचे स्थान मिळायला लागले. एका साखर कारखान्यावर 10 हजार लोक आणि 2 हजार कुटुंबे अवलंबून आहेत. साखर कारखाना सुरु करताना प्रत्येक टनामागे 365 रुपये टॅक्स द्यावा लागतो आणि जी घेतलेली उचल आहे त्यासाठी प्रत्येक पोत्यासाठी 25-30 रुपये प्रमाणे व्याज द्यावे लागते. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकार साहेब, आपले सहकारी श्री.राजू शेट्टी, श्री.सदाभाऊ खोत यांनी मागील 2 वर्षाच्या काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किमान 3 हजार, 4 हजार, 4 हजार 500 रुपये दर मिळाला पाहिजे, यासाठी आदोलने केली आणि सुदैवाने त्या काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बऱ्यापैकी दरही देता आला. परंतु, या हंगामात त्यांच्यापैकी कोणीही दिसत नाही. मी टिकाटिप्पणी करण्यासाठी त्यांची नावे घेतली नाही. परंतु, एखादी अपप्रवृत्ती सहकारात आल्यानंतर संपूर्ण सहकार चळवळ बदनाम होण्याचे काम निश्चितपणे होते आणि त्यामुळे खऱ्या अर्थाने आज साखर कारखानदारी अडचणीत आलेली आहे. साखर कारखान्याला साखरेचे एक पोते तयार करण्यासाठी किमान 700 ते 800 रुपये खर्च येतो. आपण आजच्या परिस्थितीत एफआरपीचा निर्णय घेतला. साखर आयुक्तांनी अनेक साखर कारखान्यांना जप्तीच्या नोटीसा पाठविलेल्या आहेत की, साखर जप्त करावी आणि शेतकऱ्यांचे पैसे द्यावेत. मागील 15 दिवसात आमच्या सोलापूर जिल्ह्यातील सर्व साखर कारखानदारांनी बैठक घेऊन आपण पुढील वर्षी आपला कारखाना चालवूच शकत नाही, अशा प्रकारचा निर्णय घेण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्यावर आलेली आहे. प्रत्येक वर्षी साखर कारखानदारी चांगली चालते, अशातला भाग नाही.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव साळुंखे.........

परंतु, देशाचे जाणते नेते माननीय श्री.शरद पवार साहेबांनी मागील अनेक वर्षात केंद्र शासनाच्या माध्यमातून साखर उद्योगाला मदत करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे खऱ्या अर्थाने ही कारखानदारी वाचली आणि हा सहकारातील शेतकऱ्यांच्या मालकीचा उद्योग आज पर्यंत टिकला.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, भविष्य काळात ही जबाबदारी आपल्या मंडळींवर आहे. साखर कारखानदारीमध्ये कोणाचा किती वाटा आहे हा भाग नाही. परंतु, हे शेतकऱ्यांच्या मालकीचे मंदीर आहे. प्रत्येक शेतकरी साखर कारखान्याचा सभासद असतो आणि त्याला निश्चितपणे आपल्या संस्थेचा अभिमान असतो. परंतु, हे जरी खरे असले तरी त्याला बऱ्यापैकी भाव मिळाल्याशिवाय शेतकरी उभा राहू शकत नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आज बँकाही अडचणीत आलेल्या आहेत. साखर न विकल्यामुळे कारखाना बँकेकडून घेतलेले कर्ज परत करु शकत नाही, व्याजाचा बोजा वाढत चालला आहे. आमच्या दुष्काळी भागातील कारखान्यांनी 1000 ते 1100 रुपये दिलेले आहेत. त्यापेक्षा जास्त पैसे देण्यासाठी कारखान्याकडे पैसे नाहीत. अशा परिस्थितीत ही कारखानदारी वाचली पाहिजे आणि शासनाच्या मदतीशिवाय ही कारखानदारी वाचू शकत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी या निमित्ताने अतिशय चांगली चर्चा उपस्थित केलेली आहे. राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आपल्या उत्तराकडे डोळे लावून बसलेला आहे. मध्यंतरीच्या काळात शासनातील काही मंडळींनी दिल्ली येथे जाऊन माननीय पंतप्रधानांची भेट घेतली. चांगल्या पद्धतीची मदत, भरीव अनुदान मिळाल्याशिवाय ही कारखानदारी भविष्य काळात चालू शकणार नाही. म्हणून मी माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेबांना विनंती करतो की, साखर कारखानदारी भविष्यात चालू राहण्यासाठी, शेतकऱ्यांचे हे पिढ्यानपिढ्या टिकविलेले मंदीर उभे राहण्यासाठी आणि बळीराजाला जगविण्यासाठी आपल्या उत्तरातून भरीव मदत अपेक्षित आहे आणि आपण ती मदत कराल, अशी अपेक्षा व्यक्त करून माझे दोन शब्द संपवितो.

--------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर म.वि.प. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. आज साखर उद्योग अत्यंत अडचणीत आलेला आहे. साखर उद्योगाला शासनाकडून मदत व्हावी आणि भविष्यात या उद्योगाला भरभराटी यावी, या उद्देशाने त्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. राज्यात निवडणुका झाल्या आणि मागील अनेक वर्षे विरोधी बाकावर बसणारे विरोधी पक्ष सत्तेवर आले. आज राज्य कारभार चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर आलेली आहे आणि सर्वात जास्त जबाबदारी जर कोणाकडे आली असेल तर ती सहकार खात्याकडे म्हणजे माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेबांकडे आलेली आहे. राज्यात सत्तांतर झालेले आहे. आज सहकार क्षेत्रातील साखर उद्योगावर संकट आलेले आहे. तसेच, इतर शेती उत्पादन असेल, शेतीची अवस्था असेल, या संपूर्ण बाबींचे सहकार क्षेत्रावर होणारे परिणाम असतील. सहकार मंत्री यातून मार्ग काढून या संपूर्ण व्यवस्थेला दिशा देणार आहेत की नाही, याकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागलेले आहे. हे अत्यंत कठीण काम आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. परंतु, आलेली जबाबदारी आणि त्यातून तुम्ही कशा प्रकारे या संकटाला सामोरे जात आहात, यासंदर्भात तुम्ही कशा पद्धतीने पावले उचलणार आहात ? सहकार क्षेत्र अनेक वर्षे सत्तेत असलेल्या लोकांच्या जवळचे असले तरी सहकार क्षेत्र राज्याचा आर्थिक कणा आहे आणि आपण त्या संदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन राज्य कारभार केला नाही तर त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण राज्याला भोगावे लागतील. म्हणून त्या दृष्टीकोनातून विचार करणे आवश्यक आहे. संपूर्ण क्षेत्रात, मग साखर कारखानदारी असेल, सहकारी बँका असतील किंवा मागील शासनाने शेती उद्योगाच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे त्या माध्यमातून उभे राहणारे उद्योग असतील याबाबत सकारात्मक विचार करुन आपल्याला हे सहकार क्षेत्र सांभाळावे लागणार आहे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

ही अत्यंत महत्वाची जबाबदारी आहे, सत्तांतर झाले, विचार वेगळे असले तरी त्या वेळच्या शासनाने अशा प्रकारची व्यवस्था उभारली असेल, ती व्यवस्था संपूर्ण राज्यातील जनतेच्या हिताची असेल, भविष्यात कोणताही पर्याय नसेल तर ती टिकविण्याची जबाबदार कोणत्याही विचाराचे शासन असो, कोणतेही माणसे सत्तेत बसली असोत किंवा सहकार क्षेत्रात काम करणारी असली तरी सहकार क्षेत्रात समन्वय व सांगड घालण्याची गरज आहे. शासनाच्या ज्या प्रतिक्रिया येत आहेत त्यातून असे वाटते की, शासनाला सहकार उद्योग टिकवायचा आहे की, संपवायचा आहे. राज्यातील जनतेच्या व शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून शासनाची दिशा कोणत्या पध्दतीने जाते हा महत्वाचा भाग आहे. ज्यावेळी शासन सहकारी बँकाच्या संदर्भात अशा प्रकारचा विचार करते, त्यावेळी सहकारी बँकानी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची शासन परतफेड करते तेव्हा त्याचा फायदा सहकारी बँकानाच मिळणार व शेतकऱ्यांना मिळणार नाही, अशा प्रकारे स्वत:चे स्पष्टपणे मत तयार करुन घेतले आहे. साखर उद्योग किंवा साखर कारखान्यातील जनतेचे सहकार्य फक्त आम्हाला मिळाले पाहिजे, अशा प्रकारे राजकीय दृष्टीकोनातून स्टेटमेंट केले आणि सर्व साखर कारखान्यांनी एफआरपीप्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दर दिला नाही तर सरकार त्यांच्यावर कारवाई करेल. यामुळे जनतेला कळते की, हे सरकार काय करायला निघाले आहे, त्यानंतर सरकारने जरी सकारात्मक विचार केला तरी त्यातून लोकांचा गैरसमज निर्माण होतो. अशाच प्रकारे बँकेच्या संदर्भात शासन जी प्रतिक्रिया देत आहे त्यामुळे सहकारी बँकाकडे जनतेचा पाहण्याच्या दृष्टीकोन बदलतो. त्यांची आर्थिक अवस्था ढासळते व पर्यायाने सर्व राज्याचे नुकसान होते.

सभापती महोदय, साखरेच्या संदर्भात अतिशय संकट आले आहे ते मी मान्य करतो, त्यांना मदत करणे सहज सोपे नाही, एफआरपीप्रमाणे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दर देण्याचा विषय आहे, बाजार भावाचा एफआरपीच्या दराशी मेळ घातला नाही तर शासन कोणत्या पध्दतीने दर देणार व यामध्ये कोणते व्यवहारी ज्ञान आहे याचा देखील विचार करावा लागणार आहे. राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना कमी दर मिळत असेल, शेतकऱ्यांना ऊस उत्पादन करणे परवडत नसेल तर शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहण्याची जबाबदारी राज्य व केंद्र शासनाची आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात साखर उद्योग उभा करण्यात आला आहे. साखरेचे देशात जेवढे उत्पादन होते त्यापैकी

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

30 ते 40 टक्के उत्पादन महाराष्ट्रत होते. 25 हजार कोटी रुपयांचा कर वेगवेगळ्या माध्यमातून राज्य व केंद्र शासनाला मिळतो.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामध्ये कमी प्रमाणात पाऊस पडलेला आहे, धरणातून पाणी आणून ऊस पिकाला दिले तर शेतकऱ्यांना त्यातून चार पैसे मिळतात. ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मागील काळात साखर कारखाने उभारले नसते तर तेथील परिसरातील अर्धाभाग ओसाड दिसला असता. तेथील लोकांनी मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले असते. तेथील साखर उद्योग आम्ही दूरुन पाहत होतो. विदर्भात साखर उद्योग कधीही फोफावला नव्हता. ज्या ठिकाणी शेतीमध्ये सुधारणा झाली तो भाग आपण पहायला जावा म्हणून आम्ही पश्चिम महाराष्ट्रात येत होतो. अकलूज व इतर अनेक ठिकाणी आमच्या भागातील लोक जाऊन पाहत होते. तेथील लोक आम्हाला सांगत होते की, आमच्या भागात 14 वर्षापूर्वी काहीही नव्हते. त्यावेळी आम्ही त्यांना विचारले की, तुम्ही मुलांना कॉलेजमध्ये शिक्षण देऊ शकत होता काय ? दरमहा आपले किती उत्पन्न होते, अंगावर कपडे व्यवस्थित होते काय ? 14 वर्षानंतर साखर कारखानदारी उभी राहिल्यामुळे त्यांच्या आयुष्यात बदल झालेला आहे. त्यामुळे ते मोठ्या प्रमाणात आर्थिक मिळकत मिळवू लागले आहेत. तो दृष्टीकोन ठेऊन राजकीय क्षेत्रातील इतर माणसांनी कारखाने काढण्यास सुरुवात केली. साखर कारखाना काढण्यास परवानगी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना जमा करावे लागत असे. तुमच्यासाठी आम्ही साखर कारखाना उभारीत आहोत, शासनाने आम्हाला भाग भांडवल द्यावे, त्यामुळे आपण त्या भागाकडे आज सुजलाम सुफलाम भाग म्हणून पाहत आहोत.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात अत्यंत वाईट अवस्था निर्माण झाली आहे. शासन बदलले, विचार बदलले आणि तशा प्रकारचे निर्णय व्हावयास लागले तर सहकार क्षेत्रातील संपूर्ण आर्थिक व्यवस्था उध्दवस्त होईल. मोठ्या संख्येने राज्यात साखर कारखानदारी उभी राहिलेली आहे. 125 च्या वर सहकार क्षेत्रातील कारखाने आहेत, 60 ते 70 कारखाने खाजगी आहेत, साखर उद्योग फोफावला तर त्याकडे बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. मागील सरकारच्या काळात याबाबत काही चुका झालेल्या नाही असे मी म्हणत नाही. विदर्भात साखर

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

कारखान्याबाबत अन्याय झालेला आहे, विदर्भाला पाहिजे त्या प्रमाणात मदत मिळालेली नाही. आता देखील तीच परिस्थिती आहे परंतु त्यामध्ये आम्ही राजकारण करीत नाही. मागील सरकारने काय केले व आम्ही काय करणार आहोत असे राजकारण करण्याची गरज आहे. जी परिस्थिती असेल त्याचा विचार केला पाहिजे. विदर्भात 16 सहकारी साखर कारखाने होती. त्यापैकी 12 सहकारी साखर कारखाने विकण्यात आली आहेत. आता चार सहकारी साखर कारखाने राहिले असून ती देखील अडचणीत आली आहेत. वसंतराव नाईक सहकारी साखर कारखाना पुसद हा सोडला तर इतर सर्व कारखाने डबघाईस आली आहेत, हे कारखाने बँकेने ताब्यात घेतले आहेत व ती खाजगी लोकांना विकण्यात आली आहेत, त्यामध्ये आपले नेते देखील आहेत. टेंडर न काढता बँकेने कारखाने विकली आहेत, अशा प्रकारे विदर्भातील सहकार क्षेत्राची धुळधाण होत असेल तर शासनाकडून विदर्भात साखर कारखाने कसे उभारले जातील याचा विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, विदर्भात ज्या आत्महत्या झाल्या त्या कापूस उत्पादक परिसरात झाल्या आहेत. कर्नाटक, केरळ व इतर विभागातील कापूस उत्पादक क्षेत्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील सन्माननीय सदस्य जेव्हा भाषण करतात तेव्हा ते सांगतात की, विदर्भातील लोकांना साखर कारखानदारी चालविता येत नाही. जेव्हा पासून विदर्भात साखर कारखाने उभारली गेली किंवा उभारण्याचा प्रयत्न झाला तेव्हा पासून विदर्भाला कशा प्रकारे सहकारी बँकेच्या माध्यमातून मदत होत होती किंवा होत नव्हती. कारखाना उभारण्यासाठी काय कष्ट करावे लागतात, गोरगरिबांना मदत न केल्यामुळे त्या भागातील साखर कारखानदारी डळमळीत आली आहे. त्यासाठी त्या भागातील नेत्यांकडे बोट दाखवून भागणार आहे. जोपर्यंत राज्य किंवा सहकारी बँकेच्या माध्यमातून पुरेसा निधी मिळत नाही तोपर्यंत कितीही चांगली माणसे असली तरी साखर कारखाने चालू शकत नाहीत.

सभापती महोदय, महत्मा फुले सहकारी साखर कारखाना केंद्रीय मंत्री माननीय श्री.नितीन गडकरी यांनी घेतला आहे. ज्या वेळी हा कारखाना उभारला त्यावेळी सर्व लोक मनापासून म्हणत होते की, हा कारखाना वाढला पाहिजे, परंतु या कारखान्याचे कर्जराज्य व जिल्हा बँकेने दोन वर्षासाठी थांबवून टाकले. तो कारखाना शेवटी बॅकेने विक्रीला काढला. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील साखर कारखान्याच्या अध्यक्षांनी आत्महत्या केली आहे, त्यांनी अशी चिठ्ठी लिहून

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

ठेवली होती की, अनेक बँकाकडे मी कर्ज मागण्यासाठी किती चकरा मारल्या, किती ठिकाणी गेलो तरी कारखाना चालविण्यसाठी मला पैसा मिळाला नाही म्हणून मी कारखाना चालवू शकत नाही. सहकार क्षेत्रातील व्यवस्थेला खऱ्या अर्थाने न्याय मिळतो की नाही याचा विचार करण्याची गरज आहे.

या नंतर श्री.भोगले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

हे पाहून तशा प्रकारची पावले उचलली तर निश्चितपणे या साखर कारखानदारीला, सहकार क्षेत्रातील शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील. आज लोकशाही प्रक्रियेमध्ये साखर कारखान्यामध्ये सत्ता कोणाचीही असू शकते. परंतु ही व्यवस्था कोलमडता कामा नये. त्या दृष्टीकोनातून शासनाने दिशा निश्चित करण्याची गरज आहे. मंत्री महोदयांनी जाहीर केले की, ऊसाला एफआरपी देऊ. शेतकऱ्यांना चांगला भाव दिला गेला पाहिजे म्हणून दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यानंतर शासनाला कळून चुकले की, दबाव आणून चालणार नाही. साखर कारखान्यांची अवस्था आर्थिकदृष्टया फार वाईट आहे. उत्पादन खर्च 5 ते 6 हजार रुपये असेल तर भावामध्ये 700 ते 800 रुपयांचा फरक पडतो. अशा परिस्थितीत कारखान्यांचे काय करायचे?

सभापती महोदय, केंद्र सरकारने संपूर्ण देशातील साखर उद्योगाला मदत करण्यासाठी 6000 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. 6000 कोटी रुपयांमध्ये महाराष्ट्र राज्याचा वाटा किती असणार आहे? केंद्र सरकार जर काही आर्थिक मदत देणार नसेल तरी शेतकऱ्यांना एफआरपी नुसार भाव देणे क्रमप्राप्त आहे. यामध्ये दोन भाग आहेत. शेतकऱ्यांना जी काही किंमत निश्चित केली असेल ती देण्याचा आपला हेतू चांगला आहे. परंतु पुढील वर्षी कारखाने उभे राहतील यासाठी नियोजन करण्याची गरज आहे. माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी ब्राझीलमधील ऊस उत्पादकाचा मुद्दा मांडला आहे. ज्यावेळी जागतिक स्तरावर पेट्रोलचे दर वाढत होते त्यावेळी ब्राझीलमधील साखर उद्योगांकडून पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी इथेनॉलची निर्मिती केली जात होती. इथेनॉलला जगाच्या पाठीवर मार्केट होते. आज मार्केट कोसळले आहे. जागतिक स्तरावर क्रूड ऑईलचे भाव गडगडत आहेत. त्यामुळे ब्राझील देशाने इथेनॉल निर्मिती बंद केली आहे. इथेनॉल ऐवजी साखर उत्पादनावर भर दिल्यामुळे साखरेचे भाव कोसळत आहेत. आज 1850 रुपये क्विंटल या दराने साखरेची विक्री होत आहे. आपल्याला हा साखर उद्योग टिकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे.

सभापती महोदय, फक्त राज्य सरकारवर अवलंबून राहणे योग्य होणार नाही. राज्य सरकारने तिजोरीतून किती मदत करावी याला मर्यादा आहेत. आज देशात महत्वाचे असलेले साखरेचे उत्पादन मोठया प्रमाणात महाराष्ट्रातून होत आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्याची गरज आहे. केंद्र सरकारच्या पातळीवर संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

माननीय पंतप्रधानांना जोपर्यंत आपण साखर उद्योगाचे महत्व पटवून देत नाही तोपर्यंत या साखर व्यवस्थेला फार मदत मिळू शकते अशी स्थिती नाही. यामधून राज्य शासनाला मार्ग काढावा लागेल. त्या शिवाय दुसरा पर्याय नाही. सहकार मंत्र्यांकडून अपेक्षित असलेल्या गोष्टी होणार नसतील तर माननीय मुख्यमंत्री काही करु शकत नाहीत, सर्व मंत्री एकत्र येउनही काही करु शकणार नाहीत. त्यामुळे केंद्रीय पातळीवर हा विषय कसा पटवून देता येईल याचा विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, साखर कारखान्यांना व्याजावर निधी उपलब्ध करुन दिला तर साखर कारखाने तग धरु शकतील. एफआरपी नुसार शेतकऱ्यांना भाव मिळाला पाहिजे. जेणेकरुन ते ऊस लागवड करु शकतील. साखर कारखानदारी कशी जिवंत राहील, पुढील वर्षे कारखाने बंद पडणार नाहीत याचा विश्वास देण्याचे काम मंत्री महोदयांना करावे लागेल. आपले पहिले टार्गेट शेतकरी आहेत हे आम्ही मान्य करतो. निवडणुकीच्या काळात आपल्याला त्याची गरज असते. सहकार मंत्री म्हणून आपल्याला साखर कारखान्यांना मदत करावी लागते. साखर कारखानदारी उभी राहील, शेतकरी जिवंत राहील हेही तितकेच महत्वाचे आहे. आज कारखानदारीचा निवडणुकीकरिता उपयोग होतो, बँकांच्या निवडणुकीकरिता उपयोग होतो, हे कमी अधिक प्रमाणात आम्ही मान्य करु. परंतु आज तुम्ही राज्यकर्ते आहात, राज्य कारभार तुमच्या हाती आहे. कोणत्याही द्वेष भावनेने आम्ही कारभार करणार नाही हा विश्वास तुम्ही राज्यातील जनतेला द्यायचा आहे. राज्यातील जनतेच्या आणि राज्याच्या हिताच्या दृष्टीने उपयुक्त निर्णय घेतले जातील अशी भावना जनमानसामध्ये तुम्ही निर्माण करण्याची गरज आहे आणि ती तुम्ही निश्चितपणे अंमलात आणाल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, आमच्या विदर्भातील साखर कारखानदारी कशा प्रकारे उभी करता येईल हा प्रश्न आहे. आज ही कारखानदारी कठीण अवस्थेतून वाटचाल करीत असताना आणखी डबघाईला येत आहे. साखर कारखाने, सूत गिरण्या किंवा कॉटनवरील उद्योग उभारण्याकरिता प्रोत्साहित केले पाहिजे. त्यामध्ये गैर काहीही नाही. परंतु उभी राहिलेली व्यवस्था आहे ती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

बिघडू नये यासाठी सुध्दा सहकार मंत्री म्हणून आपल्याला पावले उचलावी लागतील. जेणेकरुन सहकारी क्षेत्रात साखर आणि इतर उद्योगांना दिशा मिळू शकेल. त्या दृष्टीने प्रयत्न व्हावेत अशी

...3...



श्री.माणिकराव ठाकरे.....

अपेक्षा व्यक्त करतो आणि मी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या संदर्भात मंत्री महोदयांनी निश्चितपणे विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, राजकीय अभिनिवेशातून बोलणार नाही. मागच्या काळात बाली येथील परिषदेमध्ये झालेली घटना मी उपस्थित करण्याची गरज नाही. चुकीचे विधान केले जाते, त्या ऐवजी सावधपणे विधान केले पाहिजे असे माझे मत आहे. मला आज अशी माहिती मिळाली की, शेतीच्या उत्पादनातून 50 टक्के नफा मिळाला पाहिजे अशा प्रकारचे भाव शेतकऱ्यांना मिळाले पाहिजेत, असा उल्लेख माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी मागील काळात केला होता. आज मला मिळालेल्या माहितीनुसार केंद्र शासनाने एका प्रकरणात सुप्रीम कोर्टात ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. त्यानुसार सुप्रीम कोर्टाला लेखी लिहून दिले आहे की, शेतकऱ्यांना शेतीच्या उत्पादनातून 50 टक्के नफा मिळेल अशा प्रकारचा भाव देता येणार नाही. माझ्याकडे थोडयाच वेळेत त्या ॲफिडेव्हीटची प्रत उपलब्ध होईल. एका ठिकाणी बोलायचे एक आणि प्रत्यक्ष कृती मात्र वेगळी करायची हेच यातून दिसून येते. जे वास्तव असेल ते लोकांसमोर मांडले पाहिजे. तुम्ही 50 टक्के नफा देऊ शकता की नाही हे लोकांना चांगले कळते.

सभापती महोदय, यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, आम्ही कृषी मूल्य आयोगाची राज्यामध्ये स्थापना करु. आम्हाला खूप आनंद वाटला. यापुढे शेतमालाला भाव मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे जायची गरज भासणार नाही. कृषी मूल्य आयोग राज्यामध्ये स्थापन होणार असल्यामुळे आपल्याला याच ठिकाणी भाव निश्चित करुन मिळेल अशी आशा निर्माण झाली होती. श्री.पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती नेमली होती. त्यांनी जाहीर करुन टाकले की, मी कृषी मूल्य आयोगाची मागणी मान्य करुन आणली, यापुढे कोणाला दर ठरवावे लागणार नाहीत, आम्ही दर ठरवू आणि त्यानुसार शेतकऱ्यांना किंमत देऊ. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आणि त्याप्रमाणे त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. कृषी मूल्य आयोग राज्य सरकार स्थापन करणार असेल तर त्यापेक्षा वेगळा आनंद होऊ शकत नाही. पणन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मंत्र्यांना सुध्दा कित्येक पटीने आनंद होईल.  आज देश पातळीवर केंद्र सरकारने जाहीर केलेल्या सपोर्ट किंमतीनुसार नाफेड मार्फत खरेदी केंद्रे सुरु केली जातात आणि शेतीमाल खरेदी केला जातो.

नंतर 2जे.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

तशा प्रकारे कृषी मूल्य आयोगा सोबत व्यवस्था निर्माण करावी लागेल. सर्व शेतमालाचे भाव कमी येत असतील तर त्यास शासन भाव देईल अशी व्यवस्था करावी लागेल. ती व्यवस्था उभी करण्यासाठी आपणाला नाफेड सारखी संस्था उभी करावी लागेल. याकरिता किती अतिरिक्त खर्च येणार आहे याचा आपण निश्चितच अभ्यास केला असेल. या माध्यमातून आपण शेतकऱ्यांना निश्चितच मदत करणार असाल. आज शेती मालाच्या संदर्भात जी अवस्था निर्माण झाली आहे ती मी येथे सांगितली आहे. माननीय सहकार मंत्र्यांवर आज प्रचंड बोजा आहे. त्यांना देखील यात काय करावे हे सुचनासे झाले असेल. पण यात माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांतजी पाटील हेच मार्ग काढू शकतात. त्या दृष्टीकोनातून आपण या क्षेत्राकडे पहावे. कर्जासंबंधी, व्याज भरण्यासंबंधी, कारखान्यांसंबंधी ज्या काही सूचना आल्या असतील त्या आपण बॅलन्स कशा काय करणार आहात ? शेतकऱ्यांच्या मालाला किमान भाव मिळाला पाहिजे. तसेच भविष्यामध्ये कारखानदारी देखील वाचली पाहिजे. तेव्हा यासंबंधी आपल्या अधिकाऱ्यांकडून काही सूचना आल्या असतील त्याचा देखील विचार करावा. मागच्या नागपूर अधिवेशनात देखील चांगली चर्चा झाली होती. त्यावेळी आपण अतिशय चांगले उत्तर दिले होते. ते उत्तर प्रेसला देखील आले होते. दिल्ली येथे जशी बैठक झाली त्याप्रमाणे आपल्या येथे 3-4 बैठका घेऊन त्यात काही मार्ग काढता येईल काय या दृष्टीने देखील विचार करावा. आज साखर उद्योग अत्यंत अडचणीमध्ये सापडलेला आहे. त्या उद्योगाला तारण्याच्या दृष्टीने, मजबूत करण्याच्या दृष्टीने आपल्याकडून प्रयत्न व्हावेत अशा प्रकारची अपेक्षा या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने मी उपस्थित करीत आहे. धन्यवाद.

......

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, 'राज्यातील साखर उद्योग तोट्यात जाणे' या विषयावर म.वि.प.नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अनेक दिवसांपासून या राज्यातील साखर उद्योगावर संकट आले आहे हे आम्ही वर्तमानपत्रातून वाचत आहोत. मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, आपल्या देशाचा सन्मान कोणत्या उद्योगामुळे होत असेल, आपणा सर्वांचा सन्मान कशामुळे होत असेल तर तो साखर उद्योगामुळ होत आहे. आपल्या देशातच नव्हे तर जगात देखील साखर उद्योगामुळे आपला सन्मान होत आहे. अशा या उद्योगाचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे. या उद्योगाला सहकार्य करण्याकरिता ज्यांनी ज्यांनी काम केले आहे त्यात श्री.शरद पवार साहेबांचे नाव घेतल्याशिवाय त्याची पूर्तता होणार नाही. साखर उद्योगामधील श्री.शरद पवार साहेबांच्या कामाला तोड नाही. आपल्या राज्यात श्री.पवार साहेबांनी सहकाराच्या माध्यमातून प्रत्येक माणूस जोडला. त्यांनी कारखानदाराला शेतकऱ्यांशी जोडले. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या म्हणीप्रमाणे शेतमजूर देखील त्यांनी प्रत्येक कारखानदारीशी जोडला. माझ्या ऊसाला किती दर मिळतो हे एका शेतकऱ्याला माहीत झाले की, ते राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फक्त सहकारामुळेच माहीत होते. अशा प्रकारे सहकाराची भावना निर्माण करण्याचे काम श्री.पवार साहेबांनी केले आहे.

निवडणुकीपूर्वी कारखानदाराच्या विरुद्ध शेतमजुराला उभे करण्यात आले होते आणि त्यासंबंधातील बातम्या देखील वर्तमानपत्रात आल्या होत्या. त्यामुळेच शेतकरी संघटनेला एक नैतिक पाठबळ मिळाले आणि त्यांनी संपूर्ण राज्यात रान उठवले. त्या संघटनेचे सहकारी आपण देखील आहात. मी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांना सांगू इच्छितो की, आज आपली भाईगिरी सगळीकडे सुरु आहे. ती थोडी तरी बंद करावी. आपल्या राज्यातील शेतमजूर, साखर कारखाने जीवंत राहिले पाहिजेत अशी श्री.शरद पवार साहेबांची भावना आहे हे मला येथे प्रकर्षाने सांगावेसे वाटते. आपण काय केले ? साखर कारखानदारी ही श्री.पवार साहेबांचीच आहे, शुगर लॉबी ही श्री.पवार साहेबांचीच आहे असा प्रचार केला आणि साखर कारखानदारीपासून

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)**

श्री.प्रकाश गजभिये.....

शेतमजुराला, शेतकऱ्यांना तोडले आणि आपल्या बाजूला वळविले व श्री.मोदी साहेबांच्या नेतृत्त्वाखाली आपण निवडणुका लढवल्या व जिंकून देखील आलात. आज आपण सत्तमध्ये आहात. 191 कारखाने आहेत असे सांगितले गेले आहे. आपण सत्तेमध्ये आल्यानंतर या राज्यातील साखर कारखाने बंद झाले तर कोणीही शेतकरी आपणाला माफ करणार नाही. हे कारखाने शेतकऱ्यांचेच आहेत. हे कारखानदारांचे कारखाने नाहीत. सहकारीतील प्रत्येक माणसाचे कारखाने आहेत.ते जीवंत राहिले पाहिजे. यासाठी श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, मोर्चा, आंदोलने करून बसगाड्या पेटविण्यात आल्या. ऊस उत्पादकाला एफआरपी नुसार भाव मिळाला पाहिजे, जो पर्यंत भाव मिळत नाही तो पर्यंत आंदोलन मागे घेणार नाही अशी भूमिका घेण्यात आली. सत्तेवर आल्यानंतर आपण सर्वकाही विसरला. एक क्विंटल साखर निर्माण करण्यासाठी कारखान्याला 2450 रूपये खर्च येतो. आता आपण 1900 रूपये भाव देत आहात. त्यामुळे यातील 500 रूपयाची तूट ही सरकारला भरून काढायची आहे. त्यामुळे गल्लत होत आहे. एवढेच नव्हे तर विनाकारण ऊस देखील पेटविण्यात आला. शेतकऱ्यांच्या आंदालनाला हिंसक वळण देण्यात आले. या आंदोलनात दोघांचा मृत्यू झाला. आंदोलनाच्या ठिकाणी नेत जात नाही. तेथे फक्त आंदोलक मरतात. या आंदोलनामध्ये दोन शेतकऱ्यांचा मृत्यू होणे हे राज्याला काळीमा फासणारे आहे. तेव्हा त्याचा देखील आपण अभ्यास केला पाहिजे. साखर संकुलाची देखील तोडफोड करण्यात आली. आपण नैतिकतेच्या गोष्टी करणारे लोक आहात. साखर संकुलाची तोडफोड केल्यामुळे आपला कुठला फायदा झाला ? आपली अर्थव्यवस्था किती बळकट झाली ? याचे सुद्धा उत्तर आम्हाला आपल्याकडून हवे आहे. आमचे माननीय मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील या आंदोलनाच्या निमित्ताने काय म्हणत होते ते देखील आपणास सांगतो. ते म्हणाले होते की, सरकारी तिजोरी पूर्ण खाली करण्यात आल्याने कामगारांचे पगार देण्यासाठी पैसे नाहीत. साखर कारखान्यांना कोणतीही सूट देणे सरकारला शक्य नसल्याचे सहकार मंत्री

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये....

श्री.चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच स्पष्ट केले. कारखान्यांना एफआरपी देणे शक्य नाही. त्यांनी आर्थिक स्थितीचा अहवाल सरकारकडे द्यावा. त्यानुसार ते साखर कारखाने सील करून त्यांच्यातील साखर विकून एफआरपी देण्यात येईल, हे आमच्या श्री.चंद्रकांतदादा पाटलांचे म्हणणे होते. निश्चितच त्यांच्या काही अडचण असतील. ते स्वतः निर्णय घेऊ शकतच नाही.

यानंतर श्री.जुन्नरे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

कोणताही मुख्यमंत्री ऊसाच्या दराच्या संदर्भातील निर्णय घेऊ शकत नाही. ऊसाच्या दराच्या संदर्भातील निर्णय दिल्लीवरुन होत असतो. आपली त्यामध्ये काही चूक नाही. साखर संकुलाची तोडफोड, वाहनांची तोडफोड केल्यामुळे राज्याचे अपरिमित नुकसान झाले. या राज्यामध्ये अत्यंत असंवेदनशील सरकार सत्तेमध्ये आलेले आहे. शेतकऱ्यांचे कैवारी आणि शेतकऱ्यांचा कळवळा असणारे एकमेव खासदार श्री. राजीव शेट्टी यांनी ऊसाचा पहिला हप्ता बीन कपात 3000 रुपये घेतल्याशिवाय राहणार नाही असे ते सांगत होते. आता ते कोठे आहेत ते दिसत नाहीत. साखरेचे दर पडलेले असताना कोठेही आंदोलन दिसत नाही. माननीय श्री.चंद्रकांत दादा आपल्या विषयी आमच्या मनात प्रेम आणि जीव्हाळा आहे. आम्ही तुमच्यासंदर्भात तुमच्या अपरोक्ष चांगली चर्चा करीत असतो. ऊसाच्या दराच्या संदर्भातील मध्यम मार्ग शासनाला काढावा लागणार आहे. 40 हजार कोटी रुपयांची उलाढाल साखर कारखान्यांच्या माध्यमातून होत असल्यामुळे हा उद्योग व्यपगत होता कामा नये. साखर उद्योग संपावयास नको. साखर उद्योग तुम्हाला जीवंत ठेवावा लागणार आहे. साखर उद्योग हा आपल्या देशाचा सर्वोच्च सन्मान आहे. साखर उद्योग हा देशाचा कणा आहे. माननीय श्री.पवार साहेब हे भारतातील साखरेचे उत्पादन वाढविणारे एकमेव नेते आहेत. माननीय श्री. शरद पवार साहेबांचे नाव जगामध्ये सन्मानाने घेतले जाते. आमच्या देशाचा कृषी मंत्री कोण आहे असे गावामध्ये विचारले तर कृषी मंत्र्याचे नाव कोणालाच सांगता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. टीव्ही चॅनलवर त्यांच्याच पक्षाच्या सदस्यांना कृषी मंत्री कोण आहे असा प्रश्न केल्यानंतर त्यांना सुध्दा कृषी मंत्र्यांचे नाव सांगता आले नाही.

सभापती महोदय, साखर कारखानदार सत्ताधारी मंडळींचे सुध्दा नातेवाईक आहेत. सगळे साखर कारखानदार एकमेकांचे नातेवाईक आहेत. साखर कारखाने कोणा कोणाचे आहेत त्यांची नावे मी घेणार नाही. परतु राज्यातील शेतकरी राष्ट्रवादी पक्षाचा आहे असे म्हणण्यास हरकत नाही. माननीय श्री.चंद्रकांत दादा आपण व्यापाऱ्यांच्या एलबीटीसाठी 6000 कोटी रुपये दिले, टोलसाठी 800 कोटी रुपये दिले आहेत. शासनाकडे यासंदर्भातील 480 कोटी रुपये शिल्लक असून ते वाटण्यात आलेले नाही. आम्ही साखर कारखान्यांसाठी 80 कोटी रुपये मागितले परंतु आम्हाला फक्त 20 कोटी रुपये दिले गेले. आमच्या संदर्भात आपल्या मनात जो काही राग आहे तो

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

जाऊ द्या. राग हा निवडणुकी पुरता असतो. आज तुम्ही तेथे बसला आहात उद्या तुम्ही या बाजूला याल हे लक्षात ठेवा. आम्हालाच आमच्या कास्तकारांचा विचार करावयाचा आहे. तुम्ही जर माननीय मुख्यमंत्र्यांना विधानसभेत साधी चिठ्ठी पाठवून सांगितले की, मला साखर कारखानदारीसाठी 80 कोटी रुपयांची घोषणा करावयाची आहे तर त्याला माननीय मुख्यमंत्री विरोध करणार नाही.

सभापती महोदय, आमचे सन्माननीय सदस्य श्री. महादेवराव जानकर हे ऊसाच्य वाडयातून येथे आलेले आहेत. आम्ही त्यांचा सन्मान करतो. सन्माननीय सदस्य श्री. जानकर हे माझे मित्र आहेत. ते म्हणतात की, प्रकाश आम्ही रासप मध्ये आहे. आपल्याला सुध्दा आमच्याकडे येण्यास हरकत नाही. तुम्ही माझ्याकडे राजीनामा देऊन ठेवला आहे. या अधिवेशनानंतर मला मंत्री केले नाही तर हा माझा राजीनामा आहे. या ठिकाणी मी इमानदारीने बोलतो आहे. माझ्या शिरावर बंधन आहे. जे अनुभवी नेते आहेत त्यांचा आपण सन्मान केला पाहिजे. माननीय सभापती महोदय हे 5-10 वेळेस निवडून आले असतील व माननीय चंद्रकांत दादा हे तीनदा निवडून आले आहेत व त्यानंतर सभापती पद मिळत असते. पवार साहेब लहानातून मोठे मोठे होत होत गेले असून आता ते आभाळाएवढे झाले आहेत. असे असतांना माननीय पवार साहेबांविरुध्द आरोप करताना थोडे सांभाळून करावयास पाहिजे. माननीय पवार साहेब हे अनुभवी नेते आहेत. माननीय पवार साहेबांएवढी उंची कोणी गाठू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. आमचे साहेब विरोधी पक्षात होते तेव्हा माननीय अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी माननीय पवार साहेबांना 25 ते 27 कमिटयांचे अध्यक्षपद दिले होते. माननीय पवार साहेबांनी देशाचे नेतृत्व केलेले आहे. एवढया मोठया माणसाजवळ विद्वत्ता,नम्रता असून ते कोणाच्या विरोधात कधीही बोलत नाही. राज्याची घडी साखर कारखानदारी अवलंबून आहे. साखर कारखानदारी हा 40 हजार कोटी रुपयांच्या उलाढालीचा उद्योग असून हा उद्योग आपल्याला राजकारणाच्या पलीकडे जाऊन जीवंत ठेवावा लागणार आहे. साखर कारखानदारीला जेवढी मदत लागेल तेवढी मदत शासनाने केली पाहिजे. शेतमजूर, शेतकरी आणि साखरेचा भाव यामध्ये जी तफावत आहे ती तफावत दूर करण्यासाठी शासनाने कारखानदारांस मदत केली नाही तर साखर कारखानदारी डुबल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, मंदी असल्यामुळे सरकार अडचणीत सापडले आहे असे या ठिकाणी सांगण्यात आले आहे. परंतु अडचणीत सरकार सापडले आहे की, साखर कारखाने सापडले

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

आहेत ? शेतमजूर, शेतकरी आणि साखर कारखानदारांचे एकमत होणे गरजेचे आहे. शेतमजूर, शेतकरी आणि साखर कारखानदारांमध्ये दुही आपण टाकली असे मी म्हणणार नाही. परंतु शेतकरी संघटनेच्या माध्यमातून दरी निर्माण करण्यात आलेली असून ही दरी आपल्याला संपवावयाची आहे. या राज्यातील साखर उद्योगाची स्थिती चांगली कशी होईल, हा उद्योग संपन्न कसा होईल याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. केवळ साखर कारखान्यांकडेच नाही तर इतर कारखान्यांकडे तसेच इतर उद्योगांकडेही शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, मला विश्वास आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर साखर कारखान्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने पॅकेज घोषित करावे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

--------------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील साखर उद्योग हा देशातील आर्थिक कणा आहे. आपल्याला जास्त परकीय चलन साखरेपासून मिळत होते. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, ज्यावेळेस साखर 50 रुपये, 56 रुपये किलो होती त्यावेळेस शेतकऱ्यांचे काही नेते आसूड घेऊन कारखानदारांनी शेतकऱ्याला न्याय दिला पाहिजे म्हणून स्वतःला मारुन घेत होती आणि दुसऱ्याला मारीन म्हणून सांगत होती. आज अडचणीची परिस्थिती आल्यानंतर ते नेते सत्तेच्या मागे लागले आणि गायब झाले. आता शेतकऱ्यांना कोणीच वाली राहिला नाही अशी एकंदरीत परिस्थिती आहे. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय हवालदिल झालेली आहे. आता साखरेचा भाव 18.50 रुपये किलो आहे. अशा परिस्थितीत साखर कारखाने ऊसाला काय दर देणार ? यामध्ये कोणाचा दोष आहे असे मी म्हणत नाही तर ही परिस्थिती निसर्गाने तयार केलेली आहे. साखर कारखान्यांमध्ये व्यवस्थापन व्यवस्थित नसल्यामुळे कारखान्याचा खर्च वाढला असेल. परंतु इतके काही भयावह होते असे नाही. 1800 रुपये या दराने साखर विकून ऊसाला 2000 रुपये दर देणे साखर कारखान्याला कधीही शक्य होणार नाही. या शासनाने जी 1800 रुपये एफआरपी ठरवली आहे ती सुध्दा देणे शक्य नाही. 1800 रुपये साखरेचा भाव आणि त्यामध्ये 700-800 रुपये खर्च धरला तर साखरेचा भाव 2500 रुपये क्विंटल पाहिजे तेव्हा ऊसाला 1800 रुपये दर देणे शक्य होईल.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर.....

सभापती महोदय, मला भीती वाटते की, मुंबईतील गिरण्यांची जी स्थिती झाली तशी स्थिती साखर कारखान्यांची झाली तर राज्यावर केवढे मोठे संकट ओढवेल याची कल्पना करता येत नाही. ते चित्र फार भयानक असेल. सांगण्याचा उद्देश एवढाच की, आपण सर्वांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रात 70 ते 75 टक्के क्षेत्र ऊसाखाली आहे. ऊसाचे क्षेत्र बंद पडले तर त्या क्षेत्रात दुसरे पिकणार काय ?

सभापती महोदय, काल वर्तमानपत्रात एक बातमी होती. महाराष्ट्र राज्य आणि कर्नाटक राज्यातील सर्व साखर कारखानदारांची एक बैठक झाली. त्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, पुढील वर्षी कोणीही साखर कारखाना चालू करु नये. जर आपण साखर कारखाना सुरु केला तर तो कारखाना पुन्हा उभा राहणार नाही. आपणास शेतकरी उभे राहू देणार नाही. आपणास शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे दर देणे कधीही शक्य होणार नाही. आपण शेतकऱ्यांना एक हजार रुपयापेक्षा जास्त दर देऊ शकणार नाही अशीही भीती व्यक्त करण्यात आली. तोडणी आणि वाहतूकदारांना ॲडव्हान्स दिला तरच तेथील कारखाने चालतात. जर ॲडव्हान्स दिला नाही तर कारखान्याला मजूर मिळणार नाहीत म्हणून त्यांनी तोडणी व वाहतूकदारांना ॲडव्हान्स न देण्याचा निर्णय घेतला. मराठवाडा आणि बीड जिल्ह्यातून ऊस तोडणी मजूर येतात त्यांना ॲडव्हान्स देणे बंद केले आहे. माझी सरकारला विनंती आहे की, आपणास साखरेचा उद्योग वाचवावयाचा असेल तर या उद्योगाला मदत केली पाहिजे. ते आपणासही भेटणार आहेत आणि दिल्लीतही जाणार आहेत. जेथून कुठून मदत मिळेल त्या ठिकाणी ते जाणार आहेत. जर भेटूनही काही झाले नाही तर त्यांनी साखर कारखाना बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. साखर उद्योगावर जे संकट आलेले आहे ते साखर कारखान्यांच्या चुकीमध्ये आलेले नाही. सरकारच्या चुकीमुळे आलेले नाही. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हे नैसर्गिक संकट आहे. जगाच्या बाजारामध्ये साखरेचे उत्पादन वाढल्यामुळे हे संकट आलेले आहे. आपल्यापेक्षा दुसऱ्या देशातून स्वस्त दरात साखर मिळू लागल्यामुळे हे संकट आले आहे. पेट्रोल-डिझेलचे दर जास्त असल्यामुळे त्यामध्ये इथिनॉल मिसळून वापरत होते. परंतु पेट्रोलिअमचे दर कमी झाल्यामुळे इथिनॉलचे उत्पादन बंद केले आणि

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर.....

साखरचे उत्पादन सुरु केल्यामुळे बाजारामध्ये साखरेचा पुरवठा जास्त झाला. जगाच्या बाजारामध्ये साखरेचे दर कमी झाले. त्यामुळे आपली साखर निर्यात होऊ शकली नाही.

सभापती महोदय, ब्राझील आणि टांझानिया हे देश उष्ण कटीबंधात येतात. कमी कष्टात, व कमी खर्चात साखरेचे उत्पादन होत असल्यामुळे त्या ठिकाणी जास्त प्रमाणात साखरेचे उत्पादन झाले. परंतु आपल्या येथे खर्चाच्या प्रमाणात ते दर परवडत नाही म्हणून जगाच्या बाजारपेठेत आपली साखर घेतली जात नाही.

सभापती महोदय, आपणास साखर उद्योगाचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर साखर कारखान्याला टाळे ठोकू, साखर जप्त करु, कारखाना विकून एफआरपी द्यायला लावू असे बोलू नये, ही कठीण परिस्थिती आहे. सरकारने अतिशय माफक बोलले पाहिजे.

सभापती महोदय, साखर उद्योगा बरोबरच काही कोटी ऊस तोडणी मजुरांचा, वाहतूकदारांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्याच्या एकूण आर्थिक स्थितीचा विषय असल्यामुळे तो अतिशय हळूवारपणे हाताळला पाहिजे. प्रश्न सुटेल असा तोडगा काढला पाहिजे. या धंद्यातील तज्ज्ञच लोक आपणाला मार्ग काढून देतील म्हणून त्यांना जवळ बोलाविले पाहिजे. आपल्याकडे साखर कारखान्यातील तज्ज्ञ लोक आहेत. ज्यांनी 20-25 वर्षे साखर कारखाने चालविले आहेत अशा लोकांची आपणास मदत घेता येईल. या लोकांनी कर्ज घेऊन ती फेडली आहेत. त्यांनी नवीन उद्योग सुरु केलेले आहेत. हे लोक आपणास यातून मार्ग काढून देतील. पण आपण त्यांना जवळ घेतले पाहिजे. त्यांना सरकारची भूमिका समजावून सांगितली पाहिजे. साखर उद्योगाच्या माध्यमातून टॅक्स रुपाने सरकारच्या तिजोरीमध्ये 20 हजार कोटी रुपये गोळा होतात. तेव्हा एखादे वर्ष सरकारला तो टॅक्स माफ करता आला तर किंवा त्यामध्ये सवलत दिली तर ते त्यांच्यासाठी पॅकेज होऊ शकते. केंद्र सरकार कोणालाही मदत करत आहे. नेपाळला देखील आर्थिक मदत केली. पण देशातील साखर उद्योग अडचणीत आला आहे त्याला मदत करीत नाही. तेव्हा आपण केंद्र सरकारकडे विनंती करावी. आपल्या पक्षाचे सरकार आहे म्हणून तुम्ही विनंती करावी असे मी म्हणणार नाही. आपण सर्वजण त्यामध्ये साखर कारखानदारांना घेऊन त्यांना वस्तुस्थिती सांगू.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर.....

राज्य कोणत्याही पक्षाचे असू द्या, पण अशा कठीण परिस्थिती मदत घ्यायला काय हरकत आहे ? साखर उद्योगास मदत मिळाली पाहिजे. जर मदत मिळाली तरच यातून मार्ग निघू शकेल. तेव्हा आपण केंद्र सरकारकडे मदतीसाठी आग्रह धरला पाहिजे की, राज्यावर मोठे संकट आलेले आहे, राज्याची अर्थ व्यवस्था तोट्यात आहे तेव्हा आपण आम्हाला मदत केली पाहिजे. यासाठी दादा आपण पुढे राहिले पाहिजे आणि सर्वांना बरोबर घेतले पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, आपल्यावर दुसरे संकट उभे आहे की, साखर कारखाने बंद झाले की, को-जनरेशन बंद होणार, मग वीज बंद होणार, वीज कमी झाली की ती दुसरीकडून विकत घेण्याची वेळ येणार, वीज विकत घेण्याची पाळी आली की आणखी खर्च वाढणार असे हे त्रांगडे आहे. त्याशिवाय इथिनॉल बंद होणार. मग डिस्लरी बंद होणार, स्पिरीट बंद होणार आणि बगॅस बंद होणार, ऊस तोड थांबल्यामुळे सर्व ऊस तोडणी कामगार घरी बसणार, त्यांच्या गाड्या झिजणार असे हे चक्र आहे. आपणास को-जनरेशनमधून पैसे मिळतात, डिस्टलरीपासून पैसे मिळतात, बगॅसची किंमत चौपट झाली आहे तरी देखील कारखान्यांना एफआरपी देता येत नाही. तेव्हा हे सर्व बंद पडल्यावर कारखान्याची काय अवस्था होणार ? दादा, मी आपणास सांगतो की, जर एक वर्ष कारखाना बंद राहिला तर तो पुन्हा सुरु करणे किती जिकिरीचे आहे, याची आपणास कल्पना करता येणार नाही. ज्यांचे कारखाने एकेक वर्ष बंद राहिले ते दहा वर्षे पुन्हा उठलेच नाहीत. कारखाना बंद असला तरी कामगारांचे पगार असतात, मेन्टेनन्स असतो, व्याज असते, या सर्व गोष्टी चालू असतात. तेव्हा त्यातून उठणे कठीण आहे. हे अस्मानी सुल्तानी संकट आहे असे समजून सरकारने काही निर्णय घेतले पाहिजेत.

सभापती महोदय, या उद्योगामुळे सहकारी बँका अडचणीत येणार आहेत. सरकार बदलले म्हणून त्याची सर्व जबाबदारी सरकारवर आली असेही काही नाही. तुम्ही धोरण ठरविले म्हणजे सर्वांना बंदूक घेऊन मारायला चालला आहात असेही काही नाही. पण या उद्योगातील काही तज्ज्ञ लोक आहेत, ज्यांनी हा उद्योग उभा केला, तो वाढविला त्या माणसांना दूर ठेवून चालणार नाही आपण त्यांचा सल्ला घेतला पाहिजे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर.....

सभापती महोदय, दुधाच्या भुकटीच्या बाबतीत असाच निर्णय झाला होता. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी दूध भुकटी निर्यातीला परवानगी दिली आणि दूध धंदा वाचवला. आता देखील दूध भुकटीच्या निर्यातीची परवानगी द्यावी. सरकारने भुकटीच्या लीटरला काही अनुदान दिले. आज दूध धंदा पूर्ण कोलमडून पडला आहे. 27 रुपयाला मिळणारे दूध 17 रुपयाला मिळत आहे. मी त्या दिवशी हरकत घेतली होती की, 17 रुपयांनी विकत घेतलेले दूध 70 रुपयाला विकले जाते. परंतु असे कधी होत नाही. माझा स्वतःचा दूधसंघ आहे. मी तो आज विकायला तयार आहे. आपण तो घेतो असे म्हणालात तर मी आताच्या आता देण्यास तयार आहे. आज जवळपास 50 दूधसंघ बंद पडले आहेत. 17 रुपयाला विकत घेतले दूध 70 रुपयांना विकले जाते हे रेकॉर्डवर कसे राहते हे मला कळत नाही. दूधाचे दर शासन ठरविते. दूध उत्पादकाकडून ज्या किमतीला घेतो त्याच किंमतीला बाहेर विकावे लागते. त्यामध्ये जादा पैसे घेता येत नाही. फक्त ओव्हररेट घेतो. जर दोन रुपये ओव्हररेट ठरला तर त्याला 1 रुपये 70 पैसे खर्च येतो आणि लीटरमागे 30 पैसे मिळतात. येथे सांगण्यात आले की, दूधसंघाला 7 रुपये मिळतात, हे कसे शक्य आहे ? मी बारामती दूध संघात रोज जातो. आम्ही पॅकींगचे 14 रुपये देतो, त्यावेळी येथील विक्रेता तो 21 रुपयाला विकतो. त्याला लीटरला सात रुपये मिळतात. ती यंत्रणा बंद करा असे आम्ही सरकारला सांगितले, पण तसे झाले नाही. तसेच ऊसाच्या बाबतीत आहे. त्यांना वाढते की साखर कारखाने फार मजा करतात, पण तसे काहीही नाही. आज साखर कारखाने डबघाईला आलेले आहेत. त्यांना एफआरपी सुद्धा देता येत नाही. काही ठिकाणी एका क्विंटला 90 किलो साखर पडते तर कोल्हापूर सांगली भागामध्ये जमिनीच्या पोतामुळे 110 किलो पडते. तेव्हा वरची जी 10 किलो साखर मिळते म्हणून त्याचे पैसे जास्त येतात. हे अस्मानी सुल्तानी संकट आहे, असा विचार करुन साखर उद्योगाला मदत केली पाहिजे. आज सरकारची खरी कसोटी आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर...

त्यामुळे मी माननीय सहकार मंत्री आणि सहकार राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, हे संकट फार मोठे आहे. आपण सर्वांना बरोबर घेतले तर, आपल्याला सर्वजण सहकार्य करण्यास तयार आहेत. हा तुमच्या किंवा आमच्या एकट्याचा प्रश्न नाही, हा सर्वांचा प्रश्न आहे. या सर्व परिस्थितीमुळे पश्चिम महाराष्ट्र भरडला जात आहे. त्यामुळे आपण या प्रश्नाकडे सहानुभूतीने लक्ष देऊन यातून मार्ग काढण्यासाठी सर्वांचे सहाकार्य घ्यावे. या दृष्टिकोनातून काम करताना काही गोष्टींचा त्याग करावा लागेल, काही गोष्टी आपल्याला वरपर्यंत बोलाव्या लागतील आणि काही गोष्टी वरुन आणाव्या सुध्दा लागतील. या गोष्टी केल्याशिवाय हा उद्योग जगणार नाही आणि हा उद्योग जगविल्याशिवाय महाराष्ट्र शाबूत राहू शकणार नाही. त्यामुळे या विषयामध्ये लक्ष घालण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो व येथेच थांबतो.

--------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील साखर उद्योगधंद्यांमध्ये मंदी आल्याबाबतची ही चर्चा आहे. साखर कारखाने हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने वाचले पाहिजे, शेतकऱ्यांचे हीत जपले पाहिजे. परंतु आजपर्यंत सहकाराच्या नावावर स्वत:चे खाजगी उद्योग करुन सबसिडी घेण्याचा जो प्रकार राज्यात झाला तो निंदनीय आहे. महोदय, राज्यात ठोंबरे साहेबांचा कारखाना असेल, नागनाथ अण्णा यांचा कारखाना असेल, सा.रे.पाटील किंवा राजे विक्रमसिंह घाडगे यांचा कारखाना असेल. हे सर्व कारखाने आदर्शवत आहेत. या सर्वांचा आदर्श घेऊन राज्यातील सहकारी साखर कारखाने चालविले तर सध्या मोडकळीस आलेल्या कारखान्यांना उर्जितावस्था प्राप्त होऊ शकते. परंतु आज सहकाराच्या माध्यमातून स्वत:चे घर भरणारे मालक झाल्यामुळे ही सहकार चळवळ मोडीत निघाली असे दुर्दैवाने आणि खेदाने म्हणावे लागत आहे.

सभापती महोदय, सध्याचे सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. या चर्चेच्या माध्यमातून मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती करतो की, आज शेतकऱ्यांबरोबर व्यापारी आहे, व्यापाऱ्यांबरोबर मजूर आहे. या उद्योगामध्ये सर्वांचे हीत आहे. परंतु सहकार चळवळीच्या माध्यमातून वैकुंठभ्ांई मेहता, गाडगीळ साहेब किंवा विखे-पाटील यांनी जो दर दिला होता तो दर खाली कोणी आणला, या संदर्भात आत्मचिंतन झाले पाहिजे. सहकाराच्या नावाखाली स्वत:चे काम करण्याचा उद्योग बंद केला पाहिजे. मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती करु इच्छितो की, राज्यातील रायगड, सातारा, मुंबई या जिल्हा सहकारी बँका चांगल्या प्रकारे सुरु आहेत. अशा बँकांना सरकारने मदत केली पाहिजे. मला यात राजकारण करावयाचे नाही. पुणे जिल्हा सहकारी बँकेला सुध्दा मदत दिली पाहिजे. माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या बँकेमध्ये 8 हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. त्यामुळे त्या बँकेला सुध्दा शासनाने मदत केली पाहिजे. या बँकेला मदत करण्याच्या बाबतीत माझ्या मनात काहीही किंतु नाही. पूर्वी ज्या बँका चांगल्या होत्या त्या बँका विरोधकांनी खायच्या आणि पुन्हा त्या बँकांना मदत करण्यासाठी शासनाकडे मागणी करावयाची हे योग्य नाही. हे कोठे

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर....

तरी थांबले पाहिजे. माझे म्हणणे एवढेच आहे की, राज्यातील सहकारी बँकांची गत नागपूर, वर्धा, बुलढाणा या सहकारी बँकांसारखी होता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित, सातारा जिल्हा सहकारी बँक ही आपल्या पक्षाच्या ताब्यात आहे. काल काटजचा सहकारी साखर कारखाना तुमच्या पक्षाच्या ताब्यात होता. परंतु आज तो माझ्या पक्षाच्या ताब्यात आहे. कारण तेथील आमदार श्री.राहुल कुल हे माझ्या पक्षाचे आमदार आहेत. मी पुन्हा सांगतो की, मला यामध्ये राजकारण करावयाचे नाही. शेतकऱ्यांच्या सहकाराच्या माध्यमातून हजारो पिढ्या जगणार आहेत. परंतु या सहकारातून आजपर्यंत कोणाचा फायदा झाला ? महोदय, श्री.ठोंबरे साहेब मराठवाड्यातील आहेत. ते चांगल्या प्रकारे कारखाना चालवित आहेत. नागनाथ अण्णा यांचा वाळव्याला चांगल्या प्रकारे कारखाना सुरु आहे. तो कारखाना टॉपचा आहे. राजे विक्रमसिंह घाडगे आणि सा.रे.पाटील यांचा कारखाना सुध्दा चांगल्याप्रकारे सुरु आहे. त्यामुळे या लोकांची समिती नेमून सहकाराच्या बाबतीत काही सूचना सुचविण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. परंतु सहकाराच्या माध्यमातून भरपूर खाण्याचा धंदा कोठे तरी बंद झाला पाहिजे. कारण शासनाचा पैसा हा जनतेचा पैसा आहे. मी हे राजकारणाच्या दृष्टीने बोलत नाही. कारण हा सहकार खराब झाला तर बऱ्याच पिढ्या बरबाद होतील. त्यामुळे अस्तित्वात असलेले उद्योग चांगल्याप्रकारे सुरु ठेवण्यासाठी त्यांना पुरेशी मदत केली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, या उद्योगामध्ये अंबानी येत आहेत. महोदय, माझे वैयक्तिक मत आहे की, आज शेतकऱ्यांच्या 1 टन ऊसाला 600 रुपये भाव मिळत असेल आणि अंबानी त्याच ऊसाला 6 हजार रुपये भाव देत असेल तर त्यांनी साखर कारखाना का चालवू नये ? यामुळे आमच्या शेतकऱ्याच्याच ऊसाला भाव मिळणार आहे. मी तर म्हणेन की, सन्माननीय श्री.अजितदादा पवार यांनी साखर कारखाना चालवावा. एखादा उद्योगपती सहकारी कारखाना चांगल्याप्रकारे चालवित असेल आणि त्यातून शेतकऱ्यांना फायदा होत असेल तर, आपल्या पोटात का दुखावे ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चांगली आहे. मी तर म्हणेन की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनीच हा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर....

उद्योग चालवावा. आम्ही त्यांचे स्वागत करण्यास तयार आहोत. हा उद्योग अंबानी किंवा अदानीने नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी घ्यावा. आम्ही त्यांना सहकार्य करण्यास तयार आहोत. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव मिळाला तर त्यांना योग्य ती मदत करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. या चर्चेवर बोलताना मी अगोदरच सांगितले की, अंबानी देशातील सर्व कारखाने घ्यायला मागत आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी जे वक्तव्य केले त्यावर माझा आक्षेप आहे. जर सरकार हा संपूर्ण उद्योग अंबानीला देणार असेल तर ही चर्चा करण्यात काय अर्थ आहे ?

**तालिका सभापती** (प्रा.जनार्दन चांदूरकर) : ही अल्पकालीन चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आपण आपले विचार मांडले. आता सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर हे त्यांचे विचार मांडत आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या चर्चेला वेगळे वळण लागत आहे. अंबानी ज्यावेळी कारखाना घेईल त्यावेळी शेतकऱ्यांना 800 रुपये भाव मिळणार नाही. ज्यावेळी राज्यात सहकार चळवळ नव्हती त्यावेळी वारणा, सांगली या भागात शेतकरी ऊस जाळत होते. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर, आपण चळवळीतील आहात, शेतकरी आहात. त्यामुळे आपण अशी मागणी करु नका.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी बोलताना केवळ एक उदाहरण दिले. त्यांनी असे कोठेही म्हटले नाही की, अंबानीला काखाने द्या. मी विचारु इच्छितो की, ते देणारे कोण आहेत, एखादा उद्योग कोणाच्या हातात द्यायचा हे त्यांच्या हातात आहे काय ? त्यांनी केवळ आपले विचार मांडले आणि विचार मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मला वाटते या विषयाला वेगळे वळण देऊन वेगळाच विषय समोर आणण्यापेक्षा, सन्माननीय सदस्यांना या चर्चेवर बोलू द्यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांचे म्हणणे त्यांच्यापुरते बरोबर असू शकते. काही लोक या बाबतीत समर्थन करु शकतात. मागे विदर्भातील कारखाने बंद पडले होते. शेतकऱ्यांचा आग्रह होता की, बंद पडलेले कारखाने सुरु झाले पाहिजे. परंतु ते कारखाने सुरु करण्याची आर्थिक स्थिती कोणाची नव्हती. ..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी अंबानी यांचे नाव घेतले. स्व.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना मी त्यांना म्हटले होते की, जे कारखाने सुरुच होऊ शकत नाही किंवा ज्या कारखान्यांवर प्रचंड कर्ज आहे असे कारखाने एखाद्या उद्योगपतीला चालवावयास सांगितले तर ते असे कारखाने चालवू शकतील. काही दिवसानंतर विलासराव देशमुख यांनी मुकेश अंबानींना बोलावून घेतले आणि त्यांना बंद पडलेले 15-20 कारखाने चालविण्यास तयार आहात काय असे विचारले. त्यावर मुकेश अंबानी यांनी सांगितले की, मी 40-50 कारखाने चालविण्यास तयार आहे. मला हे कारखाने चालविण्यात अडचण नाही. परंतु 40-50 कारखान्यासाठी लागणारी जमीन मला द्यावी. मी त्या जमिनीवर ऊस घेईन. त्या परिसरातील धरणेही मीच बांधतो,....

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

शेतीही मीच करतो आणि कारखानादारीही मीच चालवितो. तुम्ही म्हणता की, काही फरक पडत नाही. पण त्यांचा दृष्टीकोन व्यापारी असतो. तुम्ही एकदा सुरूवात केली तर ते कोणत्या स्तरापर्यंत जाईल हे सांगता येत नाही. त्यांचा हा विषय वेगळा आहे. विचार मांडले तर ठीक आहे. पण त्यातून परिणाम होतात ते मी सांगितले.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, विषयाचे डायव्हर्शन केले आहे.

**तालिका सभापती** : आता त्या विषयावर चर्चा झाली आहे, त्याच विषयावर बोलून ती चर्चा वाढविण्यात अर्थ नाही. आपण दुसऱ्या विषयावर बोलावे.

श्री. महादेव जानकर : सभापती महोदय, मला त्या विषयात बोलायचे नाही. अंडर गव्हर्नमेंट एखाद्या बिल्डरकडून त्याच्यापेक्षा साडे चार हजार कोटी रूपये जास्त रक्कम देऊन शेतकऱ्यांचे हित होत असेल तर ठीक आहे. I am only talking for the interest of the farmers. मी त्याबद्दल म्हणत होतो. परंतु त्याचा विपर्यास करीत असतील तर ते बरोबर नाही. माझी वैयक्तिक भूमिका होती हे मी पहिल्यांदा सांगितले होते. सहकारामध्ये काय झाले आहे याचा मीही अभ्यास करतो. आपण ज्येष्ठ, वरिष्ठ आहात. परंतु शेतकऱ्यांचे हित साधावे या दृष्टीने आम्ही पाहत होतो. परंतु आपले तसे म्हणणे असेल तर मी त्याबद्दल बोलणार नाही. बीओटी तत्वावर रस्ते बांधले जातात, ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते होते. मग ते खाजगीकरणाला का दिले ? आता मुंबईतून पुण्याला जाण्यास अडीच तास लागतात आणि हे बीओटीमुळे झाले आहे. प्रत्येक गोष्टीत खाजगीकरण आले आहे. शेतकऱ्याचे हित महत्त्वाचे आहे. सुरूवातीला सातारला जाण्यास 6 तास लागायचे. आता अडीच तासात पुणे आणि तेथून साडे तीन तासात सातारला पोहचतो. मी ही भूमिका वैज्ञानिक पातळीवर मांडली तर काय चुकीचे आहे ? माझे म्हणणे व विनंती शासनाला एवढीच आहे की, शेतकऱ्यांचे हित पहावे. साखर कारखानदारी मोठी आहे. आपण याला जीवदान देण्याची भूमिका घ्यावी. पाठीमागच्या लोकांनी काय केले, आम्ही काय करणार आहोत हे पाहण्यापेक्षा याला जीवदान कसे मिळेल हे पहावे अशी विनंती करून थांबतो. धन्यवाद !

----

..2

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 97 अन्वये मांडलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे. सत्ताधारी पक्षातील अधिक सन्माननीय सदस्यांनी या विषयावर बोलावे असे माझेही मत होते. कारण साखर उद्योग प्रतिकूल परिस्थितीत आला आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतमालाचे बाजारातील भाव पडलेले आहेत. सत्ताधारी पक्षाचे नेमके यावर मत काय आहे, यावर मार्ग काय निघू शकतो, काय उपाययोजना केल्या जाऊ शकतात, सत्तेत असताना या मंडळीचे काय मत आहे हे जाणून घेण्याचा आग्रह माझाही होता. सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, माणिकराव ठाकरे यांनी यावर भाषणे केली. आज एका अतिशय महत्त्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. निर्यात होणाऱ्या साखरेचा दर प्रति क्विंटल 1900 रूपयांवर घसरला आहे. आज येथे उल्लेख केलेला भाव 1900 रूपये आहे. आज दुपारी मराठवाड्यातील साखरेचे टेंडर 1852 रूपयांना गेले आहे. अधिकृतरित्या मिळालेल्या माहितीनुसार 1800-1850 रूपये साखरेचे भाव आहेत आणि हे 1600 रूपयांपर्यंत उतरणार आहेत. एकीकडे एफआरपी 1600 पेक्षा अधिकचा द्यायचा आहे. एफआरपीचे 1600 रूपये दिले तर ऊसतोड कामगारांना काय द्यायचे ? प्रत्येक वर्षी 20-30 टक्क्यांप्रमाणे् वाढ मागत आहात. आपण गेल्या वर्षीच फक्त 20 टक्क्यांप्रमाणे देऊ शकलो आणि ती सुध्दा त्या बिलामध्ये वाढ करू शकलो नाही. प्रत्येक वर्षी ऊसतोड कामगाराला साधारणपणे 40-45 टक्क्यांपर्यंतची वाढ देताना, या वर्षी केवळ 20 टक्क्यांची वाढ दिली. आता जर 1500-1600 रूपयांचा एफआरपी द्यायचा तर उरलेली रक्कम कशातून द्यायची ? साखरधंदा अडचणी्त आला आहे. साखरधंदा अडचणीतून बाहेर काढायचा असेल, त्याततून मार्ग काढायचा असेल तर अलाईड उद्योग आहेत. आम्ही या संदर्भात वृत्तपत्रांतही वाचतो. सभागृहात शून्य प्रहरामध्ये एक सन्माननीय सदस्य बोलले. (अडथळा) सत्ताधारी पक्षातून एकच सन्माननीय सदस्य बोलले. (अडथळा) सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य अडचणीत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित ....

असणाऱ्या उद्योगावर बोलणारे केवळ एकच होते आणि ते सुध्दा दादाकडे जाऊन आग्रह धरल्यानंतर संधी मिळाली. दादांची आचारसंहिता भन्नाट आहे, हे बोलू नका, तेवढेच बोला, कागदे काढून घेतली.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आमच्या पक्षांच्या वतीने माननीय मंत्री उत्तर देणार आहेत म्हणून आम्ही या विषयावर बोललो नाही. आम्ही बोललो नाही याचा अर्थ आम्हाला त्या प्रश्नाबद्दल आस्था नाही असा गैरसमज करू नका.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आस्था असणे वेगळे आहे आणि त्या धोरणाशी आपले नाते असणे हे वेगळे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी साखर या विषयावर बोलावे.

(अडथळा)

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आस्था असण्याचा प्रश्न नाही. त्या प्रश्नाशी, साखरधंद्याशी, लोकांबरोबर आपले काय नाते आहे हे महत्त्वाचे आहे. मुंबई, पुणे अशा महानगरांत राहून इतक्या सहजासहजी नाते जुळत नाही. आपला सहभाग किती आहे हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. अनेक वक्त्यांनी मुद्दे मांडले आहेत. अलाईड उद्योग जसे वीज निर्माण करणारा उद्योग, डिस्टिलरिज आहेत. तुमचा दृष्टीकोन महत्त्वाचा आहे.

(सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे बसून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शांत बसावे. मला बोलू द्यावे. आपण सरळसरळ टॉटिंग करू लागला आहात. कमाल आहे. सत्तेत आला आहात. तुम्ही ज्येष्ठ सदस्या म्हणून आम्ही तुमच्याकडे पाहतो. पाचवीच्या वर्गातील मुलासारखे टॉटिंक करणे बरोबर नाही. कमाल आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तुम्हाला प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नाही.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आपआपसातील वाद घरी मिटवावेत.

**सभापती** : साखर गोड असते. सन्माननीय सदस्यांनी साखरेवर गोड बोलावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा विषय घेऊन सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आले आहेत. परंतु हा विषय भटकत चालला आहे. आपण या संदर्भातील गणित कसे बसविणार आहात हे समजून सांगावे. याचे सूत्र काय राहणार आहे ? भाव 1850 रूपयांपर्यंत गेला आहे. आम्ही वृत्तपत्रांत वाचत आहोत, व्यापारी म्हणत आहेत. 8-10 दिवसांत 1600 रूपयांपर्यंत भाव गेला तर आमचा एफआरपी तर 1600 रूपये निघतो. आता आम्ही ऊसतोड कामगारांना काय द्यायचे ही चिंतेची बाब आहे. हंगाम निघून गेला आहे. सन 2015-16 च्या हंगामाला समोर जायचे म्हटले तर कारखाने सुरूकरता येणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर यांनी ठोंबरेंचा आदर्श सांगितला, अजून कोणाचा आदर्श सांगितला. मला वाटते की, ते विसरले आहेत. गेल्या सोमवारच्या वृत्तपत्रात माननीय श्री. ठोंबरे साहेबांनी मुलाखत दिली आणि त्यामध्ये सांगितले की, एफआरपीचे सूत्र जर हे राहिले तर सन 2015-16 ला मी कारखाना सुरूकरणार नाही. त्यांनी ते अतिशय स्पष्टपणे शासनाला ठणकावून सांगितले आहे. राजकारणाचा 'र' ही यामध्ये अपेक्षित नाही. हा कारखना नको, ती बँक नको, असे म्हटले जाते. नेमके दुखणे काय आहे, शल्य काय आहे, कोणत्या गटातटाचे कारखाने आहेत म्हणून हे चालले आहे. काँग्रस व राष्ट्रवादी काँग्रेसची कारखानदारी आहे म्हणून हे चालले आहे. येथे काम करणाऱ्या मजुरांना जात, पक्ष, गट, पंथ नाही. आपण त्यांच्यावरील अवलंबत्व पहा. मी तुम्हाला नव्याने सांगण्याची गरज नाही. आपण कोल्हापूरचे प्रतिनिधीत्व करीत आहात ज्याकडे राज्यातील साखर धंद्यातील आगार म्हणून पाहिले जाते. तुम्हाला नव्याने साखरधंद्याचा परिचय करून देणे चुकीचे होईल. मी विनम्रपणे सांगू लागलो आहे. गट-तट-पक्ष यांचे राजकारण नको. अगोदरच्या वक्त्यांनी संगितले की, या धंद्याशी ज्यांची नाळ जुळली आहे, ज्यांचे नाते आहे, त्या लोकांना मोठे निर्णय करताना यदाकदाचित आपण विश्वासात घेतले जसे अगोदरच्या सरकारने केले आहे तर बरे होईल. अगोदरच्या सरकारने चुकीचे निर्णय केले आहेत असे तुमचे म्हणणे आहे का ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** या चर्चेची वेळ मी 20 मिनिटांनी वाढवीत आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन 2006 च्या हंगामात साखरेचे उच्चांकी उत्पादन झाले. त्यानंतर सुध्दा साखरेच्या किमती नियंत्रित नव्हत्या. त्यावेळी साधारणपणे 50 लाख टन साखरेचा बफर स्टॉक सलग दोन वर्षे ठेवण्यात आला. मी काही नवीन सांगतो आहे, असे नाही. आपणही साखर धंद्याशी निगडित आहात. आपल्याला सर्व वस्तुस्थिती माहीत आहे. 60 लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय त्यावेळी झाला होता. ही निर्यात करीत असताना त्या निर्यातीसाठी अनुदान देण्यात आले होते. 4 वर्षासाठी 3800 कोटी रुपयांचे व्याजमुक्त कर्जही देण्यात आले होते. आज आपण बँकांकडे विचारणा करा. सन 2006-2007 मध्ये देण्यात आलेल्या कर्जापैकी 92 ते 95 टक्के कर्ज पूर्णपणे वसूल झालेले आहे. मंत्री महोदयांनी या साखर धंद्यावर एवढा गैरविश्वास दाखवू नये. साखरेची निर्यात केल्यामुळे बाजार स्थिर राहिला. आज मात्र असे झाले नाही. साधारणपणे 4 महिन्यांपासूनचा आलेख आपण पाहिला तर असे कधीच झाले नाही. केवळ अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी घाईगडबडीत आपण सभागृहात आला आणि निर्णय जाहीर केला की, 2 हजार कोटी रुपयांची तरतूद करुन एफआरपी मिटआऊट करण्यासाठी राज्य शासन मदत करणार आहे. त्यानंतर साखरेचे दर आठवडाभरासाठी मर्यादित स्वरुपात 200 रुपयांनी वाढले. त्या दिवसापासून आजपर्यंत तो आलेख सतत वेगाने आणि गतीने खाली येत चालला आहे. जो साखरेचा दर 2800, 2900 रुपये होता तो 1700, 1750, 1800 रुपयांपर्यंत खाली येत आहे. हे सहज होत नाही.

सभापती महोदय, नेते मंडळी बोलत असताना आम्ही ऐकले आहे की, 30 टक्के उत्पादकांना सांभाळायचे की, 70 टक्के ग्राहकांना सांभाळायचे. पण एक आमचा नेता आहे, ज्यांचा आम्हाला अभिमान वाटतो. श्री.शरद पवार साहेब स्वतः सभागृहात बोलले की, उद्या जर का तुम्हाला 30, 35 रुपये दराने साखर खाण्याची वेळ आली तर ती सोसा, शिका, त्याची तयारी ठेवा. एकदा पार्लमेंटमध्ये आंदोलन झाले. काही खासदार कांद्याच्या माळा घालून सभागृहात आले. श्री.पवार साहेब कृषी मंत्री म्हणून उठून उभे राहिले आणि म्हणाले की, "आज कांद्याचे दर वाढलेले आहेत म्हणून तुमच्या डोळ्यात पाणी आले आहे, पण जो उत्पादक आहे, त्याच्या घरात

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित........

आज दिवाळी साजरी होत आहे, ते तुम्हाला सहन होत नाही." आज आपण 50 रुपयांचा चहा पितो आणि आमच्या खेडेगावात 1 ते 2 रुपयांना चहा मिळतो. आज आपल्याला 50 रुपयांचा चहा परवडतो, 85 रुपये लिटरने दूध परवडते, पण 30 रुपये, 35 रुपये दराची साखर परवडत नाही, याचा विचार आपण सर्वांनी केला पाहिजे. ज्या 70 टक्के ग्राहकांबद्दल आपण बोलत आहात ते 70 टक्के ग्राहक या 33 टक्के उत्पादकांवर अवलंबून आहेत. त्यांचे उत्पादन बाजारात आले नाही तर ग्राहकाला काही किंमत राहणार नाही. साखर उत्पादक असेल, कापूस उत्पादक असेल, सोयाबीन उत्पादक असेल, या उत्पादकांना जगविण्याचे काम, कर्तव्य, उत्तरदायित्व हे आज तुमचे आहे. "अच्छे दिन"ची घोषणा तुम्हीच केली आहे. हे "अच्छे दिन" कधी येणार आहेत ? हा साखर धंदा त्याची वाटत बघतो आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदय या साखर धंद्यावरील अवलंबत्वाची कल्पना करु शकणार नाहीत. केवळ शेतकऱ्यांचेच अवलंबत्व आहे, असे नाही. यावर ड्रायव्हर, क्लिनर, ऊस तोडणी कामगार, गाड्या, बैलगाड्या चालविणारे सर्व अवलंबून आहेत. एक महिन्याअगोदर त्यांना गाडीची देखभाल व दुरुस्ती करायची असते. हे ग्रामीण भागातील अवलंबित्व आहे. हे पैसे तेथपर्यंत जातात. ग्रामीण भागात, दुर्गम भागात ज्या ठिकाणी काही पिकत नाही, विकत नाही, ते लोक हंगामात येतात आणि काम करतात. तेथे काही पिकले नाही, विकले नाही आणि येथेही काही मिळाले नाही तर आत्महत्येशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय राहणार नाही. ही वेळ मी स्वत: अनुभवलेली आहे, पाहिली आहे.

सभापती महोदय, मी एका आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेटावयास गेलो. आत्महत्या झाल्याच्या तिसऱ्या दिवशी भेटावयास गेलो. आमच्या भागात तिसऱ्या दिवशी सावडले जाते. सावडले जाण्याच्या अगोदर सकाळी 8 वाजता त्यांना भेटावयास गेलो. त्या तिसऱ्या दिवशी त्यांच्या घरच्यांनी मला म्हणावे की, "अमर आम्ही जी काही कागदपत्रे पाहिजे, ती दिलेली आहेत, तलाठी आला होता." रडत रडत त्या लेकरांनी सांगितले. कारण त्यांची मुले शिकण्यासाठी शाळेत होती. आमचे काहीही होओ, त्या पैशातून त्या मुलांची फी भरता येईल का, किमान ते फडक तर खाली

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.....

पडाव, हा त्यांचा उद्देश होता. ही परिस्थितीची अपरिहार्यता होती. मेल्यानंतर काही मिळेल, या हेतूने त्यांनी मागितले नव्हते. ही परिस्थितीची अपरिहार्यता होती. घरातील कर्ता माणूस गेला, उद्या शाळेची फी भरली नाही तर पोरांचे शिक्षण थांबेल, अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये हा साखर धंदा चालणार असेल काळही तुम्हाला माफ करणार नाही.

सभापती महोदय, आज या सरकारने काय दिले आहे ? आज आपल्याला 14 लाख टन साखर निर्यातीसाठी केंद्राने अनुदान जाहीर केले आहे. त्यापैकी 3 लाख टन कच्ची साखर निर्यात केली गेली आहे. 2 लाख 58 हजार टन कच्ची साखर आणि पांढरी साखर निर्यातीसाठी वाट बघते आहे. आपण ती साखर का निर्यात करु शकलो नाही ? आंतरराष्ट्रीय बाजापेठेतील भाव पडलेले आहेत. एवढी वाईट आणि दारूण अवस्था या धंद्याची झाली आहे.

सभापती महोदय, मी एका चर्चेच्या राईट टू रिप्लॉयच्या माध्यमातून बोलत असताना सांगितले होते की, बाजारभाव तुमच्या एमएसपीवर अवलंबून नाही. शेती विषयक धोरणंवर अवलंबून आहे. आम्ही कापूस 6 ते 7 हजारांनी विकला. त्यावेळी तुमचा एमएसपी 4050 होता. मग आम्ही एमएसपीने कापूस द्यायचा होता का ? पण त्यावेळचे शेती धोरण वेगळे होते. त्यामुळे आमचा कापूस 6800 ते 7250 ला गेला. त्यावेळी कापूस सलग 15 दिवस 7250 रुपयांनी गेला. 100 क्विंटल कापसाला 7 लाख 20 हजार रुपये मिळाले. आज 100 क्विंटल कापसाला किती मिळत आहेत ? फार फार तर 2 लाख 50 हजार रुपये मिळतील. तुम्ही 3900 भाव सांगत आहात. पण पदरात काय येत आहे ? याच पध्दतीने काम करणार असाल तर शेतकऱ्यांच्या पदरात काही पडेल असे वाटत नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांचे भाषण ऐकत होतो. त्यांनी सांगितले की, अनेक लोकांनी या उद्योगावर इमले बांधले आहेत. ती यादी सभागृहात आली तर कळेल की, ते इमले बांघणारे कोणत्या रंगाचे, कोणत्या पक्षाचे होते. हे आज या चर्चेतून अभिप्रेत नाही. हा धंदा अडचणीत आला आहे, व्यक्ती अडचणीत आलेली नाही. या धंद्यावर अवलंबून असणारे असंख्य, लाखो लोक आहेत. लक्षावधींची बिरादरी आहे. शेतकऱ्यांची जात अडचणी आलेली आहे. ते

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

कोणत्या गटाचे, तटाचे किंवा पंथाचे नाहीत. त्यांचे या धंद्यावरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणावर आहे. सन्माननीय सदस्यांनी बोलत असताना यांनी इमले बांधले, त्या लोकांना बांधले, असे केले, तसे केले, असे सांगितले. पण त्यांनी ही उदाहरणे देखील द्यावीत की, काही लोकांचा साखर धंद्यातील सहभाग, त्यांनी स्वत: या साखर धंद्यात झोकून दिलेले आहे, काम केलेले आहे. त्यांचा उल्लेख केल्याशिवाय आपल्याला महाराष्ट्राचा इतिहास लिहिता येणार नाही. व्देष जरुर असावा, पण व्देषाचे जोडे त्या दरवाजा बाहेर ठेवणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, हा साखर धंदा अडचणीतून बाहेर काढावयाचा असेल तर एक सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन आपण निर्णय केला तरच तो अडचणीतून बाहेर निघू शकेल. हे फक्त ठोंबर साहेब म्हणाले नाही. येथे सभापती महोदय देखील आहेत.

सभापती महोद, या राज्याला लागून कर्नाटक राज्य आहे. आमच्याकडील अधिकचा मजूर त्या राज्यात ऊसतोडीला जातो. सव्वा लाखाची उचल एका कोयत्याला मिळते.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

एक कोयता म्हणजे किती ? नवरा आणि बायको असेल तर त्याला आपण एक कोयता म्हणतो. अगोदर 1.25 लाख रुपये, 1.50 लाख रुपये एवढी उचल मिळत होती. परवा दिवशी वाटप करताना ती उचल कोठपर्यंत आली ? मी माननीय सहकार मंत्र्यांना सांगू इच्छितो की, 35 हजार रुपयांपासून सुरुवात केली. 1.25 लाख रुपयांची उचल फेडून त्या मुकादमाकडे 20-25 हजार रुपये निघत होते. म्हणजे मजूर एवढी अपार मेहनत, कष्ट करणारे आहेत. परंतु, परवा 35 हजार रुपयांपासून सुरुवात केलेली आहे.

सभापती महोदय, आज कर्नाटक राज्यातील एका वर्तमानपत्रात बातमी छापून आलेली आहे. आमच्याकडे पवळाचीवाडी नावाचे गाव आहे. तेथील एका मुकादमाने सांगितले की, कर्नाटक राज्यातील खाजगी साखर कारखान्यांनी केंद्र आणि राज्य शासनाने एफआरपी, शेती आणि साखर उद्योगाच्या संदर्भात धोरण बदलले नाही तर आम्ही कारखाना सुरु करणार नाही. त्यांचे ऐकून श्री.ठोंबरे साहेब म्हणाले आणि आमच्या शेजारी असलेल्या कारखान्यांमध्ये देखील आम्ही आमचे कारखाने सुरु करणार नाही, अशी चर्चा सुरु आहे. का ? कोणत्या जाचक अटी घातलेल्या आहेत ? हजार कोटी रुपयांचे अनुदान देताना त्या संचालक मंडळाची सूपर्ण मालमत्ता लिहून घ्यायची ? म्हणून संचालक मंडळ म्हणते की, हे कशासाठी करायचे, कशासाठी लिहून घेता, काय करायचे ते करुन घ्यावे. पूर्वी असे होत नव्हते. परंतु, आपला दृष्टीकोन सकारात्मक असणे अतिशय गरजेचे आहे. मी माननीय सहकार मंत्र्यांना अतिशय विनम्रपणे विनंती करतो की, आपला या संदर्भातील दृष्टीकोन बदलावा, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझ्या भाषणाचा समारोप करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर साहेबांनी अंबानी, टाटा, अदानी यांच्या नावाचा उल्लेख केला. आपण चळवळीतून आलेले कार्यकर्ते आहात. मी तुमचा आदर करतो. तुमचे गेवराई तालुका, बीड जिल्हा आणि संपूर्ण मराठवाड्यात बऱ्यापैकी काम आहे. आम्ही वेळोवेळी वर्तमानपत्रातून तशा बातम्या वाचत असतो. आपण एकदा हे करुनच बघावे. तुम्हाला अदानी, टाटा, रिलायन्स ज्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.........

कोणाला कारखाना चालवायला द्यायचा आहे तो देऊन बघा. हे सर्व तुमच्या आजुबाजूलाच बसलेले आहेत. जे कारखाने आजारी पडलेले आहेत त्यापैकी एक कारखाना पूर्ण मदत देऊन या मल्टिनॅशनल पैकी कोणाला तरी चालविण्यासाठी द्यावा. यामध्ये मोनोपोली आल्यानंतर याच मोठ्या ठेणग्यांनी काय काय केलेले आहे, हे मी नव्याने सांगण्याची गरज नाही. आपण त्यांच्या वीज कंपन्यांचे विजेचे दर चेक करा. को-जनरेशनच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या विजेचे दर आणि त्यांच्या कंपन्यांचे विजेचे दर काय आहेत, हे एकदा तपासून पहावे. त्यानंतर तुम्हाला त्यांचे आणि आपले नाते कळेल.

सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये अत्यंत महत्वाच्या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. मी माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेबांना नम्रपणे विनंती करतो की, सहकार क्षेत्राला ऊर्जितावस्थेत आणण्याचा विषय तर नंतरचा आहे, परंतु, यामध्ये थोडा जीव ठेवायचा असेल तर आपल्याला या संदर्भात लवकर निर्णय घ्यावा लागेल. कारण, पुढील हंगाम सुरु करायचा असेल तर आपल्याला या संदर्भातील धोरणात्मक निर्णय आज करावे लागतील आणि दोन पावले पुढे जाऊन साखर उद्योगातील जे जाणकार असतील, मग त्यांच्या पक्षाचा रंग कोणताही असो, हा केवळ कोल्हापूर, सांगली, साताऱ्याचा विषय नाही. हा संपूर्ण राज्याचा विषय आहे. म्हणून राज्य पुन्हा त्याच ऊर्जितावस्थेत आणण्याच्या दृष्टीने आपल्याला सकरात्मक पाऊल उचलावयाचे असेल तर आपण सकारात्मक निर्णय करण्याच्या हेतूने या जाणकारांना पुन्हा एकदा या चर्चेत समाविष्ट करुन आपण नेमका कोणता निर्णय घेणार आहात ? आपल्याला महत्वाच्या कामानिमित्त बाहेर जायचे असल्यामुळे आपण सांगितले की, मी 10 मिनिटात माझे उत्तर पूर्ण करणार आहे. परंतु, आपण तसे न करता नियम 97 अन्वयेच्या चर्चेला न्याय द्यावा, अशी आशा आणि अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सभागृहात साखर उद्योगाशी संबंधित विषयावर चर्चा सुरु आहे. माझ्या भावना मी थोडक्यात मांडणार आहे.

मी स्वत: साखर उद्योगाशी निगडित आहे याची माननीय सहकार मंत्र्यांना कल्पना आहे. आपण 8-10 दिवसापूर्वी माझ्या दालनात बैठकीसाठी आला होता. त्यावेळी आपली या विषयावर सखोल चर्चाही झालेली आहे. मला अशीही माहिती मिळाली आहे की, परवा आपण माननीय श्री.शरद पवार साहेबांबरोबर माननीय पंतप्रधानांची भेट घेण्यासाठी दिल्ली येथे गेला होता. तेथे या संदर्भात सकारात्मक चर्चा झाली असावी आणि काही निर्णय होण्याची शक्यता आहे.

सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या विरुद्ध मला बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील हे चांगल्या प्रकारे कारखाने चालवित आहेत. पण मी आजारी कारखान्यांचा एक्स्पर्ट आहे. दुसऱ्यांनी आजारी पाडलेले कारखाने मी 10-15 वर्षापासून चालवित आहे. परंतु, माझे तरुण सहकारी श्री.अमरसिंह पंडित यांनी सांगितला तोच खरा मुद्दा आहे. यामध्ये राजकारण हा विषय राहिलेला नाही. फक्त ऊस बागायतदारच या क्षेत्राशी संबंधित आहेत, अशातला भाग नाही. एखादा कारखाना तोट्यात असेल तर त्या तालुक्यातील शेतीशी संबंधित सोडून इतर लोकांची फायनान्शियल सायकल त्या कारखान्यावर अवलंबून असते. मला स्वत:ला सर्वात जास्त धोकादायक परिस्थिती अशी दिसते आहे की, आपण सातारा जिल्हा बँकेत आला होता. आपण सातारा जिल्हा बँकेचे कौतुकही केले होते. याच सातारा जिल्हा बँकेच्या माध्यमातून आमच्या 5-6 कारखान्यांनी एफआरपीची कमी रक्कम का असेना, पण ती दिलेली आहे आणि त्यातून नवीन कर्ज वाटप केले आहे. आता जर हे कारखाने सुरु झाले नाहीत आणि 15 दिवसांनी या पैशांची परतफेड झाली नाही तर बँका अडचणीत येतील. नवीन हंगामही सुरु होणार नाही आणि वसुलीही होणार नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे गाव पातळीवरील सोसायट्या देखील अडचणीत येणार आहेत. एकंदरीत राज्याची संपूर्ण ग्रामीण भागाची थ्री टायर सिस्टीम अडचणीत येणार आहे. कोण कोणत्या रिजनचा आहे याचा त्याच्याशी काहीही संबंध राहिलेला नाही. पश्चिम महाराष्ट्रात सर्वात जास्त साखर कारखाने आहेत. परंतु, हंगामाच्या वेळी बीड जिल्ह्यातील अर्धे

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती........**

लोक त्या भागात आलेले असतात. आमच्याकडे कर्नाटक राज्यातून माणसे येतात. आमच्या माण तालुक्यातील लोक इतर ठिकाणी जातात. या सर्व बाबींचा विचार करुन आपण सकारात्मक उत्तर द्यावे, अशी भावना मी व्यक्त करतो.

--------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : माननीय सहकार मंत्र्यांचे उत्तराचे भाषण पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि इतर सन्माननीय सदस्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी तांत्रिक बाबींमध्ये शिरणार नाही. परंतु, या विषयावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर आणि आपली भूमिका ऐकल्यानंतर आपल्या राज्यातील साखर उद्योग व्हेंटिलेटरवर आहे की काय, असे वाटत आहे. राज्यातील व्हेंटिलेटरवर असलेल्या साखर उद्योगाला पुन्हा सन्मानाने जगवायचे असेल तर त्यासाठी जे काही करता येण्यासारखे आहे ते केले पाहिजे. आपण सांगितले की, माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत पाटील साहेबांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांना बरोबर घेऊन माननीय पंतप्रधानांची भेट घेतली आणि संकटात सापडलेल्या साखर उद्योगाला पुन्हा ऊर्जितावस्था कशा प्रकारे देता येईल, वाचविता येईल, याबाबत सकारात्मक चर्चा झाली, असे मी गृहीत धरतो.

सभापती महोदय, राज्यातील साखर कारखानदारीचे आगळेवेगळे महत्व आहे, हे मी वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. राज्याच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक जडणघडणीवर प्रभाव टाकणारे आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मग ऊस उत्पादक शेतकरी, इतर शेतकरी, ऊस तोड कामगार किंवा या संदर्भातील वाहतूक व्यवस्था, मार्केटिंग, ऊसाच्या चिपाडापासून साखर कारखान्यात निर्माण होणारी वीज, डिस्टिलरी, व्यापारी, ग्राहक ही संपूर्ण व्यवस्था अत्यंत महत्वाची आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत साखर कारखानदारी महत्वाची भूमिका पार पाडते. साखर उद्योग संकटात आला तर राज्याची, देशाची अर्थव्यवस्था संकटात येईल. म्हणून ही कारखानदारी वाचविणे अत्यंत आवश्यक आहे. ती कारखानदारी कोण चालविते, हा भाग महत्वाचा नाही. राज्याची अर्थव्यवस्था चांगल्या प्रकारे सुदृढ राहते किंवा नाही, हे जास्त महत्वाचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, रामहरी रुपनवर यांनी या चर्चेत सहभागी होऊन अत्यंत मौलिक सूचना केलेल्या आहेत. केवळ एमएसपी लक्षात न घेताच

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सरकारचे धोरण काय आहे त्यानुसार एमएसपी ठरली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ज्यावेळी मुंबईतील गिरणी कामगारांची अशी अवस्था झाली त्यामुळे सर्व गिरणी कामगार रस्त्यावर उतरले होते. अशा प्रकारचे प्रलयकारी संकट साखर उद्योगावर येऊ नये याची दक्षता शासनाने घ्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, मी जाता जाता एवढेच म्हणेल की, पेटलेल्या प्रतिभेने जळणाऱ्या मेनबत्ती वितळणाऱ्या मेनाला प्रश्न असा विचारला की, धागा जल रहा है, पिघल तू क्यूं रहा है. जळणाऱ्या धाग्यापासून वितळणारे मेन सांगते की, जिसको दिल में बैठा लिया उसको जलता हुआ देखा नहीं जाता, साखर उद्योग हा गोड आहे, गोड माणसे यामध्ये आहेत, मंत्री महोदय, आपणही या गोडीत भर टाकावी अशी विनंती करतो व साखर उद्योगाला वाचविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न आपण करावेत, अशी विनंती सरकारला करतो व माझे भाषण संपवितो, धन्यवाद.

------------

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये राज्यातील आर्थिक दृष्ट्या अतिशय महत्वाच्या व परिस्थितीमुळे ज्वलंत झालेल्या विषयावर खूप सविस्तर चर्चा सन्माननीय सदस्यांनी केली आहे. हे संकट कशामुळे निर्माण झाले, याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी विस्तृत माहिती दिली आहे, त्यामुळे त्याच्या खोलात मी जात नाही. आपणा सर्वांना माहिती आहे की, यामध्ये साखर कारखानदार, ऊस उत्पादक किंवा सरकारचा देखील दोष नाही. एकूण जागतिक परिस्थिती बदलल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यातील तज्ज्ञ लोक असे म्हणतात की, अशी उलटी परिस्थिती निर्माण झाली असताना पुन्हा दोन वर्षानंतर साखर प्रतिकिलो 35 ते 40 रुपये होईल, असे देखील जागतिक परिस्थितीमुळे होणार आहे. सुरुवातीपासून सरकारचा प्रयत्न सकारात्मक राहिला आहे. साखर कारखान्याच्या बिघडत चाललेल्या परिस्थितीबाबत काही सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले आहे की, या क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांचा सल्ला सरकारने घेतला पाहिजे. आपल्या माहितीसाठी मी सांगतो की, पुणे येथे संपूर्ण दोन दिवस वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट येथे साखर परिषद घेतली होती, येथे बसलेले काही लोकप्रतिनिधी त्या परिषदेला उपस्थित होते. या परिषदेचे उद्‌घाटन माननीय श्री.शरद पवार यांनी केले होते, त्यावेळी माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. मी दोन दिवसांतील सर्व सत्रांना उपस्थित होतो. भविष्यातील अनेक प्रकारची चर्चा त्या परिषदेमध्ये झाली आहे. आता जे संकट निर्माण झाले ते कशामुळे झाले, त्यावर काय करता येईल याचा विचार आपण सर्व करीत आहोत. परंतु हे संकट का आले याचे तात्पुरते कारण जागतिक संकटाचे असले तरी याचे मुख्य कारण आपली साखर कारखाने ॲडव्हॉन्स टेक्नॉलॉजिकडे वळली नाहीत, इथेनॉल व लिक्वीड शुगरकडे आपण गेलो नाही, अशा खूप बाबी यामध्ये आहेत त्यावर परिषदेमध्ये सविस्तर चर्चा झाली आहे.

सभापती महोदय, हे सरकार शहरी लोकांचे आहे, यांना ग्रामीण भागातील समस्या कळत नाही अशातला भाग नाही. मी सुरुवातीला आपणा सर्वांना नम्रपणे सांगू इच्छितो की, यामध्ये सरकारचा कोणताही हेतू वाईट नाही, हे सर्व प्रश्न सरकारला कळतात. साखर कारखानदारी संपली तर ऊस उत्पादक शेतकरी व त्याला सहयोगी असणारे उद्योग संपतील. यामध्ये ऊस तोड कर्मचारी आहेत, ऊस वाहतूक करणारा वाहतूकदारापासून साखर कारखान्याच्या बाहेर असणाऱ्या हॉटेलपर्यंत विषय मांडण्यात आले आहेत. नॉन फार्मर देखील या धंद्याशी जोडले गेले आहेत. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

सर्व बाबी सरकारला कळतात. ही कारखानदारी वाचविण्याच्या दृष्टीने सरकार सत्तेवर आल्यापासून प्रयत्न करीत आहे. साखर कारखानदारी टिकली पाहिजे, सहकार टिकला पाहिजे हा प्रश्न नेहमी सरकारचा आहे. त्यामुळे अशा अडचणीच्या काळात कोणाचीही उणीदुणी काढण्याची इच्छा नाही. साखर कारखाने आतापर्यंत नफ्यात होती तेव्हा साखर 50 रुपये झाली होती त्यावेळी तुम्ही का बचत केली नाही, रिझर्व्ह फंड का तयार केला नाही. सुरुवातीच्या काळात अशी मांडणी करण्यात आली होती.

सभापती महोदय, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या कारखान्याकडे 97 कोटी रुपयांचे डिपॉझीट आहेत, श्री.विक्रमसिंह घाटगे यांचा कारखाना देखील उत्तम स्थितीत आहे, परंतु नंतर साखरेचे दर ज्या प्रमाणात कोसळत गेले, तेव्हा सरकारने ही बाब शेतकरी संघटनांना सांगितली होती. शेतकऱ्यांना देखील याबाबत माहिती देण्यात आली होती. साखरेचे दर इतके खाली आले असताना आपणाला साखर कारखानदारावर कडक कारवाई करता येणार नाही. डिसेंबर मधील हिवाळी अधिवेशनाच्या वेळी साखर कारखानदारीशी संबंधित आमदारांची बैठक घेतली, त्यावेळी साखर आयुक्त श्री.शर्मा यांनी त्यांना समजावून सांगितले की, हे खरे आहे की, आपणाला शेतकरी संघटनेचे आंदोलन फेस करावे लागेल. त्याबाबत तुम्ही कारवाई का करीत नाही. परंतु आपणाला हे माहिती आहे की, साखर कारखाने एफआरपी का देत नाही. त्यामुळे ही प्रक्रिया अत्यंत संथगतीने घेतली पाहिजे. कारखान्याने ऊस घेतल्यानंतर एफआरपी 14 दिवसात द्यावी लागते, नाही दिली तर फौजदारी खटला दाखल करता येतो. 14 दिवसानंतर व्याज द्यावे लागते, असे असून देखील अगदी गळ्याशी आल्यावर ज्या कारखान्यांनी 50 टक्के पेक्षा कमी एफआरपी दिली अशा केवळ आठ कारखान्यांवर जप्तीची कारवाई करावी असे आदेश जिल्हाधिकारी यांच्याकडे दिले आहेत, जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे की, शक्यतोवर त्यांच्याकडून पैसे निघतील असे प्रयत्न करावेत, जप्त्या करुन नका, जप्त्या करुन आपणाला कारखाना संपवायचा नाही. संकटे लक्षात घेऊन मदत करण्याची सरकारची भूमिका आहे, कडक कारवाई केली नाही ही एक प्रकारची मदत झाली आहे. दुसऱ्या बाजूला निधी म्हणून मदत करण्याचा विषय आला तो निर्णय डिसेंबरच्या अधिवेशनात घेण्यात आला होता. त्यावेळी 870 कोटी रुपयांचा परचेस टॅक्स माफ केला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील

आहे. मला हे मान्य आहे की, खूप गोंष्टी केंद्रामध्ये उशिरा घडल्या आहेत, त्याचा परिणाम देखील काही वेळेला झालेला आहे. रॉ शुगरला अनुदान देण्याचा निर्णय केंद्र सरकारने डिसेंबरमध्ये घेतला होता. त्यावेळी राज्य सरकारचा निर्णय तयार होता. केंद्र सरकार चार हजार रूपये रॉ शुगर एक्सपोर्ट करण्यसाठी अनुदान देत असेल तर राज्य शासन एक हजार रूपये देणार होते. असे केले असते तर महाराष्ट्रातील रॉ शुगर थोडी बाहेर गेली असती. केंद सरकारचा निर्णय उशिरा झाला. यामध्ये जो बेनिफिट मिळावयास पाहिजे होता तो एक्सेस शुगरला मिळाला नाही. महाराष्ट्राची साखरेची गरज 85 लाख मे. टन आहे, आपले उत्पादन 105 मे.टन झाले आहे. आता आपणाकडे 30 लाख मे.टन साखर एक्सेस आहे, सिझन सुरु झाला, त्यावेळी ओपनिंग बॅलन्स 14 लाख मे.टन अशा प्रकारे 44 लाख मे.टन शुगर आपणाकडे जास्त होती. रॉ शुगर बाहेर जावी असा सरकारचा प्रयत्न होता. केंद्र शासनाचा निर्णय उशिरा झाल्यामुळे ती बाब आपणाला वेळेत करता आली नाही. जे कारखाने रॉ शुगर एक्सपोर्ट करतील त्यांना प्रतिटन एक हजार रूपये अनुदान दिले होते. त्यावेळी एक मुद्दा असा उपस्थित करण्यात आला होता की, को-जनरेशनची बिले वेळेत मिळत नाही.

महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असा निर्णय केला होता की, को-जनरेशनीच सर्व बिले तातडीने काढण्यात यावी. मार्चच्या अधिवेशनात एकाच दिवशी 56 कोटी रूपयांची बिले काढण्यात आली होती. त्यानंतर असा निर्णय करण्यात आला की, को-जनरेशनचे बील 40 दिवसात दिले पाहिजे. असे अनेक चांगले निर्णय सरकारने केले आहेत. या कामासाठी अनेक वेळा केंद्रात जाऊन चर्चा करण्यात आली आहे. हा प्रश्न केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नसून महाराष्ट्रासाठी 2000 कोटी रूपये देऊन टाका व हा प्रश्न सुटेल असे नसून संपूर्ण देशभरात म्हणजे उत्तरप्रदेश, कर्नाटक राज्यात हा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्रात 82 टक्के एफआरपी देण्यामध्ये आपण यशस्वी झालो आहे. यामध्ये कारखानदारांनी काही प्रयत्न केले, आपण त्यांच्या मागे लागलो, कायद्याचा बडगा दाखविला, असे अनेक प्रकारे प्रयत्न करण्यात आले आहेत. आज उत्तरप्रदेश व कर्नाटक मध्ये अत्यंत वाईट परिस्थिती आहे. देशामध्ये एकूण 19 हजार कोटी रूपये ऊस उत्पादकांचे देणे बाकी आहे. यात महाराष्ट्रातील 3200 कोटी रूपये देणे बाकी आहे. जवळपास 16

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

हजार कोटी रुपये उत्तर प्रदेश व कर्नाटक व इतर राज्यांची द्यावयाची आहेत, संपूर्ण देशात हा एक कठीण प्रश्न निर्माण झाला आहे. केंद्र शासन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु हा प्रश्न सुटत नाही. केंद्र शासनाने आता सहा हजार कोटी रुपयांचे स्वॉफ्टलोन जाहीर केले अहे. महाराष्ट्र राज्याला यातून 2189 कोटी रुपयांचे कर्ज येणार आहे, ते सर्व कर्ज साखर कारखान्यांनी घेतले पाहिजे. यामध्ये काही अडचणी आहेत, हे कर्ज घेतांना साखर कारखान्याच्या बोर्डाला त्यांची प्रॉप्रर्टी मॉरगेज करावी लागणार आहे. यामध्ये डायरेक्टर यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही आमची खाजगी प्रॉपर्टी कशाला मॉर्गेज ठेवावी. अशा प्रकारचा मुद्दा साखर कारखान्याच्या डायरेक्टर यांनी उपस्थित केलेला आहे. या रकमचे सर्व व्याज सरकार भरणार आहे. प्रॉपर्टी मॉर्गेज ठेवण्याची बँकेची अट असेल तर ती पूर्ण करायला पाहिजे. यासंदर्भात मंत्रिमंडळात चर्चा झाली आहे की, काही कारखान्यांना प्रॉपर्टी मॉर्गेज करण्यामध्ये अडचण येऊ शकते. अशा कारखान्यांना शासन हमी देणार आहे. परंतु ही कर्जाची रक्कम कारखान्यांनी उचलली पाहिजे. यामध्ये एक अट अशी आहे की, 50 टक्के पेक्षा जास्त एफआरपी ज्या कारखान्यांनी दिली असेल त्याला या कर्जाचा फायदा होईल. कालपर्यंत 50 कारखान्याकडील रिपोर्ट असा आहे की, साखर आयुक्त यांच्याकडून त्यांनी प्रमाणपत्र घेतली आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, 50 टक्के पेक्षा ज्या कारखान्यांनी एफआरपी कमी दिली अशी आठ कारखाने कोणती आहेत व त्यांची नावे काय आहेत ?

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

या कारखान्यांमध्ये महाडिक शुगर, कोल्हापूर माणगंगा, सांगली रयत, सातारा स्वामी समर्थ, आर्यन शुगर, चोपडा साखर कारखाना, जळगाव महाराष्ट्र शेतकरी शुगर यांचा समावेश आहे. या 8 कारखान्यांना वगळून इतरांना केंद्र सरकारने जे 6 हजार कोटीचे पॅकेज दिले त्याचा फायदा मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यातील 22 कारखाने त्या सूत्रामध्ये बसत नाहीत. 2013-14 मध्ये ज्यांनी शुगर तयार केली त्या शुगरच्या 11 टक्के जी क्वांटिटी येईल त्याला 24000 हजार रुपये मे.टनाने गुणून जी रक्कम येईल तेवढे लोन मिळेल. 22 कारखान्यांनी 2013-14 मध्ये साखरेचे उत्पादन केलेले नाही. त्यांना राज्य सरकार मदत करणार आहे. हे 2200 कोटी रुपयांचा भाग आहे त्यातून सॉफ्ट लोन कारखान्यांना मिळावे असा आमचा प्रयत्न आहे. केंद्र सरकारने घोषित केले की, पहिल्या वर्षी 10 टक्के व्याज आम्ही भरणार आहोत, पुढील 4 वर्षांचे व्याज आम्ही भरणार नाही. म्हणून राज्य सरकारने निर्णय घेतला की, पुढील 4 वर्षांचे व्याज महाराष्ट्र सरकार भरेल. 5 वर्षे मिळून 1000 कोटीच्या आसपास व्याजाची रक्कम होईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, 2013-14 मध्ये ज्यांनी रॉ शुगर केलेली आहे, त्या कारखान्यांचे नाव अनुदानाच्या यादीमध्ये आलेले नाही. कारखाने सुरु होते. शेवटी पैसे देत असताना ऊसाचे पैसे द्यायचे आहेत. त्यांनी रॉ शुगर केली आहे, त्यामुळे त्यांचेही नाव अनुदानासाठी पात्र ठरवावे.

श्री.चंद्रकांत पाटील : ज्यांनी शुगर तयार केली नाही त्यांनाही घेत आहोत. केंद्राच्या पॅकेजमध्ये बसणार नाहीत त्यांच्यासाठी राज्याच्या कॅबिनेटमध्ये निर्णय झाला आहे. ज्यांनी या वर्षी शुगर तयार केली त्या कारखान्यांना 11 टक्के क्वांटिटी येईल तिला 24000 रुपयक मे.टनाने गुणून जी रक्कम येईल तेवढे लोन मिळेल. हे आठ कारखाने राहतील, ज्यांची एफआरपी 50 टक्केपेक्षा कमी आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, एफआरपी प्रमाणे आम्ही डिसेंबर महिन्यापर्यंत पैसे दिले. पुढील पैसे देत असताना एफआरपी खाली आली, आणखी खाली आली. साखर आजही शिल्लक आहे. पैसे द्यायला आमचा नकार नाही. एफआरपी प्रमाणे पैसे दिले पाहिजेत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये 2550 रुपये एवढा दर दिलेला आहे.

**सभापती** : कोल्हापूर जिल्हयात जेवढी एफआरपी होती तेवढी कोणीही दिलेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणतात ते योग्य असले तरी सुरुवातीच्या काळात पूर्ण एफआरपी दिली गेली. एका क्षणाला ती थांबली. ती नंतर इतकी थांबली की, टोटलच्या 50 टक्के कॉस्ट केली नाही.

श्री.जयंत पाटील : शेतकरी डिसेंबरला बंद करीत होते. त्यांचे म्हणणे होते की, आम्हाला कमी भाव द्या.

श्री.चंद्रकांत पाटील : तरी सुध्दा या सगळ्या विषयाकडे सकारात्मक भूमिकेतून पाहिले आहे. या 8 कारखान्यांना सुध्दा कशी मदत करता येईल याचा आपण वेगळा विचार करु. 22 कारखाने केंद्र सरकारच्या पॅकेजमध्ये बसत नाहीत, त्यांनाही सॉफ्ट लोन देण्याचा निर्णय सरकारने केला आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे 8 कारखाने जे आहेत, उदा.बार्शी येथील आर्यन या साखर कारखान्यात एक कण साखर शिल्लक नाही. या 8 कारखान्यांमध्ये सुध्दा बायफर्गेशन करावे लागेल. आज तुमच्याकडे साखर शिल्लक आहे, तुम्ही ती विकून एफआरपी देऊ शकता. अशा प्रयत्नांनी हा उद्योग वाचावा यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, दोन तीन सूचना महत्वाच्या आल्या आहेत. त्याला आपणही दुजोरा दिला आहे. आपणही अनेकदा बोललो आहोत. तुमच्या पक्षाची बैठक झाली. ज्या सूचना व्यवहारात आल्याशिवाय पुढील वर्षी हंगाम घेता येणार नाही. त्यालील पहिला मुद्दा हा बँकांनी लोन देण्यासाठी जे आधीचे बँक लोन आहे लोन रिस्ट्रक्चरिंग करुन मिळणे हा विषय आहे. माननीय सभापतींनी उल्लेख केला की, दिल्लीमध्ये एक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये स्वतः पंतप्रधान कार्यालयातील सचिव आले होते. इतक्या गंभीरपणाने माननीय पंतप्रधानांनी या विषयाकडे पाहिले आहे. सगळयाच महत्वाची सूचना ही आहे की, काही झाले तरी रिस्ट्रक्चरिंग ऑफ लोन केले पाहिजे. एक दोन दिवस वाट पाहून मी स्वतः दिल्लीला जाऊन पाठपुरावा करु. या विषयाबाबत नक्की पूर्ण करुन घेता येईल, अशी मला खात्री वाटते. जेणेकरुन किमान पुढील लोन कारखान्यांना मिळू शकेल. ते लोन त्या बँकांनी दिले त्या बँका वाचतील. कर्जाच्या पुनर्गठनाबाबत मी स्वतः कन्व्हीन्स आहे. त्याला पर्याय नाही. ते होईल याची मला खात्री वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : केंद्र स्तरावरुन जे होईल ते होईल. परंतु आपण राज्याची हमी बॅकांना दिली तर आपोआप रिस्ट्रक्चररिंग होईल. ज्या बँकांची कर्जे एनपीए झालेली आहेत, कराडच्या कुमुद सहकारी कारखान्याचे उदाहरण आहे. राज्य सहकारी बँकेने त्यांना पैसे दिलेले नाहीत. म्हणून त्यांचे बँक लेव्हलला खाते तोट्यात आले. आपण या राज्य सहकारी बँकेला या अकौंटला स्टेट गॅरंटी दिली तर आपोआप रिस्ट्रक्चरिंग होईल. शक्यतो तुम्ही माल तारणावर दिलेल्या लोनवर तुम्ही स्टेट गॅरंटी देऊ नये, परंतु जून्या काळात जेथे साखरेचे भाव कमी झाले होते तेथे अशी कन्व्हर्जन्स झालेली आहेत. आपल्याला ते शक्य आहे आणि दिल्लीतून जे येऊ घातले आहे, ज्याची आपल्याला गॅरंटी वाटू लागली आहे ते आपण करुन घ्यावे.

श्री.चंद्रकांत पाटील : रिस्ट्रक्चरिंग ऑफ लोन या विषयाबाबत आपण म्हटल्याप्रमाणे राज्याला करता येईल. मी तपासून घेतो. आज दिवसभरामध्ये कन्फर्मेशन मिळाली नाही. रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेशिवाय नाबार्ड परवानगी देत नाही, स्वतःहून कर्जाचे पुनर्गठन करु शकत नाही. माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे बँक व्यवहाराबाबत तज्ज्ञ आहेत. मी त्यांच्याशी चर्चा करतो. राज्य सरकारच्या निर्णयावर करता येत असेल तर त्याला वेळ लागणार नाही.

**सभापती** : स्टेट गॅरंटी वर्षात द्यावी याला मर्यादा आहे. स्टेट गॅरंटी द्यायला नाबार्ड नाही म्हणणार नाही. परंतु परवानगी लागेल. एखाद्या वर्षात स्टेट गॅरंटी किती द्यावी याबाबत माझ्या माहितीप्रमाणे बहुतेक कान्स्टिट्यूशनल लिमिटेशन्स आहेत, अशी माझी तरी समजूत आहे. आपण चर्चा करुन बाब विचारात घ्यावी.

श्री.चंद्रकांत पाटील : पुनर्गठन करण्याच्या विषयामध्ये राज्य सरकार म्हणून जे जे करावयाचे आहे ते सरकार करणार आहे. केंद्र सरकारकडे जाऊन पाठपुरावा करावयाचा आहे तो नक्की करु.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, ऊसाबाबत एफआरपी दर डॉ.सी.रंगराजन समितीच्या सूत्राप्रमाणे निश्चित केले होते. रिझर्व्ह बँकेच्या माजी गव्हर्नरांनी 40 देशातील साखर उद्योगाचा अभ्यास करुन साखर उद्योगाला कायमस्वरुपी संजीवनी देणारा अहवाल केंद्र सरकारला

सादर केला. सरकारने तो अहवाल अंशतः स्वीकारला. तो पूर्णतः स्वीकारला तर काही अडचण येणार नाही.





श्री.चंद्रकांत पाटील : दोन विषय वेगळे करावे लागतील. एक आहे लगेचच जे करावयाचे आहे तो आणि एक दूरचा विचार आहे. एक सकारात्मक चिठ्ठी आलेली आहे. संचालकांनी मालमत्ता गहाण ठेवणे बंधनकारक नाही. बँकेच्या इच्छेवर आहे. बँक due diligence ने निर्णय घेतील. एनपीए मधील कारखान्यामध्ये गॅरंटी आवश्यक राहील. एनपीएमधील कारखान्यांना राज्य सरकारने हमी देण्याचा निर्णय ऑलरेडी घेतला आहे. बॅकांनी प्रस्ताव रिजेक्ट केला आहे, शासन गॅरंटी देईल. 2200 कोटी बाबतचा मुद्दा नाही. आपले शेतक-यांना 3200 कोटी देणे आहे.

नंतर 2एस.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

हजार कोटीच्या बाबतीतच मुद्दा राहील. दिल्लीमध्ये जी बैठक झाली होती त्यामध्ये रिस्ट्रक्चरींग ऑफ लोनचा देखील विषय आला होता. त्या त्या राज्यांना सहा हजार कोटी रूपयांचे पॅकेज दिल्यानंतर देखील एफआरपी राहील. तो देण्यासाठी थोडा अवधी मिळावा. हा निर्णय केंद्राने घ्यावयाचा असून केंद्र त्याप्रमाणे निर्णय घेईल.

एक महत्त्वाचा निर्णय केंद्र शासनाने करावा म्हणून आपण आग्रह धरत आहोत. रॉ शुगर एक्सपोर्ट अनुदानाची तारीख 30 सप्टेंबर होती. ती 30 डिसेंबर पर्यंत वाढून मिळावी अशी विनंती केली आहे. ती तारीख देखील वाढवून मिळेल. आपण एक सगळ्यात महत्त्वाची सूचना मांडली आहे. ती मान्य झाली तर एकूणच पुढच्या वर्षीचे संकट दूर होईल. आपण व्हाईट शुगर एक्सपोर्टला परवानगी मिळावी म्हणून सूचना केली आहे. व्हाईट शुगर एक्सपोर्ट करताना जो लॉस येईल तो लॉस केंद्र सरकारने सपोर्ट प्राईझ म्हणून द्यावा. हे झाले तर रॉ शुगर आणि व्हाईट शुगर या दोन्हींच्या एक्सपोर्टमधून आपल्याकडील एक्सेस शुगर सुरूवातीलाच बाहेर काढता येईल आणि त्यामुळे थोडे रेट सुधारतील असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जी सूचना केली आहे त्याची वस्तुस्थिती मी लगेचच चेक करतो. तसे झाले तर आपले खूपच प्रश्न सुटतील. नव्हे आपले सगळे प्रश्न कायमचेच संपतील. हे लाँग टर्म सोल्युशन आहे. राज्याने सगळी साखर विकत घ्यायची. त्यातील सामान्य माणसाला 10 ते 15 टक्के लागणारी साखर रेशनवर द्यायची आणि ज्यांना व्यवसायासाठी साखर लागते ती जास्त रेटने विकायची. त्या प्रॉफिटमधून शुगर डेव्हलपमेंट फंड क्रीएट करायचा. तो एसडीएफ हा साखर कारखानदारीला त्या त्या वेळी द्यायचा. हे किती प्रॅक्टीकली आहे हे पहावे लागेल. कारण राज्याला ती साखर विकत घेऊन पैसे लगेच द्यावे लागतील. जी साखर आपल्याकडे राहील तिच्या स्टॉकचा देखील मुद्दा येईल. त्यामुळे डिस्क्रीमीनेशन येईल. एकाला एक रेट व दुसऱ्याला दुसरा रेट हे राज्य घटनेप्रमाणे चालेल काय किंवा कोर्टामध्ये चॅलेंज होईल काय या सगळ्यांचा पुन्हा एकदा नीट विचार करून त्या विषयामध्ये काय करता येईल हे पाहण्यात येईल.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बाकी कुठल्या गोष्टीतून आपल्याला पैसे मिळू शकतात हे पाहिले पाहिजे. इथेनॉलमधून आपल्याला पैसे मिळू शकतात. त्यामुळे सरकारने ज्यांच्याकडे इथेनॉल प्रोजेक्ट नाही त्यांना इथेनॉल प्रोजेक्ट तयार करण्यासाठी मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडे आपला आग्रह आहे की, इथेनॉल ब्लेंडींग पाच टक्के आहे ते किमान 10 टक्के करावे म्हणजे आपोआपच इथेनॉलची रिक्वायरमेंट वाढेल. इथेनॉलवरील एक्साईज माफ करण्याचा निर्णय आपण केंद्र शासनाकडून करून घेतला आहे. त्यामुळे इथेनॉलला प्रती किलोमीटर सहा रुपये जास्त मिळतील. बाहेरून साखर जास्त येऊ नये म्हणून 25 टक्के इम्पोर्ट ड्युटी 40 टक्क्यांवर नेण्याचे केंद्र शासनाने मान्य केलेले आहे. अशा सगळ्या मार्गांनी साखर उद्योगाला जीवंत ठेवावे, सुदृढ करावे असाच प्रयत्न आहे. आपण सर्वजण ग्रामीण भागात राहणारे आहोत. मी ज्या गारगोटी भागात राहतो तेथील बिदरी कारखान्याने शाळा, कॉलेज काढून अनेक प्रकारची प्रगती केली. महाराष्ट्रामध्ये साखर कारखानदारीचे आर्थिक योगदान आहे. तसे शैक्षणिक, सांस्कृतिक योगदान आहे. वारणेने सांस्कृतिक क्षेत्रात काम केले आहे. त्यामुळे या सगळ्यामध्ये सरकार बदलल्याने काहीच फरक पडत नाही. हजारो, लाखो, करोडो लोकांना रोजगार मिळणाऱ्या गोष्टी बंद केल्यातर ते बूमरँग शेवटी अंगावरच येणार आहे. त्यामुळे यात कुठेही खोट नाही. फक्त निर्माण झालेली परिस्थिती इतकी बिकट आहे की, त्यातून मार्ग काढण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. या विषयासंबंधी आपण खूप तज्ज्ञांशी बोलत आहोत. श्री.विक्रमसिंह घाटगे आताच गेले. मी खूप वेळा त्यांच्याशी या विषयावर बोललो आहे. श्री.सा.रे.पाटील यांच्याशी माझे नियमित बोलणे होत होते. दोन दिवस साखर परिषद घेण्यात आली होती. त्याला 1200 जण उपस्थित होते. त्यावेळी आपण सगळ्या प्रकारची टेक्निकल सजेशन्स घेतली. साखर कारखानदारीसाठी दहा वर्षांचा रोड मॅप तयार करण्यासाठी श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. त्यांनी काय केले पाहिजे, को-जनरेशन स्वस्त कसे करता येईल यासंबंधातील पहिला ड्राफ्ट देखील सबमिट केला आहे. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील...

एक को-जनरेशनचा प्रोजेक्ट करण्यासाठी 150 रूपये लागतात. त्यामुळे तो प्रोजेक्ट उभा करण्यासाठी कारखाना घाबरतो. तो प्रोजेक्ट उभा केल्याशिवाय त्या साखर कारखान्याचे उत्पन्न वाढणार नाही. अशा प्रकारच्या खूप गोष्टी करून हा उद्योग, ही कारखानदारी वाचावी असा या सरकारचा प्रयत्न आहे. ज्या ज्या सूचना आल्या आहेत त्यांचे स्वागत आहे. त्या सूचना आगामी काळामध्ये म्हणजे लगेचच्या आठवड्यामध्ये मार्गी लावाव्या लागतील. रि-स्ट्रक्चरींगचा विषय उद्या परवा मार्गी लावावा लागेल. या सर्व गोष्टी शासन करेल असा विश्वास देऊन मी माझे बोलणे संपवितो.

.......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, अगदी सकारात्मक उत्तर दिल्याबद्दल मी माननीय मंत्र्यांना धन्यवाद देतो. या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला जे अपेक्षित होते ते मंत्री महोदयांनी 90 टक्क्यांवर आणून ठेवलेले आहे. इंडस्ट्रीसाठी वेगळ्या पद्धतीने साखर देण्यात यावी अशी मी येथे सूचना केली आहे. ही सूचना आपण ऑल इंडिया लेव्हलवर न्यावी. जेव्हा आपली दिल्लीला बैठक होईल तेव्हा ही सूचना मांडावी. त्यांना शक्य नसेल तर आपण हे राज्यामध्ये करू शकतो. गोव्यामध्ये पेट्रोलचा दर पाच रूपयांनी कमी आहे. पण पलीकडे माननीय मंत्री श्री.दीपक केसरकर यांच्या मतदार संघात गेलो की, सात रूपयाने दर वाढतात. जेव्हा साखर नियंत्रित होती त्यावेळी ती रेशनवर मिळत होती. त्यावेळी दिल्लीवरून आपल्याला कोटा रिलीज केला जात होता. त्यावेळी रेशनवरील सारखरेचा दर वेगळा आणि खुल्या बाजारातील दर वेगळा होता. त्यामुळे ही चर्चा राजकीय होता कामा नये. एक तासाची चर्चा आपण चार तासांची केल्याबद्दल मी सहकार मंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. आजच्या या चर्चेमुळे साखर उद्योगाला एक वेगळी दिशा मिळेल, दिलासा मिळेल. मी माननीय सभापतींना देखील धन्यवाद देतो. त्यांनी माझ्या विनंती वरून ही चर्चा आज घडवून आणली. या चर्चेकडे साखर उत्पादक शेतकरी आशेने बघत आहेत. या अधिवेशनात काही तरी निर्णय होईल असे त्यांना वाटते. आजच्या चर्चेच्या माध्यमातून सकारात्मक आशेचा किरण माननीय मंत्र्यांनी दाखविल्याबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो.

**सभापती :** मंत्रिमहोदय, आपल्या प्रयत्नांना आमच्या सर्वांच्या शुभेच्छा आहेत. आमच्या जबाबदाऱ्या ह्या मोठ्या आहेत. आम्ही चुका केल्या आहेत. त्या सावरण्याची जबाबदारीही आपल्यावर येणार आहे. अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

......

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या सभागृहासमोर 10 बिले पेंडींग आहेत. तत्पूर्वी मी सभागृहाच्या कामकाजाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढवित आहे. या दहा बिलांपैकी बऱ्याच बिलांना सुधारणा आलेल्या आहेत. मला असे वाटते की, ज्या बिलांना सुधारणा नाहीत अशी बिले आज आपण चर्चेसाठी घेऊ या. आजच्या कामकाजपत्रिकेत 1 (क) अंतर्गत दर्शविण्यात आलेले वि.प.वि.क्रमांक 12 पुढे ढकलण्यात यावे अशी विनंती माननीय मंत्र्यांनीच केलेली आहे. त्यामुळे ते बिल देखील घेता येणार नाही. त्या बिलाला देखील सुधारणा आहेत. त्यामुळे सागरी मासेमारी नियमन विधेयक व हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबात विधेयक यांना सुधारणा नसल्यामुळे ही विधेयके आता आपण चर्चेला घेऊ या. जिल्हा परिषदेच्या बिलावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्याने ते नंतर घेण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण ज्या दोन बिलांचा उल्लेख केला आहे ती घेण्यास हरकत नाही. त्या बिलांवर आपण सन्माननीय सदस्यांना बोलण्यास अनुमती द्यावी. अन्य बिलांवर आपण नंतर सविस्तर चर्चा करूया.

**सभापती :** ठीक आहे.आता वि.प.वि.क्रमांक 10 घेण्यात येईल.

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. X OF 2015**

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA MARINE FISHING REGULATION ACT, 1981.)

श्री.विजय देशमुख (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 10- महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, 1981 यात सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

या नंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय,पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभागृहात महाराष्ट्र सागरी मासेमारीचे विधेयक सुरु आहे. परंतु सभागृहात कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज कॅबिनेट मंत्री येई पर्यंत स्थगित करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** कॅबिनेट मंत्र्यांना सभागृहात उपस्थित राहण्याविषयी कळविण्यात यावे. मंत्री महोदय आपण विधेयक आणण्यामागचा उद्देश सांगावा.

श्री. विजय शिंदे : सभापती महोदय, आपल्या राज्यात नोंदणीकृत नौकांची संख्या 23115 असून यापूर्वी नौकांची नोंदणी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून केली जात होती. परंतु आता केंद्र सरकारने सागरी सुरक्षेच्या कारणास्तव 14/8/2014 च्या अधिसूचनेनुसार सदर नोंदणी मत्स्य विभागाकडे सोपवली असून त्यानुसार राज्याच्या कायद्यात बदल करणे आवश्यक असून नौकांची नोंदणी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड ऐवजी मत्स्य व्यवसाय विभागामार्फत करण्यासाठी सदर सुधारणा विधेयक मांडण्यात आले आहे.

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम,1981 मधील कलम 2 च्या खंड (आय) मध्ये नोंदणी अधिकारी म्हणून महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या बंदर अधिकारी ऐवजी सहाय्यक आयुक्त व्यवसाय असा बदल प्रस्तावित आहे. कलम 13(1)अपिलीय अधिकारी मुख्य बंदर अधिकारी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड ऐवजी आयुक्त मत्स्य व्यवसाय असे प्रस्तावित आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे विधेयक मासेमारीच्या नोकांच्या रजिस्ट्रशेनच्या संदर्भातील आहे. आजच्या परिस्थितीत समुद्रात असणाऱ्या नौका मग त्या मासेमारी करणाऱ्या असोत, वाहतुकीच्या असोत किंवा अवजड मालाची वाहतुक करणाऱ्या असोत या सर्व नौकांच्या रजिस्ट्रेशनची जबाबदारी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड या एका संस्थेकडे होती. नौकांसाठी बंदराचा विकास करण्याचे काम महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डचे होते. मासेमारीच्या ज्या नौका आहेत त्यांचे रजिस्ट्रेशन फिशरीज डिपार्टमेंटकडे दिल्यानंतर बंदराच्या विकासासाठी जी आर्थिक ताकद लागते ती नौकांच्या रजिस्ट्रेशन पासून मिळत होती किंवा इतर टॅक्सेशनच्या तसेच सरकारच्या मदतीच्या माध्यमातून मिळत होती. मासेमारीसाठी लागणारी जी बंदरे आहेत त्यांचा विकास व मासेमारीचा ताळमेळ आपण कशा पध्दतीने करणार आहोत ? बिलाच्या सुधारणेमुळे हा संपूर्ण भाग फिशरीज डिपार्टमेंटकडे गेला ही चांगली गोष्ट आहे. परंतु बंदराचा विकास महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डकडे ठेवणार आहात काय ? वाहतुकीची बंदरे महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डकडे ठेवले तर आम्ही ती समजू शकतो. परंतु मासेमारीची जी काही बंदरे आहेत त्यांचा विकास मासेमारी ज्या पध्दतीने वाढते किंवा त्याला लागणाऱ्या ज्या काही सुविधा आहेत त्या सुविधा निर्माण करण्यासाठी त्याची सांगड घालणे अत्यंत आवश्यक आहे. या बिलाच्या माध्यमातून ती सांगड घातलेली दिसत नाही. मत्स्य व्यवसायाच्या बंदराचा विकास यातून होईल असे वाटत नाही. तसेच यामध्ये कोऑर्डीनेशन राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भातील योग्य ती खबरदारी सरकारने घेतली पाहिजे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या बिलाची मागणी आम्ही याच सभागृहात केली होती. मच्छीमारांचे रजिस्ट्रेशन महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डकडे होते व मच्छीमार असल्याचा दाखला मच्छिमारांकडून घ्यावा लागत होता. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डकडून अनेक वेळा बोगस रजिस्ट्रेशन केले जात होते. डिझेलची सबसिडी ही होडीवर मिळत असते. पुरवणी मागण्यामध्ये या बिलाच्या संदर्भात आम्ही मागणी केली होती त्यावेळेस सन्माननीय मंत्री श्री.खडसे साहेबांनी त्यास संमती दिली होती त्यामुळे मी त्यांचे खासकरुन अभिनंदन करतो. डिझेलच्या सबसिडीमध्ये पारदर्शकता आणली तर निम्मी सबसिडी कमी होऊ शकते. फिशरीजचे काम मच्छीमार खात्याकडेच आहे. कन्स्ट्रक्शनचे काम हर्बरकडे होते ते सार्वजनिक बांधकाम खात्याकडे द्यावे अशी मागणी गेल्यावेळेस मी केली होती ती मागणी सुध्दा राज्य शासनाने मंजूर केलेली असून त्यासंदर्भात मला शासनाकडून पत्रही दिले आहे. हे विधेयक फार चांगले आहे. यामध्ये पारदर्शकता येण्याच्या दृष्टिकोनातून सर्व रजिस्ट्रेशनचे संगणकीकरण होईल, याचे कार्यालय तालुक्याच्या ठिकाणी येणे आवश्यक आहे. एका ठिकाणचा कार्यभार आयुक्त किंवा उपायुक्ताकडे ठेवला तरी चालेल. आरटीओ तालुक्याच्या ठिकाणी ज्या प्रमाणे कॅम्प घेऊन रजिस्ट्रेशन करी असतात त्याप्रमाणे अधिकाऱ्यांना कॅम्प करण्याची सूचना दिली जावी. ज्या ठिकाणी मच्छिमारीच्या जास्त होडया आहेत त्यांची संख्या बघून कॅम्पचा दिवस ठेवून होडयांचे रजिस्ट्रेशन केले पाहिजे. या बिलाचे समर्थन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राहुल नार्वेकर (नामनियुक्त): सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, होडयांचे रजिस्ट्रेशन पूर्वी मेरिटाईम बोर्डकडे होते परंतु आा होडयांचे रजिस्ट्रेशन फिशरीज कमिशनरांकडे केले जाणार आहे. हे सर्व केंद्रशासनाच्या सिक्यूरिटी नॉर्म्स प्रमाणे करणे आवश्यक आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, मुंबईमध्ये मच्छीमारी करणाऱ्या अनेक बोटी आहेत तसेच मच्छीमारी करणाऱ्या बोटींशिवाय प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटी सुध्दा मोठया प्रमाणात आहेत. गेटऑफ इंडियाला स्पीड बोटी सुध्दा उपलब्ध आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांच्या ट्रान्सपोर्टच्या बोटी आहेत. असे असताना अर्धे रजिस्ट्रेशन महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडे आणि अर्धे रजिस्ट्रेशन फिशरीज डिपार्टमेंटकडे असल्यामुळे दोन एजन्सी यामध्ये काम करतात. यामुळे कॉम्प्लेक्सीटीज वाढू शकतात, त्या कमी होऊ शकत नाहीत. त्यामुळे यासंदर्भात शासनाकडे कोणता उपाय आहे ?

---

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.प्रकाशजी बिनसाळे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील व सन्माननीय सदस्य ॲड.राहूल नार्वेकर यांनी या विधेयकाच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, नौकांची नोंदणी शुल्क नगण्य आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले होते की, नौकांचे नोंदणी शुल्क किती राहणार आहे तसेच बंदराचा निधी कसा जमा होणार आहे ? मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत. नौकांची नोंदणी शुल्क नगण्य असून बंदरांचा विकास करण्याचे कामे मरिटाईम बोर्डाच्या स्वतंत्र निधीतून केले जात असते. त्यामुळे बंदराचा विकास मेरिटाईम बोर्डाच्या स्वतंत्र निधीमधून केला जाणार आहे. प्रत्येक तालुक्यांमध्ये होडयांना परवानगी देणारे अधिकारी असून त्यासंदर्भातील ऑनलाईन रजिस्ट्रेशन देण्यात येणार आहे. त्यामुळे त्या तालुक्यातील परवाना अधिकाऱ्यांमार्फत रजिस्ट्रेशन केले जाणार आहे. मुंबईवर 26/11 चा हल्ला हा मासेमारी बोटीने झाला होता, त्यामुळे बोटींचा परवाना व नोंदणी या दोन्ही गोष्टी एकाच विभागाकडे असणे आवश्यक असल्यामुळे हे बिल येथे सादर करण्यात आले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :**विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 10 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 10 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## सभागृहाच्या कामकाजाबाबत

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्या सूचनेप्रमाणे आणि सभागृहाच्या पद्धतीला थोडे बाजूला सारुन कॅबिनेट मंत्र्यांच्या अनुपस्थितीत आपण एक विधेयक मंजूर केले. आता आपण दुसरे विधेयक घेत आहोत पण त्या विभागाचे मंत्री आणि राज्यमंत्रीही सभागृहात उपस्थित नाहीत. तेव्हा ते विधेयक मांडायचे कसे हा तांत्रिक मुद्दा आहे.

**सभापती** : मला सदनाला एवढेच सांगायचे आहे की, आपले मूलभूत कर्तव्य हे कायदा करण्याचे आहे. कारण हे कायदेमंडळ आहे ते पूर्ण व्हावे एवढीच अपेक्षा आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभा□ृहाची बैठ□ उद्या, शुक्रवार, दिनांक 24 जुलै, 2015 रोजी सकाळी 10.00 वाजता पु□: भरेल.

सकाळी 10.00 ते 11.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ सायंकाळी 7 वाजू□02 मि□िटां□ी, शुक्रवार, दि□ां□ 24 जुलै, 2015 रोजीच्या स□ाळी 10.00 वाजेपर्य□त स्थगि□ झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION